# राष्ट्रयोगी

## प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज
## (आचार्य किशोरजी व्यास)

लेखक
अनिल सहस्त्रबुद्धे

मोरया प्रकाशन
सुविचार आणि सुसंस्कार यांचा प्रसार हाच आमचा विचार

**राष्ट्रयोगी (विभूतिमत्त्व दर्शन)**
Rashtrayogi (Holy Personality)

**लेखक :**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे**
‘आई’, समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रकाशक / मुद्रक**
दिलीप महाजन / गौरी देव / योगिनी आठल्ये
मोरया प्रकाशन
‘अनुश्री’, ४०/१०, एरंडवणा, पुणे ४११०३८
मो. ९२२३५०१७९७, ८६००१६६२९७
६, ‘दिव्यकुंज’. सुदर्शननगर, R10 एम.आय.डी.सी.,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३
email : info@moryaprakashan.com
web. www.moryaprakashan.com

**प्रथमावृत्ती** : २०२४

© सौ. उषा अनिल सहस्त्रबुद्धे

ISBN 978-93-92269-37-0

**अक्षरजुळणी** : श्रीपाद कुलकर्णी

**मूल्य** /-

सनातन वैश्विक राष्ट्रपुरुष
प्रभू श्रीराम चरणी...

# येणे वाग्यज्ञे तोषावे...

प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांच्या विभूतिमत्त्वाचं दर्शन घडविणाऱ्या, ग्रंथाचं लेखन करण्याचं परमभाग्य मिळालं, ही भगवान महर्षि अगस्तीमुनींची कृपा! भगवान महर्षि अगस्तीमुनींनी, ''मला लिहून प्रकट कर!'' अशी आज्ञा दिली. त्या क्षणापासून; मी माझा राहिलो नव्हतो. माझ्यासारख्या बुद्धिप्रामाण्यवाद्याला, हा दिव्य साक्षात्कार, अतर्क्य, अकल्पनीय आणि केवळ स्वप्नवत वाटला. प्रसंगानं परिणाम व्हायचा तोच होत गेला. सुचेना, वेडापिसा झालो. तेवढ्याच योगायोगाने स्वरूपात प.पू. स्वामींची भेट झाली. भगवान महर्षि अगस्तीमुनींनी दिलेली आज्ञा, त्यांच्याकडे भीतभीत निवेदित केली. महर्षिंच्याच दिव्यत्वाने, प.पू. स्वामींनी मला अधिकारवाणीने समुपदेशित केले. मी भानावर आलो. भगवान महर्षि अगस्तीमुनींच्या आदेशाप्रमाणे महर्षिंना 'अगस्त्य माहात्म्य' स्वरूपात प्रकट करण्याचा, यथाशक्ती प्रयत्न केला. ज्ञानयज्ञ सफल झाला. प.पू. स्वामींच्या दिव्य कृपाशीर्वादाने हे घडले. आता प.पू. स्वामींचे विभूतिमत्त्व लिहिण्याचे भाग्य लाभले, तेही सद्गुरू माउली ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीला साक्षी ठेवून!

मोरया प्रकाशनाचे प्रकाशक श्री. दिलीपजी महाजन हे माझ्याबरोबर माउलींच्या समाधिस्थळी होते. 'मनोस्वरूप विचार' आणि 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार' अशा मी लिहिलेल्या आणि मोरया प्रकाशनाच्या माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या, या दोन्ही ग्रंथांचे; सद्गुरू माउलींच्या संजीवन समाधीशी, ग्रंथ समर्पण करण्याचा हा प्रसंग. श्री. दिलीपजी मला म्हणाले, ''प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्याविषयी आपण लिहावे, मोरयाने ते प्रकाशित करावे. चरित्र लिहावे, चालेल?'' क्षणाचाही विलंब न करता मी अधीरतेने म्हणालो, ''अवश्य, आपण प.पू. स्वामींचे विभूतिमत्त्व दर्शन घडविणारे पुस्तक लिहूया!''

प.पू. स्वामींच्या कृपाऋणातून या जन्मी उतराई होणे शक्य नाही; तरी या संधीने कृतज्ञता तर व्यक्त करता येईल; असा विचार मी करीत होतो. ''ठरले तर मग!'' दिलीपराव म्हणाले, ''हो, हो; सगळं खरं, पण स्वामीजींच्या अनुमतीशिवाय कसं शक्य आहे?'' मी म्हणालो, ''हां ते खरंच, तुम्ही विचारा, मीही विचारतो. विचारून तर पाहू!'' दिलीपराव म्हणाले, ठरलं.

अशा लेखनाची आवश्यकता परमेश्वरस्वरूपाला कोठे असते? आपण आपले जागरण घडविण्यासाठी, स्तोत्रे, आरत्या, माहात्म्य, चरित्रे इ. लिहीत किंवा गात असतो. आम्ही आत्मविश्वासाने विचारले. दिवस, सप्ताह, महिना उलटला; तरी उत्तर नाही! मी तर आशाच सोडली. एक दिवस श्री. दिलीपरावांचा फोन खणाणला. ''आपल्याला, म्हणजे तुमच्या कामासाठी बोलावलंय!'' मी मेसेज टाकलाय. पाहा. मेसेज पाहिला. धारिष्ट्याने खात्री करून घेण्यासाठी प.पू. स्वामींना मेसेज पाठविला ''आपण सांगितलेल्या दिवशी, दिलेल्या वेळेत पोहोचतो.'' तत्काळ उत्तर आले, ''ठीक आहे.'' आनंदाला पारावार राहिला नाही. तेवढ्यात सौ. उषा म्हणाली, ''लेखन करायचे ठरले; तर 'नारद', 'हनुमान' या पुस्तकांप्रमाणे, मी लिहिण्याचे काम करणार!'' मी काही म्हणायचा प्रश्नच नव्हता.

प.पू. स्वामींची भेट घडली. लेखनाचा संकल्प झाला. मार्गदर्शन मिळाले. साहाय्यभूत ठरणारे, प.पू. स्वामींचे गत पन्नास वर्षांचे सहकारी, साधक डॉ. प्रकाश सोमण यांच्याशी प.पू. स्वामींनी रुजुवात करून दिली.

स्वतंत्र भारतमातेच्या अमृतकालात अयोध्येत भव्य-दिव्य-नव्य मंदिरात श्रीरामलल्लांची पुनर्स्थापना होत असताना हे दिव्य-पवित्र विभूतिदर्शन घडविणारा हा अक्षरयज्ञ पूर्णत्वास जाताना कृतकृत्य झाल्यासारखे वाटते आहे.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि प्रसन्न होतील. समस्त वाचकांना वाचनाचा आनंद, दिव्यानुभूतीसह मिळेल. प.पू. स्वामींना अपेक्षित, राष्ट्रयोग साधनेला व्यापक गती मिळेल; असा विश्वास वाटतो. सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानाच्या प्रक्रियेत, सहभागी होण्याचे भाग्य प.पू. स्वामींच्या कृपेने लाभते आहे, याचा आनंद वाटतो. श्री. दिलीप महाजनांना या संधीचे श्रेय जाते; हे तेवढेच निर्विवाद सत्य. भगवान महर्षि अगस्तीमुनींनी हे घडवून आणले; अशी माझी श्रद्धा आहे. त्याचबरोबर प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज, यांनी माउलींच्या ममतेने

हट्ट पुरविला, म्हणूनच हे लेखन शक्य झाले.

भाद्रपद कृ. ६ शके १९४४ 'श्री ज्ञानेश्वरी जयंती' अर्थात शुक्रवार दि. १६ सप्टेंबर २०२२ या शुभपर्वात आमच्या 'आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अ.नगर'ने प.पू. राष्ट्रयोगी विद्यावाचस्पती स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज (आचार्य किशोरजी व्यास) यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने गौरवित केले. श्रीरामजन्मभूमी ट्रस्ट अयोध्याचे कोषाध्यक्ष, श्रीकृष्ण जन्मभूमी ट्रस्ट मथुराचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र (नगर जिल्हा) या संत भूमीचे आणि अमृतवाहिनी प्रवरा मातेचे सुपुत्र, ज्येष्ठ तत्त्वज्ञ, संत, कवी, प्रवक्ता, राष्ट्रबोधक अशा या विभूतिमत्त्वाला देवगड संस्थानचे महंत प.पू.भास्करगिरिजी महाराज, प्रज्ञाचक्षू प.पू. मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज, प.पू. जगद्गुरु ज्ञानोबा-तुकोबा द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज, सराला बेट श्रीरामपूरचे महंत प.पू. गंगागिरी महाराज संस्थानचे महंत प.पू. रामगिरिजी महाराज, श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे विश्वस्त तथा अध्यक्ष व संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज प.पू. शिवाजीराव मोरे महाराज, समर्थ रामदास स्वामींचे विद्यमान अकरावे वंशज प.पू. महंत भूषण महारुद्र स्वामी आणि पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यात तुंगारेश्वर पर्वतावरील प.पू. बालयोगी सदानंद महाराज अशा सप्तर्षींच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी जी-२० च्या निमित्ताने प.पू. स्वामी गोविंददेव गिरींना हिंदू धर्मविषयक विचार प्रस्तुतीकरणाची भारताचे प्रतिनिधी म्हणून संधी मिळाल्याचे वृत्त आले. ही जीवनगौरव होत असतानाचा विशेष आनंददायक शुभसंदेश होय.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज, रामराष्ट्र अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आजीवन कार्यरत आहेत. भारताच्या अमृतकाळात प्रभू रामचंद्रांचे मंदिर साकारत असताना स्वामींच्या अमृतमहोत्सवात पवित्र भावनेने त्यांचे हे 'राष्ट्रयोगी' म्हणून विभूतिमत्त्व दर्शन; सनातन हिंदूधर्म विश्वराष्ट्रपुरुष प्रभू श्रीरामचरणी अर्पण.

**- अनिल सहस्रबुद्धे**

# अनुक्रमणिका

**॥ एक ॥**

**अवतरण व्यास किशोरांचे**

पवित्र ते कुळ पावन तो देश – राजस्थान ते महाराष्ट्र व्यासकुलाचा प्रवास – बिल्वपुरी दुमदुमली – व्यासकुलाची यक्षपरीक्षा – पुण्यश्लोक पं. मदनगोपालजींचे अवतरण – 'काला कलुवा' श्रीकृष्णाचा जन्म.

**॥ दोन ॥**

**किशोरांच्या शैशवापासूनच्या लीलांतही राष्ट्रवेध**

शैशवापासून अध्यात्माचा वेध तथा लल्ला की लीलाएँ ।– अरुण–तरुण वयातील लक्षवेधक लीला – तो राजहंस एक – सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोगाच्या साधनेसाठी भगव्या ध्वजाचे आवाहन.

**॥ तीन ॥**

**अभ्यासूनि प्रकटावे**

शिशु–बाल अवस्थेतील अभ्यास – पारंपरिक शिक्षणाबरोबरच सनातन भारतीय ज्ञानपरंपरेची ओढ – अरुण–तरुण वयातही पारंपरिक अभ्यासाबरोबर धार्मिक, आध्यात्मिक व राष्ट्रीय अभ्यास सुरूच – तत्त्वज्ञान विद्यापीठात प्रवेश – महातीर्थ काशीत प्रकटले 'आचार्य' – सिद्ध राष्ट्रयोग्याची अखंड अध्ययनसाधना.

**॥ चार ॥**

**सिद्ध, राष्ट्रयोगी पू. स्वामींचा कथा ज्ञानयज्ञ विजयरथ**

पंचविध कथा–ज्ञानयज्ञ – वाग्यज्ञाची सुरुवात – पू. स्वामीजींकडून दीक्षा घेऊन सेवाकार्यात सामील – कथा–ज्ञानयज्ञ माध्यमातून राष्ट्रपुनरुत्थानासाठीचे जागरण – अनुग्रहातून आत्मविश्वास–जागरण, प्रबोधन आणि लोकसंग्रह – कथा – ज्ञानयज्ञाच्या निमित्ताने आपल्या दिव्य विभूतिमत्त्वाचा प्रेमपूर्वक आविष्कार व लोकसंग्रह.

**॥ पाच ॥**

**विश्वोद्भवभुवना श्रीगुरुराया**

सद्गुरू माउली संत ज्ञानेश्वर – जगद्गुरू सद्गुरू, समन्वयमहर्षि संत श्री गुलाबराव महाराज – गुरुपदाची संकल्पना – गुरुपदाविषयी जनसामान्यांतील समज – पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे आध्यात्मिक क्षेत्रातील गुरू – वांशिक गुरुपरंपरा – पारंपरिक शिक्षणक्षेत्रातील शिक्षक–वर्ग – सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानासाठी गुरुपरंपरा.

## ।। सहा ।।

## सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोग-विचार

सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग विचार-संकल्पना - हिंदू पद स्पष्टीकरण - संदर्भ - राज्यघटनेतील हिंदू पद संकल्पना - मराठी तत्त्वज्ञान महाकोशातील हिंदू पद संकल्पना - धर्माचे मूलाधार : वेद यातील हिंदू कल्पना - हिंदू धर्माची मूलतत्त्वे - स्वामी विवेकानंदांचा मार्क्सच्या तुलनेत समावेशक हिंदू पदविचार - शंकराचार्यांचा वेदान्त विचार - विनोबाजींचा गीता प्रवचनातील विचार - श्री आद्य शंकराचार्यांच्या मतांचे परंपरेने स्पष्टीकरण - ब्रह्मन् एक समत्व - स्वरूपविचार - हिंदू धर्माचा गाभा - हिंदू धर्माचे स्वरूप - मराठी तत्त्वज्ञान महाकोशातील राष्ट्र ही संकल्पना - हिंदू राष्ट्र आणि हिंदू राष्ट्रवाद - वर्तमानकाळात तथा समकाळात हिंदूराष्ट्रविचार - पू. गोविंददेव गिरिंना प्रभावित करणारा समकालातील हिंदूराष्ट्र विचारस्त्रोत - सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग विचार - ऐतिहासिक अवलोकन - पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग विचाराचा गर्भितार्थ - सनातन हिंदूधर्म राष्ट्रयोग-विचार-सिद्धी.

## ।। सात ।।

## संत, तत्त्वज्ञ, कवी, बहुभाषाप्रभू पू. स्वामी गोविंददेव गिरि

संत श्री स्वामी गोविंददेव गिरि महाराज :- पू. स्वामींचे संतविषयक संकल्पनेचे स्पष्टीकरण - पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वात सर्वार्थाने संतपदाचा आविष्कार - तत्त्वज्ञ पू. स्वामी गोविंददेव गिरि - गुरुपरंपरेने तत्त्वज्ञान स्वीकार प्रक्रिया - डॉ. कुमठेकर प्रतिपादित ब्रह्मसूत्राचे शांकरभाष्य सारांशरूप - अद्वैत वेदान्त आणि संतांचा भक्तिमार्ग यांचा अनुबंध - योगदर्शनाशी वेदान्तदर्शनाचा अनुबंध - वेद आणि वेदान्त सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक धन - वेदान्त अर्थात उपनिषदांवरच्या आक्षेपांचे राष्ट्रपुनरुत्थापनासाठी स्पष्ट शब्दांत निराकरण - सनातन हिंदूधर्मराष्ट्रधारिणी श्रीमद् भगवद्गीता - श्रीमद् भागवत कथा-ज्ञानयज्ञ आणि राष्ट्रयोग - भगवान माउली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा राष्ट्रधर्म - संत श्री गुलाबराव महाराज - स्वामी विवेकानंदांच्या भूमिकेचा परिणाम - शिवसमर्थ योगाचा आदर्श - कवी पू. स्वामी गोविंददेव गिरि - वाग्यज्ञातील काव्यात्मकता - पू. स्वामी विरचित आरतीगीते - प्रार्थनांचा अनुवाद - पू. स्वामींची प्रार्थना - संस्कार-प्रेरणागीते - वंदनीय विभूतिमत्त्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन - बहुभाषाप्रभू पू. स्वामी गोविंददेव गिरि - राष्ट्रयोगी पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातील चतुरंगदर्शन.

## ।। आठ।।

## राष्ट्रयोग्याचा कथा–ज्ञानयज्ञ

कथा–ज्ञानयज्ञाचे वेगळेपण – भक्तिमार्गाने राष्ट्रयोगसाधनेची परंपरा – राष्ट्रयोग्याचा कथा–ज्ञानयज्ञ साध्य आणि साधनही – श्रीमद् भागवतकथा – श्रीमद् देवीभागवत महापुराण – महाभारत कथा – हनुमानकथा – रामकथा ज्ञानयज्ञ – तत्त्वज्ञानात्मक कथा–ज्ञानयज्ञ – कथा–ज्ञानयज्ञातून सर्वांगीण प्रबोध.

## ।। नऊ ।।

## द्रष्टा प्रबोधक

कथा–ज्ञानयज्ञ आणि प्रवचने यातील वेगळेपण – सा विद्या या विमुक्तये – युवाशक्तीच्या आत्मनिर्भरतेचा जागर – संस्कारित मनाने जीवन आणि राष्ट्र संपन्न करावे – वेद–वेदान्त अनुबंधित प्रबोधन – महान विभूतिमत्त्वांच्या प्रकाशात विचारप्रवर्तन – प.पू. द्वितीय सरसंघचालक श्री. मा. स. गोळवलकर गुरुजींच्या अंतिम संदेशाचा प्रभाव – राष्ट्रयोगी पू. स्वामी यांचा राष्ट्रयोगसाधकांशी हृदयसंवाद – समग्र जीवनपरिपोषक प्रबोधन.

## ।। दहा ।।

## ज्ञानवान – कर्म – यज्ञ

महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान – महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान ः कार्य स्वरूप – महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान संचालित वेदविद्यालयांचे जाळे – 'वेदश्री तपोवन' संकल्प – श्रीकृष्ण सेवा निधी – श्री गणेश समन्वय आश्रम – वंचितांचा आधार – स्वागत आपुले, आपुल्या धर्मगृही – संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलाचे कार्य – श्री ज्ञानेश्वर कन्या वात्सल्यधाम – कीर्तनकार सेवा – श्री गोविंद बालसंस्कार केंद्र – संत ज्ञानेश्वर वेदविद्यालय, वृंदावन – संत ज्ञानेश्वर आश्रम, कॅनडा – करुणामूर्ती पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सेवाकार्याचा गोवर्धन.

## ।। अकरा ।।

## राष्ट्रयोगसाधना–प्रेरक

गीता परिवार एक अभिनव उपक्रम – बालसंस्कार–शिबिरांचे आयोजन आणि विस्तार – संस्कार–शिबिरांचे स्वरूप आणि विस्तार – संस्कारवर्ग – कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिर – गीता परिवाराची उपक्रमशील प्रयोगसिद्धता – गीता परिवार विद्यमाने लक्षणीय प्रयोगसिद्ध उपक्रम :– १) नाट्याविष्कार, कथाकथन २) गीता पाठांतर स्पर्धा ३) गिरिभ्रमण ४) निःशस्त्र युद्ध / नियुद्ध ५) उत्सवांतून संस्कार, संस्कृती आणि राष्ट्रीय जागरण ६) हनुमान चालीसा–भक्तिमय राष्ट्रयोग साधना प्रयोग ७) विशेष उपक्रम– संस्कार बालभवन ८) गीता परिवार युवा मंच ९) पालकांसाठी प्रबोधन १०) पू. स्वामी–मार्गदर्शित प्रकाशने ११) जनकल्याण कार्यालय.

## ॥ बारा ॥

## राष्ट्रयोग्याचे संकल्प राष्ट्रमंदिर :–

## रामलल्ला–जन्मभूमिमंदिर

इतिहासाचे मनामनात जागरण :– (१) अयोध्या सनातन हिंदूधर्मराष्ट्राची राजधानी – (२) सात्त्विकतेवर साम्राज्यवादी संहारकांची आक्रमणे – (३) आक्रमणे निस्तेज करून परतविण्याचा इतिहास – (४) मूर्तिभंजक धर्मांध मोगल वंशीय बाबर – (५) संत समर्थ रामदास स्वामीशिष्य बाबा वैष्णवदास यांचे कार्य – (६) श्रीरामजन्मभूमिमंदिरासाठी ७९ लढाया – रामजन्मभूमीसाठी न्यायालयीन लढा – प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा श्रीरामजन्मभूमी मुक्ति आंदोलनात सुरुवातीपासूनच हिरिरीने सहभाग – श्री क्षेत्र आळंदी येथे वि.हिं.प.तर्फे धर्मसंमेलन – रामायण संमेलनातील विश्व हिंदू परिषदेचा विश्वसंचार – श्रीराम शिलापूजनाचा कार्यक्रम – निर्णायक जनआंदोलन – राष्ट्रनेता अडवाणींची रथयात्रा – रामजन्मभूमीसाठी ज्ञानेश्वरी पारायण – कारसेवा कार्यक्रमाला उधाण – कारसेवकांची निर्णायक कारसेवा – राष्ट्रनेता पंतप्रधान श्रीमान नरेंद्र मोदी सरकारला श्रीराममंदिर उभारण्याचा आदेश – राष्ट्रमंदिरासाठी निधिसंकलन – राष्ट्राच्या प्रथम नागरिकापासून निधिसंकलनाला सुरुवात – राष्ट्रयोगी पू. स्वामींचे घरातून निधिसंकलन – रामजन्मभूमिपूजन – राष्ट्राय स्वाहा! इदं न मम.

## ॥ तेरा ॥

## प्रकटे युगपरिवर्तनाची ब्रह्मवाणी

## ।। एक ।।
# अवतरण व्यास किशोरांचे

पवित्र ते कुळ पावन तो देश – राजस्थान ते महाराष्ट्र व्यासकुलाचा प्रवास – बिल्वपुरी दुमदुमली – व्यासकुलाची यक्षपरीक्षा – पुण्यश्लोक पं. मदनगोपालजींचे अवतरण – 'काला कलुवा' श्रीकृष्णाचा जन्म.

## ।। एक ।।

# अवतरण व्यास किशोरांचे

प्रवरा अमृतवाहिनीच्या पावन प्रवाहात, बिल्वतीर्थाचे ठायी तरंग उमटले. काहीतरी अलौकिक, आनंददायक घडण्याची चाहूल बिल्वपुरीला लागली. हरिहरस्वरूप श्री केशव गोविंदांच्या प्रांगणात शब्द उमटले, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' पाठोपाठ आसमंतात अनादि भावनांची स्पंदने उमटली -

**'सच्चिदानंद रूपाय विश्वोत्पत्त्यादिहेतवे ।**
**तापत्रय विनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।।'**

पुण्यश्लोक पं. मदनगोपालजी व्यास यांच्या धर्मपत्नी, व्रती सौभाग्यवती गुलाबदेवींच्या मानसात शुभशकुनांनी गर्दी केली. हे शुभसंकेत, त्यांच्या मनातील आर्त भक्तिभाव एकवटून; त्या पावन शकुनांचा उत्कटतेने अर्थ लावीत होते. परब्रह्माच्या भेटीलागी मन आतुर झाले होते. जणू, बिल्वतीर्थावरून अमृताचा शंखनाद करीत; सनातन काऊ शकुन सांगत आहे. संत ज्ञानेश्वर माउलींच्या अभंगाचे बोल भावाकाशात उमटले-

**पैल तो गे काऊ कोकताहे ।**
**शकुन गे माये सांगताहे ।।**
**उड उड रे काऊ । तुझे सोन्याने मढीन पाऊ ।**
**पाहुणे पंढरी राऊ । घरा कैं येती ।।**

पांडुरंगाचे श्रीमद् भागवत पुराणस्वरूप, अद्वैताचा उद्‌गार, शुकमुनींच्या मुखातून अवघ्या आसमंतात प्रतिध्वनित होत होता. जणू, प्रत्यक्ष भगवान नारदमुनी,

सनातनातून आलेली, भागवतपताका पुढे नेणारा, निर्विकल्प देवस्वरूप अवतार, प्रकट होत आहे; असे सांगत आहेत. नारदीय परंपरेतील संत नामदेवांच्या शब्दांत भाकीत कथन करावयाचे तर-

**म्हणती नारदमुनि परियेसी वो माते ।**
**सांगीन मी तूंते सत्य मानी ।।१।।**
**हा निर्विकल्प देव येतसे रूपा ।**
**करावया कृपा भक्तजनां ।।२।।**
**हा शरणांगता वत्सलु अनाथा कृपाळु**
**मिरवी दीन दयाळु ब्रीद जगीं ।।३।।**
**जो शब्द ब्रह्म जनिता सकळ विधिकर्ता ।**
**धर्माचा पाळिता पक्षपाती ।।४।।**
**म्हणोनि जन्मकर्में असंख्यात जगीं ।**
**केलीं याचलागीं नारायणें ।।५।।**

षट्‌तिला एकादशीच्या पावन पर्वात, राजस्थानातील नावा शहराच्या पं. नंदलालजी मिश्रा यांच्या शीलवती कन्या, गुलाबदेवी यांच्या उदरी प्रत्यक्ष शुकमुनींचे अवतार असावेत; असे दिव्य अर्भक प्रकटले. बालाजींच्या प्रसादमंदिरात, नित्य भागवतकथा-ज्ञानयज्ञ करणाऱ्या, व्यासकुलातील मदनगोपालजींना पुत्ररत्नाचा लाभ झाला. व्यासकुलात भजन निनादले-

**'नंदके घर आनंद भयो, जय कन्हैया लालकी ।**
**हाथी घोडा पालकी, जय कन्हैया लालकी ।।'**

या दिव्य शिशूची प्रभात आभा, अवघ्या बेलापूर ग्रामाने अनुभवली. भारतवर्षाचे पुनरुत्थान करून; अवघ्या वसुंधरेला विश्वकुटुंबीयत्वाच्या संवेदनेने सामावून; विश्वभरात भागवत-रंग भरणारा, दिव्य पुरुष प्रकटला होता!

**पावन बेलवनी । अवतार शुकमुनी**
**कथा निरूपणी । भागवत ।।१।।**
**किशोर बालाजी । आनंदे डोलती ।**
**भक्त जना मुक्ती । दंग कथे ।।२।।**
**व्यास वंश वेली । हरिहर कृपा झाली ।**
**निपजे बिल्ववनी । अमृतपुत्र ।।३।।**

**व्रती गुलाबदेवी । मदनगोपालजी ।**
**धन्य परिवारी । ज्ञानसूर्य ।।४।।**
**पूर्ण हा विरागी । देवर्षि कीर्तनी ।**
**सत्य प्रेम करुणी । कैवल्य हा ।।५।।**
**रामराष्ट्रासाठी । अवतार किशोरी ।**
**ज्ञानयज्ञ करी । सप्तखंडे ।।६।।**
**पावन धरती । पावन संस्कृति ।**
**सिद्ध राष्ट्रयोगी । अनिल म्हणे ।।७।।**

## पवित्र ते कुळ पावन तो देश :-

वेदान्त तत्त्वज्ञानाचा जन्म विश्वात्मक एकात्मता सिद्ध करण्यासाठी; पृथ्वीतलावर ज्या देशात अथवा भूप्रदेशात झाला तो देश खरोखरीच धन्य होय! विश्वातील अतिप्राचीन वाङ्मय म्हणून ज्या वाङ्मयाची सर्वमान्यता आहे त्या वाङ्मयाची संपादनपूर्वक मांडणी करणारे, भगवान कृष्ण-द्वैपायन, म्हणजे पराशर ऋषि व मत्स्यराजकन्या सत्यवतीचे पुत्र महर्षि व्यास, या भूमीत प्रकटले आणि हे व्यासपीठ विश्ववंद्य झाले! विश्वगुरु होण्याचा सन्मान या घटनेने मिळाला. विश्वकुटुंबीयत्वाचा संदेश मिळाला. राष्ट्रपुरुष या दृष्टीने, विश्वातील चराचराकडे अद्वैत दृष्टीने अर्थात समत्वाने पाहण्याचा संदेश या व्यासपीठावरून मिळाला. भगवान व्यासांनाही, संपूर्ण शांतीचा लाभ केवळ भक्तिभावाने म्हणजे राधाभावाने मिळेल, असे मार्गदर्शन करणाऱ्या नारदांनी, कृष्णभक्तीची अपूर्वाई ज्यात वर्णन केली आहे असे भगवद्भक्तिपुराण 'श्रीमद् भागवत' श्री व्यासांनी लिहावे असे सांगितले. व्यासांचे हे कुल भूमीएवढेच जगद्वंद्य होय. व्यास हे अतिप्राचीन कुल आहे. 'भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास' यात *श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर* या संस्थेने, भीष्म प्रकल्पांतर्गत पुराणे - 'भारताच्या इतिहासाचा व संस्कृतीचा ज्ञानकोश' या द्वितीय खंडात, व्यास या संज्ञेची व्याख्या केली आहे - '**वेदान् विव्यास इति व्यासः**' अर्थात् '**वैदिक शिकवणीचे विश्लेषण करून तिचा अर्थ स्पष्ट करून सांगतो तो व्यास.**' ही व्याख्या सार्थ ठरविणाऱ्या अठ्ठावीस व्यासांची नावे वायूपुराणात आली आहेत. त्या-त्या काळातील इतिहास, संस्कृती तसेच तत्त्वज्ञान यासह भौतिक तसेच सामाजिक शास्त्रातील घटना एकत्र गुंफून इतिहास हा विभाग तयार करण्याचे कार्य

व्यास करतात. वेदांचे असे स्पष्टीकरण, विश्लेषण करून; राष्ट्राच्या पुनरुत्थानाचे कार्य भरतखंडात अर्थात हिंदुस्थानात वैश्विक दृष्टिकोनातून वारंवार घडले आहे. म्हणूनच भरतखंड हा देश आणि व्यास हे कुल धन्य होय.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या कुलाचा विचार केला; तर हे कुल 'व्यास' संज्ञेच्या व्याख्येची यथार्थता, पिढ्यान्‌पिढ्या जपत भारतीय परंपरेचे प्रबोधनकार्य करीत आहे. म्हणूनच हे व्यास कुल धन्य होय.

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

या शांतिमंत्राने सत्य, प्रेम, करुणा या संवेदनात्मक विश्वात्मक एकात्मतेचा अर्थात विश्वात्मक राष्ट्रपुरुषाचा प्रेमस्वरूप संबंधपूर्वक बोध होतो. ही प्रेमस्वरूपता म्हणजे विश्वंभर अनंत श्रीकृष्णांविषयीचा भक्तिस्वरूप राधाभाव होय. ही राधाभावना अर्थात राधा, भगवान अनंत सच्चिदानंदस्वरूप श्रीकृष्णांच्या हृदयात पूर्णाद्वैताने वास करते; तशीच ती चराचराच्या ठिकाणीही असते. या राधाभावनेचा अर्थात प्रेमस्वरूपा भक्तीचा, अहर्निश जागर भक्तिस्वरूप देवर्षि नारद सनातनपणे करीत आहेत. हाच जागर करून पूर्ण मनःशांती मिळविण्यासाठी श्रीमद् भगवान नारदांच्या निरूपणावरून भगवान श्री वेद-व्यासांनी श्रीमद् भागवत-पुराणाची रचना केली. या व्यास कुळाची परंपरा; भगवान शुकमुनींनी भक्ती, ज्ञान, वैराग्यसाधनेने पुढे श्रीमद् भागवत निरूपणातून जागविली. कलियुगाचे ठायी नामसंकीर्तनाने पूर्णाद्वैतस्वरूप अर्थात राधास्वरूप होऊन, सायुज्यानुभूती ठायीच म्हणजे याचि देही याचि डोळा घेता येते; हे सर्वांना निवेदित करण्यासाठी; श्रीमद् ब्रह्मर्षि नारदांपासून संत गुलाबराव महाराजांपर्यंत, भक्तिसाधनेचे अनेकविध प्रकार मांडले गेले. या सर्व प्रकारांचे प्रत्यक्ष विधिनाट्यात्मक प्रचलन श्रीमद् भागवत कथा-ज्ञानयज्ञाद्वारे साधता येते हे भगवान ब्रह्मर्षि नारदांनी आणि भगवान शुकमुनींनी परोपरीने सांगितले. विश्वात्मक अद्वैत भावाने, एकात्म वैश्विक राष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी; अवतरलेल्या श्रीमद् भागवत ज्ञानपुरुषाची शिव, नारद, व्यास, शुक यांची व्यासकुलपरंपरा, कलियुगाच्या युगाब्दात व्यासकुलाने अखंडपणे सुरू ठेवली. त्या व्यासकुलात भगवान शुकस्वरूप स्वामी गोविंददेव गिरि यांचे अवतरण; याच परंपरेने हिंदू राष्ट्राचे अर्थात वैश्विक राष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी झाले; म्हणूनच हे कुल धन्य होय!

## राजस्थान ते महाराष्ट्र व्यास कुलाचा प्रवास :–

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यातील किशनगडजवळील सरगाव या गावात राहणाऱ्या, एका 'व्यास' आडनावाच्या, दाधिच ब्राह्मण कुटुंबावर स्थलांतर करण्याचा प्रसंग आला. हा काळ विचारात घेतला तर ब्रिटिश राजवटीच्या कुटिल कारस्थानामुळे भारतातील अनेक संस्थाने खालसा होत गेली. त्यामुळे हिंदुस्थानी संस्थानिक राजेरजवाड्यांच्या भक्कम पाठबळाने भारतीय परंपरेनुसार धर्मजागरणाचे, संस्कृतीसंरक्षणाचे पिढ्यान्‌पिढ्या कार्य करणाऱ्या पुरोहित वर्गावरही देशोधडी लागण्याचे प्रसंग गुदरले. वरसईकर गोडसे भटजी यांच्या 'माझा प्रवास' या लेखनात अशा अनेक ब्राह्मण कुटुंबांची कथा वर्णन केली गेली आहे. त्या काळात संस्थानिकांच्या आश्रयाने सुरक्षित असलेल्या अनेक भिक्षुक, पुरोहित, पुराणिक, वेदशास्त्रसंपन्न, भविष्यवेत्ते अशा लोकांवर उपासमारीची वेळ आली. छोट्या–छोट्या गावांत पौरोहित्य आणि पुराणकथन करीत तग धरून राहिलेली कुटुंबेदेखील यात होरपळली गेली. अशीच काहीशी परिस्थिती, अडीच–तीनहजार वस्तीच्या सरगावात राहणाऱ्या व्यास परिवारावर आली असावी. पुण्यश्लोक स्व. पं. मदनगोपालजी व्यासचरित्रात श्री. भारवी खरे लिहितात, 'जमीन अत्यंत सकस असली तरी पाण्याच्या अभावामुळे शेतीचे उत्पन्न अत्यंत तुटपुंजे होत असे. गावातील रहिवासी अशिक्षित परंतु अत्यंत श्रद्धाळू, पापभीरू आणि सदाचारी गावात थोडीच ब्राह्मण कुटुंबे. काही महाजन तर अधिक जाट किंवा अन्य जातींची होती. येथील पं. बालमुकुंदजी व्यास यांनी ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन किशनगढमध्ये सपरिवार स्थलांतर करून तेथेच राधाकृष्ण–प्रतिमेची स्थापना व आराधना करीत, नित्य श्रीमद् भागवताचे वाचन आणि गावात पौरोहित्य करण्यास प्रारंभ केला.' परिस्थिती काहीही असो; परिस्थितीवर मात करण्यासाठी धैर्याने पुढे सरसावून आपल्या ब्राह्मण वृत्तीने पौरोहित्य, नामसंकीर्तन आणि सामाजिक, सांस्कृतिक प्रबोधन करण्याचे कार्य निष्ठेने पं. बालमुकुंदजी करीतच राहिले.

सरगावला जवळ असलेले किशनगढ पं. बालमुकुंदजींनी अशा जिजीविषेने निवडले. पं. बालमुकुंदजी, राधाकृष्ण आणि श्रीमद् भागवत यांचे अनन्य उपासक होते. त्यांच्याजवळच्या विद्वत्तेमुळे आणि रसाळ भागवत कथा–ज्ञानयज्ञामुळे त्यांचा किशनगढमध्ये मोठा लौकिक होऊ लागला. किशनगढचे वातावरण

त्यांच्या वृत्तीला चांगलेच पोषक होते. महाप्रभू वल्लभाचार्यांच्या शुद्ध अद्वैत संप्रदायाचे अध्वर्यु भगवान मदनमोहनजी यांचे निवासस्थान आणि निंबार्क सांप्रदायी देवळामुळे किशनगढातील वातावरण भक्तिमय झाले होते. वैष्णवपंथी उत्सव राजाश्रयाने होत असल्यामुळे हे वातावरण अधिक भक्तिमय होई. त्यामुळे सरगावातून स्थलांतरित होऊन आलेल्या पं. बालमुकुंदजींना किशनगढमध्ये जड गेले नाही. पं. बालमुकुंदजींबरोबर त्यांचे लहान बंधू जगन्नाथजी हेही त्यांच्याबरोबरच किशनगढला आले होते.

पं. बालमुकुंदजी आणि पं. जगन्नाथजी यांचे 'महादेवजी' नामक बंधू मात्र सरगावातून हलले नाहीत. ते अशिक्षित होते. सहीच काय ती त्यांना करता येत होती. घराण्याच्या परंपरेप्रमाणे स्वभाव मात्र सात्त्विक होता. सतत गायत्री देवीच्या उपासनेत ते गढलेले असायचे. या उपासनेमुळे अथवा पूर्वसंचितामुळे त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली. मुखाद्वारे जे प्रकट होई तसेच घडे. सरगावात याविषयी चर्चा आणि श्रद्धा होती. त्यांच्या आशीर्वादात एवढे सामर्थ्य होते, की त्यांची वाणी ब्रह्मवाक्य ठरे. ब्रह्मचारी व्रतामुळे प्रपंचविस्ताराचा प्रश्नच नव्हता. उदरनिर्वाहाची जबाबदारी गावाने श्रद्धेने सांभाळली होती. आयुष्याच्या अखेरपर्यंत एकमार्गी साधना आणि 'उरलो उपकारापुरता' अशी वृत्ती जतन करीत ते समाधिस्थ झाले. पू. महादेवजींच्या महानिर्वाणानंतर, त्यांच्या साधनेची जागा गावकऱ्यांनी जतन केली. आजही त्यांचे हे समाधिस्थान श्रद्धावंतांच्या कामना पूर्ण करीत आहे.

पं. बालमुकुंदजी आणि त्यांचे बंधू जगन्नाथ यांनी किशनगढमध्ये स्थिरावयाचे ठरविले खरे; परंतु भविष्यात काही वेगळेच लिहिले होते. पं. बालमुकुंदजींच्या वडिलांचे अचानक देहावसान झाले. त्याच सुमारास सततच्या दुष्काळाची भीषणता अधिकच तीव्र झाली. सबंध राजस्थानात दुष्काळाने जीवन होरपळून निघाले. अवघ्या प्रदेशाची दयनीय अवस्था झाली. पोट भरण्यासाठी आणि वृत्ती सांभाळण्यासाठी दुष्काळग्रस्तांनी राजस्थान सोडून बाहेर पडायचे ठरविले. स्वाभाविकपणे व्यास कुटुंबीयांनादेखील तेथे राहणे अशक्य वाटू लागले. पं. बालमुकुंदजींनी व्यास कुटुंबातील सदस्यांना स्थलांतरित होण्याची अनिवार्यता शांतपणे समजावून सांगितली. अन्य मार्गही दिसत नव्हता. त्यातच ज्योतिषशास्त्रातील ज्ञानामुळे पं. बालमुकुंदजी यांचा निर्णय सर्वांचे भले करणाराच असणार याचा विश्वास सर्वांच्या ठायी होता. बंधू जगन्नाथही त्यांच्यासमवेत

निघाले आणि व्यास कुटुंब किशनगढ आणि राजस्थानातून भटके विमुक्त नारदीय जीवन अवलंबिण्यासाठी सिद्ध झाले.

संपत्तीची वानवा. प्रवासासाठी साधने कशी वापरावी हाच प्रश्न! अखेर पायी जाण्याचा निश्चय झाला. जगन्नाथदेखील मोठ्या उत्साहाने बालमुकुंदांच्या आज्ञेनुसार पायी जाण्यास तयार झाला. जणू राम-लक्ष्मण वनवासात जाण्यास तयार झाले. अशा परिस्थितीतही श्रीकृष्ण भगवंतांची भक्ती आणि श्रीमद् भागवत कथा-ज्ञानयज्ञ करण्याची वृत्ती निष्ठेने जपत, वेळेसाठीची वस्त्रं, विहिरीतून पाणी काढण्यासाठी कापडी बादली आणि अगदीच नडले तर बरोबर असावे म्हणून कसेबसे सांभाळलेले दोन पैसे कनवटीला; एवढ्याच साहित्यासह बरोबर श्रीमद् भागवताचा ग्रंथ घेऊन, द्विज बंधू मार्गस्थ झाले. बंधुद्वयांसमोर कोणतेही स्थान पक्के ठरलेले नव्हते. भगवंत नेईल तिकडे जायचे; भगवंतांची सेवा म्हणून वाटचाल करायची; याला कोणी नशिबाचा शोध घेणे म्हणेलही; परंतु भगवंतांच्या भक्तांचे नशीब भगवंतांच्याच स्वाधीन असते.

दोघेही दिवसभर चालायचे. वस्ती, गाव दिसले, अन्नब्रह्मासाठी यज्ञकर्म करण्याची वेळ झाली की माधुकरी मागायची. मिळेल त्या माधुकरीची आहुती देऊन उदरातील हुताशन शांतवायचा. रात्री एखादे मंदिर, एखादी धर्मशाळा असा मिळेल तो निवारा भगवंताची कृपा म्हणून स्वीकारायचा. दिवसभराच्या प्रवासात पदयात्रेबरोबरच श्रीमद् भागवत पाठाचे गुणगुणणे नामसप्ताहातील पहाऱ्याप्रमाणे सुरूच ठेवायचे. दमल्या-भागल्या शरीराला रात्री निद्राधीन करायचे. सकाळी उठून जेथे नदी, ओढा, विहीर मिळेल तेथे स्नानादी विधी उरकून शुचिर्भूततेने, नेटाने, भविष्ययात्रा सुरूच ठेवायची. शक्य तेथे प्रवचन, कथानिरूपण करावयाचे. पवित्र तीर्थस्थळी पूजनादि कर्मे करायची. जनता-जनार्दनावर विसंबून भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि सत्य, प्रेम, करुणा यांच्या जागरणासाठी व्रतस्थपणे यात्रा करीत पुढे निघायचे. पं. बालमुकुंदजींची अढळ श्रद्धा आणि ज्ञानसंवेदना त्यांना निश्चित ठिकाणी घेऊन जात होती. ठिकाणाचे नाव कळले नव्हते तरी दिशा मात्र जाणवत होती.

बंधू जगन्नाथजी, त्यांच्यावर विसंबून श्रद्धेने आणि तेवढ्याच व्रतस्थतेने अनुगमन करीत होते. मजल दरमजल करीत जायचे. मनात कुठलीही खंत नाही. दुःखाचा तर स्पर्श नाही. निराशा तर वाऱ्यालाही फिरकत नव्हती. चराचरातील

सच्चिदानंदस्वरूपाचे दर्शन घेत, श्रीकृष्णांचे जागर करीत आनंदमग्नतेने पुढे निघायचे. ठाकूरजींच्या भेटीच्या आसेने, आतुरतेने, उत्कटतेने पुढे निघायचे. वाड्या, वस्त्या, गावे, रानेवने, डोंगरदऱ्या, नदीनाले पार करीत; परीकथेतल्या नायकाप्रमाणे बंधुद्विजद्वय गुजरात, मध्यप्रदेश पार करून महाराष्ट्रात प्रविष्ट झाले. पुण्यापर्यंत आले. कृष्णाखोऱ्याचा निरोप घेतला. पं. बालमुकुंदांना अद्यापही अंतरात्म्यातून स्थिर होण्याचा संकेत मिळत नव्हता.

गोदावरीच्या खोऱ्यात प्रविष्ट झाले आणि अंतरात्म्याला ओढ लागली, अमृतवाहिनी आणि बिल्वतीर्थाची. हरिहरांच्या अद्वैताने बालमुकुंदांच्या आणि जगन्नाथजींच्या अंतर्मनाला संकेत दिला. पं. बालमुकुंदजींना जणू साक्षात मोहिनीराजांनी, राधाकृष्णांनी, केशवगोविंदांनी, ब्रह्मर्षि नारदांनी, महर्षि अगस्त्यांनी आवाहित केले. जणू बिल्वतीर्थ आणि अमृतवाहिनी प्रवरा हे या व्यासकुलाला वाल्मिकींच्या सान्निध्यात, बिल्वतीर्थातील असंख्य शिवरूपांच्या सान्निध्यात स्थिरावण्याची आज्ञा करीत होते. अमृतवाहिनी प्रवरा नदीच्या तीरी वसलेल्या बिल्ववृक्षाच्या छायेतील भक्तशिरोमणी भागवतबुवा आणि स्वामी विद्यानंद यांसारख्या संतांच्या सान्निध्यात स्थिरावण्याची आज्ञा केली. हीच आपली ज्ञानभूमी आणि कर्मभूमी अशी खूण बालमुकुंदांच्या मनाला पटली. बालमुकुंदजी आणि जगन्नाथजी केशवगोविंदांच्या अर्थात हरिहरांच्या अद्वैत नगरीत संचार करू लागले. तेथील कण न् कण त्यांना आपला वाटू लागला. बिल्ववनातील वारा त्यांना निवांत करीत होता. अमृतवाहिनीचा प्रवाह अमृतत्वाची साक्ष देत होता. भूमी लडिवाळपणे त्यांना सांभाळण्यासाठी आतुर झालीसे वाटत होती.

पं. बालमुकुंदांनी निश्चयपूर्वक भूमीला वंदन केले आणि नकळत त्यांच्या मुखातून, *'सच्चिदानंद रूपाय विश्वोत्पत्यादि हेतवे । तापत्रय विनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।'* प्रार्थना स्फुट झाली. नारदांचा 'नारायण' मंत्र आसमंतात भरून गेला. मनातल्या राधाभावाने बिल्वपुरीत पं. बालमुकुंदांना आणि पं. जगन्नाथजींना केशव गोविंदाचे दर्शन घडले आणि व्यासकुल बिल्वपुरीत अधिष्ठित झाले!

## बिल्वपुरी दुमदुमली :–

पं. बालमुकुंदजी आणि पं. जगन्नाथजी बेलापूर गावामध्ये आले. गावातील स्थानिक ब्राह्मणांच्या मनी थोडी असूया निर्माण झाली. तेही स्वाभाविकच होते. गावपातळीवर अशा नव्याने आलेल्या लोकांना जाणून घेण्याची स्वाभाविक ओढ

असते. स्थानिक ब्राह्मणांना मात्र नवा स्पर्धक उपटसुंभासारखा आला, असे वाटले. तो वरचढ तर होणार नाही ना, ही भयशंकाही मनात दाटली. बंधुद्वयांच्या शालीनतेमुळे तसेच विनयशीलतेमुळे स्थानिकांच्या मनात हळूहळू आत्मीयता निर्माण झाली. बेलापुरातील पू. स्वामी विद्यानंद परमहंस महाराज आणि संत श्री भागवतबुवा या दोन्ही महान विभूतींचे कृपाछत्र लाभले. त्यांचा वरदहस्तही उदारहस्ते लाभला.

पं. बालमुकुंदजी आणि पं. जगन्नाथजी यांचा भागवत-निरूपणातील अधिकार पाहून लोक थक्क झाले. कर्मकांडातील पांडित्य आणि ज्योतिषज्ञानातील अचूकता यामुळे या उभयतांविषयी आदर निर्माण झाला. अगदी तरुण वयात हे दोन्ही सात्त्विक पुरुष आध्यात्मिक आनंदात मग्न झाले. तेवढाच आनंद बेलापूरकरांनाही मिळू लागला. कृष्णभक्तीच्या अनन्य, उत्कट आविष्कारामुळे बिल्ववनातील शिव प्रसन्न झाले. राधा-कृष्ण, गोपाल-कृष्ण यांच्या भजनाने अवघी बिल्वपुरी निनादली. चार-पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अमृतवाहिनीच्या तीरावर, संतांच्या सत्संगामध्ये असलेल्या भूमीवर भागवतकथा-भक्तिज्ञानयज्ञाच्या वचनामृताचा वर्षाव होऊ लागला. आपण कोणीतरी आपद्ग्रस्त स्थलांतरित आश्रित म्हणून आलो आहोत; ही भावना परागंदा झाली. यशोदेचा भगवान श्रीकृष्णांना लळा लागावा तसा या बंधूद्वयीला बिल्वपुरीचा लळा लागला. चार-पाच वर्षे कशी निघून गेली हे कळलेही नाही. परिवाराला सोडून किशनगढाहून निघालेले हे तेजस्वी ब्राह्मणपुत्र बेलापुरात भागवताचार्य म्हणून वावरत होते.

एकदा किशनगढला जाऊन परिवाराला भेटावे आणि सर्व खुशाली सांगावी, असा विचार स्वामी विद्यानंद आणि भागवतबुवा यांनी त्यांच्यापुढे मांडून, राजस्थानला जाऊन परत येण्याचा सल्ला दिला. आता परिस्थिती बदलली होती. पायी जाण्याचे कारण नव्हते. त्यामुळे दोघांना किशनगढला जायला फारसा वेळ लागला नाही. संतसंग, भागवतकथन आणि कर्मकांड यांचे तेज तरुण पं. बालमुकुंदजी आणि पं. जगन्नाथजी यांच्या चेहऱ्यावर विलसत होते. सुमारे पाच वर्षांनंतर सुखरूप आणि नव्या उमेदीने ओतप्रोत अशा मुलांना पाहून; परिवारातील सर्वांना खूप आनंद झाला. दोघांनी बेलापुरातील आपल्या वास्तव्य-सुखरुपतेचे केलेले वर्णन ऐकून सर्व जण सुखावले. दोघांनीही आपला बेलापूर या पवित्र ग्रामातच स्थायिक होण्याचा निर्णय आग्रहपूर्वक सांगितला. त्यामुळे

तर परिवाराची काळजी दूर झाली. या मुलांना आता एकटे पाठवायचे नाही असे परिवारातील सर्वांनी ठरविले. अगदी थोड्या अवधीत अनुरूप वधू बघून दोघांचेही विवाह संपन्न झाले.

पं. बालमुकुंदजी, ठरविल्याप्रमाणे, नववधूसह कर्मभूमी म्हणून निश्चित केलेल्या बेलापूर या गावी जाण्यास निघाले. बेलापुरात पं. बालमुकुंदजी सपत्नीक पोहोचले तेव्हा नववधू मात्र नवा मुलुख, नवे वातावरण आणि एकलेपण यामुळे भांबावली. मारवाडी पद्धतीनुसार या नववधूला सहज मोकळेपणाने वावरणे काहीसे अवघडच जात होते. पं. बालमुकुंदजींनी पत्नीच्या मनातील संकोच आणि भय हळूहळू कमी केले. बेलापुरातील मंडळींनीही नवसासुरवाशिणीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. चार-दोन महिन्यांत गावातील महिलांमध्ये ही नववधू मिळून-मिसळून वागू लागली आणि रुळली. हळूहळू बस्तान नीट बसून प्रपंचाची गाडी सुविहितपणे सुरू झाली.

विवाहित पंडितजींची दिनचर्या सराईताप्रमाणे सुरू होती. पौरोहित्यातील शास्त्रशुद्ध ज्ञान, ज्योतिषशास्त्रातील अचूकता आणि श्रीमद् भागवतकथा निरूपणातील आगळ्यावेगळ्या रसाळ शैलीमुळे त्यांची पंचक्रोशीतच नव्हे तर दूरवर ख्याती पसरली. निरनिराळ्या गावांतून त्यांना आमंत्रणे येत राहिली. त्यांच्या या विस्ताराबरोबरच त्यांच्या प्रपंचवेलीचाही विस्तार झाला. पं. बालमुकुंदजींना पाठोपाठ दोन पुत्र आणि दोन कन्या झाल्या.

विद्वत्ता, शालीनता आणि शुचिर्भूतता यामुळे स्वामी विद्यानंद सरस्वती यांच्याशी त्यांचा थेट संवाद आणि एकांतातही चर्चा सुरू झाली. जणू स्वामीजी आणि पंडितजी यांचे जन्मोजन्मीचे ऋणानुबंध होते. पंडितजींचा अधिकार सर्वमान्य झाला. बेलापुरातील माहेश्वरी समाज तर त्यांचा एवढा आदर करीत, की समाजातील कोणत्याही समस्येचा अंतिम निर्णय पंडितजींच्या शब्दानुसार केला जाई. कधीकाळी आपल्या नशिबाचा शोध घेत, श्रीकृष्णांवर भार घालून बेलापुरात आलेले पंडितजी, आता स्वामी विद्यानंद सरस्वती, ह.भ.प. भागवत महाराज यांच्या बरोबरीने परिसराचे सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक धुरीण, मार्गदर्शक म्हणून वावरू लागले. या तिघांच्या अस्तित्वाने हरिहर भक्तीची पेठ फुलून गेली. अवघा आसमंत नामसंकीर्तनाने दुमदुमला.

## व्यास कुलाची यक्षपरीक्षा :-

बेलापूर नगरीच्या आध्यात्मिक वैभवाला गालबोट लावणारे प्रसंग नियतीने पुढे मांडून ठेवले होते. स्वामी विद्यानंद सरस्वती व भागवत महाराज यांच्या महानिर्वाणाने संपूर्ण आध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक धुरीणत्वाची जबाबदारी पं. बालमुकुंदजींवर येऊन पडली. अपार परिश्रम आणि कौटुंबिक जबाबदारी यांचा पं. बालमुकुंदजी व्यासांवर परिणाम झाला. त्यातच स्वामी विद्यानंद आणि भागवत महाराज यांच्या चिरवियोगाने पंडितजींना कृपाछत्र हरवल्याचे डाचत राहिले. अचानक किरकोळ आजाराचे निमित्त होऊन पं. बालमुकुंदजी यांचे देहावसान झाले. संपूर्ण व्यास कुटुंबावर दैवाने मोठा घाला घातला.

त्या वेळी त्यांचे ज्येष्ठ पुत्र त्र्यंबकराज सोळा वर्षांचे तर श्रीधरजी चौदा वर्षांचे होते. गावातील मोठा आधारस्तंभ उन्मळून पडला होता. अवघा परिसर हवालदिल झाला होता. व्यास परिवाराचे सगे-सोयरे दूरदेशी किशनगढाकडे होते.

पंडितजींच्या दुःखद निधनाचे वृत्त सर्वदूर पसरले. दूरदूरहून सांत्वना करण्यासाठी आलेली मंडळी चार समजुतीच्या गोष्टी सांगून जाऊ लागली. सारेच मुळी उद्ध्वस्त झालेले! या संकटामुळे अनेकांपुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या. 'पुण्यश्लोक स्व.पं. मदनगोपालजी व्यास (चरित्र)' या पुस्तकात लेखक श्री. भारवी खरे लिहितात- 'आता इतकं शास्त्रशुद्ध कर्मकांड कोण करणार, ज्योतिष कोण बघणार, रसाळ व ओघवत्या शैलीत भागवतकथा कोण सांगणार हे सर्वसामान्यांपुढे प्रश्न उभे; तर घराचा गाडा व्यवस्थित चालविण्याबाबत कुटुंबापुढे प्रश्न 'आ' वासून उभा होता. दुःखाच्या या आघातातही त्र्यंबकराजजी व श्रीधरजी यांनी धीर धरला. पितृनिधनानंतर सर्व शास्त्रीय विधी पार पाडून हळूहळू आपल्या नित्यकर्माला सुरुवात केली.

गावातील माहेश्वरी समाजापुढे तर वेगळाच प्रश्न उभा राहिला. बालाजी मंदिरात भागवतकथा-निरूपणाची परंपरा अनेक वर्षे प्रचलित होती. आत्तापर्यंत पं. बालमुकुंदजी आसन ग्रहण करून अतिशय लाघवी, रसाळ व मधुर शब्दांत कथा सांगून अनेकांना संतुष्ट करीत असत. पंडितजीदेखील गावातील मंदिरात कथाकथन करण्याचा परिपाठ सातत्याने पाळत असत. सारांश, गावातील बालाजी

मंदिरातील भागवत आणि पंडित बालमुकुंदजी यांचा अलिखित करार, समझोताच जणू झाला होता. त्यामुळे माहेश्वरी समाजातील कर्त्या मंडळींपुढे प्रश्न पडला की, या वर्षी ही जबाबदारी कोण उचलणार!'

गावातील माहेश्वरी बालाजी मंदिरात पंडित बालमुकुंदजींनीच भागवतकथा ज्ञानयज्ञ करावा असा पायंडा पडला होता. नाइलाजाने माहेश्वरी समाजाच्या पुरुष नेतेमंडळींनी, दुसरा कोणी भागवतकथाकार शोधून कार्यक्रम त्याच्याकडे सोपवावा असा निर्णय घेतला. माहेश्वरी समाजातल्या स्त्रियांनी मात्र हा निर्णय कसोशीने थांबवला. पंडित बालमुकुंदजी हयात नसले तरी गावाच्या बालाजी मंदिरातील भागवतकथा सांगण्याची परंपरा त्यांच्याच ज्येष्ठ पुत्र पंडित त्र्यंबकराजजींनी चालू ठेवावी; अन्यथा बहिष्कार टाकू! असा निर्वाणीचा निर्णय दिला. पुरुष मंडळींनी त्र्यंबकराजजींच्या शिक्षणपूर्ततेविषयी मुद्दा उपस्थित करून समजूत घालण्याचा प्रयत्न केला. महिलांनी मात्र आग्रह कायम ठेवला. त्यामुळे भागवतकथा निरूपणासाठी समाजाचे रीतसर आमंत्रण त्र्यंबकराजजींनी देणे भाग पडले.

पं. त्र्यंबकराजजींनी मोठ्या धैर्याने हा यक्षप्रश्न सोडवायचे ठरविले. भारवी खरे लिहितात– 'घरात जेथे पं. बालमुकुंदजींची तसबीर होती तेथे गेले. त्यांना विनम्रपणे वंदन करून प्रार्थना केली की, 'आपणच मला निर्णय घेण्याविषयी आदेश द्यावा. माझी कथा यशस्वी व्हावी.' त्र्यंबकराजजींनी पुनश्च तसबिरीकडे डोळे उघडून पाहिले. तसबिरीतील पंडितजींची मुद्रा अधिक प्रसन्न व सस्मित वाटली. यातून काय तो संदेश मिळाला. त्वरित बाहेर येऊन त्यांनी कथा स्वीकारत असल्याचे वचन माहेश्वरी पंचांना दिले. तीन महिन्यांच्या कालावधीत भागवत–पाठ अतिशय चांगल्या पद्धतीने आत्मसात करून कथा निरूपणास सज्ज झाले.'

वडिलांकडून मिळालेला संकेत, मातोश्रींचे आशीर्वाद यांच्या बळावर त्र्यंबकजींनी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।'

**सच्चिदानंद रूपाय विश्वोत्पत्त्यादिहेतवे ।**
**तापत्रय विनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।।**

असे नमन करून कथा निरूपणाला सुरुवात केली. वयाच्या सोळाव्या वर्षी इतके प्रभावी आणि रसाळ कथाकथन करण्याचा अवघ्या पंचक्रोशीत घडलेला हा चमत्कारच म्हणावा लागेल. या चमत्काराने त्र्यंबकजींना पंडित ही पदवी आपोआपच लाभली. त्र्यंबकजींनी थेट पं. बालमुकुंदजींचा वारसा यथाविध

सांभाळला. रात्रंदिवस अध्ययन आणि परिश्रम ह्यामुळे वडिलांप्रमाणेच त्यांचा कीर्तिसुगंध आसमंतात पसरला. लोकांमध्ये पंडित बालमुकुंदराजजींचे स्थान त्यांना प्राप्त झाले.

त्र्यंबकजींचे कनिष्ठ बंधू श्रीधरजी यांनाही कर्मकांड, ज्योतिषशास्त्र, भागवत कथा, संस्कृत भाषा यात अतिशय चांगली गती होती. वेळप्रसंगी त्यांच्या या ज्ञानाची अनुभूती सर्वांनाच येत असे. मात्र त्यांना पंडित होऊन याच वृत्तीने राहणे बरे वाटत नव्हते. माहेश्वरी समाजातील व्यावसायिकांप्रमाणे आपण धंदा करावा, असे त्यांना वाटे. त्याप्रमाणे त्यांनी कापडाचे दुकान टाकून आपल्या नशिबाची परीक्षा घ्यायचे ठरविले. त्यांचा स्वभाव हा त्र्यंबकजींपेक्षा विपरीत होता. हट्टी, महत्त्वाकांक्षी आणि तापट असल्यामुळे या व्यास कुटुंबात ताणतणाव निर्माण होत. परंतु त्र्यंबकजींच्या उदार व शांत स्वभावामुळे निभावले जाई. दोन्ही मुले कर्ती झाली. वडिलांच्या पश्चात उभी राहिली. त्यामुळे आईला स्वाभाविकच परिवारातील मुलांच्या लग्नाचे वेध लागले. त्र्यंबकजींच्या पुढाकाराने आणि गावात व्यास कुटुंबियांना असलेल्या सन्माननीय स्थानामुळे विवाह उत्तम तऱ्हेने पार पडले.

### पुण्यश्लोक पं. मदनगोपालजींचे अवतरण :–

पंडित त्र्यंबकजींच्या पत्नीचे नाव मोहिनीदेवी असे होते; तर श्रीमान श्रीधरजींच्या पत्नीचे नाव केसरबाई होते. दोघीही आपल्या नावाप्रमाणे गोड स्वभावाच्या होत्या. त्याचबरोबर त्या दोघी सख्ख्या बहिणी होत्या. विवाहानंतर श्रीधरजी आणि केसरबाई यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. पं. बालमुकुंदजींच्या निधनानंतर व्यास वंशात प्रकट झालेले हे पहिले अपत्य. त्यामुळे सर्वांना विलक्षण आनंद झाला. मोहिनीदेवी थोरल्या. त्यामुळे धाकट्या बहिणीला पुत्ररत्न झाले, याचा त्यांना विलक्षण आनंद झाला. सख्ख्या बहिणींमध्ये जिव्हाळा तेवढाच असल्यामुळे मत्सराचा प्रश्नच नव्हता. दुर्दैव हात जोडून उभे होते. नवजात अर्भकाचा नामकरण विधी मोठ्या थाटात पार पडला. नाव ठेवले मदनगोपाल. मदनगोपालजी अवघ्या सहा महिन्यांचे असतानाच मातोश्री केसरबाईंचे अल्पशा आजाराने देहावसान झाले. मोहिनीबाईंनी बाळाला ओटीत घेतले. 'माय मरो मावशी जगो' ही म्हण त्यांनी सर्वार्थाने खरी करून दाखविली. बाळाचे संगोपन करीत असताना मोहिनीबाईंपुढे नवे संकट उभे राहिले.

पत्नी निवर्तल्याने, भरकटलेल्या श्रीधरजींनी तुलसाबाईंशी दुसरा विवाह केला. तुलसाबाईंना आपल्या जावेशी जुळवून घेता येईना. तसेच मदनगोपालजीदेखील दुसऱ्या आईला आई मानायलाच तयार होईनात. मदनगोपालजी मोहिनीबाईंना माता आणि त्र्यंबकराजजींना पिता म्हणत. पुढील काळात मोहिनीबाईंना लागोपाठ दोन मुले आणि दोन मुली झाल्या. थोरल्याचे नाव विठ्ठलदास तर धाकट्याचे नाव राधेश्याम. मुलींचीही नावे अशीच हौसेने ठेवलेली. ही मुलेदेखील मदनगोपालजींना आपला ज्येष्ठ बंधू मानत. मदनगोपालजींनीही नेहमीच ज्येष्ठ बंधूप्रमाणे संपूर्ण परिवाराचा सांभाळ केला. धाकटी भावंडे मदनगोपालजींना भाऊसाहेब म्हणू लागली. कुटुंबात आणि गावात मदनगोपालजी तथा भाऊसाहेब हेच त्र्यंबकजींचे ज्येष्ठ पुत्र म्हणून मानले जात. श्रीधर आणि तुलसाबाईंनी स्वतंत्र बिऱ्हाड थाटून जवळपास संबंध तोडल्यासारखेच केले होते. मदनगोपालजी त्र्यंबकजींच्या पावलावर पाऊल टाकून मोठे होऊ लागले. १९४५ साली गावातल्या पाटील वाड्यासमोर व्यास कुटुंबाची भव्य वास्तू उभी केली. हा सर्व कारभार जवळचे स्नेहबंध असलेल्या रामचंद्रजी शर्मा उर्फ खातीजी यांनी कौटुंबिक जिव्हाळ्याने पूर्ण केला.

मदनगोपालजी उपजतच प्रज्ञावंत, दूरदृष्टीचे आणि शिस्तप्रिय होते. पं. त्र्यंबकजींच्या संस्कारांमुळे त्यांच्या ठायी कर्तव्यबुद्धी आणि ध्येयासक्ती यांची बीजे रोवली गेली होती. इंग्रजी सातवीपर्यंत शिक्षण झाल्यावर, इंग्रजी शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ती पूर्ण होऊ शकली नाही. व्यास कुटुंबाच्या वाढलेल्या गोतावळ्यामुळे भागवतकथा, ज्ञानेश्वरीवरील प्रवचने, रामकथा आदि कथाज्ञानयज्ञाचे वक्ता म्हणून आणि ज्योतिष व कर्मकांड करून घरच्या प्रपंचाला हातभार लावायला सुरुवात केली.

मध्यांतरीच्या काळात, चौदाव्या वर्षीच, राजस्थानातील 'नावा' शहराच्या पं. नंदलालजी मिश्रा यांच्या कन्या 'गुलाबदेवी' यांच्याशी त्यांचा विवाह झाला. पं. मदनगोपालजी विवाहानंतरही शिक्षण पूर्ण करण्यासाठी गुरू विनायकराव जोशी यांच्याकडे पुणे येथे गेले. या काळात बेलापूरच्या श्री. लड्ढा परिवाराचे जावई 'श्री. पन्नालालजी मालपाणी' यांच्याकडे निवासासाठी होते. सतरा-अठराव्या वर्षी ते बेलापुरात परतले.

पं. त्र्यंबकराजजी या त्यांच्या काका तथा मानसपित्याप्रमाणेच, त्यांनीही

सतराव्या–अठराव्या वर्षी, परंपरेनुसार बालाजी मंदिरात भागवतकथा संपन्न केली. पहिल्याच कथेपासून ते लोकप्रिय कथावक्ता झाले. त्यांना कोपरगाव, संगमनेर, पुणे, नगर येथून कथेसाठी आमंत्रणे येऊ लागली. माहेश्वरी समाजाच्या समस्या सोडविणे, ज्योतिषविषयक निर्णय देणे आदी. पं. त्र्यंबकराजजींची सर्व कामे भाऊसाहेबांकडे तथा पं. मदनगोपालजींकडे आली. सतत अभ्यास, व्यासंग व सर्व प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात ते रस घेत असत. अतिशय वैभवसंपन्न, ज्ञानमार्गी म्हणून त्यांचा लौकिक झाला. ते गावाचे भाऊसाहेब झाले. भाऊसाहेबांचा एक महत्त्वाचा आग्रह होता तो म्हणजे 'व्यास परिवाराचा लौकिक सर्वत्र बहरला पाहिजे.'

भाऊसाहेबांच्या विभूतिमत्त्वाचे वर्णन करताना 'पुण्यश्लोक स्व.पं. मदनगोपालजी व्यास (चरित्र)' या पुस्तकात भारवी खरे लिहितात– 'या सर्व वाटचालीत पं. मदनगोपालजींचे प्रपंचाकडेदेखील तितकेच लक्ष होते. त्यांना एकूण चार पुत्र आणि दोन कन्या असा परिवार असून, चुलत भाऊबंद आणि त्यांचे कुटुंबीय यामुळे एकूण १५–२० जणांचा तो परिवार होता. भाऊसाहेब सर्व मुलांना एकत्र बसवून सकाळचे पाठ आणि सायंकाळची स्तोत्रे म्हटलीच पाहिजेत अशा विचारांचे होते. घरात गडबड मस्ती करण्यापेक्षा स्वाध्याय करावा अशी त्यांची भूमिका होती. परिस्थितीमुळे स्वतः शिक्षण घेऊ न शकणाऱ्या भाऊसाहेबांचा 'प्रत्येकाने अधिकाधिक शिक्षण घ्यावे' असा आग्रह होता. मुलींनीदेखील शिक्षण घ्यायलाच पाहिजे याबद्दल त्यांच्यात कुठेही संदिग्धता नव्हती. भाऊसाहेब बाहेरून घरात आले की दंगामस्ती करणारे किंवा मोठ्या आवाजात वाद घालणारे सगळे चिडीचूप होत. महिलावर्गदेखील भाऊसाहेबांना भिऊन असायचा. त्यामुळे वाद, भांडाभांडी, कलह याला कुठेच थारा नव्हता. हा भाऊसाहेबांचा मोठेपणा अधिकार कर्तृत्व आणि दूरदर्शीपणा यामुळे आपोआपच कौटुंबिक शिस्त निर्माण झाली होती.

## 'काला कलुवा' श्रीकृष्णाचा जन्म :–

पं. बालमुकुंदजींपासून पं. मदनगोपालजींपर्यंत, नारदीय भागवताची शुकमुनी उद्घटित परंपरा संचित रूपात प्रकट होत राहिली. श्रीमद् भागवत म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांचे मूर्त रूप. नंदराजांप्रमाणे पं. मदनगोपालजी खरेच भाग्यवंत. प्रत्यक्ष शिवांच्या कृष्णभक्तीचा परिपाक बिल्ववनात पं. मदनगोपालजींच्या पोटी

अवतरला. याचाच वेध माता गुलाबदेवींना लागला असावा. अद्भुताचा संकेत त्यांच्या ठायी भक्तीची स्पंदने घडवीत होता आणि षट्तिला एकादशीच्या पावन पर्वात धर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी मूर्तिमंत भागवताचा जन्म झाला. अतिशय मोहक, आकर्षक, लडिवाळ, तेजस्वी बालक प्रकटले. जन्मतःच प्रेममयी वात्सल्यमूर्ती गुलाबदेवींना या बालकाने दीपवून टाकले. व्यास कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. खरेतर व्यासवंशवेलीवर गुलाबदेवींच्या पोटी हे पहिलेच संतानपुष्प प्रकटले होते असे नाही. पण उपजतच या बालकाच्या दिव्य दर्शनातील आभा सर्वांना मोहून टाकत होती.

पू. स्वामीजींच्या दीदी संगमनेर येथील सौ. शांता श्री. भेडा लिहितात– 'हम भाई–बहनोंमें किशोरी आठ नंबर की संतान है । एकादशी के दिन जन्मा था । माँ कहती थी– 'मेरा किशोरी सबसे अलग है । यह तो मेरा आठवाँ काला कलुवा है ।' भागवतकथा–निरूपण–परंपरेतून अर्थात शिवपार्वती, भगवान श्रीकृष्ण, ब्रह्माजी, नारदमुनी, श्री व्यास महर्षि, शुकमुनी एवढेच नव्हे तर सनत, सनंदन, सनक, सनातन अशा सनत्कुमारांपासून पं. मदनगोपालजींपर्यंत स्फुट झालेले, प्रत्यक्ष भगवंतस्वरूप भागवत पाळण्यात क्रीडा करीत होते. अवघ्या आसमंतात देवदेवतांची आनंदमय नर्तनक्रीडा सुरू झाली होती. 'नंदके घर आनंद भयो । जय कन्हैया लाल की । हाथी घोडा पालकी । जय कन्हैया लाल की ।'

आज आपण पू. गोविंददेव गिरिजी महाराज यांचे दर्शन घेतो तेव्हा शुकदेव महाराजांच्या जन्मकथेची आठवण होते. शुकदेव महाराजांनी उदरातून बाहेर येताना, 'आपल्या बुद्धीला मायेचा स्पर्श होता कामा नये' अशी अट घातली होती. जन्मतःच शुकदेवांनी वनात प्रस्थान केले. निःसंग झाले! त्यांच्या मुखातून विश्वात्मक श्रीकृष्णस्वरूप, समत्वाचे ज्ञान स्फुट होत राहिले, ते भागवतरूपात! फरक एवढाच, पू. स्वामीजींच्या मुखातून कथा प्रकट होताना एक मंत्र प्रकटतो– 'राष्ट्राय स्वाहा! इदं न मम ।'

* *

## ।। दोन ।।

# किशोरांच्या शैशवापासूनच्या लीलांतही राष्ट्रवेध

शैशवापासून अध्यात्माचा वेध तथा लल्ला की लीलाएँ ।- अरुण-तरुण वयातील लक्षवेधक लीला - तो राजहंस एक - सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोगाच्या साधनेसाठी भगव्या ध्वजाचे आवाहन.

## ।। दोन ।।

# किशोरांच्या शैशवापासूनच्या लीलांतही राष्ट्रवेध

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे चाचाजी श्री. राधेश्याम व्यास, व्यास परिवाराची परंपरा सांगताना लिहितात– 'भगवान कहाँ पधारते हैं? जो कुल और व्यक्ति अतिपवित्र होता है, वहीं प्रभु पधारते हैं और अक्सर देखा गया है कि ऐसे पवित्र कुल में ही महापुरुष पधारते हैं । ऐसा ही हमारा कुल है – ''व्यास परिवार'' तभी तो चार महापुरुषोंका अवतरण इस कुलमें रहा ।' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांचे दादाजी ब्रह्मलीन महादेव बाबा अर्थात महादेवजी हे परमतपस्वी, सिद्ध पुरुष होते. त्यांना भगवान महादेवांचा साक्षात्कार झाला होता. गायत्री मंत्राच्या उपासनेने, गायत्री देवींनी त्यांना दर्शन दिले होते. राधेश्यामजींचे पिताजी अर्थात त्र्यंबकराजजी यांना ग्रामदेवता हरिहर केशव गोविंद यांचा साक्षात्कार झाला; तर त्यांचे ज्येष्ठ बंधू पं. मदनगोपालजी यांना भगवती जगदंबेचा साक्षात्कार झाला होता. याच मालिकेत चौथा साक्षात्कारी पुरुष म्हणून त्यांनी नारायणस्वरूप, कपिलनारायण प.पू. स्वामी श्री गोविंददेव गिरि यांचा उल्लेख केला आहे.

**शैशवापासूनच अध्यात्माचा वेध :–**

अकोला येथील सौ. मथुरा घनश्याम पाटोदिया या पू. स्वामीजींच्या जीजी. त्यांना किशोरजींच्या शैशवावस्थेपासून किशोरावस्थेपर्यंतच्या आपल्या

या छोट्याशा भावाचे अद्‌भुतरम्य बालपण आठवते. मातोश्री गुलाबदेवींनी व्यास परिवाराच्या उद्यानात किशोररूपी गुलाब फुलविला. त्या गुलाबाच्या अलौकिक सुगंधाने अवघा व्यास परिवार दरवळतो आहे. अर्थातच पू. स्वामीजींचे नामकरण 'किशोर' असे झाले. शैशवावस्थेपासून किशोरजींना कुटुंबातील सदस्यांच्या मुखातून प्रकट होणारे नामस्मरण, भजने, स्तोत्रे ऐकण्याचा तसेच भागवतकथा ऐकण्याचा छंद जडला. भागवतातील कथानायकांचे चरित्र ऐकताना ते रंगून जात. त्यांच्या मनात प्रश्न पडत आणि आदर्शही उभे राहात. शैशवावस्थेत त्यांना दिव्य कथांची ओढ लागली. त्यांचा हट्ट, त्यांचा ध्यास अशा गोष्टींचे अनुकरण करण्याकडेच असे.

किशोरजी पाच वर्षांचे असतानाचा एक गमतीशीर प्रसंग मथुराजीजी सांगतात. किशोरांचे पाचव्या वर्षापर्यंत जावळ काढले नव्हते. एक दिवस जीजी त्यांच्या केसांची वेणी घालण्यासाठी बसल्या. नेहमीप्रमाणे किशोरजींनी भोकाड पसरून रडायला सुरुवात केली. गुलाबदेवींना त्याची खूप गंमत वाटली. त्या गमतीने म्हणाल्या, ''अरे, तू इतका काळा आणि तू जर केसही नीट ठेवले नाहीस तर मोठेपणी तुला लग्नासाठी मुलगी कोण देणार?'' किशोर तावातावाने आईला म्हणाले, ''माँ, हम काले है तो क्या हुआ? दिलवाले हैं ।''

किशोरजी बहुधा शैशवावस्थेपासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर जात असावेत. संघाच्या शाखेमुळे त्यांच्या बालमनावर बालभक्तांचे संस्कार झाले असावेत. ध्रुवबाळ, प्रह्लाद, संत रामदास, रोहिडेश्वरावर स्वराज्याची शपथ घेणारे छत्रपती बालशिवाजी आदि कथांनी त्यांना मोहिनी घातली असावी. त्याचबरोबर पिताश्रींबरोबर भागवत ऐकण्यात त्यांना रस होता. बाल्यावस्थेत देवासाठी आणि राष्ट्रासाठी, आर्त प्रजेसाठी आणि धर्मासाठी, जीवन समर्पित करणाऱ्यांच्या कथांनी किशोरजींच्या संवेदनशील मनात देवभक्ती, धर्मभक्ती, राष्ट्रभक्ती जागृत झाली असावी. सौ. मथुराजीजींनी बालमनाच्या या संवेदनशीलतेचा अद्‌भुत प्रसंग सांगितला आहे – किशोरजी झोपायला जाण्यापूर्वी आईकडून चहा करून घेऊन पीत असत. आईला नेहमीच आश्चर्य वाटायचे की, हा पोरगा चहा पिऊन का झोपतो? एक दिवस आईने केलेला चहा पिऊन किशोर नेहमीप्रमाणे झोपण्यासाठी मच्छरदाणीत शिरला. थोड्या वेळाने कुतूहलाने आईने मच्छरदाणी वर करून आत बघितले तर काय? हा छोटासा मुलगा मच्छरदाणीत ध्यानस्थ बसलेला

होता. त्याच्यासमोर श्रीमद् भागवत आणि श्री भगवद्गीता ठेवलेली होती.

किशोर बोलायला लागल्यापासूनच त्याने भगवद्गीतेचे पाठांतर केले होते आणि वाचता यायला लागल्यापासून भागवताचे वाचनही सुरू केले होते. गुलाबदेवींनी ध्यानस्थ बसलेल्या किशोरजींना पाहिले. त्यांना सानंद आश्चर्य व कौतुकही वाटले. त्यांनी मनोमनी आपल्या मुलाची अलाबला घेतली. त्याला थोडाही न त्रास देता त्या झोपी गेल्या.

किशोर बालवयातच भागवतातील कथा सवंगड्यांना सांगत असे. एवढेच नव्हे तर कोणी चेष्टा केली तर रागही त्याला येत असे. मथुराजीजी सांगतात - केवळ दहाव्या वर्षी किशोरजींनी रामदेव बाबांची कथा-प्रवचन करायला सुरुवात केली.

सौ. शांतादीदी आपल्या लाडक्या भैय्याविषयी सांगतात - 'मेरे प्यारे भैया किशोरीके बचपन की हर लीला अविस्मरणीय है । जब वह छोटा था तब मेरे पिताजी और हम सब भाई-बहन साथ में बैठकर स्तोत्र बोलते थे - 'भजै व्रजैक मंडनम्' - यह स्तोत्र उसे बहुत पसंद था । स्तोत्र बोलते समय वह बहुत नाचता था ।' शांतादीदींनी आणखी एक हृद्य आठवण नोंदवली आहे - शाळेला सुट्टी लागली की किशोरजी संगमनेरला जात. त्यांचे अंथरूण त्यांच्या दीदीजवळच असे. झोपताना ते दीदीला म्हणत, ''जीजी, तेरी फेरनेकी माला मुझे दे दे ।'' रात्री जेव्हा-जेव्हा दीदी जाग्या होत तेव्हा-तेव्हा किशोरजी माळा घेऊन जप करताना दिसत. किशोरजींना झोपेविषयी प्रश्न केला की ते सांगत- 'थोडा सोया और बाकी समय का सदुपयोग किया ।'

दीदी आणखी आठवण सांगतात- लहानपणी खेळता-खेळता किशोरजी अचानक वर जाऊन श्रीकृष्णाच्या फोटोजवळ बसत. जेव्हा जेव्हा दीदी वर जाऊन पाहत तेव्हा-तेव्हा भगवंताच्या समोर किशोरजी ध्यानस्थ बसलेले दिसत. खेळायचे सोडून वर का आले, असे विचारताच किशोरजी सांगत- ''प्रल्हादजी भी तो खेलते-खेलते भगवान को याद करते थे । तभी तो उन्हें भगवान ने दर्शन दिये थे । बचपनसे ही भगवान को याद करना चाहिए तभी शायद भगवान मिलते हैं ।'' सेवाभावी सरळ स्वभावाच्या आपल्या आईच्या आठवणी सांगताना लहानग्या किशोरला गहिवरून येई. दीदी म्हणतात, ''उसके बचपन की बातें याद आती हैं तो आँखों से प्रेमाश्रू छलकने लगते हैं ।''

बालकिशोर एवढे हुशार, प्रज्ञावंत, की एकदा ऐकलं की त्यांचं पाठ होऊन जाई. इयत्ता दुसरीत असतानाच ते वक्ता म्हणून भाषणास उभे राहिले. त्यांच्या भाषणाचा विषय होता– महात्मा जोतीराव फुले. टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या या भाषणाला दाद मिळाली. आपल्या प्रज्ञेची झलक, तिसरी–चौथीत स्कॉलरशिप परीक्षेतील सर्वोत्कृष्ट प्रावीण्याने त्यांनी नगर जिल्ह्यालाच नव्हे तर महाराष्ट्राला दाखविली.

**अरुण–तरुण वयातील लक्षवेधक लीला :–**

शैशवावस्थेपासून भागवतात आणि भगवद्गीतेत रमलेला बालकिशोर उपजतच ज्ञानी असावा. राष्ट्र, राष्ट्रीयत्व आणि हिंदुत्व यांच्या पुनरुत्थानासाठीच त्यांचा जन्म झाला असावा, याची प्रचिती त्यांच्या अरुण–तरुण वयातील लीलांमधून येत होती. भगवद्गीतेतील सहाव्या अध्यायातील, भगवान श्रीकृष्णांनी योगभ्रष्ट पुरुषाविषयी केलेले भाष्य, किशोरजींच्या बाबतीत तंतोतंत प्रत्ययास येते. किशोरजी मुळातच सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोगी म्हणून प्रकटले, याची प्रचिती येते. भगवान श्रीकृष्ण पार्थास सांगतात–

**प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।।४१।।**
**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।**
**एकद्धि दुलर्भतरं लोके जन्म यदीदृशयम् ।।४२।।**
**नत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ।।४३।।**
**पूर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्द ब्रह्मातिवर्तते ।।४४।।**
**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ।।४५।।**
**तपस्विभ्योऽधिकोयोगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ।।४६।।**

(गीता अ. ६–४ ते ४६)

किशोरजींची प्रज्ञा प्रकट होई तेव्हा भगवान श्रीकृष्णांच्या या भाष्याची प्रतीति सहजच सर्वांना येत असे.

किशोरजींचे सहाध्यायी श्री. अशोक औटी लिहितात– ‘५ सप्टेंबर हा दिवस प्रतिवर्षी आमचे माध्यमिक विद्यालयात ‘शिक्षकदिन’ म्हणून साजरा करण्याची प्रथा आमचे मुख्याध्यापक श्री. न. बा. कुलकर्णी तथा नानासाहेबांनी सुरू केली. त्या वेळी किशोर व्यास हे आचार्याबरोबरच प्राचार्याची भूमिका घेत असत, तर मी त्यांचा ‘पर्यवेक्षक/उपमुख्याध्यापक’ सहकारी असे. ‘संस्कृत’ विषयाची तासिका ते घेत असत, तर मी मात्र विशेषतः ‘गणित व शास्त्र’ विषयांचा भोक्ता असल्याने त्या विषयांचे पाठ घेत असे. निसर्गदत्त बुद्धिमत्ता, तात्त्विक निष्ठा व सात्त्विक वृत्ती यामुळे ते ‘तत्त्वज्ञ’ तर झालेच, परंतु संत/महंत, वेदांचे गाढे अभ्यासक–प्रसारक–संस्थाचालकही झाले. मी मात्र पंचमहाभूतांचा अभ्यास करून ‘स्थापत्य अभियंता’ झालो.’

‘मुलाचे पाय पाळण्यात दिसतात’ अशी फार प्राचीन पूर्वजांची म्हण आहे. या उक्तीस अनुसरून किशोर व्यास साधारणतः इ. ९ वी (अ) पासूनच स्वामी विवेकानंदांची प्रवचने/व्याख्याने पुस्तिका गणवेशधारी सदऱ्याच्या खिशात ठेवून तत्त्व–चिंतन करीत व त्या नादातच ते आमच्यासारख्या दोस्तांस– ‘माझ्या धर्माची निंदा करशील, तर मी तुला समुद्रात फेकून देईन’ असा सज्जड दमही देत असत. त्यामुळे ते केवळ ‘संन्यस्त’ नसून, ‘अवतारी पुरुष’ असावेत याविषयी तिळमात्र शंका नव्हती.’

स्वामीजींचा सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोग सिद्ध करण्याची साधना त्यांच्या अशा लीलांमधून स्पष्टपणे जाणवते.

श्री. रामनाथ रभाजी शिंदे हे बेलापूरमधील त्यांचे शाळासोबती सांगतात– ‘आचार्य आणि मी एकाच शाळेत शिकलो, खेळलो आणि प्रवरा नदीत यथेच्छ डुंबलो. त्याच मातीने आमचे ऋणानुबंध साकार केले. वास्तविक पाहता, मी सामान्य कष्टकरी कुटुंबातील; आचार्य विद्वान घरातील. हा मोठा विरोधाभास असूनही आमची मैत्री घट्ट झाली आणि दिवसेंदिवस फुलत गेली. अभ्यासाबरोबरच विविध विषयांत किशोरजी रमत असत. लहानपणी स्नेहसंमेलनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांसाठी ‘कवडीचुंबक’ नावाचे नाटक आम्ही बसविले होते. त्या वेळी किशोरजींनी कंजूस शेठजीची भूमिका विनोदी पद्धतीने सादर केली होती, तो प्रसंग अजूनही आठवतो. ते जे.टी.एस. हायस्कूलमधून इयत्ता ११ वीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांच्या सहवासाने, मार्गदर्शनाने आम्हासारखे सामान्य

विद्यार्थीसुद्धा त्या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकले आणि नगर जिल्ह्यात जे.टी.एस. हायस्कूल या विद्यालयाचे नाव गाजले.'

किशोरजींची प्रज्ञा केवळ पाठ्यविषयातच नव्हे तर कला, क्रीडा यातही तेवढ्याच ताकदीने आविष्कृत होत असे.

किशोरजींचे शिक्षक श्री. बबन लक्ष्मणराव गाडे सांगतात- 'शिष्यात् इच्छेत् पराभवम्' या वचनाचा अनुभव मला किशोर व्यास यांच्या अभ्यास आणि वर्तन या दोहोंतूनही मिळाला. जून १९६२ मध्ये बेलापूरच्या जे.टी.एस. हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर किशोर व्यास या विद्यार्थ्याच्या सात्त्विकता आणि नम्रता या गुणांनी प्रभावित झालो. सुसंस्कारित, ज्ञानसंपन्न आणि वैभवशाली अशा व्यास घराण्याचा तो कुलदीपक आहे. तो माझा आवडता विद्यार्थी झाला. त्याच्या अंतरंगातील सद्‌गुणांचा आविष्कार, त्याच्या स्वच्छ आणि नेटक्या शालेय गणवेशातून घडे. सद्‌वर्तनाचे आणि सहजतेचे दर्शन त्यातून होई. लिखाणातील खाडाखोड साशंक वृत्तीचे दर्शन घडविते. मात्र किशोरच्या लेखनात अशी खाडाखोड कुठेच आढळत नसे. स्पष्ट आणि ठाम विचार त्याच्या तेवढ्याच सुंदर हस्ताक्षरातून प्रकट होत. शिकविताना त्याच्या प्रसन्न, ग्रहणशील मुद्रेतून विषय त्याच्या हृदयापर्यंत जात आहे, हे लक्षात येई. जिज्ञासा आणि कुतूहल यामुळे तो नेहमीच ज्ञानार्जनासाठी धडपडे. निरहंकारी आणि मनमिळाऊ स्वभावामुळे त्याच्याभोवती खूप मोठा मित्रपरिवार असे.

किशोर आठवीत शिकत असतानाची गोष्ट. संस्कृतच्या उत्तरपत्रिकेत त्याला १०० पैकी ९९ मार्क मिळाले. एखाद्या विद्यार्थ्याच्या आनंदाला पारावार राहिला नसता, पण किशोरने उत्तरपत्रिका नीट तपासून पाहिली आणि अतिशय नम्रतेने संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकांना, आपण अर्धा-अर्धा मार्क का कापला असे विचारले. शिक्षकांनी जेव्हा शुद्धलेखनातील चुका दाखविल्या तेव्हा किशोरला आपली चूक समजली.

सौम्य, शांत आवाजात तो आपले विचार व्यक्त करी. त्याच्या भाषणातील ढंगदारपणे उपयोजित केलेल्या श्लोक, दोहे, सुविचार, कवितेच्या ओळी यामुळे त्याचे भाषण प्रभावी होई, त्याचबरोबर बालवयातच त्याला घडलेल्या व्यासंगाचाही परिचय होई.

किशोरजींचे दुसरे शिक्षक श्री. पी. जी. देवस्थळी किशोरजींविषयी

लिहितात- 'It was a pleasant accident that I was a teacher and a would be great personality 'Kishor Vyas' was a 12 year old pupil. I have deliberately used epithet 'pleasant' which contradicts the noun 'accident' because I still feel, whether I was eligible to be his Guru or not, our meeting was accidental.

As a student, who could study independently, he was not in need of any Guru. I had to be very careful and cautious before going to that class.

सरांच्या या प्रांजळ लेखनातून किशोरजींच्या ठिकाणी पूर्वज्ञानाचा आविष्कार झाला असेच म्हणावे लागते.

जे.टी.एस. हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. न. बा. कुलकर्णी मोठ्या गौरवाने सांगतात- 'आजचे स्वामीजी हाच कधीकाळचा इयत्ता ११ वीत शिकणारा गणवेशधारी विद्यार्थी आहे. शिक्षक येण्यापूर्वीच तो आपले पुस्तक आणि वही उघडून शिक्षकांची वाट पहात असे. अन्य विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या गलक्याकडे त्याचे लक्षही नसे. कोलाहलापासून दूर असा हा छोटासा बालक! शिक्षकांनी कोणताही कठीण प्रश्न विचारावा; त्याचा आपला हात वरच. कोणत्याही प्रश्नाचे अचूक उत्तर त्यानेच द्यावे. शिक्षकांचे बोलणे तो एवढ्या तल्लीनतेने ऐकायचा, त्यावरच्या चिंतनात एवढा गढून जायचा, की अध्यापक निघून गेले तरी ह्याची समाधी भंग होत नसे. ५ सप्टेंबरच्या शिक्षकदिनी अगदी सुटाबुटात किशोरने मुख्याध्यापकाची भूमिका केली. माझे संस्कृत आणि इंग्रजी विषय त्याने शिकवायला घेतले. तो एवढ्या कौशल्याने शिकवत होता की वर्गात Pindrop Silence. वक्तृत्व स्पर्धेसाठी तर त्याला न विचारताच मी त्याचे नाव लिहून टाकायचो. ''कोणत्या भाषेत बोलायचे सर?'' असा त्याचा प्रश्न असायचा आणि ''आवडेल त्या भाषेत बोल'' असे माझे उत्तर असायचे. शालान्त परीक्षेमध्ये जेव्हा तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला तेव्हा मला तो इंजीनिअर किंवा डॉक्टर होईल असे वाटत होते. मी त्याला विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले, ''मी ठाण्याला तत्त्वज्ञान विद्यापीठात जाऊन अध्ययन करणार आहे.'' शाळेच्या मुख्याध्यापकांचा हा अनुभव किशोरजींमध्ये अरुण-तरुण वयातच पूर्वसंचितातून दिव्य ज्ञान प्रकटल्याची साक्ष देतो.

विश्वबंधुत्व आणि समदृष्टी हा किशोरजींचा उपजत गुण आहे. आपद्ग्रस्त

कोणीही असो, त्याच्या मदतीसाठी धावूनच गेले पाहिजे हे त्यांच्या रक्तातच आहे. सौ. मथुराजीजी सांगतात– ‘बात उन दिनोंकी है, जब किशोरी लगभग पन्द्रह वर्ष के थे । एक रोज हमारे बेलापूर गाँव में भयंकर बाढ आयी । बाढ ने कई घरों को ध्वस्त कर दिया । सभी लोग बाढपीडित इलाकों में मदद के लिए दौडे । किशोर भी अपने बालसखाओं के साथ वहाँ पहुँचा । अचानक उसकी नजर एक वृद्ध मुस्लीम दंपति पर पडी, जिनका लडका बाढ के पानी में बह रहा था । पर वे असहाय होने की वजह से सिर्फ ‘बचाओ–बचाओ’ चिल्ला रहे थे । जैसे ही किशोर को बात समझ में आयी वैसे ही वह झट से पानी में कूद पडा और अपनी जान की परवाह कियेबगैर उस मुस्लीम परिवार के चिराग को बचा लिया । उस बालक के पिता ने किशोर को ११ रुपये बख्सीस देने चाहे पर किशोर ने कहा– इन रुपयों से हनुमानजी के मंदिर में प्रसाद चढा देना । हनुमानजीने ही आज उसके बेटे की जान बचायी है ।’

किशोरजी व्यासांचे आणखी एक सहाध्यायी श्री. रामप्रसाद खटोड, बालवयातील, किशोरजींच्या सहवासातील क्षणांविषयी लिहितात– ‘मेरे पू. बाबाजी और पिताजी तथा किशोर के पू. दादाजी तथा पिताजी से दोनों परिवार का पारिवारिक संबंध था । इन दोनों परिवारों में ऐसी महिलाएँ थी जिनकी अपने–अपने नामसे अलग ही पहचान थी । किशोरकी दादीजीको ‘ब्यासनजी’ के नामसे और मेरी बडी माँ ‘सेठानीजी’ के नामसे सुपरिचित थी ।

बचपनसे मैं, किशोर, प्रकाश सोमाणी, रामनाथ शिंदे, शशिकांत सिकची, नंदकिशोर मानधने १० वीं कक्षा तक साथ में सहपाठी रहें । शालेय जीवनमें किशोरको प्रारंभसे ही आध्यात्मिक विषयोंमें रुचि रही । मराठी, अंग्रेजी, हिंदी भाषापर बचपनसे ही अधिकार था । परिवार में किशोर के दादाजी एवं पिता श्रीमद् भागवतकथा सुनाते थे । घरमें ऐसे वातावरण के कारण उनको संस्कृत भाषाका भी ज्ञान प्राप्त हुआ । वैसे ही ८ वीं कक्षासे हमारे कोर्स में संस्कृत विषय भी था ।

रविवार की छुट्टी के दिन हम सभी मित्र खेत पर जाते थे । वहाँ खेलना–कूदना चलता था । किशोर कुछ देर तक हमारे साथ खेलता था । बादमें पासही के एक वृक्ष के नीचे जाकर बैठ जाता । वहाँ उसका चिंतन–मनन चलता था । हम तो अपने खेलकूद में ही मस्त रहते थे ।’

किशोरजी व्यासांच्या या सर्व लीला पाहिल्या की ज्ञानदेवांनी वर्णिल्याप्रमाणे, त्यांच्या ठायी मेधावी बुद्धीचा आविष्कार घडत होता, असे म्हणता येते. प.पू. आचार्य श्री. किशोरजी व्यास यांच्या ठायीच्या मेधावी बुद्धीविषयी श्री. दा. का. थावरे यांनी केलेल्या नोंदी खूपच बोलक्या आहेत. ते लिहितात– 'बालपणापासूनच ते वृत्तीने अंतर्मुखी होते. त्यांना देवपूजेची मोठी आवड होती. *'अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव । प्रतिमेत देव कैचा नोहें ।।'* याची जाण होण्यापूर्वीच देवाची पूजा–आवड हे व्यापक अनुभूतीचे दर्शन आहे. मातेच्या गर्भात असताना माता गोपालकृष्णाची अर्चना करीत. तुलसीपत्र दलसमर्पणाने त्या भगवंताला तोषवीत. तुलसीची *'प्रतिपाळु तरी पाटाचा । झाडा किजे तुलसीचा । परि फळा फुला छायेचा । आश्रयो नाहीं ।।'* अशी निष्काम सेवा – त्या सेवेने उपजलेले बालकही तसेच होणार.'

ज्ञानेश्वरांचे श्री ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायाच्या ४५२ ते ४५४ या ओव्यांतील भाष्य–

**मोटकी देहाकृती उमटे । आणि निजज्ञानाची पाहाट फुटे ।**
**सूर्यापुढां प्रगटे । प्रकाशु जैसा ।।**
**तैसी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गांवा न येतां ।**
**बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयावें ।।**
**तियें सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वते दुभे ।**
**मग सकळ शास्त्रें स्वयंभे । निघतीं मुखें ।।**

श्री. थावरे म्हणतात– किशोरजींच्या ठायी स्वरूपज्ञानाचा उदय बालपणीच झाला होता. याविषयी चित्तवेधक अशा दोन आठवणी ते आवर्जून सांगतात– 'किशोरजींनी वयाच्या १०व्या वर्षी श्री. रामदेव बाबांची कथा ऐकली. तिचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. आपणही अशीच कथा सांगू शकतो असे त्यांच्या मनाने घेतले. घरी आल्यावर आपले सवंगडी आणि आप्तेष्ट यांना आपल्यासमोर बसवून अतिशय रसाळ कथा ऐकवली.'

किशोरजींना वाचनाचा छंद एवढा, की घरातील वाडवडिलांनी घरात जमविलेले ग्रंथ, त्यांनी याच वयात वाचून काढले. तसेच श्री. माळी गुरुजींच्या स्वतःच्या संग्रहीची सदभिरुचिसंपन्न अशी दोन–तीनशे पुस्तके वाचून काढली. बालपणीच सर्वज्ञता प्रकटलेल्या किशोरजींचा व्यासंग त्यांचे ११ वीपर्यंतचे शिक्षण

पुरे होताना अतिशय व्यापक स्वरूपात घडला. श्री. थावरे यांनी दुसरी आठवण सांगितली ती ही की, शिक्षण चालू असताना वयाच्या अवघ्या १५व्या वर्षापासून भगवद्गीतेवर त्यांनी व्याख्याने देण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर ज्ञानेश्वरीचे आकलनही त्यांनी अचूकपणे आणि सखोलपणे करून घेतलेले दिसते.

अरुण-तरुण वयात बाल्यावस्थेत प्रकटलेले ज्ञान अधिक व्यापकपणे, तेजस्वितेने किशोरजींच्या व्यक्तिमत्त्वातून प्रकट होऊ लागले. या वयातील त्यांच्या लक्षवेधक लीला पाहिल्या की योगभ्रष्ट विभूतिमत्त्वातून मेधावी बुद्धी कशी प्रकटते, याची साक्ष मिळते.

**तो राजहंस एक :-**

पू. किशोरजी व्यास शैशवावस्थेपासूनच सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळे आहेत हे घरात, दारात, समाजात सर्वांनाच जाणवत होते. पू. स्वामीजींचे काका राधेश्याम सांगतात- 'किशोर के तपस्वी जीवन को देख ऐसा प्रतीत होता है कि साक्षात भगवान कपिल का ही अवतरण हमारे परिवार के उद्धार के लिए हुआ है । मैं तो स्वयं को बडा धन्य मानता हूँ ।'

सौ. मथुराजीजी गमतीशीर अनुभव सांगतात- 'किशोरीने किशोरावस्था में कदम रखा तब तक हम सभी बडे भाई-बहनों के विवाह संपन्न हो चुके थे और माँ की प्रबल इच्छा थी कि किशोरी भी दुल्हा बनकर घोडेपर बैठे । जब भी घर में किशोरी के विवाह की बात निकलती, वह घर से बाहर चले जाते और घंटों बीत जाने पर भी घर नहीं आते । बडी बहन होने के नाते एक दिन मैंने पिताजीसे किशोरी पर शादी के लिए तैयार होनेका जोर डलवाया । तब मेरी इस बात से किशोरी नाराज हो गया और उसने अपने कमरे में जाकर कमरा अंदर से बंद कर लिया । उस दिन न भोजन किया न पानी पिया । दूसरे दिन गुस्सा शांत होने पर जब किशोरीने कमरे का दरवाजा खोला तब मैंने माफी माँगते हुए किशोरीको विश्वास दिलाया कि घर का कोई सदस्य उसे शादी करने के लिए नहीं कहेगा । कुछ दिनों पश्चात अहमदनगरमें प.पू.आ. डोंगरेजी महाराज का प्रवचन था । कथाप्रारंभ से पूर्व शोभायात्रा में सभी किशोर बालकोंको भगवान के अनेक रूपों में सजाकर रथों तथा घोडों पर बैठाकर शोभायात्रा में शामिल किया गया । किशोरी को भी सुंदर सजाया गया और एक घोडे पर बैठाया गया । उसने एक बालक के हाथों माँ तक संदेश पहुँचाया कि आपको किशोरने बुलाया है । माँ

के पास आने पर किशोरीने कहा, ''देखो माँ आज मैंने घोडेपर बैठकर आपकी इच्छा पूरी कर दी ।'' माँ को किशोरीकी यह बात सुनकर हँसी आ गयी । माँ ने तुरंत किशोरीकी नजर उतारी और कुछ रुपये किशोरीके सरसे उतारकर गरीब बच्चोंमें बँटवा दिये ।'

याच संदर्भाने सौ. शांतादीदी आणखी एक गमतीशीर अनुभव सांगतात– 'हमारे मामाजी राजस्थानसे बेलापूर आये । मामाजी दोनों आँखोंसे अंधे थे । वे माताजीके भक्त थे । चार-पाच लडकियों के फोटो लेकर आये थे । मेरी माँ पिताजीसे कहने लगी कि इनमें से कोई लडकी पसंद करो और किशोरी का ब्याह करो ।'

किशोरीको भी फोटो दिखाये । उसने फोटो देखने से इन्कार किया । वह बोला– मुझे ब्याह नहीं करना है । मामाजी बोले– तू शादी नहीं करेगा तो मैं तुम्हारे घर में आज से अन्न ग्रहण नहीं करूँगा । रात में मामाजी से मैंने कहा– गर्मीके दिन हैं । कमसे कम नींबू शरबत पीकर सो जाओ । मामाजी शरबत पीकर सो गये । उन्हें साक्षात माताजीके दर्शन हुए । माताजीने कहा– किशोरी संसार का कल्याण करनेवाला जीवात्मा है । वह ब्याह नहीं करेगा ।

दूसरे दिन मामाजी ने सबको बुलाकर स्वप्न की बात बतायी और कहा– 'ये तो कोई भगवत-अवतार ही आपके घर में आया है ।'

स्वामीजींचे कनिष्ठ बंधू स्वामीजींच्या असामान्यतेची ग्वाही देतात. ते लिहितात– 'बाल्यावस्था से ही स्वामीजी बडे-बडे आदर्शों का चिंतन करते थे । उस समय ऐसा किसीने सोचा भी नहीं होगा कि स्वामीजी इतनी ऊँचाई पर पहुँचेंगे, किंतु वे हमेशा कहते थे कि जहाँ चाह है वहाँ राह है – वहाँ पहुँचनेके लिए केवल परिश्रम की आवश्यकता होती है । सही चाह, सही राह और साथ में अनुशासन तथा हौसला है तो जीवनमें मनुष्य अपने गन्तव्य तक पहुँच सकता है । अपने ध्येय को प्राप्त कर सकता है ।'

बेलापूर गावातील श्री. रामप्रसाद खटोड किशोरजींच्या आठवणी सांगताना म्हणतात, 'सवंगड्यांशी खेळता-खेळता ते कधी एखाद्या वृक्षाखाली जाऊन ध्यानस्थ बसलेले असतील हे सांगता यायचे नाही. सर्व सवंगड्यांमध्ये त्यांचे हे वागणे केवळ अलौकिकच म्हणावे लागेल.' त्यांचे दुसरे वर्गमित्र श्री. अशोक औटी म्हणतात– 'ते बालवयापासूनच चिंतनात गढलेले असायचे आणि धर्माविषयी ते

एवढे जागृत असत की ते केवळ अवतारी पुरुष असावेत, यात तिळमात्रही शंका वाटत नव्हती.' ते म्हणतात– '१९६९ साली झालेल्या भेटीत जेव्हा त्यांनी स्वामीजींना 'नोकरी करणार का' विचारले तेव्हा स्वामीजींनी ताडकन उत्तर दिले– 'औटी, नोकरी म्हणजे गुलामगिरी, दास्य' – त्यांचे हे उद्‌गार औटींना त्यांच्यातील संन्यस्त वृत्तीचे द्योतक वाटतात.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचेविषयी दिव्यत्वाची प्रचिती घडविणारी अनेक मिथके सांगितली जातात. ती मिथके पाहिली की राधेश्याम व्यास ह्या त्यांच्या काकांनी व त्यांच्या वडिलांनी दिलेल्या उत्तराची प्रचिती येते – एक दिवस त्या दोघात झालेला संवाद असा– 'वे नित्य हवन करते थे । मैंने उनसे एक दिन पूछा कि 'आप रोज कैसा हवन करते हो?' तो उन्होंने जबाब दिया– 'ब्रह्मचारी संतपुत्र की प्राप्ति के लिए ।'

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे – पू. स्वामी गोविंददेवजींचे विभूतिमत्त्व श्रीमद् भगवद्‌गीतेत योगेश्वर श्रीकृष्णांनी वर्णन केल्याप्रमाणे, योगभ्रष्टाचे विभूतिमत्त्व प्रकटलेले होते हेच त्यांच्या अलौकिक किंवा असामान्य वर्तनातून स्पष्ट होते.

**सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगाच्या साधनेसाठी भगव्या ध्वजाचे आवाहनः–**

वेदशास्त्रसंपन्न व्यासकुलात, व्यासकुलाचे अवघे संचित स्वभावात घेऊन व्यासस्वरूपाने प्रकटलेल्या बालवयातील किशोरांना ध्यास लागला होता, सनातन हिंदूधर्मराष्ट्रस्वभावाचा! विश्वबंधुत्व, समदृष्टी, चराचराविषयीचे प्रेम यांसह जगणाऱ्या विश्वपुरुषाचा! या विश्वपुरुषाची धारणा आणि संरक्षण सनातनापासून करणाऱ्या, स्वतःतील परमेश्वरत्व जागृत करून 'राष्ट्राय स्वाहा! इदं न मम' संदेश देणाऱ्या भगव्या ध्वजाचा! भक्त प्रह्लादांनी हाच ध्वज उंचावून सुष्टांचे पालन आणि दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी भक्ती, ज्ञान, वैराग्य ह्या मार्गाने सत्याग्रह आरंभला. दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी, प्रह्लादाच्या हाकेला धावून येण्यासाठी, विश्वराष्ट्रपुरुषाला नरसिंह बनावे लागले. सत्य, प्रेम, करुणा यावर आधारित सनातन हिंदूधर्मराष्ट्र अढळ ठेवण्यासाठी, याच भगव्या ध्वजाच्या साक्षीने ध्रुवांना हिंदूधर्मराष्ट्राचे आदर्श अढळपद देवविले. विश्वबंधुत्वाने चराचराला कवेत घेऊन, *'सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः ।'* असे सर्व कल्याणकारी रामराज्य याच भगव्या ध्वजाखाली हनुमानांच्या साहाय्याने प्रभु रामचंद्रांनी उभे केले. याच भगव्या ध्वजाच्या साक्षीने भगवान श्रीकृष्णांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या संरक्षणाची ग्वाही

देताना, **‘यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।**’ असे आश्वासन दिले.

आर्य चाणक्यांनी याच भगव्या ध्वजाखाली राष्ट्राचे पुनरुत्थान केले. भगवान शंकराचार्यांनी याच भगव्या ध्वजाला वंदन करीत ‘आसेतु हिमाचल’ सनातन हिंदूधर्मराष्ट्राची भक्कम पायावर उभारणी करीत विश्वात्मक एकात्म भावनेचा वैदिक धर्मसंदेश, वेदान्ताचे जागरण करून दिला. शंकराचार्यांच्या मार्गाने जात सत्य, प्रेम, करुणा संवेदनेने विश्वात्मक हिंदूधर्मराष्ट्रासाठी पसायदान मागितले. संत तुकोबारायांनी, *‘आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासि । बोलले जे ऋषि । साच भावे वर्ताया ।।’* असे ठामपणाने सांगत; *‘विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।। कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।।’* असे प्रबोधन करीत, विश्वात्मक सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण मांडले. याच सद्गुरूस्वरूप भगव्या ध्वजाच्या आशीर्वादाने समर्थ रामदासांनी महा-राष्ट्राचा अर्थात वैश्विक हिंदूधर्मराष्ट्राचा उद्घोष करीत शिवरायांना चैतन्य दिले. शिवरायांनी याच वैश्विक समदृष्टीने सत्य, प्रेम, करुणा या आत्मिक संवेदनांच्या आधारावर हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. स्वामी विवेकानंदांनी याच सनातन हिंदूधर्मराष्ट्राची विश्वबंधुत्वाचा सनातन संदेश देणारी भगवी पताका विश्वात फडकविली.

भागवतकथा, रामकथा, महाभारतकथा, देवी-भागवत, भगवद्गीताकथाप्रसंग यांचे जागरण कथानिरूपणासह करीत; सनातनाकडून अनंताकडे चाललेली वाटचाल निवेदित करीत मनामनात हिंदूधर्मराष्ट्र प्रेरित करण्यासाठी व्रतस्थपणे वाटचाल करीत आहेत. एक प्रकारे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे अबाधितपणे पुनरुत्थान करण्यासाठी व्यासकुल वाग्यज्ञ मांडत होते. त्या कुलाचे अवघे संचित घेऊन प्रकटलेल्या किशोर व्यासांच्या ठिकाणी ही सनातनातली सर्वज्ञता बालपणीच प्रकटली होती. या सर्वज्ञतेचा विनियोग परंपरागत व्यासवृत्तीने सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थानासाठी करावा, असे आवाहन सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा भगवा ध्वज किशोरजींना करीत होता.

या भगव्या ध्वजाचे दर्शन राष्ट्र-आराधन करणाऱ्या स्वयंसेवकांच्या चमूत किशोरजींना संघस्थानावर घडले. याच कारणासाठी संघात जाऊन स्वयंसेवक

वृत्तीने राष्ट्रपुनरुत्थानाच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे असे अरुण-तरुण अवस्थेतील किशोरजींनी ठरविले. **'त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयम्'** अशी प्रतिज्ञा करीत, **'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते'** या संकल्पाने किशोरजी सिद्ध होत होते. श्री. दा. का. थावरे लिहितात- 'श्री व्यासजी या अवस्थेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात. संघाने केलेल्या संस्काराचा उल्लेख ते कृतज्ञतेने करतात. संघकार्यात त्यांनी पूर्ववयात खूप रस घेतला. लहानपणी नियतीची इच्छा वेगळीच होती.' सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थान करण्याच्या मार्गाचा उगम वैदिक संस्कृती परंपरेतच आहे, हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा मूलभूत विचार व्यासकुलाच्या परंपरेतून आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संकल्पित कर्मवान आचरणातून त्यांच्या ठायी दृढावला होता.

त्या काळातील नगर जिल्हा प्रचारक म्हणून कार्य करणारे श्री. दामूअण्णा दाते किशोरजींबद्दल मोठ्या प्रेमाने भरभरून सांगत असत- 'आपल्या नगरचा एक स्वयंसेवक किशोर व्यास भागवतकथा व प्रवचनात फार रमून गेला आहे.'

स्वामी मकरंदनाथ यांच्या या आठवणीतून व्यासकुल परंपरेतून आणि संघस्थानावरून मनात संकल्पित झालेले सनातन हिंदूधर्मराष्ट्र जागरण पारंपरिक कथाप्रवचनातून करता येईल असे किशोरजींनी निश्चित केले, असेच सूचित होते. प्राप्त परिस्थितीत भगव्या ध्वजाला सद्गुरू स्थानी संकल्पून हिंदूराष्ट्राचे पुनरुत्थान करण्याचा संकल्प ज्या हिंदूधर्मराष्ट्रयोगी संस्थेने आणि त्यातील समर्पित स्वयंसेवक संघटनेने केला, त्या संकल्पाच्या पूर्ततेसाठी समाजप्रबोधनाचा, सनातन नारदीय परंपरेचा मार्ग किशोरजींनी निवडला.

बालपणातच दिव्य ज्ञान प्रकटलेले किशोरजी प्रत्येक गोष्टीकडे सामंजस्य, सद्भाव आणि समन्वय याचा विचार करीत वावरताना दिसतात. हे त्यांच्या बाल, अरुण, तरुण वयोमानातील अवस्थेचे वेगळेपण नजरेत भरते. दिव्य प्रज्ञा प्राप्त असूनही वर्तमानकालात विविध प्रकारे मांडल्या गेलेल्या वैज्ञानिक आणि तात्त्विक वैचारिक व्यूहांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय नारदीय परंपरेच्या मार्गाने सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी योग्य प्रकारे प्रबोधन करता येणे शक्य नाही हे किशोरजींच्या लक्षात आले होते. बहुधा स्वामी विवेकानंदांचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर असावा. जर सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करावयाचे असेल तर भौतिक अभ्युदय आणि मनःशांतीसाठी आध्यात्मिक अभ्युदय साधताना

विश्वातील भौतिक आणि आध्यात्मिक गोष्टींशी भारतीय संकल्पनांचा तुलनात्मक विचार करून त्यांचे श्रेष्ठत्व पटवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम सर्वांगीण अभ्यासाची गरज आहे असा विचार त्यांनी केला असावा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा परमवैभवसंपन्न स्वराष्ट्रनिर्मितीचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे 'अभ्यासूनि प्रकटावे' असा सामंजस्याचा विचार स्वामींनी केला असावा. एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यावर प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मेडिकल, इंजीनिअरिंग अशा ज्ञानशाखांमध्ये अभ्यास करण्याचे बाजूला सारून, अर्थात व्यक्तिगत स्वप्रतिष्ठा बाजूला सारून, स्वराष्ट्रप्रतिष्ठेला महत्त्व दिले पाहिजे; हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार त्यांनी स्वीकारला असला पाहिजे.

भारवी खरे 'पुण्यश्लोक स्व. पं. मदनगोपालजी व्यास (चरित्र)' पुस्तकात लिहितात– 'किशोर एस.एस.सी. झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी पुण्याला जाण्यासाठी उत्सुक होता. वाढत्या प्रपंचाबरोबर आर्थिक ओढग्रस्त स्थितीमुळे कसे जमायचे हा मोठा प्रश्न होता. परंतु श्री. हरिभाऊंनी एकंदर परिस्थितीचा अंदाज घेऊन नोकरीसाठी पुणे मुक्कामी जायचे ठरविले. श्री. भाऊसाहेबांचा या गोष्टीला विरोध असूनही त्यांनी त्यांना अनिच्छेनेच परवानगी दिली. श्री. हरिभाऊंना योगायोगाने आणि मित्राच्या ओळखीतून किर्लोस्कर न्यूमॅटिक्समध्ये नोकरी मिळाली. त्यामुळे आता श्री. किशोरजी यांचा पुण्यात जाऊन शिक्षण घेण्याचा प्रश्न सुटणार होता. परंतु दरम्यान ठाणे येथील पं. आठवले यांच्या तत्त्वज्ञान विद्यापीठाची जाहिरात श्री. किशोरजी यांच्या पाहण्यात आली. मुळातच अध्यात्म आणि धार्मिक विद्येकडे कल असलेल्या श्री. किशोरजी यांना अतीव हर्ष झाला. त्यांनी भाऊसाहेबांना थोडेसे दबकत, घाबरून तत्त्वज्ञान विद्यापीठाची जाहिरात दाखवली. भाऊसाहेबांनीदेखील आपल्या परिचयातील श्री. करमसीभाई सोमय्या यांच्याकडे श्री. किशोरजी यांना नेले. तेथे सविस्तर चर्चा झाली. श्री. किशोरजी यांचे संस्कृत आणि पुराणग्रंथांचे ज्ञान पाहून त्यांना लगेच तत्त्वज्ञान विद्यापीठात प्रवेश मिळाला. एकीकडे आनंद तर दुसरीकडे श्री. किशोरजी आपल्यापासून दूर राहणार याची खंत भाऊसाहेबांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.'

* *

## ।। तीन ।।

# अभ्यासूनि प्रकटावे

शिशु-बाल अवस्थेतील अभ्यास - पारंपरिक शिक्षणाबरोबरच सनातन भारतीय ज्ञानपरंपरेची ओढ - अरुण-तरुण वयातही पारंपरिक अभ्यासाबरोबर धार्मिक, आध्यात्मिक व राष्ट्रीय अभ्यास सुरूच - तत्त्वज्ञान विद्यापीठात प्रवेश - महातीर्थ काशीत प्रकटले 'आचार्य' - सिद्ध राष्ट्रयोग्याची अखंड अध्ययनसाधना.

## ।। तीन ।।
# अभ्यासूनि प्रकटावे

समर्थ रामदास यांच्या ‘अभ्यासूनि प्रकटावे’ या उक्तीप्रमाणे व्यासकुलाची परंपरा होती. वेदोपनिषदे, शास्त्रे, पुराणे, स्मृतिग्रंथ, धर्मसूत्रे, श्रीमद् भगवद्गीता, रामायण, महाभारत, देवीभागवत, योगवासिष्ठ याबरोबर संतांचे वाङ्मय यांच्या अभ्यासाची परंपरा हे व्यासकुलाचे वैशिष्ट्य होय. जणू वेदव्यासांचे नाव सार्थ करणारे हे कुल. व्यासकुलातील एकही व्यक्ती या अभ्यासाला अपवाद होती असे म्हणता येणार नाही. कदाचित अभ्यासात कमीजास्तपणा किंवा वाणीकौशल्याचा कमीपणा अधिक असेलही; परंतु या ग्रंथांचे अवलोकन आणि अभ्यास घडला नाही, असे झाले नाही. पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराजांच्या बाबतीत तर मातुल गृहाकडूनही अशीच परंपरा त्यांना लाभली.

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांची विद्यार्थिदशा किंवा अध्ययनाची सुरुवात केव्हा झाली? असे कोणी विचारले तर त्याचे उत्तर म्हणजे गर्भदशेपासूनच ही सुरुवात झाली, असे म्हणावे लागते. त्यांच्या ठायी बालपणीच सर्वज्ञता प्रकटली. पू. स्वामी हे जणू शुकमुनींचे अवतार आहेत असे म्हणावे लागते. ब्रह्मर्षि नारदांच्या बाबतीत जे गर्भदशेत घडले तेच पू. स्वामींच्या बाबतीत घडले.

**शिशु–बाल अवस्थेतील अभ्यास :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी, त्यांना शैशवावस्थेत बोलता येऊ लागले

तेव्हाच श्रीमद् भगवद्‌गीता मुखोद्‌गत केली. अक्षरज्ञान झाले तेव्हांपासून त्यांनी श्रीमद् भागवतकथा वाचायला सुरुवात केली. आजोबा, आई-वडील यांच्या सान्निध्यात अवलोकन, निरीक्षण आणि अनुकरण यामुळे घराण्याचा वारसा मौखिक परंपरेने त्यांनी आत्मसात केला. या त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांच्या ठायी घराण्याचे ज्ञानसंचित प्रकटले. बालवयातच ते घराण्याने अभ्यासिलेले सर्व ज्ञान प्रकट करू लागले! एवढेच नव्हे तर वडिलांसमोर आणि परिवारासमोर अनेक जटिल प्रश्नांची उत्तरेही ते हजरजबाबीपणाने देऊ लागले.

**पारंपरिक शिक्षणाबरोबरच सनातन भारतीय ज्ञानपरंपरेची ओढ :-**

पू. स्वामींचे प्राथमिक शिक्षण सुरू असताना पहिलीपासून चौथीपर्यंत त्यांच्याकडून आता कोणता अभ्यास करून घ्यायचा असा प्रश्न गुरुजनवर्गाला पडे. पाठ्यपुस्तकातील कविता, बोधकारक कथा, इतिहासातील माहिती त्यांना तोंडपाठ असे. एवढेच नव्हे तर नेमलेल्या गणिताच्या पुस्तकातील सर्व उदाहरणे सर्वांअगोदर सोडवून ते मोकळे होत. स्वाभाविकपणे मिडल स्कूलच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला कोणाकोणाला बसवायचं? असा जेव्हा प्रश्न आला तेव्हा शिक्षकांनी सर्वांआधी त्यांचे नाव लिहिले. शिक्षकांचा विश्वास खरा ठरला. नगर येथे झालेल्या स्कॉलरशिपच्या परीक्षेत त्यांना स्कॉलरशिप मिळाल्याचे जाहीर करून; जणूकाही किशोर उपजतच हुशार आहेत एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांत सर्वश्रेष्ठ आहेत, असे शिक्षण विभागाने जाहीर करून टाकले.

इयत्ता चौथीपर्यंतच्या आपल्या या प्रवासात एका बाजूला पाठ्यपुस्तके आत्मसात करायची; तर दुसऱ्या बाजूला आई गुलाबदेवींबरोबर भजन, प्रवचन, कथाज्ञानयज्ञ, कीर्तन अशा उपक्रमांना उपस्थित राहून त्यांचे आपल्या घरात किंवा सवंगड्यांत अनुकरणात्मक प्रयोग करायचे, असे त्यांचे चाललेले असायचे. वडिलांचे पूजापाठ, भागवत, भगवद्‌गीता, रामकथा यांचे निरूपण, त्याचबरोबर अन्य कथाकारांचेही निरूपण ते लक्षपूर्वक ऐकत. त्यामुळे पूजापाठातील कर्मकांड याबरोबरच प्रवचन, कथा इ. मध्ये संदर्भाने आलेले वेदोपनिषदे, पुराणे, शास्त्रे ह्यातील श्लोक आणि त्या संदर्भात आलेल्या दिव्य कथा त्यांना एकपाठीपणामुळे अवगत होऊन जात.

याच काळात रा. स्व. संघाच्या संघस्थानावर प्रार्थना, पद्ये, शिवछत्रपतींच्या कथा, सूचक खेळ आदि गोष्टींत ते रस घेऊन त्या गोष्टी आत्मसात करीत.

हाच त्यांचा शिरस्ता पाचवी ते सातवी या वर्गांमध्येही अधिक प्रगल्भतेने सुरू होता. सामान्य विज्ञानातील आणि गणितातील माहिती व सूत्रे यांचा पडताळा ते दैनंदिन जीवनातील साधने आणि व्यवहार यामधून घेत असत. याच कालावधीत त्यांनी भागवतकथेचा प्रयोग आपल्या आप्त आणि सवंगड्यांमध्ये करून दाखविला. तो पूर्ण यशस्वी झाल्याचे सर्वांनी मान्यही केले. या कालखंडात भारतीय प्राचीन वाङ्मयातील अनेक प्रश्न त्यांना पडत. त्याची चौकसपणे विचारणा आपल्या वडिलांकडे आणि त्यांच्या बरोबरच्या माणसांकडे करीत असत. स्वामींच्या वडिलांच्या म्हणजे भाऊसाहेबांच्या संग्रहात, वेदांच्या संहिता, उपनिषदे, रामायण, महाभारत, संस्कृत व्याकरण व निवडक काव्यनाटके, गीताप्रेसचे पुष्कळसे साहित्य, आर्यसमाज साहित्य, पू. स्वामी करपात्रजींचे ग्रंथ, ज्योतिषविषयक जवळपास सर्वच ग्रंथ, अनुष्ठाने व कर्मकांडविषयक साहित्य, दासबोध वाङ्मय, हस्तलिखित ज्ञानेश्वरी असे विपूल वाक्‌धन होते. विद्यार्थिदशेत किशोरजी या सर्व ग्रंथांचे अवलोकन व प्रसंगी वाचन करीत. त्यांच्या घराशी स्नेहबंध असलेल्या, सुतारकाम करणाऱ्या खातीजींनी किशोरजींना रोज स्वतः नदीवर जात असताना पहाटे सव्वातीन वाजता अभ्यासाला उठवावे. तेव्हां किशोरजी तत्काळ उठत आणि अभ्यासाला बसत. अभ्यासासाठी लवकर उठणे हे स्वामीजींचे नित्याचेच झाले होते.

## अरुण–तरुण वयातही पारंपरिक अभ्यासाबरोबर धार्मिक, आध्यात्मिक व राष्ट्रीय अभ्यास सुरूच :–

बेलापूरमधील जे.टी.एस. हायस्कूलमध्ये इ. ८ वीमध्ये त्यांनी प्रवेश केल्यापासून १९६६ साली ११ वीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होईपर्यंत त्यांच्या दिव्य व्यक्तिमत्त्वाचा अनुभव सर्वच शिक्षकांना येत होता. सर्वच विषयांमध्ये ते सर्वाधिक पारंगत (outstanding) आहेत हे सर्वच शिक्षकांच्या लक्षात आले होते. इंग्रजी भाषा नव्याने आत्मसात करायची होती, असे असतानाही ते मराठी, हिंदी, संस्कृतबरोबरच इंग्रजीमध्येही अस्खलित बोलू–लिहू लागले. एवढे शब्दप्रभुत्व आणि संभाषण तथा लेखनप्रभुत्व त्यांनी संपादन केले. गणित, फिजिक्स–केमिस्ट्री, बॉटनी, बायोलॉजी, झुऑलॉजी या बाबतीत तर ते आपल्या ज्ञानाविष्काराने शिक्षकांना थक्क करून टाकीत.

किशोरजींनी ब्रिटिश कालापासून चालत आलेल्या पारंपरिक शिक्षणपद्धतीतील

नेमलेल्या अभ्यासक्रमाच्या बाबतीत नेहमी १००/१०० गुणांचाच विचार केला. त्यामुळे ते महाराष्ट्र एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेत अर्थात तत्कालीन अकरावीत अतिविशेष गुणवत्तेसह प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

त्या काळात असे अभ्यासात हुशार विद्यार्थी सामान्यतः इंजीनिअरिंग, मेडिकल किंवा कॉमर्समधील चार्टर्ड अकाउंटंट आदींकडे जाण्याचा विचार करीत. मात्र याही बाबतीत, भारतीय प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासाने मुळातच परिपक्व दशेला पोहोचलेल्या स्वामीजींनी सर्वांनाच धक्का दिला. त्यांनी तत्त्वज्ञान विद्यापीठात जायचे ठरविले.

असे ठरविण्यामागे त्यांच्या ठायी दोन कारणे संभवतात. त्यातील पहिले कारण म्हणजे वेदोपनिषदांचे सारभूत तत्त्वज्ञान ज्या भगवद्गीतेत आहे, ती भगवद्गीता त्यांची मुखोद्गत होती. आश्चर्यवत प्रकटलेल्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाच्या साहाय्याने आणि व्यासकुलातील कथानिवेदकांच्या विश्लेषणातून मिळालेल्या ज्ञानाच्या आधाराने स्वामीजींनी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान भाष्यासह प्रकट करता येईल अशा तऱ्हेने अभ्यासिलेले होते. एवढेच नव्हे तर त्यातील कर्मयोगाचे धर्मरक्षणाच्या कर्तव्यतत्परतेने संघर्ष करीत ठामपणाने संरक्षणासाठी उभे राहिले पाहिजे हे सांगत. योगेश्वर श्रीकृष्ण आणि पुरुषार्थाचे प्रतीक म्हणून अर्जुन ह्यांचा विचार केला पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन असे.

अशा सूक्ष्म तत्त्वज्ञानात्मक अभ्यासाच्या बाबतीत किशोरजी अग्रेसर होते. या अरुण-तरुण वयात संघस्थानावर सद्गुरू म्हणून लहरणारा भगवा ध्वज प्रेरणा देत होता.

**तत्त्वज्ञान विद्यापीठात प्रवेश :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी ठाणे येथील पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांनी १९५८ मध्ये स्थापन केलेल्या तत्त्वज्ञान विद्यापीठामध्ये अतिशय विचारपूर्वक प्रवेश घ्यायचे ठरविले. या विद्यापीठात वैश्विक धर्मगुरू, चिंतक, विचारवंत यांनी मानवाच्या सुखशांतीसाठी केलेल्या विचारांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास तर्कशास्त्र, इंग्रजी, इतिहास, विविध विचारधारा त्याचबरोबर रामायण, महाभारत आणि मानसशास्त्र यांच्यासह अनेक विषयांचा सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या दृष्टीने अभ्यास करविला जातो. येथील अभ्यासक्रम स्नातक व स्नातकोत्तर असा एकूण सहा वर्षांचा म्हणजे

पदव्युत्तर अभ्यास समकक्ष (Post graduate equal) आहेत.शिवाय विविध विद्यापीठांच्या पदवी परीक्षेला बसण्याचीही सोय आहे. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे स्वाध्याय परिवाराचे कार्य स्वामींना ज्ञात होते. आपल्या जीवित कार्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे असा विचार करून स्वामींनी या विद्यापीठात प्रवेश केला. पू. स्वामींच्या परिवाराची पार्श्वभूमी, संस्कृत आणि इंग्रजीवरील प्रभुत्व हे लक्षात येताच पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे किशोरजींकडे विशेष लक्ष गेले.

या विद्यापीठाचे ज्ञानदान-कार्य भारतीय परंपरेतील गुरुकुल आश्रमाप्रमाणे सुरू आहे. दिव्य ज्ञान प्रकटलेल्या पू. स्वामींना हे वातावरण म्हणजे अध्ययन करण्यासाठी पर्वणी वाटली.

या आश्रमातील स्वामीजींच्या अध्ययनप्रक्रियेचे वर्णन श्री. दा. का. थावरे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. - 'या विद्यापीठ आश्रमाचे संस्थापक थोर विभूतिमत्त्वाने मंडित असलेले पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे किशोरजींच्यावर विशेष प्रेम होते. या प्राचीन आश्रमपद्धतीत किशोरजींचा सहा वर्षांचा काळ केवळ अध्ययन, अभ्यास, चिंतन आणि स्वतःच्या पारमार्थिक साधनेत व्यतीत झाला. शिक्षक, विद्यार्थी एकत्र राहत. स्वतःची कामे स्वतः करीत. या महाविद्यालयाचा दिनक्रमही एखाद्या ऋषि गुरुकुलाप्रमाणे होता. ब्रह्ममुहूर्ती साडेचार वाजता उठावे. सहा वाजेपर्यंत प्रातर्विधी, व्यायाम, सूर्यनमस्कार, स्नान-संध्या, ध्यानधारणा, स्मरणादि कार्यक्रम उरकावेत. साडेसात ते साडेअकरा आणि दीड ते पाच वाजेपर्यंत शिक्षण; सहानंतर खेळ, कपडे धुणे इ. वैयक्तिक कामे. सात वाजता सामुदायिक प्रार्थना-भोजन, अभ्यास, ईशस्मरणात योगनिद्रा. आठवले शास्त्रीजींचा ऋषितुल्य आचार-विचार, जनजागरणाचे कार्य या सर्वांचा विलक्षण परिणाम आचार्यांवर झाला. श्री. थत्ते प्राध्यापक त्यांना इतिहास आणि इंग्रजी शिकवीत. त्यांचा शिक्षण क्षेत्रातला अधिकार असाधारण होता. त्यांनी दिलेली राष्ट्रीय दृष्टी मनात ठसली.

पं. रघुनाथ शास्त्री जोशी, प्राचार्य पंडित आदि शिक्षक प्रभूती म्हणजे असामान्य अधिकारी होते. या कालात न्याय, व्याकरण, वेदान्त, योग, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र आदि विषयांचे सखोल अध्ययन झाले. या ठायी ते पदवीधर झाले.

या विद्यापीठात अंतीची चार वर्षे वेदांताच्या अध्ययनात व्यतीत झाली. या विषयाचे प्रा. पंडित आत्मारामशास्त्री जेरे हे प्रकांड पंडित होते. ते नरसोबाच्या

वाडीचे असून निस्सीम दत्तोपासक होते. त्यांनी अंमळनेरसारख्या विख्यात तत्त्वज्ञान मंदिरात तीन तपांपेक्षा अधिक काळ न्याय, वेदान्ताचे अध्यापन केले होते. त्यांची प्रगाढ विद्वत्ता, तेवढीच नम्रता, अंतर्बाह्य शुचिता, शुद्ध आचरण, वाणीतील पांडित्यासह गोडवा आणि कमालीचा प्रांजळपणा अन्यत्र पाहावयास मिळणार नाही. अशा जेरे शास्त्रींचा आदर्श व्यासजींच्या मनावर परिणाम करून गेला; नव्हे तर तद्वत जीवनाचार झाला.'

तत्त्वज्ञान विद्यापीठातील वेदान्ताचे विद्यापीठीय अध्ययन संपवून त्यांनी तत्त्वज्ञानाचा तौलनिक अभ्यास केला खरा; पण त्यांच्या प्रज्ञासूर्याला भारतीय परंपरेतील वेदोपनिषदांचे आणि शास्त्रांचे मुळातून अध्ययन करण्याची इच्छा होती. ही इच्छा कशी पूर्ण होणार याचा विचार करत असताना त्यांनी काशीला जाण्याचे ठरविले.

## महातीर्थ काशीत प्रकटले 'आचार्य' :–

किशोरजींना आचार्य म्हणून सर्वत्र ओळखले जाते. अलीकडे भागवतकथा सांगणाऱ्यांना किंवा रामकथा आदि कथा सांगणाऱ्यांनाही आचार्य अशी उपाधि लावली जाते. पू. स्वामी गोविंददेव यांनी मात्र आचार्य ही उपाधि अभ्यासाची पराकाष्ठा करून संपादन केली. त्याचे कारणही तसेच होते. घराण्यातून मिळालेल्या वारसाधनाने त्यांना वेदोपनिषद, शास्त्रे, स्मृतिग्रंथ, भगवद्‌गीता यांचे मौखिक परंपरेने ज्ञान प्राप्त होते. त्यांना स्वतःच्या ठायी प्रकटलेल्या दिव्य ज्ञानाचा प्रत्यक्ष अभ्यासातून पडताळा घ्यावयाचा होता. वैदिक संस्कृत आणि त्यांचा संथापूर्वक अभ्यास करून पाश्चात्य दर्शनाशी तुलनात्मकतेने त्याची सांगड कोणत्या प्रकारे घालता येते, याचाही विचार करावयाचा होता. अनादि कालापासून भारताकडे असलेले ज्ञानसंचिताचे सामर्थ्य जाणून घेऊन कथाज्ञानयज्ञातून ते प्रकट करण्याचा त्यांना ध्यास होता. याकरिता त्यांनी भारतीय सनातन परंपरेप्रमाणे काशीनगरीत जाऊन जीवनपावनी गंगेच्या तीरावर अभ्यास करावयाचे ठरविले.

याचे वर्णन श्री. दा. का. थावरे यांनी केले आहे. – 'तत्त्वज्ञान विद्यापीठातील अभ्यास पूर्ण केल्यापासून पुढची साधारणतः पाच वर्षे किशोरजी काशीला होते. वाराणसीचे सुप्रसिद्ध वैदिक पू.श्री. विश्वनाथशास्त्री वामन देव यांचे घरीच अध्ययन करण्यासाठी ते राहिले. पं. राजराजेश्वरशास्त्री द्रविड यांचे सांगवेदविद्यालय – गोयंका महाविद्यालय आणि अन्य विद्वानांकडे त्यांनी आपले मूळ अध्ययन

पूर्ण केले. या अध्ययनांत षड्दर्शनांचे मूळ संस्कृतमधून अध्ययन केले. तसेच पाश्चात्य दर्शनांचा अभ्यासही येथेच पूर्ण केला. त्यानंतर तेथेच मोठ्या सन्मानाने 'आचार्य' ही पदवी प्राप्त केली. काशी येथे श्री. विनायक देव व श्री. जयंतीलाल शहा इत्यादि सहकारी मित्रांच्या सहाय्याने त्यांनी सन्मित्र मंडळ स्थापन केले व त्या माध्यमातून अनेक वैचारिक उपक्रम राबविले.

काशीच्या या वास्तव्यात किशोरजी नित्य गंगास्नान करीत. भगवत-आराधना, भागवतादि ग्रंथांची पारायणे, विभिन्न विषयांचा अभ्यास आणि अनेक ठिकाणी श्रवणास जाणे, एवढाच त्यांचा कार्यक्रम असे. याव्यतिरिक्त ते कशातही सहभागी झाले नाहीत. हा काल म्हणजे त्यांची अखंड अभ्याससमाधीच होती. या दृढ अभ्यासाने ज्ञानाचे भांडारच त्यांच्या अंतरी साठविले गेले.

## सिद्ध राष्ट्रयोग्याची अखंड अध्ययनसाधना :-

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्याच्या संकल्पसिद्धीसाठी सिद्ध राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज दिव्यज्ञानी असूनही वर्तमानकालाशी आणि परिवर्तनप्रक्रियेशी सतत अनुबंध राखण्याचा प्रयत्न करतात. यासाठी जे-जे नवीन, संबंधित आणि उपयुक्त असे विचारधन पुस्तकरूपाने, वर्तम ानपत्रांच्या माध्यमातून, निरनिराळ्या चर्चासत्रांच्या माध्यमातून, विचारवंतांच्या वैयक्तिक भेटीगाठींतून मिळत राहील, ते-ते वेचित सतत ज्ञानसंचय करीत असतात. *'प्रसंगी अखंडीत वाचित जावे' ही उक्ती त्यांच्या बाबतीत अक्षरशः खरी आहे. त्याचाच विस्तार करायचा तर 'प्रसंगी अखंडीत चर्चीत जावे । प्रसंगी अखंडीत बोधीत जावे ।'* असा त्यांचा ज्ञानयज्ञ सुरूच आहे.

अभ्यासाच्या बाबतीत त्यांची तुलना जरी कोणाशी करता येत नसली तरी पू. मा. स. गोळवलकर गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज, विनोबाजी भावे, द. बा. ठेंगडी अशा काही लोकांशी जरूर करता येईल. हातात नवा ग्रंथ पडला रे पडला की त्याचे आकलन करून घेऊन ते तत्काळ संग्रही ठेवून देतात. सर्व ज्ञानशाखांमधील ज्ञान संग्रही करण्याचा छंद त्यांना आहे. वैदिक वाङ्मयाएवढे ज्ञान मात्र नव्या परिप्रेक्षात प्रकट होत नाही, याची खंतही त्यांना आहे. मूलभूत धर्मतत्त्वज्ञान व मूलभूत शास्त्रीय ज्ञान यांची नव्या-नव्या संदर्भाने वैश्विक मानवाच्या भौतिक अभ्युदयासाठी आणि माणसामाणसांत समभाव निर्माण होण्यासाठी अर्थात मनःशांती लाभण्यासाठी

सप्रमाण मांडणी, पुनर्मांडणी कशी करता येईल, सत्य शाश्वताचे मंडन आणि असत्य अशाश्वताचे खंडन कसे करता येईल, याचे सतत चिंतन अभ्यासपूर्णतेने ते करीत असतात. त्यांच्या ज्ञानसाधनेकडे पाहून म्हणावेसे वाटते-

**हा अखंड नंदादीप । जळणार सतत जळणार ।**
**हा असाच तेवत जगती । निज प्रकाश नित देणार ।।**

* *

॥ चार ॥

# सिद्ध, राष्ट्रयोगी पू. स्वामींचा कथाज्ञानयज्ञ विजयरथ

पंचविध कथाज्ञानयज्ञ - वाग्यज्ञाची सुरुवात - पू. स्वामीजींकडून दीक्षा घेऊन सेवाकार्यात सामील - कथाज्ञानयज्ञ माध्यमातून राष्ट्रपुनरुत्थानासाठीचे जागरण - अनुग्रहातून आत्मविश्वास-जागरण, प्रबोधन आणि लोकसंग्रह - कथाज्ञानयज्ञाच्या निमित्ताने आपल्या दिव्य विभूतिमत्त्वाचा प्रेमपूर्वक आविष्कार व लोकसंग्रह.

## ।। चार ।।

# सिद्ध, राष्ट्रयोगी पू. स्वामींचा कथाज्ञानयज्ञ विजयरथ

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा कथाज्ञानयज्ञ बालवयातच सुरू झाला होता. बालवयातच त्यांच्या ठायी दिव्य ज्ञान प्रकाशले होते. सिद्ध ज्ञानी पुरुष म्हणून त्यांचे अनुभव परिवार, गाव, सवंगडी, पंचक्रोशी, परिसर आणि अशा सर्व ठायी अनुभूत होत होते. वयाच्या दहाव्या वर्षी कथानिरूपण करीत आप्तेष्टांना त्यांनी प्रचिती घडविली होती. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी श्रीमद् भगवद्‌गीतेवर व्याख्याने देण्यास सुरुवात केली. त्यांचे सिद्ध ज्ञानी पुरुषत्व त्यांच्या शिक्षकांनाही जाणवले होते.

श्रीमद् भागवत, भगवद्‌गीता, श्रीरामकथा, श्रीकृष्णकथा, महाभारतकथा, देवीभागवत अशा कथायज्ञाची परंपरा, त्याचबरोबर ज्योतिर्विद्या आणि धर्मशास्त्रीय ज्ञान तथा कर्मकांड यांचा सर्व मनुष्यमात्रांचे त्रितारहरणार्थ उपयोग करायचे त्यांनी ठरविले. भक्ती, ज्ञान प्रकटवून (संसार-प्रपंचाविषयी आणि) देव, देश व धर्म याविषयी जनमानसांत आस्था निर्माण करीत जीवन व्यतीत करावे, ही त्यांची वंशवृत्ती त्यांच्या ठायी आपसूकच प्रकटली होती.

एखाद्या अवतारी पुरुषाप्रमाणे लोकोद्धारासाठीच ते प्रकटले आहेत; अशीही प्रचिती लोकांना येत आहे. तथापि *‘अलौकिक न व्हावे लोकांप्रति’* आणि *‘मार्गाधारे वर्तावे, विश्व मोहरे लावावे’* ही प्रत्यक्ष पांडुरंगावतार ज्ञानेश्वरांची

उक्ती पू. स्वामींच्या वर्तनातून जाणवते.

**पंचविध कथाज्ञानयज्ञ :–**

पू. स्वामींच्या श्रीमद् भागवतकथा वा अन्य सर्व कथाज्ञानयज्ञांचा विचार करतां, पू. स्वामी अर्थात पूर्वाश्रमीचे आचार्य किशोरजी व्यास पंचविध प्रकारे सर्वांना प्रतीत होतात. परंपरेप्रमाणे कथाज्ञानयज्ञ हा सत्संगाचा किंवा भक्तीचा जागर म्हणून श्रद्धावंतांना पुरेपूर संतुष्ट करतो. जीवन सार्थकी लागल्याचा अनुभव जनसामान्य करतात.

दुसरे म्हणजे कथाज्ञानयज्ञातून लौकिक प्रपंच नेटका करावा, हा संदेश पू. स्वामी देतात. सर्वांठायी विवेक निर्माण व्हावा, कथानिरूपणातून स्थल–काल–परिस्थितीसापेक्षतेने सोदाहरण आणि सत्संगतेने श्रोत्यांना ज्ञानार्जन घडावे अशी त्याची विषय मांडणी असते. प्रत्यक्ष नारदमुनींनी किंवा ज्ञानेश्वरांनी प्रपंचाविषयी उद्‌बोधन करावे असा अनुभव त्यांच्या ज्ञानयज्ञातून येतो.

तिसरी गोष्ट म्हणजे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे मनामनात जागरण घडते. राष्ट्रीयत्वाने मने भारून राष्ट्रआराधना करू लागतात, असे मनपरिवर्तन घडते.

चौथी गोष्ट म्हणजे आपल्या कथाज्ञानयज्ञातून किंवा व्यवहारातून प्रभावित झालेल्या व्यक्ती व्यक्तींना सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या राष्ट्रयोगसाधनेत स्वयंसेवी वृत्तीने उभे करण्याचा प्रयत्न ते करतात. सनातन भारतीय संस्कृती, वाङ्मय, न्याय, नीति, भूतदया, विश्वबंधुत्व यांचे जागरण, जतन, संगोपन तथा संस्करण करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम योजून त्या उपक्रमांच्या माध्यमातून व्यक्तिविशेषांना राष्ट्रसाधनेच्या कार्यात स्वयंसेवक म्हणून उभे करण्याचे कार्य घडते.

पाचवी गोष्ट म्हणजे कथाज्ञानयज्ञाच्या निमित्ताने किंवा या निमित्ताने होणाऱ्या प्रवासात अथवा जनसामान्यांत वावरताना ज्या–ज्या व्यक्तींना पू. स्वामीजींच्या विभूतिमत्त्वात आपल्यासाठी तारणहार म्हणून गुरुत्व प्रतीत होते अशा सर्वांना कारुण्याने, माउलीच्या ममतेने जवळ घेऊन त्यांना मार्गदर्शक असे उपाय, उपासना सांगून, दीक्षित करून, स्वतःशी जोडून पू. स्वामी त्यांना आश्वासित करतात. त्याचबरोबर त्यांचा लौकिक दृष्ट्या उद्धार होत असताना त्यांना सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानाच्या कार्यात जोडून घेण्याचे कार्यही पू. स्वामी करतात.

या पंचविध कथाज्ञानयज्ञ–सारणीतून पू. स्वामी गोविंददेव गिरि त्यांच्या

बालवयापासून सनातन हिंदूधर्मराष्ट्रजागरणासाठी लोकसंग्रह करीत आहेत.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण झाले तरच विश्वाचे कल्याण होईल ह्या परात्पर गुरू शंकराचार्यांच्या वेदान्त तत्त्वज्ञानाच्या साररूप संदेशनाचा आणि माउली ज्ञानेश्वरांच्या विश्वशांतीच्या अर्थात पसायदानाच्या संदेशनाचा मार्ग पू. स्वामींनी अवतारकार्य म्हणून स्वीकारला आहे. महाराष्ट्रात, देशात आणि विदेशात सतत होत असलेल्या ज्ञानयज्ञातून पू. स्वामींचा विजयरथ मार्गक्रमण करीत विश्वाला कवेत घेण्यासाठी पुढे जात आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि प्रसंगी संस्कृत या भाषांतून हा कथाज्ञानयज्ञ अस्खलितपणे आणि सहज, अधिकारवाणीने आणि प्रसन्नपणे श्रोतृसंवाद करीत निघाला आहे. वैदिक ऋषि, श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान, श्रीमद् आद्य शंकराचार्य, शक्तिस्वरूपिणी माँ भगवती, आर्य चाणक्य, शिवछत्रपती, ज्ञानेश्वर महाराज, संत तुकोबारायादि संत, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, ज्ञानेश्वरकन्या प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांचे आदर्श लोकांसमोर ठेवीत सिद्धप्रज्ञ पू. स्वामी संचार करीत आहेत.

**वाग्यज्ञाची सुरुवात :–**

पू. स्वामींचे सहाध्यायी रामनाथ रभाजी शिंदे लिहितात– आचार्य पदवी घेतल्यानंतर ते जेव्हा प्रथम बेलापूर येथे आले, त्या वेळी त्यांचे प्रथम प्रवचन करण्यासाठी मी त्यांना आग्रह केला. त्या वेळी गोखलेवाडी येथे सायकलवर जाऊन त्यांनी प्रवचन केले. सुदामा आणि श्रीकृष्ण या विषयावर त्यांचे रसाळ भाषेतील प्रवचन झाले.

नगरचे श्री. रमेशचंद्र आसावा आठवण सांगतात– ‘बात १९७७–७८ वर्ष की है । मेरे स्व. पिताजी के प्रथम स्मृतिदिवस के उपलक्ष्य में श्रीमद् भागवतकथा करनेका परिवार में तय हुआ और हम लोग कथावाचक की तलाश करने लगे तभी स्वामीजी के बारेमें जानकारी मिली । कथाज्ञानयज्ञ सोनगाँव में होना था जो कि बेलापूर से लगभग पच्चीस कि.मी. की दूरी पर था ।

स्वामीजी हमारे गाँव पधारे । कथा आरंभ हुई । स्वामीजीका वह दूसरा ज्ञानयज्ञ था तबसे मेरा स्वामीजीके प्रति स्नेह बढने लगा । मेरा निवास अहमदनगरमें था । अतः मैंने स्वामीजीसे विनती की कि जब भी आप नगर शहरमें पधारेंगे आपका निजी निवास मेरे यहाँ होगा । थोडी हिचकिचाहट के साथ उन्होंने मेरा प्रस्ताव स्वीकार किया । मुझे बहुत खुशी हुई ।

उस समय स्वामीजी का कार्यक्रम गायत्री मंदिर में होता था । धीरे-धीरे नगर शहरमें स्वामीजी के कार्यक्रम बढने लगे । स्वामीजी हमारे यहाँ रुकते । हमारे परिवारमें उनका व्यवहार पारिवारिक सदस्य जैसा होता था । मुझे ऐसा लगता मानो स्वामीजी से मेरा पूर्वजन्म का कोई रिश्ता हो ।

स्वामीजी सभी विषयोंपर अधिकारपूर्वक बोलते थे । अतः शीघ्र ही वे भी जातियों में लोकप्रिय होते गये । सन १९८२ में इसी वजह से प.पू. डोंगरे महाराजजी की श्रीमद् भागवतकथामें स्वामीजीने १०८ भागवतकथा का आचार्यपद सँभाला था ।

स्वामीजी के स्नेह और कृपादृष्टिके कारण ही हमने नयी वास्तु का निर्माण किया । स्वामीजी की पिताश्री से गृहप्रवेश का मुहूर्त तय किया । १५ फरवरी १९८४ का दिन निश्चित हुआ, लेकिन विधाता को कुछ और ही मंजूर था । २६ जनवरी १९८४ के दिन पू. स्वामीजी के पिताश्री का यकायक स्वर्गवास हुआ। मैंने वास्तुशांतिका कार्यक्रम आगे रखने का फैसला किया । स्वामीजीको इस बात का पता चला । उन्होंने मुझे तुरंत बेलापूर बुलाया और कहा कि पिताजीने जो मुहूर्त निकाला है, उसी दिन वास्तुप्रवेश होगा । कार्यक्रम का आचार्यपद उनके छोटे भाई श्री. रमाकांतजी व्यास करेंगे और मेरी स्वयं की भी उपस्थिति रहेगी । फलतः मैं अविभूत था ।'

## पू. स्वामीजींकडून दीक्षा घेऊन सेवाकार्यात सामील :-

बीड येथील श्री. रामप्रसादजी राठी हे संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलचे न्यासी लिहितात - 'माझ्या आई-वडिलांचा स्वर्गवास झाल्यामुळे मन विषण्ण झाले. व्यवसायातून पूर्ण निवृत्ती घेतली. याच कालावधीत म्हणजे डिसेंबर २००२ मध्ये बीड येथे प.पू. स्वामीजींचा भागवतकथा सप्ताह झाला. मी झपाटल्यासारखा भारावून गेलो. आयुष्यातील सगळ्याच घटना आपल्या मनाप्रमाणे होत नसतात; आहे ते स्वीकारण्याची आपली तयारी असावी, अशी मनाची धारणा होण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन व उपदेशच उपयोगी पडले. निराशावादी विचार पूर्णपणे दूर होऊन, मन प्रसन्न होऊन ईश्वरवादी विचार प्रकट होऊ लागले. ही फक्त प.पू. स्वामीजींची माझ्यावरील कृपा.

संत ज्ञानेश्वर गुरुकुल, पुणे, या संस्थेमार्फत चालणाऱ्या नामलगाव, ता.जि. बीड येथील 'श्री गणेश समन्वय आश्रम'ची धुरा, प.पू. स्वामीजी माउलींनी माझ्या

खांद्यावर ठेवली. वेळोवेळी त्यासाठी मार्गदर्शन केले. खरोखरच मी धन्य झालो. आज त्या ठिकाणी ६० मुले आहेत.'

'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान'चे न्यासी, श्री. पुखराज कालानी लिहितात – 'सन १९९१ से हम (मैं और मेरी धर्मपत्नी) हर वर्ष मई–जून में ऋषिकेश (स्वर्गाश्रम) जाते रहे हैं । उन्ही दिनों पूज्य स्वामीजी द्वारा भागवतकथा का आयोजन कोई न कोई यजमान कराता रहा है । १९९७ तक हम नियमित रूप से पू. स्वामीजी की भागवतकथा सुनते थे लेकिन व्यक्तिगत तौर पर स्वामीजीसे मिलना नहीं हुआ था । स्वामीजीकी सरलता–सहृदयता व भागवत प्रवचनोंकी आकर्षक शैलीसे प्रभावित हम दोनोंने स्वामीजीसे गुरुदीक्षा लेनेका निश्चय किया व जून १९९७ में हमने दीक्षा ली ।

सन १९९९ में मेरे जीवनके पचहत्तर वर्ष पूरे हो रहे थे – अतः १९९८ में कथा के दौरान तय किया कि सन १९९९ में स्वामीजीकी भागवतकथा का आयोजन पुष्करमें करवाना चाहिए । स्वामीजीने हमारी प्रार्थनाको स्वीकारते हुए पुष्कर में भागवतकथाके आयोजनकी स्वीकृति प्रदान कर दी । यह कथा १६ सितंबर १९९९ से २४ सितंबर १९९९ तक हुई । मैं सन १९६७ में राजस्थान विधानसभा का चुनाव लड कर विधायक बना था । राजनीति छोडकर मैं आध्यात्मिक जीवन बिताऊँगा, यह न तो कभी मैंने वो मेरे साथियोंने सोचा था ।

स्वामीजीकी गुरुदीक्षा व सन १९९९ की भागवतकथाने मेरे जीवनकी शैली को एकदम परिवर्तित कर दिया । मेरे राजनैतिक जीवनसे आध्यात्मिकताकी तरफ शुरुआत १९९९ में हुई । कथा की आखिरी रात्रि में यह तय किया गया कि पुष्करमें एक वेदविद्यालय आरंभ किया जाए । मेरे अभिन्न साथी स्वर्गीय श्री. चिरंजीलालजी झंवरने यह बीडा उठाया । माहेश्वरी सेवा सदनने विद्यालय के लिए जगह देनेका निश्चय किया । पुणे के आलंदी वेदविद्यालयसे ९ छात्रोंको अध्ययन के लिए पुष्कर बुलाकर 'महेश वेद–अध्ययन केंद्र'की २८ जनवरी २००० को स्थापना कर पुष्कर में वेदविद्यालय का शुभारंभ किया गया ।'

श्री. मदनलाल इनाणियाँ सांगतात– '१७ मई २००२ को बीकानेरमें उस क्षण जब मेरे नेत्रोंने प्रथम बार आचार्य श्री. किशोरजी व्यासके दर्शन किये एवं आचार्यश्रीने मेरे ललाट (आज्ञाचक्र) का पावन स्पर्श किया तो मेरा रोम–रोम

गुरुमय हो गया । मन प्रसन्नता से परिपूर्ण हो गया, आत्मिक शांतिसे सराबोर हो गया और मेरे हृदयोद्‌गार स्वतःही निकल पडे ''गुरुदेव आप की जगत्‌जननी परांबा माँ दधिमति प्रतीक्षा कर रही है । कब आयेगा मेरा लाडला मेरे पास (गोठमांगलोद), कब मेरे इस अखंड प्रांगण में वेदविद्यालय की स्थापना करेगा और कब मुझे पीयूष वाणी से श्रीमद् भागवतकथा का रसपान करायेगा, कब मेरे इस जीर्णशीर्ण भवन (मंदिर) का जीर्णोद्धार करायेगा ।'' आचार्यश्रीने सुनकर आँखें मूंद ली, अंतर्ध्यानस्थ हो गोता लगाया और गद्‌गद हो माँ के चरणों में शीश नवाते हुए मधुर वाणी से बोले ''क्षमा परांबा माँ । अतीत में किये गये संकल्प की विस्मृतिके लिए आज श्री इनाणियाँ के माध्यम से मुझे जगा दिया । उन संकल्पों की याद ताजा कर दी । अध्यक्षजी! आपने मेरे हृदय की बात कह दी । मैं शीघ्र ही माँ के दर्शन करने गोठमांगलोद आऊँगा । वहीं भावी प्रकल्पों की योजना तय करेंगे ।' माह सितंबर २००२ में माँ के दर्शन करने आचार्यश्री माताके धाम गोठमांगलोद पधारे, तभी से बरसने लगी माँ दधिमथि की कृपा एवं आचार्यश्री का आशीर्वाद । श्रीमद् भागवतकथाकी पूर्णाहुति पर आचार्यश्री ने अपने श्रीमुख से आगामी आश्विन नवरात्रि २००४ (दि. १४.१०.२००४ से २०.१०.२००४ तक) के पावन दिवसों में २५१ श्रीमद् भागवत-कथाज्ञान के भव्य आयोजन की उद्‌घोषणा कर इस दधिमथि धाम में सर्वांगीण विकास की पावन गंगा प्रवाहित कर दी । साथ ही उद्‌घोष किया ''मंदिरका जीर्णोद्धार तो परांबा माँ स्वयं ही करवायेगी । मंदिर विकास में यदि यह किशोर काम आ सकता है तो मैं तैयार हूँ । माँ के लाडलो! निश्चिंत होकर आगे बढो और गूँजा दो यह मंत्र ''चलो बुलावा आया है, माँ दधिमथि ने बुलाया है ।''

लातूरचे डॉ. पांडुरंग बाहेती अनुग्रह घेऊन सेवारत होतात. त्यांनी आपल्या भावना कवितेतून मांडल्या आहेत. ते त्यांच्या कवितेत लिहितात-

**म्हे तो वैग्या पूरण काज**
**म्हाने गुरुवर मिलग्या आज ।।धृ।।**
**म्हांसू यांकी यही अपेक्षा ।**
**भारत माता की हो रक्षा ।।**
**देवो तन मन धन की भिक्षा ।**
**होवे सुगम समन्वय काज ।।८।।**

श्री. वसंत काशिनाथ शिंदे सांगतात– युवावस्थेत आचार्यश्री माझे मित्र होते, पण आता ते माझे गुरू आहेत. त्यांचे अंतःकरण माउलीसारखे आहे. त्यांच्या प्रेरणेतून बेलापुरात गोशाला सुरू झाली आणि आम्हाला सेवासंधी मिळाली. आता ही गोशाला एक सांस्कृतिक केंद्र बनली आहे.

कथेच्या निमित्ताने जवळ येऊन अनुग्रह घेणाऱ्या अनेक साधकभक्तांना अशा प्रकारे पू. स्वामींनी त्यांच्या सर्वांगीण राष्ट्र पुनरुत्थानाच्या कार्यात सामावून घेतले.

**कथाज्ञानयज्ञ माध्यमातून राष्ट्रपुनरुत्थानासाठीचे जागरण :–**

नागपूर येथील वंदना श्रीनिवास वर्णेकर लिहितात – 'स्वतः अखंड कार्यरत राहून, भारतीय संस्कृतीच्या रक्षणार्थ वेदांचं रक्षण करण्याचं अभूतपूर्व कार्य ते करीत आहेत. गुरुदेव म्हणजे जणू ज्ञानेश्वर माउली आणि स्वामी विवेकानंद यांच्या दिव्य तेजाचा अपूर्व संगम. जेव्हा ते अंतर्यामी साऱ्यांशी समरस होऊन अवघ्या विश्वावरच आनंदाचं सिंचन करतात, जणू विश्वाशी तदाकार होतात तेव्हा ते ज्ञानेश्वर माउलीच भासतात. आणि जेव्हा भारतभूमीच्या अस्तित्वाचा प्रश्न उठतो, भारतीय संस्कृतीवर घाला घातला जातो, तिच्या लेकरांवर संकटांचा आघात होतो तेव्हा त्या आक्रोशानं अंतर्यामी व्यथित होतात, मातृभूमी त्यांच्यासाठी विश्वापेक्षाही महान ठरते तेव्हा ते स्वामी विवेकानंदच असतात.'

उज्जैन येथील पूर्वप्राचार्य श्री. बी. के. कुमावत सांगतात – 'आचार्य स्वामी गोविंददेव गिरि का भारतीय संस्कृतीरक्षण का महाकार्य निरंतर चल रहा है । उनका शिष्ट–सात्त्विक तथा धार्मिक साहित्य का संवर्धन और वितरण निश्चित ही अनुपम और सर्वानुकरणीय है । वे भगवद्भक्ति, राष्ट्रभक्ति और गुरुभक्ति, सात्त्विक प्रेमभाव, सन्निष्ठा आदि सद्गुणों के आदर्श रूप कहे जा सकते है । लुप्त होती जा रही वेदविद्या की सेवा के लिए सन्नद्ध हो देशभर में वेदविद्यालयों की अद्भुत शृंखला खडी कर सैंकडो वैदिकों के निर्माण से वेदाध्ययन–अध्यापन को मूर्त रूप देने तथा उसे अक्षुण्ण बनाए रखने में आचार्य स्वामी गोविंददेव गिरि का योगदान अविस्मरणीय रहेगा इसमें कोई संशय नहीं है ।'

गत पन्नास वर्षांच्या कालावधीमध्ये झालेल्या कथाज्ञानयज्ञांमध्ये राष्ट्रपुनरुत्थान जागर घडला नाही, असे घडले नाही. सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानाचा संकल्प हा महाराजांच्या विभूतिमत्त्वाचा स्वाभाविक धर्म आहे. स्थल, काल,

परिस्थिती पाहून कथाकथनाबरोबर समीक्षा करताना ते श्रोत्यांच्या मनामनाला हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानासाठी जागवितात.

**अनुग्रहातून आत्मविश्वास–जागरण, प्रबोधन आणि लोकसंग्रह :–**

मुंबई येथील सौ. कल्पना भंडारी सांगतात – आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविणाऱ्या गुरूंच्या शोधात मी होते. पू. आचार्य किशोरजी व्यास यांची कथा गोरेगावात होती. कथा संपवून परत जाण्याच्या बेतात असताना मी मंडपाबाहेर, रस्त्यात हात जोडून पुढे झाले. मला महाराजांचे दर्शन घ्यायचे होते. तेवढ्यात त्यांची गाडी आली. माझ्याजवळ थांबून गुरुजी मला म्हणाले – तुम्हाला गीतेच्या संदर्भात काही हवे आहे तर मला भेटा. मी भेटले. गुरुजींनी मला संत गुलाबराव महाराजांची 'ज्ञानेश्वरी–गूढार्थ दीपिका' याविषयी सांगितले. तो ग्रंथ मी मिळविला, वाचला, तृप्त झाले आणि दुसऱ्याच दिवशी मी महाराजांकडून अनुग्रह घेतला. माझी स्वामी गोविंददेव गिरिजी यांचेविषयी दृढ श्रद्धा निर्माण झाली. आध्यात्मिक उन्नतीबरोबरच व्यावहारिक समस्यांवरही मार्ग निघू लागले. माझे एक मेजर ऑपरेशन होणार होते. स्वामीजींनी मला 'हनुमान चालिसा'चा अखंड पाठ करावयास सांगितला. आश्चर्य म्हणजे, तो रोगच नाहीसा झाला. त्यामुळे ऑपरेशनही टळले.

कॅनडामधील व्हँक्युअर येथील शांतादेवी पराशर या भारतात सद्‌गुरू स्वामी सत्यमित्रानंद गिरि यांच्या दर्शनाला आल्या होत्या. त्यांनी, आचार्य किशोरजी व्यास यांची कथा ऐकावी अशी आज्ञा केली. त्या एकच कथा ऐकून थांबल्या नाहीत. लागोपाठ सहा कथा ऐकल्या. त्याच वेळी महाराजांना पुनःपुन्हा भेटून श्रद्धावंतांना धन्य करण्यासाठी व्हँक्युअर येथे येण्याचे त्यांनी निमंत्रण दिले. पू. स्वामी म्हणाले– माझ्या गुरुदेवांना मला आज्ञा दिली तर मी जरूर येईन. नाइलाजाने मी कॅनडाला परतले. पुढे दोन वर्ष फोनवर त्यांच्याशी संपर्क करत राहिले. १९९६ साली आचार्य श्री. किशोरजी व्यास थेट माझ्या कुटीमध्येच प्रकटले. एडमंटनचे जीवन जी. कायंदे आणि ब्रह्मस्वरूप वर्माजी, टोरँटो येथील डाह्याभाई आणि विनूभाई यांच्या सहकार्याने स्वामींच्या कथांचे आयोजन झाले. त्या काळात स्वामीजी माझ्या मुलांमध्ये मिळून–मिसळूनच गेले नाही, तर तेही मला अम्मा म्हणू लागले.

संगमनेर येथील सौ. शैला विजय पलोड सांगतात – 'उस समय

प.पू. स्वामीजी 'गुरुमंत्र' की दीक्षा भी नहीं देते थे । सपने में आयी हुयी बात मैंने हमारी भाभीजी आदरणीय ललिताजी मालपाणी को बतायी और उन्होंने यह बात प.पू. आचार्यजी को बतायी ।

सपने में हवन चल रहा था, सामने प.पू. स्वामीजी विराजमान थे, उनके सामने मैं बैठी थी, बाजूमें पूजा की सामग्री थी । आँखों से अश्रु झर रहे थे । प.पू.स्वामीजी ने कान में मंत्र पढा । वह मंत्र मुझे पूरा याद था, प.पू. स्वामीजी को मैंने 'गुरुदक्षिणा' दी और उन्होंने मुझे साडी ओढाई । यह एक सपना था ।

लेकिन यह सपना हकीकत में बदल गया और प.पू. गुरुजी के हम शिष्य बन गये । यह सब तो आपका आशीर्वाद और कृपा ही थी, जो सपना हकीकत में बदल गया । आदरणीय गुरुदेव को सादर प्रणाम!'

पू. स्वामीजींनी भारतातच नव्हे तर विदेशातही अनेक ठिकाणी अनुग्रहपूर्वक लोकसंग्रह तर केलाच; त्या बरोबरच विदेशात राहणाऱ्या भारतीयांमध्येही सनातन श्रुतिवाङ्मयाचे संरक्षण, गीतेचा प्रसार आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्रजागरण सातत्याने सुरू ठेवले आहे.

### कथाज्ञानयज्ञाच्या निमित्ताने आपल्या दिव्य विभूतिमत्त्वाचा प्रेमपूर्वक आविष्कार व लोकसंग्रह :–

प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांनी आपल्या प्रेममय विभूतिमत्त्वाने कथाज्ञानयज्ञ प्रसंगाने महाराष्ट्रासह भारतातील आणि विदेशातील अनेक कुटुंबे आपला परिवार म्हणून जोडली. स्वामीजींचे कौटुंबिक जीवन हे विश्वकुटुंबीयत्वाच्या भावनेने जोडलेले आहे. ज्या-ज्या कुटुंबाशी त्यांचा संबंध येईल, त्या-त्या कुटुंबाला ते आपल्याच कुटुंबातील सदस्य आहेत अशी अनुभूती येते. याचे एक अतिशय हृद्य उदाहरण म्हणजे संगमनेर येथील श्रीमती ललिता ओंकारशेठ मालपाणी हे होय. श्रीमती ललितादेवींना ते आपली बहीण अर्थात जीजीच म्हणू लागले. भागवतकथाज्ञानयज्ञाच्या निमित्ताने आचार्य किशोरजी व्यास आणि नंतर पू. गोविंददेव गिरि, प्यारे किशोरभैया झाले.

ललितादेवी मोठ्या नाट्यमयतेने या प्रसंगाचे वर्णन करतात. त्या सांगतात– '३० जुले १९७६ ची गोष्ट. सकाळची वेळ होती. मी किशोरजींच्या बहिणीकडून अनेकदा त्यांचेविषयी ऐकले होते. संगमनेरमध्ये किशोरजींचा मुक्काम सौ. शांताजी भेडा यांचेकडेच असे. आमच्या घरापासून जवळच किशोरजींची कथा सुरू होती.

दुपारी विश्रांतीसाठी ते कुठेतरी थांबत. म्हणून मीच त्यांना आमंत्रण देण्यासाठी त्यांच्या शांताजीजींच्या घरी गेले. २४-२५ वर्षांचा एक युवक स्नान आटोपून, केस पुसत-पुसत पुढे आला. मला वाटले, कथाकार महाराजांबरोबर कोणी अन्य व्यक्ती आलेला असावा. परिचय होताच मी आश्चर्याने थक्क झाले. माझ्यासमोर उभा असलेला तरुण स्वतःच कथाकार होता. कोणी कथाकार एवढा साधासुधा असतो, हे मी पहिल्यांदाच पाहत होते. धाकटे बंधू रमाकांत यांचेबरोबर ते आले होते.

पहिल्याच दिवसापासून त्यांनी मला 'जीजी' म्हणून हाक मारायला सुरुवात केली. नंतर पुढे दोन वर्षे ते संगमनेरात राहिले. पूर्ण चतुर्मास, मंदिरात रात्री दोन तास भागवताच्या दशम स्कंधाच्या पूर्वार्धावर कथा होत राहिली. नित्य घरी येत असत. माझे पती श्री. मालपाणी, किशोरजींच्या विद्वत्तेने आणि साध्या-सरळपणाने खूपच प्रभावित झाले. एक दिवस ते किशोरजींना म्हणाले- आपण हिला 'जीजी' तर म्हणताच, तर मग त्यांच्याकडून राखी बांधून घेऊन, रक्षाबंधन सूत्रात बांधून घ्यावे. किशोरजींनी आपल्या पूज्य माता-पित्यांची आज्ञा घेतली आणि १९७८ साली ऋषिपंचमीच्या दिवशी सोलापूरला माझ्या माहेरी 'राठी' परिवारात आमचे बहीण-भावाचे नाते विधिपूर्वक जोडले गेले. त्या दिवसापासून किशोरजी 'मेरे प्यारे किशोरभैया' झाले.

त्यानंतर संगमनेरमध्ये किशोरजींचा मुक्काम आमच्याकडेच असे. ते कोणी मोठे कथाकार आहेत असे कधी वाटलेच नाहीत. माझ्या मुलांचे मामा बनून आणि माझ्या नातीचे नाना-दादा बनून घरातल्या अन्य सदस्यांसारखेच ते राहत.

कोणत्याही कठीण प्रसंगात ते हमखास आमच्याजवळ असत. १९८१ सालची गोष्ट. श्री. मालपाणीजींचे अल्सरचे ऑपरेशन पुण्यात होणार होते. किशोरजींना कळले. बेलापूरमध्ये वार्षिक कथा चालू होती. त्यांनी रमाकांतजींना कथा सांगायला बसविले आणि स्वतः हॉस्पिटलमध्ये जाऊन आठ दिवस राहिले. कधी कोणाच्या लग्नात सहभागी न होणारे किशोरजी. माझी कन्या अंजलीच्या लग्नात 'मायरा भरण्यासाठी' घेऊन आले.

आम्ही पती-पत्नी दोघेच गंगोत्री-यमुनोत्रीला जाण्यासाठी ऋषिकेशला पोचलो. भैया संगमनेरला येताच त्यांना हे कळले. त्यांनी विमानाने ऋषिकेशला येऊन आमच्याबरोबर यात्रा पूर्ण केली.

दिवाळीचे दिवस होते. माझा मुलगा, संजयचा हात फ्रॅक्चर झाला होता. त्याला फटाके उडविता येत नाही हे पाहून, मागच्या अंगणात सगळे फटाके त्यांनी उडवून दिले. मुलगी अंजली संस्कृत बी.ए. करीत होती. किशोरजी वेळ मिळाला की तिला संस्कृत शिकवत. त्यामुळे ती विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. माझा मोठा मुलगा, राजेश अमेरिकेत शिकता-शिकता नोकरीपण करीत होता. त्याने आपल्या पहिल्या कमाईतून किशोर मामासाठी घड्याळ आणले. आजही ते, तेच घड्याळ हातात बांधतात.

काही वर्षांपूर्वी आमच्या घरावर दरोडा पडला. पहाटे चार वाजता कोणीतरी त्यांना ते कळविले. ते दुःखी झाले. त्यांनी तेथेच अनुष्ठान केले. त्या दरोड्यात राजेशला लागले होते. त्याला मुंबईत हिंदुजा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते. उभेसुद्धा राहता येत नव्हते. अनुष्ठान संपताच किशोरजी मुंबईत हॉस्पिटलमध्ये आले. काही मंत्र म्हणून डोक्यावरून हात फिरविला आणि राजेशने उभे राहून त्यांना प्रणाम केला. मला तर किशोरजी कृष्णसखाच वाटू लागले.

पित्याच्या दुःखद निधनाची वार्ता ऐकताच ते एखाद्या लहान मुलासारखे ओक्साबोक्शी रडू लागले.

एकदा जिवराज महाराज या एका सामान्य ब्राह्मणाचे घरी कथा करण्याचे ठरले होते. अचानक ॲपेंडिक्समुळे त्यांच्या पोटात दुखू लागले. आमचे परिचित डॉ. मुळे फॅमिली डॉक्टर होते. त्यांना सांगितले. किशोरजींनी विचारले - ७-८ दिवस ऑपरेशन टळू शकते का? डॉक्टरांनी जबाबदारी नाकारली. उद्या सकाळी ऑपरेशनला येतो, असे सांगून झोपायला गेले. त्यांनी परमेश्वराजवळ काय प्रार्थना केली कोणास ठाऊक! सकाळी डॉक्टर त्यांना पाहून आश्चर्यचकित झाले. म्हणाले- ऑपरेशनची काही आवश्यकता नाही. ब्राह्मणाकडची कथा सुरक्षित पार पडली.

त्यानंतर दोन वर्षांनी पुन्हा दुखणे उपटले. त्या वेळी हैदराबादमध्ये कथा सुरू होती. अचानक दुखू लागल्यामुळे त्यांनी कथा पूर्ण करून, हैदराबादहून कांचीला जाऊन आपले गुरुजी प.पू. स्वामी जयेंद्र सरस्वती यांचं दर्शन घेऊन संगमनेरला आले. तेव्हा विश्व हिंदू परिषदेची गाडी त्यांना घेऊन जाण्यासाठी दारात उभी होती. रामजन्मभूमीसाठी प्रवचन करायला जायचे होते. अंगात प्रचंड ताप होता. कसेतरी मी त्यांची समजूत काढून डॉक्टरांना दाखवायला सांगितले.

डॉक्टरांनी त्वरित पुण्याला जाऊन ऑपरेशन करायचा सल्ला दिला. कसातरी कार्यक्रम स्थगित करून ऑपरेशन पार पडले. फुटलेले अॅपेंडिक्स पोटात असताना सहा दिवस कथा व तीन दिवस प्रवास झाला. कसे जगू शकले याचे डॉ. मुळे व त्यांच्या सहकाऱ्यांना सतत आश्चर्य वाटत राहिले. गुरुकृपा! परमेश्वराची कृपा! दुसरे काय?

श्री. मालपाणीजींच्या वाढदिवशी 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानची' स्थापना करण्यात आली. त्या वेळी पू. स्वामी सत्यमित्रानंद यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. बालसंस्कार शिबिराचा प्रारंभही मालपाणी यांच्या आग्रहानेच झाला. किशोरभैयांच्या आग्रहानेच मालपाणींनी माहेश्वरी महासभेचे महामंत्रिपद स्वीकारले. त्याच्या बोधचिह्नात शिवलिंग आणि सेवा-त्याग-सदाचार हे महत्त्वपूर्ण शब्ददेखील किशोरजींनी सुचविले.

कांची पीठाच्या पू. परमाचार्यांनी माझ्यावर एक कामगिरी सोपविली होती. खरेतर किशोरजींच्या आदेशाने मी स्वामींचे दोन वेळा दर्शन घेतले होते. आता किशोरजींनाच घेऊन येण्याचे काम माझ्यावर सोपविले होते. आम्ही दोघे किशोरजींना घेऊन कांचीला गेलो. तेथे पू. परमाचार्यांनी किशोरजींना भागवतावर अनेक प्रश्न विचारले. किशोरजींनी उत्तरे देऊन पू. परमाचार्यांना संतुष्ट केले. त्यांनी स्वतःच्या गळ्यातली माळ काढून किशोरजींच्या गळ्यात घातली आणि म्हणाले- ''डोंगरे महाराज वारिस होकर कथा करेंगे ।'' आमच्या उपस्थितीत वृंदावनचे पू. देवराबाबा यांनीही किशोरजींना आशीर्वाद दिला.

प.पू. स्वामी जयेंद्र सरस्वती यांनी चतुर्मासात पैठणला किशोरजींची भागवतकथा ऐकली आणि त्यांनी स्वतःच्या मनाने किशोरजींना मंत्र देऊन अनुग्रह दिला.

किशोरजींच्या आयव्ययाच्या हिशोबाचे कामही त्यांनी माझ्यावर सोपविले.

संगमनेरमध्ये १०-१२ वेळा भागवत, ४ वेळा रामायण, देवीभागवत, एकनाथी भागवत, दासबोध, गीताप्रवचन, विवेकानंद-चरित्र, जे. कृष्णमूर्ती-चरित्र अशी अनेक कथा प्रवचने केली.

मला माझ्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त संगमनेरमध्ये काही करण्याची इच्छा नव्हती. त्यामुळे मी वृंदावनात जाऊन राहिले; परंतु किशोरजींनी संगमनेरमध्ये

भागवतकथेचे आयोजन करून, त्यामध्ये प्राप्त झालेले सर्व धन संगमनेर 'गीता परिवाराला' दान केले.

किशोरजींकडून गुरुमंत्र घेऊन अनुयायी व्हावे, यासाठी खूप लोक मागे लागले होते. त्यांना मंत्र देणे आवडत नव्हते; परंतु मला त्यांनी पहिला गुरुमंत्र देऊन अनुयायी केले. वास्तविक लहानपणीच मी वल्लभ संप्रदायाची दीक्षित होते. तोच मंत्र त्यांनी पुन्हा देऊन मला प्रथम शिष्येचा मान दिला. माझ्या जीवनप्रवासात, माझ्यासाठी किशोरजी गुरू-माता-पिता-भ्राता सारे काही झाले.'

ललितादेवींच्या उदाहरणावरून किशोरजी आपल्या कथाज्ञानयज्ञाच्या निमित्ताने, कौटुंबिक जिव्हाळ्याने लोकसंग्रह कसा करीत आणि त्या आधारावर श्रुतिवाङ्मयाचे संरक्षण करणे आणि राष्ट्रपुनरुत्थानासाठी संस्थात्मक कार्य उभे करणे या दोन्ही गोष्टी कशा साधतात हे लक्षात येते. सिद्ध योगी पुरुष असूनही त्यांची राष्ट्रयोगी म्हणून साधना नित्य सुरू असते. भौतिक गोष्टींच्या अभ्युदयाबरोबरच अध्यात्मसाधनेने शांती कशी प्राप्त करून घेता येईल; त्यायोगे सत्य, प्रेम, करुणा यावर आधारित समाजधारणा कशी होईल यासाठी त्यांचा सतत खटाटोप सुरू आहे. म्हणूनच त्यांच्या कथाज्ञानयज्ञाचा विजयरथ 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्' यासाठी पुढे पुढेच जातो आहे.

* *

## ।। पाच ।।

# विश्वोद्भवभुवना श्रीगुरुराया

सद्गुरू माउली संत ज्ञानेश्वर – जगद्गुरू सद्गुरू, समन्वयमहर्षि संत श्री गुलाबराव महाराज – गुरुपदाची संकल्पना – गुरुपदाविषयी जनसामान्यांतील समज – पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे आध्यात्मिक क्षेत्रातील गुरू – वांशिक गुरुपरंपरा – पारंपरिक शिक्षणक्षेत्रातील शिक्षकवर्ग – सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थानासाठी गुरुपरंपरा.

## ।। पाच ।।

# विश्वोद्भवभुवना श्रीगुरुराया

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांचे दर्शन आणि भेट होण्याचा योग महत्प्रयासाने आला. आमचे मन्तव्य पू. स्वामींजवळ आम्ही व्यक्त केले. सहज बोलता-बोलता पू. स्वामींनी सांगितले - उत्तर भारतात विविध ठिकाणी संत ज्ञानेश्वर माउलींच्या मूर्तींची स्थापना केली आहे. आत्तापर्यंत ५० ठिकाणी माउलींची प्रतिष्ठापना झाली. विश्वशांतीचा विचार करणारे संत सर्वत्र झाले पाहिजेत. प्रत्येक मंदिरात त्यांच्या पूजापाठाचीही व्यवस्था झाली आहे. हे सांगत असताना पू. स्वामी गहिवरले आणि म्हणाले - माउली ज्ञानेश्वर हेच आमचे सद्गुरू!

**सद्गुरू माउली संत ज्ञानेश्वर :-**

पू. स्वामींच्या या उद्गारांचा मी अंतर्मुख होऊन विचार करीत होतो. काही दिवसांपूर्वी म्हणजे आषाढ वद्य ७, युगाब्द ५१२३ अर्थात ३०.७.२०२१ रोजी मी लिहिलेल्या 'मनोस्वरूप विचार' या ग्रंथाच्या निमित्ताने प्रोत्साहनपूर्वक पत्रद्वारा शुभाशीर्वाद देताना पत्राच्या खाली पू. स्वामींनी 'श्री ज्ञानेश्वर पदाश्रित' असे लिहून स्वाक्षरी केली आहे. सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा भारतीय सनातन परंपरेतील सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांसह भूतमात्रांमध्ये एकात्मतेचा विचार करून अवघे विश्व समृद्ध होवो आणि सर्वांना मनःशांती प्राप्त होवो असे विश्वात्मक देवाकडे, विश्वात्मक सामरस्याने, अखिल विश्वातील चराचरासाठी पसायदान मागणाऱ्या माउलींचा वेदान्तविचार पू. स्वामींच्या अंतर्बाह्य विभूतिमत्त्वात भारून राहिला

आहे. त्याचीच ही प्रचिती होती. माउलींनी १०व्या अध्यायापासून १८व्या अध्यायापर्यंत, अध्यायाच्या प्रस्तावनांमध्ये, श्रोतृसंवाद साधताना गुरुमाहात्म्य परोपरीने वर्णन केले आहे. या वर्णनाचे सार 'विश्वोद्भवभुवना' या शब्दात साठविले आहे. वेदोपनिषदांतून प्रकटलेला समत्वाचा आणि सामरस्याचा, अद्वैत विचार, प. पू. आद्य शंकराचार्यांच्या चिंतनातून प्रस्फुरित झाला. तोच विचार त्याच सामरस्याने, माउलींच्या चिंतनातून प्रकटला. या विचाराने भारावलेले पू. स्वामीजी, अनेकदा प्रत्यक्ष माउली म्हणूनच प्रतीत होतात. मात्र आपल्या समग्र जीवनाला विश्वात्मक राष्ट्रीयत्वाचा आकार देणाऱ्या विविध प्रकारच्या, विविध पातळीवरच्या गुरुजनांविषयी पू. स्वामी समर्पित, शरण्यमंगल भावाने भरभरून कृतज्ञता व्यक्त करीत असतात.

**नमामि सद्गुरुं शातं सच्चिदानंदविग्रहम् ।**
**पूर्णब्रह्म परानन्दम् ईशमाळन्दिवल्लभम् ।।**

पू. स्वामी गोविंददेव गिरि आपल्या जीवनात ज्ञानेश्वरांना सद्गुरू मानतात. त्याचे कारण शैशवावस्थेपासून श्रीमद् भगवद्गीता आणि पर्यायाने श्री ज्ञानेश्वरी या ग्रंथांनी त्यांना झपाटले. विशेषतः जगद्गुरू भगवान श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला पुरुषार्थपूर्णतेने प्रकटण्यासाठी जो विवेकविचार दिला, ज्ञानेश्वरांनी त्या गुरु-शिष्य संवादाचा नेमका अर्थ आत्मसात केला, तो पसायदानातील अखेरच्या ओवीतून. ही ओवी किती महत्त्वाची आहे ते सांगताना पू. स्वामी 'प्रबोधनकार का स्वधर्म' या व्याख्यानात सांगतात - 'ज्ञानेश्वर महाराजने पसायदान की नौ ओवियाँ (एक काव्यप्रकार) लिखी हैं । मैं उनका अर्थ कुछ हटके करता हूँ । पसायदान की आठ ओवियाँ तो साधन बताती हैं, साध्य बतानेवाली ओवी बस एक ही है । वह है-

**किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।**
**भजिजो आदिपुरुखीं । अखण्डित ।।**

(अधिक क्या कहें? स्वर्ग-पृथ्वी-पाताल इन तीनों लोकों में रहनेवाले सभी प्राणी परिपूर्ण सुख पाकर निरंतर आदिपुरुष परमात्मा के भजन में लीन रहें ।)

विश्व का कोई भी महात्मा सभी लोगों के लिए इससे अधिक कुछ माँग ही नहीं सकता ।'

पू. गोविंददेव गिरि महाराज 'सच्चिदानंद विग्रहम्' अशा संत ज्ञानेश्वरांना

सद्गुरू म्हणून स्वीकारतात. त्याचबरोबर भगवान श्रीकृष्णांना जगद्गुरू म्हणूनही स्वीकारतात.

**जगद्गुरू, सद्गुरू, समन्वयमहर्षि संत श्री गुलाबराव महाराज :-**

माउली ज्ञानेश्वर आणि भगवान श्रीकृष्ण या दोन्ही विभूतिमत्त्वांचा एकत्रितपणे प्रकर्ष आपल्या ठायी संभवावा, अशी साधना करण्याचा निश्चय पू. स्वामींच्या ठायी प्रकटला तो माउली ज्ञानेश्वरकन्या संत श्री गुलाबराव महाराज यांच्यामुळे. श्री संत गुलाबराव महाराजांच्या आरतीमधून गुलाबराव महाराजांचे जगद्गुरुत्व आणि सद्गुरुत्व यांबरोबरच समन्वयमहर्षित्व पू. स्वामींच्या मनाला कसे व्यापते, याचे पू. स्वामींनी भक्तिभावाने वर्णन केले आहे. ती आरती अशी-

**आरति संत गुलाबराव की**
**अद्भुत अनुपम सद्गुरु की ।।धृ।।**
**धन्य विदर्भ धरा भइ पावन**
**संत पधारे जगदुद्धारण ।**
**शैशव से लीला विस्तारण**
**प्रज्ञाचक्षु जगद्गुरुवर की ... ।।१।।**
**पति श्रीकृष्ण पिता ज्ञानेश्वर**
**परमप्रमाण जगद्गुरू शंकर**
**मधुराद्वैत भक्तिमय सुंदर**
**गोपी दिव्य पंचलतिका की... ।।२।।**
**वेदधर्म शुभ विश्वोद्धारक**
**विज्ञानानकूल हितकारक**
**भक्ति चरम सिद्धांत निदर्शक**
**धर्म समन्वय कुशल सिद्ध की ... ।।३।।**
**तर्क कठोरा कुसुम कोमला**
**शैली संशयछेदक विरला**
**वाङ्मय मूर्ति अमर निर्मला**
**योगी, ऋषि, आचार्य प्रवर की ... ।।४।।**

पू. स्वामी गोविंददेव गिरिजींनी जगद्गुरुत्वाच्या अकरा कसोट्या निर्धारित करून, मुद्रित करून त्या श्रेष्ठ विद्वानांना दाखविल्या. या सर्व कसोट्यांवर संपूर्ण

जगाच्या इतिहासात भगवान श्रीकृष्णांनंतर कोणीही आढळत नाही, असा दावा करून; 'एकविसाव्या शतकाचा खरा जगद्गुरू होण्याचे श्रेष्ठत्व कोणात असेल तर संत श्री गुलाबराव महाराज यांच्यात आहे' असे ठाम विधान केले. हे विधान त्यांनी संत नामदेव अध्यासन आणि प्राचार्य सोनोपंत दांडेकर अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विद्यापीठात झालेल्या व्याख्यानात केले.

श्रीमद् भगवान शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्त व 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' या तत्त्वज्ञानाचा, भगवान व्यास-विरचित श्रीमद् भागवताच्या द्वैतप्रणीत भक्तितत्त्वाशी परिपूर्ण समन्वयबुद्धीच्या आधाराने, भारतीय परंपरेशी सुसंगत अशा प्रकारे, संत श्री गुलाबराव महाराज यांनी समन्वय मांडून दाखविला. पू. स्वामींच्या मनातील अद्वैत आणि भक्ती याविषयीच्या सर्व शंका संत श्री गुलाबराव महाराजांच्या समन्वय मांडणीने फिटून गेल्या. श्री गुलाबराव महाराजांचा वाङ्मयाचा सखोल अभ्यास पू. स्वामींनी केली. गुलाबराव महाराजांकडून प्रमाण कोणते मानावे याविषयीचा निर्णय त्यांनी घेतला. तो निर्णय असा-

**शांकरज्ञानसंयुक्तं भगवद्भक्त्यलंकृतम् ।**
**यद् वाक्यं तत् प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः ।।**

गुलाबराव महाराजांच्या अंतरंग-भावविश्वाचे दर्शन त्यांच्या पुढील उक्तीतून झाले -

**उमा माता पिता शम्भुः गुरूर्ज्ञानेश्वरो महान् ।**
**पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ।।**

## गुरुपदाची संकल्पना :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि 'गुरु-शिष्य संबंध' या विषयावरील भगवद्गीतेवर आधारित गीता परिवारातील व्याख्यानात म्हणतात- 'हमारी भारतीय परंपरा में 'गुरु' एक अत्यंत पवित्र शब्द माना गया । गुरु आपका जीवन बनाता है और इसलिए हमारे यहाँ गुरू के सान्निध्य की आवश्यकता होती है । गुरू स्वयं केवल अपनी वाणी से नहीं सिखाता है, गुरू अपनी एक-एक क्रियासे सिखाता है । गुरू से आनेवाले स्पंद भी अपने भीतर एक नया जागरण लाते हैं । हमारी चेतना को दूसरे स्तर पर ले जाते हैं और इसलिए हमारे यहाँ गुरु-शिष्य संबंध अत्यंत पवित्र माना गया । इतना पवित्र माना गया कि भगवान आदि-शंकराचार्य महाराज ने तो कहा, मुझे 'गुरू' शब्द के लिए अन्य कोई उपमा भी नहीं मिलती है! स्वयं

अपने 'वेदान्त केसरी' का आरंभ करते हुए एक-एक पदार्थ को लेकर वे कहते हैं, गुरू पायस के समान नहीं होते हैं, गुरू चंद्रमा के समान भी नहीं होते हैं, गुरू सूर्य के समान भी नहीं होते हैं; गुरू इनसे भी बढकर होते हैं! क्यों होते हैं? इसलिए होते हैं, इनमें से कोई भी वस्तू *'स्वीयं साम्यं विद्यन्ते'* अपने जैसा अन्य को बना नहीं सकती । गुरू वो होते हैं, जो दूसरे को अपने जैसा बना करके छोडते हैं और इसलिए गुरू का माहात्म्य हमारी परंपरा में बहुत माना गया ।'

प.पू. गोविंददेव गिरि यांना सद्गुरूंची कृपा लाभली. सद्गुरूंचे मुख्य लक्षण म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे 'स्वीयं साम्यं विधत्ते' अर्थात *'आपुल्यासारखे करिती तात्काळ'* हे विचारात घेतले तर पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज हे स्वतः ही सद्गुरू पदालाच पोहोचलेले आहेत. असे असूनही, सद्गुरूंच्या ठायी जो विश्वातील चराचराकडे समत्व भावाने पाहणे आणि सामरस्याने अनुभव घेणे असा गुण असतो; तो गुण प.पू. स्वामींच्या ठिकाणी ओतप्रोत भरला आहे. *'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत',* या उक्तीप्रमाणे किंवा श्री गुरूंच्या बाबतीत श्री एकनाथ महाराज, नाथ भागवतात म्हणतात त्याप्रमाणे-

**जो जो जयाचा घेतला गुण ।**
**तो तो म्या गुरू केल्या जाण ।**
**गुरूसी पडले अपारपण ।**
**जग संपूर्ण गुरू दिसे ।।**

अशा हंसवृत्तीने प.पू. स्वामी ज्ञानकण वेचीत स्वतःला सतत ज्ञानमय करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना सर्वत्र गुरुदर्शन घडते. तसेच त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला त्यांच्यात गुरुदर्शन घडते. या दृष्टीने त्यांच्या जीवनात ज्या महापुरुषांचा सहवास घडला किंवा सत्संग घडला, ज्यांची कृपा झाली त्या सर्वांना पू. स्वामी गुरुस्थानी मानतात. उदा. ख्यातनाम प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले, महामना स्वामी करपात्रजी महाराज, वृंदावनचे थोर स्वामी अखंडानंदजी महाराज, पंडित राजराजेश्वर शास्त्री द्रविड, पंडित गोपीनाथ कवीराज, ब्र. योगीराज स्वामी शिवानंद, पंडित प्रवर दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर, वेदमूर्ती यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे, महाराष्ट्रातील थोर संत वारकरी संप्रदायाचे धुरीण वै. धुंडा महाराज देगलुरकर, ह.भ.प. ब्रह्मश्री, ब्र. शंकर महाराज खंदारकर, थोर भागवत-कथाकार प्रति-शुकजी ब्र. डोंगरे महाराज, श्री स्वामी वरदानंद भारती आदि.

## गुरुपदाविषयी जनसामान्यांतील समज :–

२३ जानेवारी २०१५ रोजी संस्कार टी.व्ही. चॅनलवर पू. स्वामींनी 'गुरु' संकल्पनेविषयी जनसामान्यांतील समज, अनेकविध प्रकारचे गुरू आणि धर्मसंप्रदायातील गुरू याविषयी चर्चा केलेली दिसते. तसेच 'गुरु–शिष्य संबंध' या छोट्याशा पुस्तकातही गुरुपदाविषयी संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यात वंश, घराणे आणि कुटुंब यातील गुरू, पारंपरिक आणि आधुनिक क्षेत्रांत शिकविणारे गुरू, व्यवहारात माहिती देणारे व कौशल्य शिकविणारे गुरू अर्थात राजकीय, सामाजिक, आर्थिक इ. सर्व क्षेत्रातील माहिती देणारे गुरू; एवढेच नव्हे तर माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात एक बटन दाबताच हवी ती माहिती सहज उपलब्ध करून देणारा 'गुगल' गुरू येथपर्यंत 'गुरु' कल्पनेविषयी प्रकार सांगता येतात.

पू. स्वामीजी आध्यात्मिक क्षेत्रातील धर्म व संप्रदाय यातील गुरुपरंपरा याविषयीही माहिती सांगतात. कालसापेक्षतेने गुरुविषयीची कल्पना ते स्पष्ट करतात. हे लक्षात घेतले, तर ज्याच्याकडून जो गुण घेतला, ज्याच्याकडून जी माहिती घेतली, ज्याच्याकडून कौशल्यात्मक प्रशिक्षण घेतले असे सर्वच गुरू होत असे म्हणता येईल. जनसामान्यांमध्ये 'गुरु' या शब्दाला धार्मिक, पारंपरिक अर्थ चिकटलेला आहे. धर्म व संप्रदाय किंवा संगीत यासारखी विशिष्ट विद्या या क्षेत्रात गुरुपरंपरा सांगितली जाते.

प.पू. स्वामीदेखील या तऱ्हेने गुरुपरंपरा सांगतात.

## पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे आध्यात्मिक क्षेत्रातील गुरू :–

बालवयापासून श्रीमद् भगवद्गीतेच्या अभ्यासामुळे, घराण्यातील परंपरेमुळे तसेच वेदोपनिषदांचे धार्मिक एकात्मतेचे संरक्षण करणाऱ्या भगवान आद्य शंकराचार्य यांच्या माहितीमुळे आपणही धार्मिक परंपरेत श्रीगुरूंकडून धर्मदीक्षा घ्यावी, असे त्यांच्या मनात होते.

श्रीमद् शंकराचार्यांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी अर्थात धर्मरक्षणासाठी भरतवर्षात चार धाम स्थापित केले. श्रीमद् आद्य शंकराचार्यांचे मूळ पीठ कांची कामकोटी हे होय. त्यामुळे या पीठाला अनन्यसाधारण महत्त्व आहे; असे पू. स्वामींना नेहमीच वाटत आले. कांची कामकोटी पीठाचे परमाचार्य यांचे ज्ञान आणि अधिकार तसेच धर्मरक्षणाची दृष्टी भगवान आदि–शंकराचार्यांइतकीच आहे; हे कळल्यावर तर त्यांच्या मनाने, त्यांच्याकडून दीक्षित होण्यासाठी

उचल खाल्ली.

त्या वेळी परमाचार्यांचे उत्तराधिकारी म्हणून जगद्गुरू शंकराचार्य श्री जयेंद्र सरस्वती यांच्याकडून पू. स्वामींना धर्मदीक्षा मिळाली. त्यामुळे पू.श्री. जयेंद्र सरस्वती हे त्यांचे दीक्षागुरु किंवा मोक्षगुरु होत. असे असले तरी परमाचार्यांचे उदंड आशीर्वाद पू. स्वामींना मिळाले. एवढेच नव्हे तर पू.श्री. डोंगरे महाराज यांच्यापेक्षाही भागवत-कथाकार म्हणून त्यांना यश मिळेल असे आशीर्वादही मिळाले. या मार्गाने पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना भगवान श्री आद्य शंकराचार्य यांच्या गुरुपरंपरेत स्थान मिळाले.

आपण सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण करीत, सनातन हिंदूधर्मराष्ट्रसंरक्षण आणि पुनरुत्थान हेच जीवनसर्वस्व मानून मोक्षसाधना करावी अशा संकल्पाने संपूर्ण समर्पित वृत्तीने जीवन व्यतीत करण्यासाठी संन्यासदीक्षा घ्यावी, असे पू. स्वामीजींच्या मनात आले. हरिद्वार येथील 'भारतमाता मंदिराची' स्थापना करून सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण करणारे निवृत्त शंकराचार्य, परम श्रद्धेय, प्रातःस्मरणीय भगवान श्री सत्यमित्रानंदजी यांच्याकडून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. महामंडलेश्वर भगवान संत श्री सत्यमित्रानंद गिरि यांनी आचार्य किशोरजी व्यास यांना 'गिरि' परंपरेतील 'गोविंददेव गिरि' या नावाने घोषित केले आणि पू. सत्यमित्रानंदजी महाराज हे पू. स्वामींचे संन्यासदीक्षागुरू झाले.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या श्रद्धास्थानांचा विचार केला तर आदिनाथ शिव आणि विष्णु भगवान श्रीकृष्ण यांच्यापासून थेट पू. जयेंद्र सरस्वती आणि पू. सत्यमित्रानंदजी यांच्यापर्यंतची गुरुपरंपरा सांगता येते. त्या परंपरेने भगवान व्यास, भगवान ब्रह्मर्षि नारद आणि भगवान माउली ज्ञानेश्वर, संत तुकाराम व श्री ज्ञानेश्वरकन्या संत गुलाबराव महाराज यांच्यापर्यंत ही आध्यात्मिक गुरुपरंपरा सांगता येऊ शकते.

## वांशिक गुरुपरंपरा

व्यास वंशातील भागवतादि कथाकार, पुरोहित, कर्मकांड करणारे आणि ज्योतिर्विद्यापारंगत अशी व्यासकुलाची परंपरा, पंडित बालमुकुंदजी - पंडित त्र्यंबकजी - पंडित मदनगोपालजी आणि पू. गोविंददेव गिरि अशी ही परंपरा सांगता येते.

## पारंपरिक शिक्षणक्षेत्रातील शिक्षकवर्ग :-

प्राथमिक शाळेतील श्री. माळी गुरुजी, माध्यमिक शाळेत असताना श्री. न. बा. कुलकर्णी, श्री. बबनराव गाडे, श्री. पी. जी. देवस्थळी या उल्लेखनीय शिक्षकांचे स्मरण स्वामीजींना नेहमी होते. ठाणे येथील तत्त्वज्ञान विद्यापीठात पू. पांडुरंगशास्त्री आठवले आणि अन्य गुरुजनवर्ग, त्यातही विशेषतः श्री. थत्ते, पं. रघुनाथशास्त्री जोशी, प्राचार्य पंडित त्याचबरोबर वेदांतावर प्रभुत्व असलेले. प्रा. पं. आत्मारामशास्त्री जरे यांच्याविषयी ते कृतज्ञता व्यक्त करतात. काशी येथील वेदविद्यालय आणि गोएंका महाविद्यालय येथील आचार्य पदवीसाठीचा पाच वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना सुप्रसिद्ध वैदिक अभ्यासक्रम पू.श्री. विश्वनाथशास्त्री वामन देव यांचे घरी स्वामीजींचे अध्ययन घडले. पं. राधेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडून षट्दर्शनाचा अभ्यास घडला. त्याचबरोबर पं. वशिष्ठ त्रिपाठी यांच्याकडून न्यायशास्त्र शिकायला मिळाले तर पं. राममूर्तीशास्त्री यांचेही मौलिक मार्गदर्शन मिळाले. घरातील परंपरेबरोबरच सोलापूर येथील पंचांगकर्ते धुंडिराजशास्त्री दाते यांच्याकडून ज्योतिषशास्त्राचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानासाठी गुरुपरंपरा :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि आचार्य, सिद्ध राष्ट्रयोगी म्हणून सर्वांना प्रतीत होत आहेत. या त्यांच्या विभूतिमत्त्वाच्या घडणीत वाचन, लेखन, अध्ययन, चिंतन या मार्गाने ज्या महान विभूतिमत्त्वांचा सद्गुरू-स्वरूपात स्वामींच्या विभूतिमत्त्वावर थेट सखोल परिणाम झाला ती नामावली खरेतर न संपणारी आहे. या नामावलीत ध्रुव, प्रह्लाद, श्रीराम, श्रीकृष्ण, नारद, श्री वेदव्यास, श्रीमद् आद्य शंकराचार्य, माउली ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत गुलाबराव महाराज, स्वामी समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, पू. सरसंघचालक मा. स. गोळवलकर गुरुजी, ज्येष्ठ संघ विचारवंत द. बा. ठेंगडी अशा विभूतिमत्त्वांची गुरुपरंपरा म्हणून विचार करावा लागतो. यात छत्रपती शिवरायांचा स्वतंत्रपणे विचार करावा लागतो.

श्रीमद् भगवान योगेश्वर श्रीकृष्ण यांच्या माध्यमातून विवेक आणि पुरुषार्थ एकत्र असतील तर सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान नक्कीच होईल, असे संदेशन झाले. सात्त्विक जीवन-अभ्युदयासाठी आणि मनःशांतीसाठी ज्ञानवान कर्म करीत जीवनसंघर्ष केला पाहिजे. या संघर्षात सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांनी धर्म,

ज्ञान आणि राष्ट्र यांचे संरक्षण आणि एकात्मिक वैश्विक अनुबंधन करता येते असा संदेश मिळाला.

प्रभु रामचंद्रांच्या सम्यक दृष्टीने आणि सत्य, प्रेम, करुणापूर्णतेने विश्वात्मक कल्याणकारी राष्ट्रभाव पुरुषार्थपूर्णतेने जागविता येतो याचे ज्ञान झाले.

भगवान श्रीमद् शंकराचार्यांनी प्राचीनतम श्रुति, स्मृति, पुराणे यांचे संरक्षण, वेदान्तदर्शन यांच्या संदेशातून विशाल भारताचे एकात्मिक पुनरुत्थान करून विश्वगुरुत्व सिद्ध करता येते यासाठी धर्मव्यवस्थापन केले. माउली ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक परमेश्वराकडे विश्वात्मक एकात्म भावाच्या कल्याणकारी जीवनप्रणालीसाठी पसायदान मागून सनातन हिंदूधर्मराष्ट्राची विश्वगुरुत्वाची शक्ती प्रदर्शित केली, तर संत तुकोबारायांनी वेदान्त-तत्त्वज्ञानाने सर्वांभूती अभेद वृत्ती जागविता येते व त्यातून सत्य, प्रेम, करुणेचे वैश्विक मानवी जीवन निर्माण करता येते, याचे संदेशन केले.

श्री स्वामी समर्थ रामदास यांनी, प्रपंच, राज्य, धर्म यांचे संरक्षण सत्यनिष्ठेने आणि सामर्थ्याने केले पाहिजे; त्यासाठी एकता, सामरस्यशक्तीची आराधना आणि एकात्मतेची साधना करण्यासाठी प्रभु रामचंद्र आणि हनुमान यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कर्तव्यनिष्ठेने दुष्टांचे निर्दालन आणि सुष्टांचे पालन करण्यासाठी अर्थात देव, देश आणि धर्मासाठी भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांची साधना करीत महा-राष्ट्रधर्माने जगण्याची दीक्षा दिली. म्हणूनच स्वामी गोविंददेव गिरि समर्थ रामदासांना राष्ट्रगुरू असे म्हणतात.

स्वामी विवेकानंदांनी जागतिक व्यासपीठावरून जगाला विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन सनातन हिंदूधर्मराष्ट्र वैश्विक भावनेने पुनरुत्थापित करण्यासाठी प्रथमतः भारत देश सनातन हिंदूधर्मराष्ट्र म्हणून तरुणांच्या भक्कम पायावर उभा राहिला पाहिजे; यासाठीची साधना सुरू केली.

संत गुलाबराव महाराजांनी मतमतांचा समन्वय साधून एकात्मिक सनातन हिंदूधर्मराष्ट्राची उभारणी कशी करता येते यासाठी माउली ज्ञानेश्वर, योगेश्वर श्रीकृष्ण यांचे आदर्श लोकांसमोर ठेवून जगद्गुरुत्वाच्या ताकदीने संदेशन केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या जागरणासाठी चळवळ उभारली.

सर्व परंपरेचे पाईक म्हणून सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुरुष शिवछत्रपतींनी राजयज्ञाचे

आयोजन करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे तेजस्वी स्वरूप म्हणून भक्ती, ज्ञान, वैराग्य, शक्ती आणि समर्पण, वीर्य आणि पुरुषार्थ ह्याचे जागरण करणारा सामर्थ्यसंपन्न सांस्कृतिक राष्ट्रध्वज भगवी पताका अर्थात जरीपटका सनातनातून वर्तमानात पुन्हा प्रकटविला.

शिवछत्रपती, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद आणि माउली ज्ञानेश्वर या सर्वांचे सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानाचे स्वप्न साकार करण्यासाठी 'आसिंधु सिंधुपर्यंता । तस्य भारत भूमि का ।' ह्यातील राम कृष्ण या दैवतांना राष्ट्रदैवते मानून, भगवतीमातेचा शक्तिसंचय करून सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी *'हिंदू अवघा मेळवावा सनातन हिंदूधर्म जागवावा'* असा ध्यास घेऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, छत्रपती शिवरायांचे मावळेस्वरूप स्वयंसेवक-उभारणीच्या कार्याला लागला. पू. सरसंघचालक मा. स. गोळवलकर गुरुजी यांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी संघपरिवाराची कल्पना मांडली, विश्वहिंदुत्वाचा जागर केला. द. बा. ठेंगडी या महास्वयंसेवकाने राष्ट्रयोगविचाराचे जागरण केले. या सर्व प्रयत्नांच्या गुरुस्थानी छत्रपती शिवरायांनी सनातनातून वर्तमानात पुनरुत्थापित केलेला भगवा ध्वज. या भगव्या ध्वजाला आणि छत्रपती शिवरायांना पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज सनातन हिंदूधर्मराष्ट्रगुरू म्हणून मानतात. पू. स्वामी गोविंददेव गिरि या गुरूला, शिवछत्रपतींच्या आरतीने वंदन करतात-

**हर हर महादेव आरती, हिंदु साम्राज्य शुभंकर की ।**
**जय भवानि जय शिवाजि राजा, जय भगवा ध्वज की ।।**
**धन्य तुंग सह्याद्री माथा**
**धन्य शहाजी - जिजाऊ माता**
**धन्य मित्रगण जीवनदाता**
**भारतमाता धन्य प्रिय, राजर्षि शिवाजी की ।।१।। हर हर...**
**धर्म-नीतिमय शुभ आचार**
**अनाथ जनता की आधार**
**कार्यकरों से अद्‌भुत प्यार**
**कार्यदक्षता धन्य छत्रपति, शिवाजी राजा की ।।२।। हर हर...**
**रक्षण करती गोमाता का**

**संरक्षण संस्कृत भाषा का**
**उत्कट पालन न्याय–नीति का**
**देवालय संरक्षक राजा, संतभक्त शिव की ।।३।। हर हर...**
**महिषासुर मर्दिनी भवानी**
**रामकथा राक्षस संहारिणी**
**कृष्णकथा ज्यों दुष्टनिकंदिनी**
**दुष्ट यनव संहारक त्यों, नरसिंह शिवाजी की ।।४।। हर हर...**
**सदाचार पुरुषार्थ जगाये**
**क्षात्रतेज संचार कराये**
**शौर्य, धैर्य, उत्साह बढाये**
**देश–धर्म–सेवा–स्फूर्ति–प्रद कथा शिवाजी की ।।५।। हर हर...**

या प्रकारे पू. स्वामी गोविंददेव गिरि यांची ही गुरुपरंपरा वैयक्तिक त्यांच्यापुरती मर्यादित राहत नाही. ही गुरुपरंपरा सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानाकरिताच्या राष्ट्रयोगसाधनेची गुरुपरंपरा ठरते.

* *

## ।। सहा ।।

# सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार

सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार - संकल्पना - हिंदू पद स्पष्टीकरण - संदर्भ - राज्यघटनेतील हिंदू पद संकल्पना - मराठी तत्त्वज्ञान महाकोशातील हिंदू पद संकल्पना - 'धर्माचे मूलाधार : वेद' यातील हिंदू कल्पना - हिंदू धर्माची मूलतत्त्वे - स्वामी विवेकानंदांचा मार्क्सच्या तुलनेत समावेशक हिंदू पदविचार - शंकराचार्यांचा वेदान्त विचार - विनोबाजींचा गीता-प्रवचनातील विचार - श्री आद्य शंकराचार्यांच्या मतांचे परंपरेने स्पष्टीकरण - ब्रह्मन् एक समत्व - स्वरूपविचार - हिंदू धर्माचा गाभा - हिंदू धर्माचे स्वरूप - मराठी तत्त्वज्ञान महाकोशातील 'राष्ट्र' ही संकल्पना - हिंदू राष्ट्र आणि हिंदू राष्ट्रवाद - वर्तमानकाळात तथा समकाळात हिंदूराष्ट्रविचार - पू. गोविंददेव गिरिंना प्रभावित करणारा समकालातील हिंदूराष्ट्रविचार-स्त्रोत - सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार - ऐतिहासिक अवलोकन - पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग -विचाराचा गर्भितार्थ - सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार सिद्धी.

## ।। सहा ।।

# सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे विभूतिमत्त्व सिद्ध सनातन हिंदू राष्ट्रयोगी स्वरूपात प्रतीत होत आहे. देश-विदेशामध्ये घडलेल्या आणि होत असलेल्या प्रवचने, व्याख्याने, कथाज्ञानयज्ञ कार्यक्रम, घडणारे संवाद तसेच त्यांचे प्रसिद्ध वाङ्मय, या सर्व वाङ्मय-आविष्कारातून आणि त्यांनी स्थापित केलेल्या, संचालित केलेल्या, मार्गदर्शन केलेल्या विविध संस्था, समूह, कार्यशाळा आदींमधील स्वामींच्या कार्य आणि व्यवहार-आविष्कारातून त्यांचे सिद्ध सनातन हिंदू राष्ट्रयोगी हे विभूतिमत्त्व साधकांना, स्वयंसेवकांना, सहकाऱ्यांना, श्रोत्यांना, समाज व राजधुरिणांना तसेच धार्मिक नेत्यांना प्रत्ययास येत आहे.

घराण्यातील समृद्ध सात्त्विक वारसा, संघस्वयंसेवक म्हणून घडलेले संस्कार, वेद, उपनिषदे, शास्त्रे, स्मृतिग्रंथ, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता, पुराणे, रामायणे, महाभारत, योगवासिष्ठ इ. प्राचीन वाङ्मयाचा सखोल व्यासंग, महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील संत वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास, राम, कृष्ण, चाणक्य, शिवछत्रपती, स्वामी समर्थ रामदास, माउली ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, स्वामी विवेकानंद आणि प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज आदी दिव्य विभूतिमत्त्वांचा चिंतनपूर्ण प्रभाव या तपश्चर्येतून आणि समकालीन स्थितिगतीच्या तुलनात्मक अभ्यासातून स्वामींच्या ठायी हे विभूतिमत्त्व सिद्ध झाले आहे.

**सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार – संकल्पना :-**

सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार म्हणजे वेदान्तानुसार सर्वांभूती परमेश्वर या

श्रद्धेने मानवतेच्या स्वाभाविक, समावेशक, सहिष्णु, प्रेममूलक कारुण्यभावाने; सर्वात्मक, समानमनस्क मानवी समूहाचा अर्थात प्राप्तकाली भारतीयांचा स्थलकालपरिस्थितीनुसार, लौकिक तथा भौतिक आणि पारलौकिक तथा आध्यात्मिक असा द्विविध, एकात्मक जीवनशैलीविचार होय.

पू. स्वामींनी विद्यार्थीदशेतच हिंदू जीवनशैली आणि तत्त्वज्ञान याचे विशेष चिंतन केले. त्या चिंतनातून त्यांची हिंदुत्वाची व्याख्या प्रकटली.

**सन्मान बुद्धिर्वेदेषु गुरुबुद्धिश्च भारते ।**
**तत्सम्मत सदाचार निष्ठा हिंदुत्व लक्षणम् ।।**

त्यांची ही व्याख्या सनातन हिंदु धर्म राष्ट्रयोग विचाराचा तात्त्विक व ऐतिहासिक आढावा घेताना पुन्हा पुन्हा प्रत्ययास येते.

या विचाराच्या आधाराने प्रथम हिंदू राष्ट्र तथा भारत राष्ट्र, हे सर्व मतप्रवाह समावेशक, समन्वयक, स्वयंशासित, स्वयंसंरक्षित परमवैभवसंपन्न असे स्थिर, अजेय अशा प्रकारचे राष्ट्र उभे करून जीवनशैली अनुसरणात्मकतेने, अखिल विश्वात्मक राष्ट्र आविष्कृत करण्याचा वैश्विक बंधुभावात्मक योग तथा जीवनशैली तथा सारणीविचार अनुसरण्याची प्रक्रिया होय.

या प्रक्रियेतील वर्तमानातील पहिला टप्पा म्हणजे हिंदूराष्ट्र तथा भारतराष्ट्र आदर्शवत आणि अजेय स्वरूपात उभे करणे होय. अशा प्रकारे व्याख्यात्मकतेने सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार-संकल्पना स्पष्ट करता येते.

सिद्ध सनातन हिंदू राष्ट्रयोगी, यातील 'हिंदू' आणि 'राष्ट्रयोग' या दोन शब्दांचा विशेष विचार केला पाहिजे; कारण या शब्दांच्या सतत चिंतनातूनच सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार हा वैचारिक व्यूह स्वामींच्या विभूतिमत्त्वातून सातत्याने प्रकट होत आहे.

## हिंदू पद स्पष्टीकरण – संदर्भ :-

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'हिंदू राष्ट्र' या संकल्पनेचा विशेष प्रभाव हिंदू ही संकल्पना स्पष्ट करताना दिसून येतो; मात्र केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार म्हणून नव्हे, तर वेदातील धर्मविचाराचा आधार या संकल्पनेला आहे. पू. स्वामींचा स्वतःचा व्यासंग आणि परमपूजनीय मा. स. गोळवलकर गुरुजी यांच्या कल्पनेतून आकारलेल्या 'विश्व हिंदू परिषद' या संकल्पनेत आणि स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील सर्वधर्म परिषदेतील व्याख्यानात सर्वांना उद्देशून 'बंधू

आणि भगिनी' या उल्लेखातून प्रकटलेल्या विचारांमध्ये 'हिंदू' या संकल्पनेचे बीज स्वामींच्या वैचारिक व्यूहासाठी प्रेरित झाले असावे हे स्पष्टपणे जाणवते.

## राज्यघटनेतील हिंदू पद संकल्पना :–

'हिंदू कोणास म्हणावे?' या इतिहासभूषण श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या ग्रंथातील पुढील उल्लेख महत्त्वाचा वाटतो – ''आपण येथे प्रथम 'हिंदू कोणास म्हणावे?' याचे विवेचन करू. हिंदू हा शब्द धर्मवाचक की स्थलवाचक? हिंदुस्थानात राहणाऱ्याला परकीय आक्रमक हिंदू म्हणू लागले. तेव्हा हे नाव 'धर्मवाचक' नाही, ते स्थलवाचक आहे असे म्हटले जाते, पण ही एक शाब्दिक कसरत आहे. भारतीय शासनाने 'हिंदू कोड' मंजूर केले आहे. त्याअन्वये मुसलमान व ख्रिश्चनांना वगळता, इतर सर्व भारतीय रहिवाशांना हा कायदा लागू आहे. याचा अर्थ जे धर्माच्या दृष्टीने मुसलमान किंवा ख्रिश्चन हे अल्पसंख्य, ते वगळता शीख, बौद्ध, जैन आदी सर्वांना हा कायदा लागू असल्याचे ठरविण्यात आले आहे. म्हणजे, त्या कायद्यात नमूद केलेले अपवादात्मक धर्मगट वगळता इतर सर्व 'हिंदू' आहेत, असे मानण्यात आले आहे. याचा सरळच अर्थ आहे की, 'हिंदू' हे नाव स्थलवाचकही आहे व धर्मवाचकही आहे.''[१]

हा 'हिंदू' शब्दाविषयीचा निर्णय समकालीन परिस्थितिजन्य आहे. स्वामींचा वैदिक वाङ्मयाचा अभ्यास असल्यामुळे त्यांना हा तत्कालिक अर्थ अभिप्रेत नाही. 'विश्व हिंदू परिषद' यातील 'विश्व हिंदू' या शब्दाचा वाच्यार्थ विश्वातील हिंदू असा कोणी घेतीलही; तथापि 'हिंदू' संकल्पनेतील विश्वव्यापकता यात अभिप्रेत आहे, हे स्वामींना अवगत आहे.

## मराठी तत्त्वज्ञान महाकोशात हिंदू पद संकल्पना :–

''भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम कसाही झालेला मानला तरी तत्त्वज्ञानाच्या उद्‌गमास आवश्यक मानली जाणारी जी विस्मयावस्था तिचा आढळ आपणांस ऋग्वेद संहितेतही बऱ्याच ठिकाणी होतो.''[२]

## 'धर्माचे मूलाधार : वेद' यातील हिंदू कल्पना :–

'धर्माचे मूलाधार : वेद' या ग्रंथात डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी, ''वेद आपल्याला उपदेश करून प्रेमाने बजावतात की, आपण भौतिक व आध्यात्मिक गोष्टींमध्ये समन्वय साधून जीवनाची ऐक्यपूर्ण दृष्टी वाढीस लावावी''[३] असे नोंदविले आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की, वैदिक मताप्रमाणे भौतिक व आध्यात्मिक

समन्वयाची, मानव कल्याणासाठीची सारणी होय. वेदांचे स्वरूप पाहिले तर प्रकृतीच्या प्रपंचातून सृष्ट झालेली निसर्गासह जीवसृष्टी; यांचे मानवकेंद्रित मात्र मानवासह सर्व जीवसृष्टीच्या कल्याणासाठी; सारणीची मांडणी करत; ती सारणी तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी करण्याचा व त्याद्वारे सर्व कल्याणप्रद जीवनधारणा करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे धर्म होय. श्रुतिवाङ्मयामध्ये मानवमात्राचा, जीवमात्राचा आणि सर्व नैसर्गिक घटकांचा भौतिक आणि तात्त्विक उल्लेख संपूर्ण पृथ्वीच्याच नव्हे, तर विश्वाच्या संबंधाने केला आहे. त्यामुळे वैदिक संस्कृतीची मांडणी करणारे ऋषि, मुनी, तपस्वी आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार जीवनसारणी अवलंबणारे लोक कोठून आले, कोठे वसले, त्यांचा संचार पृथ्वीवर कोठे-कोठे झाला, याला महत्त्व राहत नाही, तर त्यांची सत्य, प्रेम व करुणा यावर आधारित सारणीची परंपरा काय आहे याला महत्त्व येते. अशा प्रकारची सनातन, वैदिक तत्त्वज्ञानानुसार, सांस्कृतिक सारणी अनुसरणारा लोकसमूहे; व्यापक प्रमाणात भारतामध्ये इतिहासकालात पाहवयास मिळतो. या लोकसमूहाला परकीय आक्रमकांनी 'हिंदू' संबोधले. यामुळे हिंदू हे धर्मवाचक नाम सनातन वैदिक सारणीला येऊन चिकटले.

## हिंदू धर्माची मूलतत्त्वे :-

या सारणीधर्माची अर्थात सनातन धर्माची, भारतीय परंपरेची म्हणजे हिंदू धर्माची मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी नोंदवली आहेत ती अशी[४] :- 'हिंदू धर्म' कशास म्हणावे? याबाबत भल्या-भल्या अतिरथी-महारथींतही वैचारिक गोंधळ आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या विश्वधर्माची तुलना तर्कदुष्ट अशा ज्यू-ख्रिश्चन-इस्लाम अशा धर्मपंथांशी केली जाते. एक प्रेषित, एक धर्मग्रंथ व काही अशास्त्रीय रूढीवर आधारलेले हे धर्मपंथ विश्वव्यापी मानवतावादावर आधारलेल्या हिंदू धर्माच्या बरोबरीचे असूच शकत नाही. याची दहा मूलतत्त्वे आहेत.

१) विश्वबंधुत्व - एकाच परमेश्वराची आम्ही सर्व मुले.

२) बुद्धिप्रामाण्य - सर्वधर्मविषयक विचार तर्कशुद्ध विचारसरणीवर आधारित अंधश्रद्धा जोपासू नका.

३) 'तेन त्यक्तेन भुंजीथाः - त्यागपूर्ण संयमित जीवन जगणे'.

४) 'कर्मणि एव अधिकारः ते' - कर्मयोगी हो.

५) भिन्नरुचिर्हि लोकः – प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. प्रत्येकाने 'ह्या सर्व सृष्टीचा निर्माता एक आहे' हे ध्यानात ठेवून आपला उपासनामार्ग निवडावा. उपासना–स्वातंत्र्य.

६) उत्तम नीति – धर्मावर आपले आचरण आधारावे. 'अहिंसा, सत्यं शौचं, इंद्रियनिग्रहः, प्रेम, सत्य, दुसऱ्याच्या धनाचा हव्यास न करणे, शरीर व मन शुद्ध ठेवणे व संयम' ही नीतिधर्माची प्रधान अंगे आहेत.

७) साधनामार्ग – अष्टांग–योग व साधन–चतुष्ट्यः

८) आपल्या उपासनामार्गांचे प्राणपणाने रक्षण करा. 'अगृतः चतुरो वेदाः एष्ठतः सशरं धनुः'

९) आचारधर्म – संध्या, पूजा, होम आदि आचार भक्तिभावाने चित्तशुद्धीकरिता करावेत.

१०) मोक्ष – आत्मज्ञान करून घेऊन समाजोद्धारक कर्मे करीत राहणे–

'अस्य जीवनमुक्तस्य शरीरधारणां लोकस्य उपकारार्थमेव ।'

**स्वामी विवेकानंदांचा मार्क्सच्या तुलनेत समावेशक हिंदू पद विचारः–**

धर्माच्या संदर्भात, चं. प. भिशीकर यांनी हिंदू धर्माची सर्वसमावेशकता आणि धर्म हा अनुभवाचा विषय याविषयी; स्वामी विवेकानंदांची मते अनुवाद करताना स्पष्ट केली आहेत. त्यातील महत्त्वाचा भाग असा– ''हिंदू धर्मग्रंथांच्या बाबतीत मात्र वस्तुस्थिती अगदी भिन्न स्वरूपाची आहे. हिंदू धर्मग्रंथांच्या एका अनन्य वैशिष्ट्याचा लाभ आपल्याला झालेला आहे. ते वैशिष्ट्य हे की हिंदू धर्मग्रंथ केवळ मुक्तीचीच ग्वाही देत नाहीत किंवा मुक्तीचा मार्ग दाखवून तसेच मृत्यूनंतर स्वर्ग लाभण्याचे किंवा तत्सम आश्वासन देऊन थांबत नाहीत; तर भौतिक जीवनाचे शारीरिक व इतर पैलू विचारात घेतात आणि स्वतःच अनेक शास्त्रांचे ज्ञान देतात विवेचन करतात. वस्तुतः सर्व भौतिक शास्त्रे किंवा ज्याला आपण ऐहिक ज्ञान म्हणतो ते ज्ञान, म्हणजे धर्मग्रंथ मानल्या गेलेल्या वेदांचे एक अंग असल्याचे निदर्शनास येईल. ...आयुर्वेद हा ऋग्वेदाचा भाग आहे, तर धनुर्वेद हा यजुर्वेदाचा. धनुर्वेद म्हणजे धनुष्यबाणांच्या लढाईचे शास्त्र व आनुषंगिक शास्त्रे. सामवेदात स्थापत्यशास्त्र आहे. गणित व त्याच्या सर्व शाखांसह वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी (इंजीनिअरिंग) वगैरे सगळ्यांना मिळून 'स्थापत्यविद्या' हा एक शब्द संस्कृत भाषेत आहे. हे चार 'उपवेद' आहेत.''[५]

## शंकराचार्यांचा वेदान्त विचार :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्यावर शंकराचार्यांच्या विचारांचा प्रभाव आहे हे लक्षात घेता, शंकराचार्यांच्या वेदान्त-मतानुसार धर्मकल्पना लक्षात घेणे आवश्यक वाटते. मराठी तत्त्वज्ञान महाकोशात 'धर्म तत्त्वज्ञान शांकर वेदान्त मत' यानुसार धर्मविषयक नोंद अशी - ''धर्म हा शब्द विशिष्ट पंथवाचक नसून त्याचा अर्थ साऱ्या जगाला स्थैर्य देणारा म्हणजे *'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा'* असा आहे.''[६] शंकराचार्यांचे वेदान्तमत हे सनातन भारतीय सारणीविषयी आहे. धर्म ही जीवनशैली आहे, असा अर्थ त्यातून स्पष्टपणे सूचित होतो. हाच सनातन धर्म, हिंदू धर्म या नावाने काही शतकांपासून रूढ झाला आहे. पूजनीय स्वामी गोविंददेव गिरि यांनी 'वेदान्त और पुरुषार्थ' या ग्रंथात 'धर्म म्हणजे मानवी जीवनाच्या जीवनप्रणालीतील पुरुषार्थ होय' हे लक्षात घेऊनच मांडणी केली आहे. हे स्पष्ट करताना ते लिहितात- 'आप चाहे रामायण, महाभारत, भागवत अथवा भगवद्गीता पढिये । जहाँ-तहाँ 'धर्म पुरुषार्थ' की अत्यंत बडी महत्ता हमें परिलक्षित होगी । *'यतो धर्मस्ततो जयः'* भगवान भी स्वयं कहते हैं, भगवान ने यह नहीं कहा कि मैं लोगों को मोक्ष देने के लिए आता हूँ ।' भगवान ने कहा-

**'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।'**

क्योंकि धर्म की संस्थापना ठीक से होगी, धर्म-आधारित अर्थ और काम रहेंगे, तो मोक्ष तो, Its the natural blossoming of the life. इस प्रकार से आना चाहिए । यही वास्तव में वैदिक जीवनपद्धति है। धर्म उसका मूल है ।''[७]

'यज्ञमय जीवन'[८] या ग्रंथात पूज्य स्वामींनी यज्ञ संकल्पनेच्या आधारे 'स्वधर्म हाच सनातन धर्म' अशा प्रकारचा विचार मांडून हिंदू धर्माच्या जीवनशैलीचे स्पष्टीकरण केले आहे. 'विश्वबंधुत्व' या पुस्तकात - ''विश्वबंधुत्व :- हिंदूओंका स्थायी भाव'', असे म्हणून वेदप्रणीत मानवतावादी वैश्विक जीवनप्रणालीचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना - ''वेद तो किसी देशविदेश का नागरिकत्व मानते ही नहीं । वे नहीं कहते कि 'मैं भारतीय हूँ, या और कोई हूँ ।' वेदोंकी उडान तो 'विश्वमानुषः' तक है ।-

Not citizens of the earth only
But citizens of the universe.

अर्थात पूरे विश्व के नागरिकत्व तक विशाल है, विराट है । वेदोंकी आदर्श भावना है कि 'मैं इस विश्व का नागरिक हूँ ।' ज्ञानेश्वर महाराज के विचारों में भी यही भावना है ।

**हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपणचि जाहला ।।**

यहाँ ज्ञानेश्वर महाराज एक विशेष प्रतिपादन करते हैं कि ''पूरा विश्व ही मेरा घर है, मैं इस विश्व का नागरिक हूँ, इतना ही नहीं, पूरे विश्व के साथ एकरूपता प्राप्त करके मैं एक ही हूँ ।– यह एकात्म अनुभूति है ।''[९]

## विनोबाजींचा गीता–प्रवचनातील विचार :–

'गीता प्रवचने' या विनोबाजींच्या ग्रंथात विनोबाजींनी 'भगवद्‌गीता हे सर्वोत्तम धर्मशास्त्र आहे' अशा तऱ्हेने निवेदित करीत आत्मज्ञान आणि समत्वबुद्धी यानुसारचे वर्तन, असे धर्माचे वर्णन आशयनिवेदनात्मकतेने केले आहे. त्यांच्या या निवेदनातून एक प्रकारे वेदान्ताचे सार प्रकट झाले आहे. 'धर्म मानवमात्रासह जीवमात्र आणि अखिल सृष्टीचा समत्वदृष्टीने विचार करतो' असे प्रतिपादित करीत, धर्म या पदाची आदर्श जीवनसारणी अर्थात माणसाच्या प्रज्ञेला आकलित झालेली सर्वकल्याणात्मक जीवनसारणी होय असा त्यांच्या प्रतिपादनाचा मथितार्थ आहे.

'विजयरथ' या ग्रंथात 'सर्वत्र समदर्शन' या शब्दात धर्माचे स्वरूप स्वामी गोविंददेव गिरि यांनी विशद केले आहे.[११] त्यानुसार तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे *'दया तिचे नाव । भूतांचे पालन । आणिक निर्दालन । कंटकांचे ।।'* असे धर्माचाराचे वर्णन केले आहे; तर 'प्रेम–योग–साधना'[१२] यात *'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे'*, म्हणजे सर्वात्मक परमेश्वराचे म्हणजे परम सत्यत्वाचे आत्मज्ञान झाले की सर्वाभूती प्रेमभावना अर्थात आत्मभावना प्रकट होते आणि ठायीच कारुण्य प्रकटते. या प्रक्रियेतून अनंतमयता अनुभूत होते, ही धर्माची प्रक्रियात्मक अनुभूती निरूपित केली आहे. नारदांच्या शब्दांत –

**'गुणारहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानम्**
**सूक्ष्मतरम् अनुभवरूपं प्रेमस्वरूपम् ।'**

## श्री आद्य शंकराचार्यांच्या मताचे परंपरेने स्पष्टीकरण :–

धर्म या पदाची चर्चा करताना 'आचार्य शंकर–प्रणीत अद्वैत वेदान्त'[१३]

विचारात घेतला जातो. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि भगवद्‌गीता यातून वेदान्ताचे साररूप दर्शन घडते. उपनिषदांनी अद्वैताचे स्पष्टीकरण महावाक्याच्या स्वरूपात केले आहे – *'अहं ब्रह्म अस्मि', 'तत् त्वम् असि', 'आयम् आत्मा ब्रह्म', 'प्रज्ञानं ब्रह्म', 'सत्यं ज्ञानम् अनन्तं ब्रह्म', 'सर्वं खलु इदं ब्रह्म', 'एकमेकाद्वितीयम्', 'न इह नाना अस्ति किंचन'*

वेदान्तावर भारतीय परंपरेतील वैदिक आणि अवैदिक ऋषिंनी अनेक प्रकारे मंथन करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यातून अनेक मतांतरे निर्माण झाली. द्वैत-अद्वैत, ईश्वर-निरीश्वर, सगुण-निर्गुण, मूर्तिपूजा वैध-मूर्तिपूजा अवैध, ध्यानयोग आणि भक्तियोग आदी परस्परविरोधी अशी मतांतरे निर्माण झाली. त्यातूनही काही प्रज्ञावंतांनी *'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति'*, असे सांगून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगीन भागवत तथा वारकरी संतांनी स्वप्रज्ञेने समन्वयात्मक वेदान्त प्रतिपादित केला. द्वैतातून अद्वैताचे रूप विशद करून सांगितले. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या 'अमृतानुभव' आणि 'चांगदेव पासष्टी'मधून निर्गुण आणि सगुण यांचा स्वरूपसंबंध स्पष्ट करून, निर्गुणाचा आविष्कार म्हणजे सगुण. अर्थातच निर्गुण लपते आणि सगुण प्रकटते; तर सगुणावस्थेत आत्मज्ञान झाले की सगुण लोप पावते आणि ठायीच निर्गुण प्रकटते. ही क्रीडा सत्-चित्-आनंदस्वरूप आहे. हे सनातन धर्माचे तत्त्वज्ञानात्मक मर्म उलगडून, सर्वांभूति परमेश्वर आहे, हे आत्मभान ठेवून व्यवहार करणे म्हणजे धर्म होय; असे सूचित केले. संत तुकोबारायांनी, *'वेदांचा तो अर्थ आम्हाशीच ठावा'*, असे म्हणत

**'विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।।**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।।'**

असे स्पष्ट निवेदन करून हिंदू धर्माची प्रेमपूर्वक, स्वाभाविक, सहिष्णुतापूर्ण विश्वात्मक भूमिका विशद केली.

संत ज्ञानोबारायांनी शंकराचार्यांच्याच वेदान्त तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करून; श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य करताना; हिंदू धर्माच्या वैश्विक भूमिकेकडे लक्ष वेधले. हे पसायदानाच्या रूपाने सर्वज्ञात आहे.

पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी लिहिलेल्या 'जगद्‌गुरू श्रीमत् शंकराचार्य'[१४] या ग्रंथाच्या लक्ष्मण ढवळू टोपले यांनी श्रीमत् शंकराचार्य यांची, मंडन मिश्रांच्या धर्मविषयक शंकांना उत्तर देतानाची, हिंदू धर्मविषयक भूमिका स्पष्ट केली आहे.

तो संवाद असा– ''जर आपला हा विकास परकीयांचे अनुकरणस्वरूप असता, आमची आत्मनिर्भरता, आत्माभिमान आणि आत्मविश्वास नष्ट करणारा असता, आपल्यातील आत्मगौरवाला प्रज्वलित केले नसते आणि प्राचीन परंपरांचे तुकडे–तुकडे झाले असते आणि हा विकास अराष्ट्रीय प्रवृत्तींचा जनक झाला असता तर आपण त्याला समूळ उपटून फेकून दिले असते. त्याचा थोडासुद्धा मोह आपल्याला झाला नसता, परंतु हे सारे आपल्या पूर्वजांच्या परंपरांनाच पुष्ट करणारे आहे. पूर्वजांनी पेरलेल्या बीजानेच आज वृक्षाचे रूप धारण केले आहे. बीजस्वरूप नष्ट झाले म्हणून शोकविव्हल होण्याचे कारण नाही. त्याचे परिवर्तित आणि विकसित रूप ओळखा. वृक्षात बीज पहा. वृक्षालाच पाणी देऊन पुन्हा फळ आणि बीज मिळेल. तोडून अथवा मुळे खोदून काढून आता आपल्याला बीज मिळू शकणार नाही. आजचा हिंदू धर्म हा आपल्या प्राचीन वैदिक धर्माचेच विकसित स्वरूप आहे. या त्याला वाढवूया. संपूर्ण भारतात अद्वैताचा प्रचार करून भारतीय संततीला एका सूत्रात गुंफूया.''

''तर काय आता यज्ञ–हवनादी कर्म पूर्णपणे नष्ट होणार आहेत आचार्य?'' मंडन मिश्राने खिन्न होऊन विचारले. आचार्यांच्या वाणीने त्यांना जिंकले होते, परंतु मनावरील संस्कार उसळ्या मारीत होते.

''का नष्ट होतील ते मिश्र! यज्ञाचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे; महत्त्व आहे; ते चालूच ठेवले पाहिजेत. आमचे संपूर्ण जीवनच यज्ञमय होईल.''

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्याही मनात वेदान्त–तत्त्वज्ञान आणि व्यवहार याविषयी अनेकदा प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांचे परिपूर्ण निरसन, प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराज यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनाने झाले; असे पू. स्वामीजी प्रांजळपणे सांगतात. उदा. ''अद्वैत वेदान्ताचा या भागवताच्या भक्तीशी समन्वय कसा करावा, त्यातले हे सत्य असेल किंवा ते सत्य असेल या कातरीमध्ये मी सापडलो होतो. अशा या उलघालीमध्ये मला जर खरोखर कुठे आलंबन मिळाले असेल, की ज्यामुळे मी पूर्णपणे निःशंक झालो असेन, तर ते आलंबन म्हणजे संत श्री गुलाबराव महाराज यांचे वाङ्मय होय!''[१५] त्या संत गुलाबराव महाराजांचे 'आर्य संस्कृती'विषयीचे मत धर्मपदाच्या स्पष्टीकरणासाठी अतिशय महत्त्वाचे ठरते.

'मुळात वैदिक संस्कृती विश्वव्यापिनी होती.' लोकमान्यांच्या आर्यांचे मूळ स्थान उत्तर ध्रुवांवरती होते, हा विचार महाराजांनी स्वीकारला नाही. लोकमान्यांचा प्रतिवाद करणारे जे लोक होते त्यांचा विचार असा की, आर्य इथलेच भारतातले होते. श्री महाराजांनी मांडलेला विचार वेगळाच आहे. ते म्हणतात, तेव्हा जगभरच आर्य पसरले होते. त्यामुळे ते इथे होते, तिथे होते असा प्रश्न नाही. झाले फक्त असे की, संस्कारांचा लोप होत गेल्यामुळे त्यांना अन्य स्थिती प्राप्त झाल्या. *'वृषलत्वं गता लोके ब्राह्मणानाम् अदर्शनात्'* सगळे जग आर्यच होते. आर्यत्वाचा पुढे संकोच होत गेला. काही लोकांचे म्हणणे आर्य बाहेरून आलेत. काही लोकांचे म्हणणे आर्य इथून बाहेर गेले. महाराज म्हणतात, सर्वत्र आर्यच होते. हा नवीन सिद्धांत आहे. अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्री महाराजांनी 'आर्य' शब्द हा वंशवाचक नाही, आर्य वंश हा गुणवाचक आहे, हे इतक्या कसोशीने सिद्ध केले, की त्यांच्या त्या प्रतिभेची कमाल वाटते. डॉ. आंबेडकरांनी हेच मत स्वीकारलेले आहे आणि मांडलेले आहे. या देशात कायमचा कलह निर्माण व्हावा म्हणून मॅक्समुलरने आणि विदेशी अभ्यासकांनी खोडसाळ मते प्रचारकी थाटाने आपल्यावरती लादली; हे महाराजांनी सिद्ध केले. त्याकरता त्यांनी विदेशी ग्रंथातले उतारेच्या उतारे नमूद केले आहेत. हा सगळा विचार मोठा विलक्षण आहे.'

## ब्रह्मन् एकसमत्व – स्वरूप विचार – हिंदू धर्माचा गाभा :–

सृष्ट विश्व हा स्वतःसह निर्गुणाचा सगुण आविष्कार हे जाणवल्याने सृष्ट विश्वातील जीवमात्र, वस्तुमात्र याविषयी समत्व–दृष्टीने व स्वाभाविक बंधुभावाने वर्तन करण्याची सहानुभूतिपूर्ण सारणी, मानवमात्रांच्या समूहमनाच्या ठायी निर्माण झाली. या सारणीतूनच सनातन धर्म तत्त्वज्ञान प्रकट झाले आणि ज्ञानात्मक कर्म करण्याची कर्तव्यतत्परता हा समदृष्टीप्राप्त मानवाचा स्वभावधर्म झाला. म्हणूनच सनातन धर्मसारणी ही ग्रंथनिष्ठ अपरिवर्तनीय नसून; ती स्थलकाल परिस्थितिसापेक्ष सर्वात्मकतेच्या जाणिवेने सर्व कल्याणप्रद सारणीच्या स्वरूपात तथा जीवनशैलीच्या स्वरूपात अस्तित्वात आहे. ही वेदान्तावर आधारित जीवनशैली म्हणजे हिंदू धर्मशैली होय.

या दृष्टीने 'ब्रह्मन्' या 'भारतीय इतिहास व संस्कृती यांचा यथार्थ अभ्यास' या बाराव्या खंडातून धर्म व तत्त्वज्ञान संकल्पना यांचे स्पष्टीकरण विचारात घेऊनच

धर्मपदाचे यथास्थित आकलन घडते. हे संकल्पनात्मक स्पष्टीकरण– ''धर्म व तत्त्वज्ञान :– धर्म आणि पंथ एकच नव्हेत. जिच्या योगाने ऐहिक हित साध्य होऊन पारमार्थिक कल्याणाचा मार्ग सुकर होतो अशा आचारसंहितेला धर्म ही संज्ञा आहे. मानवांचे परस्परांवरील प्रेम व विश्वास हा धर्माचा पाया आहे. त्याची दुसरी व्याख्या आहे– *'धारणात् धर्मः इति आहुः धर्मः धारयते प्रजाः ।* समाजाला एकत्र जोडून ठेवणाऱ्या आचारविषयक निर्बंधांना धर्म असे म्हणतात.' असा धर्म समाजाच्या साऱ्या घटकांचे हित घडवून आणतो. पंथ म्हणजे विशिष्ट व कठोर श्रद्धापालनाचे नियम. इस्लामी व ख्रिस्ती पंथांचा मूलाधार 'मत्सरी देवा'चा सिद्धांत हा आहे. या दोहोंपैकी प्रत्येकाचा देव त्याच्या अनुयायांना स्वर्गात प्रवेश देतो; पण जे लोक त्यांच्या विशिष्ट छापाच्या निष्ठा मानीत नाहीत, त्या अन्य साऱ्यांना कायमचे नरककुंडात फेकून देतो. याच्या उलट, जे लोक आपल्या व्यक्तिगत आयुष्यक्रमात तसेच समाजबांधवांसमोरच्या वर्तनात विहित नैतिक विधिनियम पाळतात, मग ते त्यांच्या देवाला मानोत वा न मानोत, त्या सर्वांसाठी अत्यंत प्रेममय व करुणामय असा ईश्वर आहे असा वैदिक सनातन धर्माचा पायाभूत सिद्धांत आहे. सामान्य माणूस काही नैष्ठिक कर्मे पार पाडणे एवढाच धर्माचा अर्थ जाणतो. जनसामान्याची ही गरज मनूने जाणली होती, म्हणून त्याने त्यांच्या देव (विविध दैवतांच्या मूर्ती), गुरू आणि वडीलधारी मंडळी यांच्याबद्दल आदरभाव बाळगावा असा सोपा नियम सांगून ठेवला. ज्यांना इच्छा होती त्यांना अनुसरण्यासाठी त्याने काही सविस्तर धर्मविधी पुरस्कृत केले आहेत. ते सर्व मुख्यतः मनोनिग्रह व शुद्धतापावित्र्य यांच्यासाठी होते. सर्वांनी पाळला पाहिजे असा एखादा सामान्य नियम नव्हता.''[१६]

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी तत्त्वज्ञान विद्यापीठातून तसेच वाराणसीत प्रत्यक्ष गुरुकुल स्वरूपात धर्म तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. त्यांना पडलेल्या अनेक प्रश्नांच्या उत्तरांचे, श्रीमत् शंकराचार्य, मध्ययुगीन संत माउली ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत समर्थ रामदास स्वामी, स्वामी विवेकानंद आणि मुख्यत्वेकरून प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या वाङ्मयातून सखोल चिंतन–मनन या माध्यमातून, सर्व प्रश्नांचे निरसन करून घेतले. सनातन धर्माची वेदान्तप्रणीत विश्वात्मक समत्व–दृष्टी स्वामीजींच्या ठायी ओतप्रोत प्रकट झाली. सनातन धर्मतत्त्वज्ञानाचा अर्थात हिंदू तत्त्वज्ञानाचा विचार व त्याशी निगडित आचार

धर्मसारणी यांचा, त्यांच्या सर्व प्रकारच्या वाङ्मयसेवेतून सतत आविष्कार घडतो आहे. धर्मविषयक त्यांच्या ठायीची संकल्पना स्पष्टपणे त्यांच्या मुलाखतीतून प्रकट झाली आहे. ती धर्मविषयक कल्पना पुढीलप्रमाणे–

'वास्तव में देखा जाये तो धर्म शब्द अत्यंत गंभीर । मानवमात्र का धर्म एकही – भिन्न–भिन्न उपासनों को धर्म कहना वेदोंकी दृष्टिसे संमत नहीं । वेदोंने उपासना संप्रदायोंको धर्म नहीं कहा । उपासना–संप्रदाय धर्मके अंग होते हैं, लेकिन वह परिपूर्ण धर्म नही । भिन्न–भिन्न प्रकारके धर्मोंके नाम लेते हैं तब वह उन–उन विशिष्ट लोगोंके द्वारा स्थापित अपने–अपने मत होते हैं । अपने–अपने संप्रदाय होते है । धर्मका अर्थ इन सब संप्रदायोंको लांघके जानेवाला है । उपासना भी धर्मका एक अंग होने के कारण धर्म कहलायेगा, लेकिन धर्म शब्द उपासना संप्रदायोंसे शब्दसे व्यापक है – संस्कृत भाषाकी दृष्टिसे महाभारत, रामायण, श्रीमद् भागवत. भगवद्गीता ग्रंथोंके सहारे देखा जाए तो धर्म का अर्थ है अपना–अपना कर्तव्य । वे अपने–अपने कर्तव्योंके पालन के ऊपरही जोर देते हैं । वेदोंमें धर्मका विचार – दो आयाम प्रधान है ।

जतः अभ्युदय निःश्रेयस सिद्धी सः धर्मः ।
यह लोक भी सफलता से जीया जाये ।
परलोक भी उत्तम गति प्राप्त
अभ्युदय – भौतिक समृद्धी
निःश्रेयस – आंतरिक शांती

भगवान मनूने – जीवनमूल्योंकी व्याख्या

**धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधः दशकं धर्मलक्षणम् ।।**

दस सद्गुणों का वर्णन किया – जिसके जीवन में दस गुण प्राप्त होगे वही धार्मिक है । इस प्रकारकी व्याख्या की जायेगी तो सारे के सारे विश्व के धर्मोंका समन्वय अपनेआप हो जायेगा । कोई धर्म छोटा या बडा नहीं होगा । सात्त्विकता के ऊपर ध्यान देना चाहिए ।''[१७]

## हिंदू धर्माचे स्वरूप :–

येथवर सनातन धर्म अर्थात हिंदू धर्म अर्थात वैदिक धर्म, वेदान्त तत्त्वज्ञान

यांचा व्यापक अर्थ विचारात घेतला. सनातन धर्म अर्थात हिंदू धर्म ही अखिल मानवमात्रांसाठीची सत्य, प्रेम, करुणा यांवर आधारित जीवनप्रणाली आहे. गत दोन हजार वर्षांत धर्म या पदाला जो पोथीनिष्ठ मर्यादित अर्थ दिला गेला आहे, तो सर्वथा व्यर्थ असून, असे तथाकथित धर्म म्हणून घोषित असलेले धर्म किंवा मतप्रणाली या हिंदू जीवनप्रणालीमध्ये स्वाभाविकपणे समावेशित करता येऊ शकतात. मात्र पोथीनिष्ठेचा आग्रह सोडावा लागेल; कारण तो आग्रह मनुष्यमात्राच्या दृष्टीने फसवा आहे हे स्वामींनी त्यांच्या उपरोक्त मुलाखतीत स्पष्ट केले आहे.

धर्म या पदानंतर राष्ट्र या पदाची संकल्पना समजून घेणे. 'हिंदू राष्ट्र' या पदाची संकल्पना समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

**मराठी तत्त्वज्ञान महाकोशातील राष्ट्र ही संकल्पना :–**

**राष्ट्रवाद –** 'राष्ट्र' या शब्दाचा वापर प्राचीन संस्कृत वाङ्मयात आढळतो, त्याचप्रमाणे पाश्चात्यांमध्ये रोमन साम्राज्यकालापासून 'नेशन' या शब्दाचा वापर केलेला आढळतो; तथापि 'एक प्रभावशाली, गतिमान राजकीय सामर्थ्य' या स्वरूपात राष्ट्रवाद प्रकट झाला तो १७७५ साली, असे टॉयन्बी म्हणतो. राजकीय जीवनावर राष्ट्रवादाचा प्रभाव गेल्या दोन शतकांत खूपच पडलेला आहे, हे निःसंशय. **'राष्ट्रवाद' ही एक मानसिक, आध्यात्मिक भावना आहे. या भावनेमुळे लोकांत एकात्मतेची, आत्मीयतेची भावना निर्माण होते व अन्य समाजांहून आपण पृथक कसे आहोत, हे दर्शविण्याकडे त्यांचा कल असतो. यांतूनच राष्ट्र–राज्याची** कल्पना उदयास आली. राष्ट्रवादाचा प्रभाव गेल्या दोन शतकांत अधिक वाढलेला दिसत असला तरी राष्ट्रवादाचा विकास तेराव्या शतकापासून होत होता. या कालापासून युरोपांतील लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. धर्मसत्तेची अवनती, व्यापारी क्रांती, पुनरुज्जीवन आणि धर्मसुधारणा यांमुळे राष्ट्रवादाला खतपाणी मिळाले. मध्ययुगाच्या अखेरीस पोप यांची जी अवनती झाली, तीमुळे पवित्र रोमन साम्राज्याच्या कल्पनेला तिलांजली मिळाली आणि धर्मनिरपेक्ष समाजाचा युरोपांत उदय झाला.

नव्या समुद्रमार्गांचा शोध लागल्यामुळे जी व्यापारी क्रांती झाली; त्या क्रांतीने राष्ट्रीय ऐक्याला आणि सामर्थ्याला आर्थिक पाया मिळवून दिला. पुनरुज्जीवनामुळे ग्रीक व लॅटिन भाषा मागे पडून निरनिराळ्या प्रादेशिक भाषांचा विकास झाला.

तात्पर्य असे की, पुनरुज्जीवनामुळे प्रादेशिक, राष्ट्रीय भाषा व संस्कृती यांना चालना मिळाली. यातच धर्मसुधारणेची भर पडली व प्रादेशिक, राष्ट्रीय धर्मसंस्थांची (नॅशनल चर्चेस) स्थापना झाली. **राष्ट्रीयत्वाची भावना, एकात्मतेची भावना निर्माण करणारे घटक म्हणजे वंश, भाषा, समान इतिहास, परंपरा, समान राजकीय उद्दिष्ट व अन्य समाजापासून पृथगात्मता या साऱ्या घटकांची निर्मिती आणि जाणीव** युरोप खंडातील लोकांत होऊ लागली. पॅट्रिक हेन्री, थॉमस पेन यांसारखे अमेरिकेतील विचारवंत ब्लंट स्क्ली, फिश्ट यांसारखे जर्मन विचारवंत, फ्रेंच क्रांतिकारक यांनी राष्ट्रवादाच्या सिद्धांतात मोलाची भर टाकली. पहिल्या महायुद्धानंतर युरोप खंडात जी अनेक नवीन राज्ये उदयास आली ती या राष्ट्रीय भावनेमुळेच निर्माण झाली. राष्ट्र-राज्य-कल्पनेचे प्रखर आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे 'ज्यू' लोकांचे इस्राइल हे राज्य होय. याच राष्ट्रीयत्वाच्या प्रखर भावनेमुळे गेल्या शतकात इटली व जर्मनी या नव्या राष्ट्र-राज्यांचा उदय झाला.

राष्ट्रवाद हे एक राजकीय तत्त्वज्ञान आहे. सामाजिक प्रसंविदा सिद्धांताने व्यक्तीला जे एक राजकीय समाजाचे नागरिकत्व मिळते, त्याचे कारण त्याने करारात घेतलेला भाग असतो, हे होय; परंतु राष्ट्रवादाने ही भूमिकाच बदलून टाकली.

राजकीय समाजाच्या सदस्यत्वासाठी राष्ट्रवादाने नवीनच निकष निर्माण केले. अमेरिकेच्या राज्यक्रांतीने यात आणखी एका निकषाची भर टाकली व तो निकष म्हणजे 'आम्ही एक आहोत' ही भावना हा होय. उपयुक्त घटकांपैकी कोणता निकष किती प्रमाणात राष्ट्रीय भावना निर्माण करतो, हे सांगता येत नाही. जर्मन विचारवंतांनी राष्ट्रपुरुषाची (दि स्टेट - ए रिअल पर्सन) कल्पना मांडली. फिश्टने 'भाषा' या घटकावर भर दिला. माणसांमुळे भाषेची अडचण जेवढी होते, त्यापेक्षा अधिक घडण भाषेमुळे माणसांची होते. **राष्ट्र म्हणजे दैवी, शाश्वत, अस्सल अशा केवलतत्त्वांचे (ॲब्सोल्यूट) प्रकटीकरण होय. समाज व राज्य यांच्यापेक्षा 'राष्ट्र' हे श्रेष्ठ आहे. 'राष्ट्र' हे राज्याचे साध्य आहे आणि समाजांतर्गत शांतता व सुरक्षितता राखून राज्य हे राष्ट्राचे केवळ साधन म्हणून काम करते.** सारांश, जर्मन विचारवंतांनी राष्ट्राला व त्या अनुषंगाने राष्ट्रवादाला एक दैवी, अलौकिक स्थान प्राप्त करून दिले, त्याचाच परिणाम आत्यंतिक राष्ट्रवादात, राष्ट्रीय अहंभावात झाला.[१८]

मराठी तत्त्वज्ञान विश्वकोशातील नोंदीमध्ये राष्ट्रवाद संकल्पनेचा परिवर्तनात्मक इतिहास बाजूला केला तर, राष्ट्र ही संकल्पना वरील नोंदीत स्पष्ट होते.

नोंदीतील ही तात्त्विक संकल्पना विचारात घेतली की वर उल्लेखिल्याप्रमाणे हिंदू या पदाचा एकात्म मानवी जीवनप्रणाली म्हणून विचार करावाच लागतो. म्हणजेच हिंदू या पदाला संकीर्ण, सांप्रदायिक, संकुचित किंवा मर्यादित अर्थ लावणे स्पष्टपणे नाकारावे लागते. पू. स्वामी गोविंददेव गिरी यांच्या व्याख्यानांतून, प्रवचनांतून, कथाज्ञानयज्ञांतून आणि उद्यमशील उपक्रम संयोजनातून सातत्याने हिंदूराष्ट्र अर्थात भारतराष्ट्र अर्थात सनातन राष्ट्र हा विश्वव्यापकतेचा सनातन हिंदू प्रणालीचा एकात्मिक भावनेचा पडसाद चैतन्यशीलतेने प्रकट होत असतो. हिंदूराष्ट्र ही संकल्पना स्वामीजींच्या आविष्कारातून कशी सार्थपणे प्रकट होते, हे लक्षात घेता येते.

हिंदू किंवा सनातनप्रणाली किंवा आर्यप्रणाली किंवा भारतीय परंपरा किंवा वेदान्तप्रणीत मानवी जीवनप्रणाली, हे सनातन वैश्विक हिंदूराष्ट्र आहे. ''होय, आम्ही हिंदू आहोत!'' ह्या पुस्तकात लक्ष्मण टोपले यांनी नोंदविलेल्या, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो – 'भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती, थोर विचारवंत, विश्वविख्यात तत्त्वज्ञानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात– 'हिंदू' हा एक संप्रदाय नाही; ज्यात अनेक संप्रदाय गुण्यागोविंदाने राहू शकतात... नांदू शकतात असा तो एक संघ आहे. Hinduism is not a religion... It is a commonwealth of many religions. हिंदुत्व एक संघ आहे. तो एक रस आहे. त्यांचा एक स्वभाव आहे. तो स्वभाव शांततेचा पुरस्कर्ता आहे; सहिष्णु आहे; उदार आहे... सर्वसमावेशक असा आहे. ही गुणसंपदा कोणत्याही विशिष्ट कर्मकांडाशी बांधलेली नसल्यामुळे 'हिंदू' हा संप्रदाय बनला नाही, ती संस्कृती बनली आहे. प्राचीनांच्या भाषेत बोलायचे म्हणजे तो एक धर्म बनला आहे. 'धर्म' म्हणजे वैश्विक सामंजस्याचे तत्त्व A principal of universal harmony हे सामंजस्य कोणते? तर व्यक्ती आणि समाज यात सामंजस्य, मानव आणि समाज यात सामंजस्य, मानव, समाज आणि मानवेतर सृष्टी यांत सामंजस्य होय...'[१९]

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी एक प्रकारे सनातन राष्ट्राचे स्वरूप सूचित केले आहे. सनातन धर्म किंवा हिंदू धर्म किंवा वेदान्त किंवा भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञान हे मानवाच्या आरंभबिंदूपासून, मानवाच्या नैसर्गिक सारणीतून द्रष्ट्या

ऋषिंना दृष्ट झालेले, मानवी आत्मीयतेचे सारणीस्वरूप आविष्कृत करणारे धर्मज्ञान आहे. त्यामुळे सनातन धर्मसंस्कृती ही एकात्म मानवी राष्ट्राचाच उल्लेख करते. त्यामुळेच श्री सत्यसाईबाबा म्हणतात त्याप्रमाणे, 'सर्व धर्मांची बीजे सनातन धर्मात आहेत.'[२०] तर सायमन पिमेन्टा म्हणतात, 'हिंदू धर्म ही अशी संस्कृती आहे की, जी अनेक धर्मपंथांना वाव देते.'[२१] 'भारतः – शाश्वत संस्कृतीची यक्षभूमी' यातील उल्लेखाप्रमाणे 'हिंदू धर्म हा सर्वात पुरातन आहे हे तर सर्वच मानतात, मग वेद हे अखिल मानवजातीचा वारसा आहेत, ह्या सत्यसाईंच्या म्हणण्याला व या प्राचीन संस्कृतीतील राम–कृष्णांसारख्या महामानवांना मान्यता देण्याला त्यांना काही अडचण पडू नये.'[२२] याच ग्रंथात निष्कर्षाप्रत जाताना म्हटले आहे, 'हिंदूंचे हे कर्तव्य ठरते की, त्यांनी स्वतःच्या धर्माच्या सिद्धान्तांचा सखोल अभ्यास करून त्यांचे माहात्म्य आत्मसात करावे व वेदान्त तत्त्वज्ञानावर आधारलेल्या या सर्वसमावेशक उदार धर्माचे इतर सर्व धर्म भाग कसे आहेत, हे त्यांना पटवून द्यावे. महाभारताने या धर्माच्या आधारभूत सत्याचे रक्षण व स्पष्टीकरण करण्याची गरज आहे हे सिंहनाद करून सांगितले आहे. महाभारत म्हणते–

**'अग्रतः चत्वारो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।'**[२३]

उपरोक्त उल्लेखाचा इत्यर्थ हा की, द्रष्ट्या ऋषींना वैश्विक मानवमात्राच्या चैतन्यशीलतेचे दर्शन घडले होते. त्याच्या ठायीच्या सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांचे ज्ञान झाले होते; त्याआधारेच मानवाच्या लौकिक व पारलौकिक अभ्युदयासाठी तसेच मानवकेंद्रिततेने चराचराच्या अस्तित्वाचे जतन, संरक्षण व उपयोजन करण्यासाठीची व्यवस्थापनप्रक्रिया अर्थात धर्मसारणी मांडली. त्यामुळे वैश्विक सनातन राष्ट्राचा उदय झाला आणि त्या सनातन राष्ट्राचे तात्त्विक अस्तित्व आजही विश्वपटलावर अबाधित आहे. म्हणूनच हिंदू हे सनातन राष्ट्र होते, आहे आणि राहणार यात शंकास्पद असे काहीच नाही.

'वेदान्त और पुरुषार्थ' या तीन दिवसीय व्याख्यानमालेतील व्याख्यानात हिंदू धर्म हे सनातन विश्वराष्ट्र आहे व ते माणसाच्या 'पुरुषार्थ संपादन' संकल्पनेतून सातत्याने सिद्ध होत आले आहे याविषयीचा निर्वाळा, छत्तीसगढच्या रायपूर येथील रामकृष्ण मिशन आश्रमाचे अध्यक्ष स्वामी सत्यरूपानंदजी महाराज यांनी दिला आहे. ते आपल्या पुरस्कारात लिहितात– ''वेदान्त डंके की चोट पर यह

घोषणा करता है कि मनुष्य मूलतः अजर, अमर, नित्यमुक्त, शुद्धबुद्ध, चैतन्य एवं सर्वशक्तिसंपन्न आत्मा है। विश्व ब्रह्मांड में मनुष्य के लिए कुछ भी अजेय नहीं है। तभी तो यमराज ने नचिकेता से कहा था–

**'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।**

**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ।।'**

उठो, जागो! गुरुजनों के पास जाकर शक्ति का रहस्य जान लो तथा कमर से कस कर इस कठिन मार्ग पर चल पडो ।''[२४]

वेदातील नारदीय सूक्त, पुरुषसूक्त आणि भगवद्गीतेतील विराटरूप दर्शन उल्लेखांतून सनातन धर्मराष्ट्राची निर्मिती व सारणीस्वरूप स्पष्ट होते. वेद हेच सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक धन आहे व त्यावरच सनातन राष्ट्र उभे आहे हे स्पष्टपणे निवेदित करताना पू. स्वामी गोविंददेव गिरि लिहितात– 'सामान्यतः हम सभी सांस्कृतिक, राष्ट्रीय, धार्मिक चिंतन करनेवाले लोग जिस विषय का चिंतन किये बिना अपने चिंतन का आरंभ नहीं कर सकते, ऐसा मूलगामी श्रेष्ठ धन है, 'वेद और वेदान्त' । हमारी भारतीय परंपरा वेदों पर आधारित है । ये वेद कितने प्राचीन हैं इसका कोई निश्चित प्रमाण आजतक उपलब्ध नहीं हुआ । डॉ. विन्टर निट्झ ने कहा कि No power on the earth can decide the date. वेद कितने प्राचीन हो सकते हैं, इसके बारेमें विद्वानोंके अनेक अनुमान हम लोगोंके समक्ष उपलब्ध हैं । लेकिन वे कितने प्राचीन हैं यह निश्चित रूपसे कहा नहीं जा सकता । फिर भी सभी विद्वान इस बातपर एकमत हैं कि यह विश्वका प्राचीनतम वाङ्मय है । सरस्वती की वीणा का प्रथम झंकार ऋग्वेद है । ऋग्वेदसे प्राचीन कोई साहित्य संसार में उपलब्ध नहीं होता ।'

' 'वेद' केवल हमारे राष्ट्र का ही नहीं, सारे संसारका अनमोल धन है । हमारे राष्ट्र के लिए ये तो परमात्मा की अलौकिक देन है ।'[२५] ते पुढे लिहितात– ''वेदोंके महान भाष्यकार सायणाचार्य महाराजने कहा, *'इष्टप्राप्ति अनिष्टपरिहारयोः अलौकिकम् उपायम् यो ग्रंथो वेदयति स वेदः ।'* इष्ट की प्राप्ति हो जाय और अनिष्ट का परिहार हो जाय ऐसा मार्गदर्शन हम लोगों को करनेवाले जो अत्यंत श्रेष्ठ ग्रंथ हैं, उनका नाम वेद है ।'[२६] ते आणखी लिहितात– 'वेद हमारे राष्ट्रीय चिंतनका आरंभबिंदू रहा और हमारी परंपराने माना कि यह वेदराशि अपौरुषेय है । इनका कोई निर्माता नहीं । अब इसका अर्थ भिन्न–भिन्न स्तरोंपर

भिन्न-भिन्न किया जा सकता है ।''[२७]

वेदान्तसाहित्याची महत्ता स्पष्ट करताना, राष्ट्र प्रचलनातील वेदान्ताचे महत्त्व सांगताना पू. स्वामी म्हणतात, 'हमारा यह वेदान्त-साहित्य संसार के समग्र साहित्यमें अनूठा साहित्य है । हमारे समस्त आचार्योंने इस वेदान्तको सर्वोच्च प्रामाणिक माना है । भगवान शंकराचार्यने वेदोंका भाष्य करते हुए वेदोंके कर्मकांडात्मक और उपासनाकाण्डात्मक भाग को गौण और वेदान्तके, उपनिषद भाग को ही श्रेष्ठत्व प्रदान किया है ।'

चतुर्विध पुरुषार्थ साधना हीच सनातन संस्कृतीची यशस्वी सारणी आहे. यासंदर्भात पू. स्वामी ग्वाही देतात, 'सांस्कृतिक विचार हमारी अनमोल धरोहर है ।', 'एक बात विशेष है, जो केवल और केवल भारतसे सबको सीखनी पडेगी और वह है, 'सांस्कृतिक विचार'। यह विचार ऐसा दिव्य है, जो भारत को कभी भी किसीसे लेनेकी आवश्यकता नहीं । Light has always come from the East यह भी नहीं । Light has always come from India. इस ज्ञान का प्रकाश सर्वदा भारतसे ही सर्वत्र पहुँचा है ।

भारत का यह सांस्कृतिक विचार, जिसका मूल वेदान्त में है, यह केवल एकमेवाद्वितीय विचार है । ऐसा विचार संसार में अन्यत्र नहीं मिलेगा । वैचारिक या सांस्कृतिक विचाररूप धन हमें कहींसे लेनेकी आवश्यकता नहीं है । जैसा कि मॅडम ॲनी बेझेंट कहा करती थी, 'अरे, भारतके पास सबकुछ है ।' लेकिन हम भारतीयोंने ही उसका मूलगामी चिंतन नहीं किया ।'[२९]

वैदिक दृष्टिकोनानुसार मानवी जीवनशैलीत निराशेला किंचितही स्थान नाही. भौतिक आणि आधिभौतिक दोन्ही स्तरांवर सतत पुरुषार्थपूर्ण जीवन जगण्याची ती प्रेरणा देते- 'सौ-सौ वर्षोंतक जीना चाहिए, दीर्घायुष्य हमें प्राप्त होना चाहिए, ऐसा कहा गया है । यह जीवन सामान्य जीवन हो ऐसा हमारे वैदिक ऋषियोंने नहीं माना । उन्होंने कहा, 'सौ वर्षोंतक जीएँ ।' लेकिन केवल जीएँ नहीं । 'जीवेम शरदः शतम् । नंदाम शरदः शतम् । मोदाम शरदः शतम् । अदीनाः स्याम शरदः शतम् । अजिताः शरदः शतम् । हम सौ वर्षोंतक उत्तम कर्मरत रहते हुए जीएँ ।'[३०] ईशावास्योपनिषदाचा संदर्भ देऊन पूजनीय स्वामी सूचित करतात, सनातन वैश्विक हिंदू राष्ट्रात चराचराला सामावून घेऊन पुरुषार्थपूर्ण, कल्याणपद, स्वाभाविक जीवनसारणी उल्लेखित आहे. म्हणूनच सनातन सारणीतून

वैश्विक आनंदमय हिंदू राष्ट्र या संघ-मनोवृत्तीचा बोध होतो. व्यष्टी ते समष्टी अशी या राष्ट्राची एकात्मिक कर्मसारणी मांडलेली दिसते. या राष्ट्र संकल्पनेचे पुनरुत्थान करणे आपल्याच हाती आहे, असे पू. स्वामी गोविंददेव गिरि स्पष्टपणे सांगतात.

## वर्तमानकाळात तथा समकाळात हिंदूराष्ट्र-विचार :-

सनातन हिंदूराष्ट्राच्या बाबतीतही इतिहासात विविध मते, विविध पंथ, विविध तऱ्हेच्या वर्तनप्रणाली आग्रहीपणे पुढे येऊन त्यांच्यानुसार निर्माण झालेली आग्रही कर्मकांडप्रणाली यांमुळे वैश्विक, एकात्मिक मानवी वृत्ती आणि सारणीची अनेक शकले झाल्यासारखी वाटली. मतामतांच्या, वृत्तिप्रवृतींच्या आग्रही अवलंबनाच्या ओघात, एकात्मिक वैश्विक प्रणालीमध्ये पृथगात्मता आहे असे वाटू लागले. देवकल्पना, त्यानुसार पंथ-संप्रदाय कल्पना, वेदान्ताच्या अनुषंगाने आलेली मतांतरे, आरोप-प्रत्यारोप यांतून वितंड निर्माण झाले. त्यातच राजसत्ता कल्पनेने वैश्विक एकात्म जाणिवेला तडे गेले. असे झाले असले तरी, *'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति'* याचे भान मात्र सुटले नाही. देवाविषयीची द्वंद्वे, प्रणालीविषयीचीही द्वंद्वे यात प्रामुख्याने अंधविश्वास, पराकोटीची स्वार्थपरता आणि वर्चस्वासाठीचा लढा यांनी तत्त्वज्ञानाला अडगळीत फेकून देण्यापर्यंत मजल गेली; असे असले तरी वेदान्तप्रणीत वैश्विक स्तरावरील मानवतेचा विचार लोप पावला नाही. अनेक द्रष्ट्या विचारवंतांनी सनातन धर्मावरील आघातांचे पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे सनातन धर्माचा ऱ्हास होणे आणि नव्या-नव्या तत्त्वज्ञानाला आणि त्यानुसारच्या धर्मप्रणालींना महत्त्व येणे हा मानवी जीवनाच्या प्रारंभापासूनचाच इतिहास आहे. विशिष्ट पोथीनिष्ठा आली की समावेशक समत्व-दृष्टीवर आघात होतोच. जीवनशैलीत रूढी-परंपरांना अंधविश्वासाने, कर्मठपणाने किंवा पोथीनिष्ठेने अतिरिक्त महत्त्व आले की हे घडणारच. यामुळेच विश्वाच्या इतिहासामध्ये सनातन धर्माचे आधारभूत वेदान्त तत्त्वज्ञान, रूढिग्रस्तता आणि कर्मठपणा यांच्या आक्रमणाने बाधित झाले. स्वार्थपर कर्मठपणालाच धर्म ही संज्ञा प्राप्त झाली. जगाच्या पाठीवर जे अनेक धर्मग्रंथ व त्यानुसार काटेकोर धर्मप्रणाली अस्तित्वात आल्या; त्यामुळे सनातन, वैश्विक एकात्मभावना जपणाऱ्या हिंदू संस्कृतीला अर्थात भारतीय संस्कृतीला वैश्विक कल्याणासाठी, पुनरुत्थानासाठी

सज्ज व्हावेच लागले. तसे घडले म्हणूनच वेदान्तप्रणीत सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांवर आधारित, चराचरात परमेश्वराचा अनुभव घेणारी मानवी जीवनशैली आजही अस्तित्वात आहे. त्या जीवनशैलीत संपूर्ण विश्वाला कवेत घेण्याची कुवत आजही त्या तत्त्वज्ञानातून मानवी मनात जागविता येते याचा अनुभव अनेक साधक, सिद्ध, परमहंसपदाला पोहोचलेले योगी घेत आहेत व इतरांना अनुभूत करीत आहेत.

या प्रवासात राष्ट्र ही कल्पना राज्य, भूप्रदेश आणि पोथीनिष्ठ धर्मकल्पना यामध्ये अडकलेली दिसते. परिणामतः मुस्लिम राष्ट्रे, ख्रिश्चन राष्ट्रे असे शब्दप्रयोग प्रचलित झाले, वस्तुतः अशा सर्व मतप्रणालींना विश्वबंधुत्वाच्या स्वाभाविक वृत्तीने आपल्यात समाविष्ट करून घेण्याची क्षमता केवळ हिंदू तत्त्वज्ञान अर्थात वेदान्तात असल्याची ग्वाही अनेक विचारवंत, तत्त्वज्ञ यांनी तटस्थ भूमिकेने दिलेली दिसते.

पुन्हा एकदा सनातन, विश्वात्मक, मानवतावादी जीवनप्रणाली अस्तित्वात आणून 'वसुधैव कुटुंबकम्'चा अनुभव घेणे पृथ्वीवरील भौतिक, विज्ञानात्मक प्रगती आणि एकात्मिक जीवन या दृष्टीने अपरिहार्य आहे. हे जाणवल्यामुळे वेदान्त तत्त्वज्ञानाची जन्मभूमी म्हणता येईल अशा भारत, हिंदुस्थान, जंबुद्वीप या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भूमीशी संबंधित, वेदान्त तत्त्वज्ञानावर आधारित जीवनप्रणाली अवलंबिणाऱ्या या भूप्रदेशास मातृभूमी मानणाऱ्या मानवांचे हिंदूराष्ट्र म्हणून उभे होणे आवश्यक आहे. तसेच ते जगाच्या कल्याणासाठी आवश्यकही आहे; हे लक्षात घेऊन समकालात हिंदू राष्ट्राची संकल्पना मांडण्याची परंपरा गत शंभर वर्षांत प्रकटलेली दिसते.

## प.पू. गोविंददेव गिरिंना प्रभावित करणारा समकालातील हिंदूराष्ट्र विचारस्त्रोत :–

प.पू. स्वामींनी पुणे येथे ११ सप्टेंबर १९८४ रोजी 'विश्वबंधुत्व' या विषयावर व्याख्यान दिले होते. स्वामी विवेकानंद यांचा विश्वबंधुत्वाचा विचार स्वामीजींना प्रभावित करणारा ठरला.

**'रुचीनां वैचित्र्यात्, ऋजुकुटिल नाना पथजुषाम् ।**
**नृणामेको गम्यः, त्वमसि पयसाम् अर्णव इव ।।'**

हा श्लोक उद्‌धृत करून, या श्लोकातून स्वामींनी सर्व धर्मांची उपयुक्तता ईश्वराप्रत

जाण्यास कशी उपयुक्त आहे हे सांगून भारतीयांना विश्वबंधुत्व स्थायी भावाच्या स्वरूपात प्रचलित आहे, हे स्पष्ट केले. वेदाची झेप विश्वमानुषाकडे कशी आहे, हे स्पष्ट करून स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या रूपाने ११ सप्टेंबर १८९३ मध्ये मंगलमय क्रांतीचा आरंभ कसा झाला, हे स्पष्ट केले. ते म्हणतात–

'११ सितंबर १८९३ के दिन देश की बहुत बडी क्रांति का प्रारंभ हुआ । मुझे कभी–कभी लगता है कि संभव है, १९९३ को यह क्रांति अपने पूर्णत्व को प्राप्त करेगी । यह भावुक आशावाद भी हो सकता है । परंतु महत्त्वपूर्ण बात यह है कि इस क्रांति का शुभारंभ मुठ्ठीभर लोगोंने किया और उनका मार्गदर्शन स्वयं श्रीरामकृष्णने किया । इस प्रकार के छोटे समूह का निर्माण कर पाना, इस प्रकारके साधकोंका संघ निर्माण कर पाना तथा इस प्रकारकी साधना करके अपना जीवन उस श्रेष्ठत्त्व तक पहुँचाना अत्यंत आवश्यक कार्य है।'[३१] स्वामी विवेकानंदांनी या विश्वबंधुत्व विचाराने हिंदू राष्ट्राची कल्पना जोरदारपणे मांडली.

या शतकात वि. दा. सावरकरांचे 'हिंदुत्व म्हणजे काय' यावर अतिशय सुंदर पुस्तक प्रकाशित झाले होते. विवेकानंदांसारख्या अनेक विचारवंतांनी, हिंदू विचारवंतांनी हिंदू राष्ट्राची कल्पना जोरदारपणे मांडली होती. डॉ. हेडगेवारांनी या कल्पनेला मूर्त स्वरूप दिले. या वेळी डॉ. हेडगेवार हिंदू समाजाच्या शिकवणीवर व राष्ट्राच्या हलाखीच्या परिस्थितीवर विचार करीत होते. आपला इतिहास, सांस्कृतिक वारसा व सद्यस्थितीविषयी मनोमन चिंतन करीत होते. खोल विचारान्ती, स्वतः त्यांना काय हवे आहे आणि ते प्रत्यक्षात कसे आणता येईल, याविषयी स्पष्ट कल्पना त्यांच्या मनात आली व त्यातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची बीजे पेरली गेली.

'संघाची स्थापना' हाच एकुलता एक मार्ग आहे, या त्यांच्या घोषणेतून हिंदू समाज व राष्ट्राची हलाखीची परिस्थिती यावर डॉ. हेडगेवार यांनी केलेल्या खोल व अर्थपूर्ण विश्लेषणाचा गाभा ध्यानात येईल. हिंदूंच्या एकतेचे सांघिक व परिणामकारक शक्तीचे प्रतीक म्हणजे 'संघ', अशी सांघिक हिंदूशक्ती ही गरज आहे; एवढेच नाही तर राष्ट्र ज्या रोगांनी पछाडले गेले आहे त्या रोगांवरील हा उपायही आहे.

दुसरे त्यांच्या असे लक्षात आले की, आपल्या देशाचे भवितव्य हिंदूंच्या हातातच सुरक्षित राहू शकेल. तेच या देशाच्या भविष्याचे शिल्पकार आहेत.

जेव्हा-जेव्हा हिंदू आत्मविश्वासाने एकत्र आला, तेव्हा तेव्हा आपल्या देशाने सत्ता व महानता मिळविली होती, अशी ग्वाही इतिहास देतो. एवढेच नाही तर त्या काळात आपल्या संस्कृतीची शिखरे उंचावली होती. देशाला जर गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करून, त्याला प्राचीन महानतेच्या शिखरावर न्यायचे असेल तर हिंदूंच्यात एकता, देशप्रेम निर्माण झाले पाहिजे याची त्यांनी खूणगाठ बांधली.'[३२]

स्वामी विवेकानंदांचे हिंदू-राष्ट्रवादाला पोषक विचार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून मूर्त रूपात अवतरत होते. 'भारतात्मा विवेकानंद' असे संबोधून, 'वेदान्त और पुरुषार्थ' या ग्रंथात पू.स्वामी गोविंददेव गिरि म्हणतात- 'इसीलिए यदि हम वास्तव में उनके उपदेशोंके अनुगामी हैं, तो हमारे जीवनमें भी भारतमाता की भक्ति भर जानी चाहिए । भारतमाता की भक्ति करनेवाले लोगोंको अकेले न रहकर साथ में मिलकर चलना चाहिए । *'सं गच्छध्वं । संवदध्वं ।'* इस प्रकार का एक संपूर्ण समूह भारतमाता की भक्ति करता हुआ चलता रहे ।'[३३]

स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद आणि बालवयापासून प्रभावित करणारे रा.स्व. संघविचार यामुळे पू. गोविंददेव गिरि यांच्या ठायी सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोग-विचार स्पष्टपणे दृढावला. त्यांच्या सततच्या अभ्यासात, व्यासंगात या विचाराला वैदिक काळापासून वर्तमानापर्यंतचे महामानवांचे विचार व आचारात्मक संदर्भ पुष्ट करत राहिले आहेत. विश्वकल्याणाचा अपरिहार्य एकमेव मार्ग म्हणजे भारतीय हिंदूराष्ट्रवाद होय, असे त्यांचे मत बनले. हा भारतीय राष्ट्रवाद अर्थात भारतीय हिंदूराष्ट्रयोगदेखील सनातनातून अढळ श्रद्धापूर्णतेने व भौतिक व आधिभौतिक कसोट्यांवर प्रकटला आहे हेही त्यांच्या विभूतिमत्त्वातून सूचित होते.

## सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचार - ऐतिहासिक अवलोकन :-

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।७।।**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।८।।**

(भगवद्‌गीता अध्याय ४ था)

या भगवद्‌गीतेतील भगवान श्रीकृष्णांच्या आश्वासनाचा अर्थ स्वामीजींनी

अभ्यासिला होता. यातील सनातन संघर्ष व सनातन संघर्षावर मात करून, देदीप्यमान सनातन हिंदू-धर्मराष्ट्र उभे करण्याचा योग पू. स्वामींनी 'पूर्णयोगबोधिनी गीता' अर्थात भगवद्‌गीतेच्या परिशीलनाने आत्मसात केला होता. हा संघर्ष, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज म्हणतात त्याप्रमाणे सात्त्विकता विरुद्ध असात्त्विकता अर्थात स्वार्थपरता; आसुरी संपत्ती विरुद्ध दैवी संपत्ती यातील होता. मानवाचे अलौकिकत्व हे त्याच्या सात्त्विक संवेदनेत अर्थात सर्वाभूती परमेश्वर पाहण्यात म्हणजे सत्य, प्रेम, करुणापूर्ण वागण्यात आहे हे त्यांना इतिहासाचा मागोवा घेताना स्पष्टपणे जाणवत होते. सुर-असुर संघर्ष येथपासून हा लढा सुरूच आहे. या लढ्यात सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगाचा विजय होणे तेवढेच अपरिहार्य आहे हेही स्वामींना अवगत झाले. या हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचाराची एक प्रकारे साक्षात जाहीर व शाश्वत घोषणा दिव्यचक्षुप्राप्त संजयांनी अंध धृतराष्ट्र महाराजांपुढे केली-

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिमम ।।७८।।**

(भगवद्‌गीता अध्याय १८ वा)

योगेश्वर श्रीकृष्ण अर्थात वेदान्त आणि धनुर्धारी पार्थ अर्थात पुरुषार्थ, अर्थात वेदान्त तत्त्वज्ञानानुसार जीवनप्रणाली अवलंबिणारे जेथे असतील तेथे सर्व प्रकारची सुबत्ता, भाग्य आणि जीवनसाफल्य अर्थात भौतिक अभ्युदय आणि पारलौकिक शांती मिळतेच. या घोषणेचा अर्थ असा, सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोग सिद्ध झाला तर विश्वकल्याण निश्चित आहे. भारतभूमीत असे धर्मराष्ट्र-जागरण करणारे अनेक महात्मा आरंभबिंदूपासून हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी प्रकट होत आहेत. भारतमातेच्या सर्व संतानांनी त्यांच्यातील अद्वैतप्रणीत सत्य, प्रेम, करुणेचा जागर करून पुरुषार्थपूर्णतेने हे राष्ट्र परमवैभवाला न्यावे, ही हिंदूधर्म-राष्ट्रयोगाची साधना करावी असे पू. स्वामींना वाटते.

ही साधना प्रभु रामचंद्रांनी केली, असे प्रतिपादन रामकथा सांगताना, नेहमीच पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या कथनातून प्रभावीपणे प्रकटते. सुनील चिंचोलकर लिहितात- 'समाजपरिवर्तनाची आत्यंतिक तळमळ व मातृभूमीविषयीचे प्रामाणिक प्रेम त्यांच्या शब्दा-शब्दातून प्रकट होत होते.'[३४] स्वामीजींच्या रामकथा निरूपणातील विचारधन उल्लेखित करीत श्री. सुनील चिंचोलकर शब्दांकित करतात- 'महर्षि वाल्मिकींची ही रामकथा केवळ आध्यात्मिक कथा नाही किंवा

कौटुंबिक कथा नाही. आपल्या संपूर्ण संस्कृतीचं ते अत्यंत महत्त्वाचं संचित आहे. अगदी वैज्ञानिक पद्धतीनं यंत्राचा वापर करून, सेतूबंधन झालं आहे. आता विटांवर वीटभट्टीचा शिक्का असावा, तसं वानरांनी दगडांवर राम, राम लिहिलं असेल. हल्ली कोणतीही वस्तू खरेदी केली की त्यावर चिन्ह असतं, तसं श्रीराम हे चिन्ह आहे.'[३५]

पू. स्वामी, 'महाभारत हा विजयप्राप्तीचा ग्रंथ आहे' असे सांगून योगेश्वर कृष्ण यांनी भारतीय सांस्कृतिक राष्ट्रउभारणीसाठी संघर्षाचे आवाहन केले आहे, असे म्हणतात. ते संत गुलाबराव महाराज यांचा अभिप्राय नोंदविताना लिहितात– 'संत गुलाबराव महाराज म्हणत की, भारतीय संस्कृतीचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ 'महाभारत' हा आहे. भगवद्गीतेचा अंतर्भाव असलेला महाभारत हाच सर्वात प्रधान ग्रंथ आहे असं जेव्हा गुलाबराव महाराज म्हणतात, तेव्हा त्याला मोठा अर्थ आहे. या भारतीय संस्कृतीच्या सर्वात मोठ्या गणल्या गेलेल्या ग्रंथाचा मुख्य विषय काय? कशाकरिता हा ग्रंथ आहे? या ग्रंथाच्या श्रवणानं, चिंतनानं, वाचनानं आणि हा ग्रंथ घरात ठेवल्यानं काय प्राप्त होणार? अन्य ग्रंथांच्या फलश्रुती वेगवेगळ्या आहेत. भारतीय संस्कृतीचा एकमेव प्रातिनिधिक ग्रंथ कुठला असेल तर तो महाभारत असल्यामुळे मी महाभारताचीच फलश्रुती सांगतो. महाभारतामध्ये चक्क लिहिले आहे, *'भारतम् भवने यस्य तस्य हस्तगतो जयः ।'* ज्याच्या घरात महाभारत असेल तो जिथे जाईल तिथे विजय प्राप्त करेल.'[३६]

सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचारात, श्री संत गुलाबराव महाराज म्हणतात त्याप्रमाणे सात्त्विकतेला सर्वाधिक महत्त्व आहे. सत्य, प्रेम, करुणा या संवेदना अद्वैताचा आविष्कार असतात. त्या प्रत्येकाच्या ठायी प्रकटण्यासाठी सात्त्विक मनोवृत्ती अभ्यासणे आवश्यक असते. 'योगवासिष्ठ' या ग्रंथावरील प्रवचने करताना, पुरुषार्थ संपादण्यासंदर्भात पू. स्वामी सांगतात– 'ऋषींनी साधकांसाठी दिलेल्या 'दहा आज्ञा' अशा– १) सात्त्विक शास्त्र-वाचन, २) सात्त्विक अन्न-जल सेवन, ३) सात्त्विक संगती, ४) सात्त्विक स्थान, ५) सात्त्विक काळात जागं होणं, ६) सात्त्विक वातावरण, ७) सात्त्विक संस्कार, ८) सात्त्विक मंत्र (दीक्षा), ९) सात्त्विक ध्यान, १०) सात्त्विक दृढ निश्चय (पुनः पुनः साधना)[३७]

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे परात्पर गुरू, जगद्गुरू श्रीमत् शंकराचार्य

यांनी, सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगविचार वैश्विक भावनेने सनातन धर्म राष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी; ज्या भूमीत वेदान्त तत्त्वज्ञान प्रकटले त्या भूमीला धर्मराष्ट्र म्हणून भक्कम पायावर उभे करण्यासाठी हिंदू–राष्ट्रयोगविचार केला. हिंदूराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी समर्पित असलेले पं. दीनदयाळ उपाध्याय, यांनी जगद्‌गुरू श्रीमत् शंकराचार्य यांचे चरित्र लिहिताना, श्रीमत् शंकराचार्य आणि मंडनमिश्र यांचा बोलका संवाद उद्‌धृत केला आहे. त्यातील अंश श्री. लक्ष्मण टोपले–अनुवादित पुस्तकात पुढे दिला आहे–

'आधिभौतिक शक्तीला जेव्हा आधिदैविक भावनांचे पुट चढविले जाते तेव्हाच आध्यात्मिक दृष्टी उत्पन्न होते. हाच यज्ञ आहे. आमच्याजवळ जे काही आहे, आम्ही जे काही करतो ते, आपल्या जीवनोपभोगासाठी नसून मानवी आदर्शाच्या प्राप्तीसाठी करीत असतो; हीच यज्ञीय भावना आहे. जगात जे काही सत्यं, शिवं, सुंदरम्, ते सर्व भगवंतांचाच आविष्कार आहे. जीवनातील कर्म त्याला समर्पित करणे, हा यज्ञच आहे मिश्र प्रवर!'[३८]

'भागवत विहंगम दर्शन'[३९] या पुस्तकात भागवतातील भारतवर्षाच्या गौरवाकडे स्वामी लक्ष वेधतात. भारतवर्षाच्या माहात्म्याचे सुंदर गुणगान स्वर्गातील देव करतात–

**'अहो अमीषां किमकारि शोभनं प्रसन्न एषां स्विदुत वयं हरिः ।**
**यैर्जन्म लब्धं नृषु भारताजिरे मुकुन्दसेवौपयिकं स्पृहा हि नः ।।'**

श्री भरतभूमी कर्मभूमी व मोक्षभूमी असल्यामुळे सर्व दृष्टींनी श्रेष्ठ आहे. पू. स्वामींच्या मते, या सुंदर श्लोकातील काही भाग तरी विद्यालयातून शिकविला जावा. त्याने भारताच्या आध्यात्मिक राष्ट्रवादाचे नेमके बीजारोपण बालमनात होण्यास मोठा आधार लाभेल. भागवतात विश्वबंधुत्वाची प्रेरणा ओतप्रोत आहे. त्यातील प्रार्थना दुष्टांची बुद्धी शुद्ध होऊन सर्व प्राण्यांमध्ये परस्पर सद्‌भावना नांदो, असे शिकविते. हे प्रभो! अखिल विश्वाचे कल्याण होवो! अशी प्रार्थना केली जाते; याकडेही पू. स्वामींनी लक्ष वेधले आहे.

पू. स्वामींचा मध्ययुगीन संतवाङ्मयाचा विशेष व्यासंग आहे. उत्तरेतील संत आणि महाराष्ट्रातील संत सतत त्यांच्या वाणीतून प्रकटतात. संतवाङ्मयाच्या बाबतीत आणि प्रबोधनाच्या बाबतीत संत नेहमी भक्तिसाधनेतून ज्ञान आणि वैराग्यप्राप्तीविषयी बोलत असतात. जीवनमुक्ती हे त्यांचे ध्येय आहे, असे प्रतिपादित

केले जाते. मात्र पू. स्वामी संतांच्या वचनांतून घडणाऱ्या विश्वव्यापकतेच्या अनुभूतीविषयी तसेच संतांनी निवेदिलेल्या, भौतिक अभ्युदयाविषयीच्या आणि मनःशांतीच्या विचाराकडे लक्ष वेधतात.

प्रेम हा संतांचा स्थायी भाव विश्वव्यापकाकडे लक्ष वेधतो. त्या दृष्टीने स्वामींना प्रभावित करणाऱ्या गुलाबराव महाराजांचे उदाहरण देत; ज्ञानेश्वरकन्या गुलाबराव महाराज ज्ञानोत्तर भक्ती अनुसरताना सर्वसमावेशकतेचा आणि समन्वय-विचाराचा संदर्भ देऊन; ज्ञानेश्वरांच्या प्रेरणेने संत गुलाबराव महाराज भौतिक अभ्युदय आणि पारमार्थिक शांती या दोहोंचा अनुबंध, धर्मविचारात व पर्यायाने हिंदूराष्ट्र-विचारात मांडलेला दिसतो; असे सूचित करतात. संत ज्ञानेश्वर यांनी पसायदानातून विश्वात्मक देवाला प्रार्थनापूर्वक, दृष्टादृष्टांचा उद्धार करण्याची केलेली विनंती, हा सनातन हिंदूराष्ट्रयोग-विचारातील वसुधैव कुटुंबकम्‌चा विचार आग्रहीपणे मांडणारी उक्ती होय.

संत ज्ञानेश्वर, *'हे विश्वचि माझे घर'* असे सांगत श्रीमद् भगवद्‌गीतेवर भाष्य करून एक प्रकारे हिंदू धर्मराष्ट्राचे जागरण करतात. संत ज्ञानेश्वर हे भगवान श्रीकृष्ण, श्रीमत् शंकराचार्य यांच्या मालिकेतील सर्वसमावेशक, एकात्मिक राष्ट्रजागरणाचे मध्ययुगातील मूळ स्तंभ ठरतात - ऋषिमुनींनी ज्याप्रमाणे ज्ञानात्मक कर्म आणि ज्ञानविज्ञानाची सांगड घातली जाते तशी अध्यात्माचा चराचराशी असलेला स्वरूपसंबंध स्पष्ट करून वैश्विक भूमिका, अंतस्रोतात्मकतेने सांभाळणारा हिंदू राष्ट्रधर्मच माउलीच्या ममतेने सर्वांठायी जागविला आहे. नामदेवांसह सर्व जातिपंथातल्या संतांची प्रभावळ ज्ञानदेवांभोवती त्यांच्याच प्रेरणेतून निर्माण झाली असे आपण पाहतो.

अनेक व्याख्यानांमधून संत ज्ञानेश्वरांची पायाभूत महत्ता स्वामींनी परोपरीने विदित केलेली दिसते. संत एकनाथ यांनी रामायण आणि भागवताच्या आश्रयाने सामाजिक समरसतेचा आणि सत्य, प्रेम, करुणाधिष्ठित वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष वर्तनातून अनुभव घडविला. संत तुकाराम महाराज हे तर शिवछत्रपतींचे राजगुरू म्हणता येतील. सामाजिक समरसतेतून आणि चराचराविषयी प्रेममयतेतून, विश्वात्मक साफल्य साधण्यासाठी, ज्ञानोत्तर कर्म अनुसरले पाहिजे; हे प्रबोधनातून स्पष्ट करतात. श्री संत तुकोबाराय *'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा'* किंवा *'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषि । साच भावे*

*वर्तीया ।'* असा भौतिक आणि आध्यात्मिक अभ्युदयासाठी कर्म करण्याचा ध्यास घेऊन एकात्मिक, वैश्विक सनातन राष्ट्रनिर्मितीचा आग्रह धरतात. त्यांच्या या उद्‌बोधनातूनच शिवछत्रपतींच्या हातून हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार झाले, याकडे पू. स्वामींची दृष्टी जाते. चराचरात परमेश्वर अनुभवण्याची दृष्टी तुकारामांनी राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी दिली; म्हणून ते भागवत धर्माचा कळस ठरले. *'विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।। कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।।'*, असे तुकाराम महाराज यासाठीच म्हणतात.

पू. स्वामी गोविंददेव गिरि, समर्थ रामदास स्वामींचा उल्लेख राष्ट्रगुरू म्हणूनच करतात. ते लिहितात– 'एकूण समर्थांच्या जीवन व कार्याच्या सर्व पैलूंचा सखोल विचार केल्यास 'राष्ट्रगुरू' या संज्ञेखेरीज अन्य कोणतेही विशेषण त्यांच्या आकाशासारख्या व्यापक, हिमालयासारख्या सुदृढ व्यक्तिमत्त्वास अभिव्यक्त करण्यास पुरत नाही असे जाणवते. श्री समर्थांनी केलेले कार्य व मार्गदर्शन स्थल–कालाच्या या सर्व सीमा ओलांडून पुढे जाणारे आहे. श्री शिवछत्रपतींच्या कार्यास अनुकूल अशा महाराष्ट्र–धर्माचे जागरण त्यांनी केले व सक्रिय भक्तीचा वन्ही चेतवून समाज घडविला आणि स्वधर्म–स्वदेशासाठी आत्मविश्वासाने उभा केला. म्हणून स्वा. सावरकरांनी जोसेफ मॅझिनीला इटलीचा रामदास व समर्थांना महाराष्ट्राचा मॅझिनी म्हटले आहे व ते अत्यंत औचित्यपूर्ण आहे. तरीही यापुढे जाऊन असे म्हणावेसे वाटते की, कोणतेही राष्ट्र घडवायचे असल्यास, त्या राष्ट्रातील सामान्य व्यक्तीला, राज्यातील सर्व संस्थांना, विविध स्तरांवरील नेत्यांना आणि राजाला व राजगुरूंनाही जे ऐहिक व पारमार्थिक मार्गदर्शन नेहमीच आवश्यक असेल, ते सर्व समर्थांच्या कार्यात व साहित्यात उपलब्ध होते. इतिहासातील अन्य कोणाही विभूतीच्या जीवनकार्यात ते दिसत नाही. म्हणून ते खरोखरच भाग्यवान, ज्यांनी या राष्ट्रगुरूच्या मार्गदर्शनाने स्वतःचे व समाजाचे जीवन धन्य केले. या थोर विभूतीचे कृतज्ञतेने स्मरण करताना म्हणावेसे वाटते–

**तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हा घडो**
**त्वदीय गुणकीर्तनध्वनि सदैव कर्णी पडो ।**
**स्वधर्महितचिंतनाविण दुजी कथा नावडो**
**तुझ्यासमचि आमुची तनुहि देवकार्यी पडो ।।**'[४०]

पू. स्वामी छत्रपती शिवरायांना सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगाचे आदर्श

मानतात. त्याचबरोबर शिवराय आणि समर्थ रामदास यांचे विभूतिमत्त्वातले अद्वैत अधोरेखित करतात. श्रीराम, योगेश्वर श्रीकृष्ण आणि शिवसमर्थ हे सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोगाच्या दृष्टीने प्रातःस्मरणीय आहे, असे त्यांना वाटते. ते म्हणतात– 'मी तत्त्वज्ञान विद्यापीठात शिकत असताना माझ्यापुरता एक श्लोक तयार करून लिहून ठेवलेला होता–

**चरितं रघुनाथस्य, शास्त्रं योगेश्वरस्य च ।**
**कार्यं शिवसमर्थस्य प्रत्यूषे प्रत्यहं स्मरेत् ।।**

या तीन गोष्टींचं रोज सकाळी स्मरण करावं. हा श्लोक मीच केलेला आहे. इकडचं-तिकडचं करून; पण तो माझ्या स्मरणाकरिता केला.'[४१]

शिवरायांच्या कार्याविषयी, पू. स्वामी लिहितात– 'या शिवबानं सर्वात पहिल्यांदा या देशाचा आत्मविश्वास जागविला. या देशाला हे शिकविलं की, अरे, आपण उठू शकतो! आपण उभं राहू शकतो, आपण प्रतिकार करू शकतो, आपण गर्जून सांगू शकतो आणि ताठ मानेनं चालू शकतो. आपण आपली कापली जाणारी गाय वाचवू शकतो; आपण माता-बहिणींची अब्रू वाचवू शकतो; सिंहासनावर बसू शकतो आणि या पाप्यांना शासनही करू शकतो. हे सगळं या देशामध्ये निर्माण करणारा एकमात्र वीरपुरुष जन्माला आला तो या महाराष्ट्र भूमीचं लेणं होता, तो शिवबा!' 'मनुष्याचा हा आत्मविश्वास जागृत होणं आणि राष्ट्राचा हा आत्मविश्वास जागृत होणं आवश्यक! The social mind must be changed छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांत महत्त्वाचं काम केलं ते म्हणजे, सामाजिक मन बदललं.'[४२] ते पुढे लिहितात– 'तो फार महान मंत्र होता, हे राज्य एका व्यक्तीचं नाही, एका परिवाराचं नाही. हे शंभू महादेवाचं राज्य आहे. हे भारतमातेचं राज्य आहे. हे स्वधर्माचं राज्य आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रत्येक मावळा लढत होता, पेटला होता, तो या भूमिकेतून की, मी एका व्यक्तीकरता लढत नाही, मी तत्त्वाकरता लढतोय, मी स्वधर्माकरिता लढतोय, मी संपूर्ण राष्ट्राकरिता लढतोय!' 'दोनच जाती - एक राष्ट्रप्रेमी लोकांची आणि दुसरी राष्ट्रद्रोही लोकांची, अशा प्रकारचं सरळ-सरळ विभाजन छत्रपती शिवाजी महाराजांनी करून दाखवलं. हे विभाजन फार महत्त्वाचं. ही दृष्टी फार महत्त्वाची आहे.'[४३]

पू. स्वामींचा सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचार, हा वेदापासून ते राम

दासांपर्यंतच्या वाङ्मयातून, तसेच वीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि स्वामी विवेकानंद तसेच संत गुलाबराव महाराज यांच्या विचारांच्या परिशीलनातून सिद्ध झाला आहे.

## पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचाराचा गर्भितार्थ :-

सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचाराचा गर्भितार्थ समजून घेताना स्वामी गोविंददेव गिरि यांच्या 'योगवासिष्ठ प्रवचने' या ग्रंथातील वसिष्ठांनी श्रीरामास केलेल्या प्रबोधाकडे लक्ष वेधावेसे वाटते - 'रामा, तूच सीता आहेस, ती तर तुझी शक्तीच! 'जरा स्वरूपाचं स्मरण' कर. तू विष्णू तर ही लक्ष्मी! तूच लक्ष्मण, भरत, किंबहुना प्रजाजन रूपात आहेस! एकात्मतेचा विविधतेनं आस्वाद घेण्यासाठीच, तू या सर्व रूपांनी नटला आहेस. प्रीतीचा आस्वाद किती भाव-भावनांच्या कोमल नि तीव्र छटांनी घेता येतो, हे सांगता येत नाही! प्रीती अनंत रूपांत प्रकट होते. तुम्हा सर्व कुटुंबीयांची, किंबहुना राजा-प्रजेचीही एकात्मता जीवनाच्या असंख्य कर्मांतून प्रकट व्हावी! होईलही!' 'तू स्वरूपावर (आत्मज्ञानावर) स्थिर झालास नि सारी तुझीच रूपं, अशी दृढ भावना असली तर 'कर्म' हे त्या ज्ञानाचं मूर्त रूप होईल. ज्ञान, प्रीती, आनंद, कर्मातून साकार होतील! प्रीतीच्या आस्वादनाचा कधीही कंटाळा येत नाही! निराश होण्याचं काय कारण आहे? जीवाचा अर्थ, परमात्मतत्त्वाच्या एकात्मतेचा विविध कर्मातून आस्वाद घेणं आहे! तू, लक्ष्मण, भरत, प्रजाजन सारी 'अद्वैताच्या अधिष्ठानावर' भावमधुरतेचा आस्वाद घेऊ शकता! असं केलं तरच 'एकाकी न रमते' याला अर्थ येईल! नाहीतर तू एकटाच एकटा परब्रह्मरूपात होतासच की!'[४४]

या संदर्भातील तात्त्विक चर्चा पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या 'यज्ञमय जीवन' या ग्रंथातील 'तेजस्वी समग्र जीवन' या मथळ्याखाली आणि त्याच ग्रंथात 'अभ्युदयो को प्राथमिकता' या मथळ्याखाली केली आहे. - 'वैदिक ऋषियोंको तो समग्र जीवनधारणा मान्य है ।' *'जीवेम शरदः शतम् । पश्येम शरदः शतम् । नन्दाम शरदः शतम् । मोदाम शरदः शतम् । अजिताः स्याम शरदः शतम् । अदीनाः स्याम शरदः शतम् ।'* यह वैदिक ऋषियोंकी मूल धारणा है । हम सौ-सौ वर्षोंतक सुदृढ देह के साथ जीयेंगे । हमारे पुत्र-पौत्रादिक उत्तम होने चाहिए और अदीनाः - हम किसीके सामने लाचार जीवन नहीं जीये । मैं, उत्तम एक आत्मविश्वाससंपन्न

जीवन जीऊँ और ऐसा जीवन जीऊँ कि कोई मुझे जीवनमें पराभूत न कर पाये । ऐसा एक राष्ट्र के लिए अत्यंत विजिगीषु सन्देश, हमारे वेदोंने दिया है । अनेक बार ऐसा लगता है कि हम इन वेदोंके अभ्युदय के सन्देश को भूल करके केवल मोक्षका विचार करते रहे । केवल निःश्रेयस का विचार करते रहे और वह भी विचार करते रहे कि नहीं रहे, पता नहीं; किन्तु इस विचार की बात करते रहे । इसीलिए स्वामी विवेकानंद कहा करते थे कि मेरा देश एक ऐसी तमिस्रामें डूबा हुआ है कि वह बात तो करता है मोक्षकी, लेकिन डूबा है तमोगुण में । निष्क्रिय हो करके बैठा है और इसीलिए मुझे इस देशको एक बार हिलाना है । इसे तमोगुण से बाहर निकालकर, इसे रजोगुण में लाना है क्योंकि मैं इस देशको समुन्नत करना चाहता हूँ । यदि इस देश को समुन्नत करने की कामना हों, तो वेदों जैसा कोई भी अत्यन्त श्रेष्ठ आधार हम लोगों को उपलब्ध नहीं है । क्योंकि वेदोंने एक ऐसा जीवनसन्देश हम लोगों को दिया, पुरुषार्थसंपन्न जीवन-सन्देश दिया, जहाँ पर पराभव की बात नहीं, दैन्य की बात नहीं, पलायन की बात नहीं, गरीबी की बात नहीं । वेदोंने सर्वदा समृद्धि की आराधना की । वेदोंने सर्वदा ज्ञान की आराधना कही । वेदोंने सर्वदा हमारे सामने विजय की आकांक्षा रखी । ऐसा भी आप देखेंगे कि एक जीत का, विजय का सन्देश हम सर्वत्र वेदोंमें देखते हैं और इस विजय के लिए क्या-क्या करना चाहिए, उसके समस्त सूत्र हमें वैदिक वाङ्मय में मिलते हैं ।'[४५]

'आज वाल्मीकि रामायण में प्रतिपादित अयोध्या की सर्वोच्च स्थिति का वर्णन देखियेगा । इस प्रकार अतिसुन्दर, संपन्न, सुदृढ राष्ट्र समाज खडा हो जाना, यह तभी होता है, जब ये दोनों बाते साथ मिलती हैं और तभी धर्म का साकार रूप हम देखते हैं । *'यतः अभ्युदय निःश्रेयससिद्धिः सः धर्मः'* । अभ्युदय और निःश्रेयस इन दोनो बातों को मिलाकर धर्म पूर्ण होता है ।' 'समृद्धि और शांति इन दोनो बातों को मिलाकर समाज प्रयास करता है तब राम-राज्य साकार होता है, जहाँ पर आन्तरिक दृष्टि से सब लोग शान्त है, अपराध करने की भावना किसी के अंतःकरण में जागृत होती नहीं ।

**'न राज्यं न च राजाऽसीत् न दण्डो न च दाण्डिकः ।**
**धर्मेणैव प्रजास्तावत् रक्षन्ति स्म परस्परम् ।'**

संपूर्ण प्रजा धर्म का पालन करते हुए, अपने भीतर शान्ति का अनुभव करते हुए,

समृद्ध जीवन जी रही है ऐसा दृश्य देखने को मिल सकता है ।'[४६]

हा राष्ट्रयोगविचार पू. स्वामीजींनी, गुरुदेवांकडे केलेल्या प्रार्थनेतून सहज स्पष्ट होतो. या 'प्रार्थना'मधील पुढील कडवी येथे उद्धृत करावीशी वाटतात.[४७]

**स्वातंत्र्य–समता–बंधुता हो विविधता में एकता**
**हो सर्व भेद विलीन समरस जागती राष्ट्रीयता ।**
**सद्बुद्धि–बल–पुरुषार्थ से चारित्र्य और विवेकसे**
**संपन्न हो युववर्ग भी सर्वत्र दिग्विजयी रहें ।।४।।**
**यह विश्व है हरिरूप इसकी, कर्मसे पूजा करें**
**हम दीपवत् जलकर स्वयं इस, संस्कृति का तम हरें ।**
**कल्याण होवे विश्वका, निर्वता का भाव हो**
**मंगल समन्वय – मंत्र गूँजे धर्मकी यह राह हो ।।५।।**

राष्ट्रयोगविचार या पदांमध्ये राष्ट्रविषयक वैचारिक व्यूह आणि राष्ट्रनिर्मितीसाठी साधना, या दोहोंचाही समावेश होतो, याचा सखोल विचार उपरोक्त उल्लेखांतून झाला आहे.

## सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगविचार सिद्धी :–

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या पवित्र आविष्काराचा गाभा म्हणजे सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगविचार सिद्धी हा होय. त्यांच्या कथाज्ञानयज्ञातून, व्याख्यानांमधून परमवैभवसंपन्न हिंदू राष्ट्र निर्माण व्हावे याकरिता कोणते प्रयत्न, कोणता मार्ग अवलंबिता येईल, कोणते आदर्श समोर ठेवून राष्ट्राचे पुनरुत्थान होईल, कोणत्या सैद्धान्तिक आधारांवर सनातन हिंदू राष्ट्र उभे राहील, याच्या विचारांचे प्रबोधक प्रसृतिकरण घडत असते. त्यांचा काव्याविष्कार सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगसिद्धीचाच विचार स्फुट करते.

प्रत्येक व्यक्ती वेदान्त–तत्त्वज्ञानाने परिपोषित असावी; स्वराष्ट्र आणि स्वधर्म यांच्या अभ्युदयासाठी समर्पितपणे, सेवाभावी वृत्तीने कटिबद्ध असावी; यासाठी विविध उपक्रमांमधून, प्रबोधक व्याख्यानांमधून, ते सतत संस्कार करण्याचा प्रयत्न करीत असतात. सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेचे, सात्त्विक मनोवृत्तीने, सर्वसमावेशक भावाने, स्वतःचा आणि समाजाचा, अर्थातच हिंदू राष्ट्राचा अभ्युदय घडविण्यासाठी, त्याने ज्ञानात्मक कर्मवान व्हावे असा त्यांचा खटाटोप असतो. त्यांच्या मनात वेदान्त, ब्रह्मसूत्रे, उपनिषदे, श्रीमद् भगवद्गीता, रामायण, महाभारत,

हनुमत् पुराण, योगवासिष्ठ या प्राचीन वाङ्मयातून; श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान याबरोबरच श्रीमत् शंकराचार्य, श्री ज्ञानेश्वर माउली, संत तुकाराम, एकनाथ, राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी आणि सनातन हिंदू धर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्याचा संकल्प सिद्धीस नेणारे श्री छत्रपती शिवराय या विभूतिमत्त्वांच्या संज्ञापनातून, सनातन हिंदू-राष्ट्रयोगविचार आकारला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, संत गुलाबराव महाराज आणि सखोल विचारपूर्वक हिंदू राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी कटिबद्ध झालेली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघप्रणाली या माध्यमातून आद्य सरसंघचालक परमपूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक पू. गोळवलकर गुरुजी यांच्या विचारातून, पू. स्वामींच्या ठिकाणी सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचार सिद्ध झाला आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या व्यासपीठावरून त्यांचा हा वैचारिक व्यूह अधिक प्रकाशमान झाला आहे. यामुळेच 'राष्ट्रयोगी' असे त्यांचे विभूतिमत्त्व त्यांच्या वाङ्मयाविष्कारातून, सेवाकार्यातून, उपक्रमांमधून सर्वांना प्रतीत होते. असे राष्ट्रयोगी विभूतिमत्त्व प्रत्येक स्वयंसेवकाचे, एवढेच नव्हे तर प्रत्येक भारतीय नागरिकाचे असावे ही त्यांच्या मनातील तळमळ, नागपूर[४८] येथील विश्व हिंदू परिषद चिंतन-बैठकीच्या निमित्ताने २१ ते २३ मार्च २०११ मध्ये व्याख्यानमालेतून प्रकट झाली. 'ध्येय ज्योती नित जले', 'सद्गुणोंकी साधना', 'विजयरथ ले हम चले' या तीन व्याख्यानांतून उद्‌घटित झाली आहे. संघशाखेवर म्हटल्या जाणाऱ्या संकल्पसिद्धीच्या दैनंदिन प्रार्थनेमधून त्यांचा हा सनातन हिंदूधर्म-राष्ट्रयोगविचार कसा प्रकट होतो, हे त्यांनी या सह-चिंतन बैठकीत व्यक्त केले आहे. हे व्यक्त करीत असताना पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे सिद्ध राष्ट्रयोगी व्यक्तिमत्त्व प्रकट झालेले अनुभूत होते. ते 'संस्कार साधना' या त्यांच्या कवितेत लिहितात-

**'ईश्वरमय है अखिल विश्व यह, संतों की पावन शिक्षा,**
**अपनाकर वैज्ञानिक दृष्टि, करे संस्कृति की रक्षा ।**
**चले विवेकानंद-मार्ग पर, त्याग-शील साकार करें ।**
**आदर्शों के पथ पर चलते, देश नया निर्माण करें ।।३।।**

**भारत माँ की सेवा करते, जीवनभर विश्राम नहीं,**
**रुके नहीं हम, थके नहीं हम, झुके नहीं हम, बिके नहीं ।**

**ध्येयवाद को ज्वलंत रखते, पौरुष की हुंकार भरें ।**
**आदर्शों के पथ पर चलते, देश नया निर्माण करें ।।४।।'**[४९]

## सनातन हिंदूधर्म–राष्ट्रयोगविचार – संदर्भ व स्पष्टीकरण :–

(१) हिंदू कोणास म्हणावे?– इतिहासभूषण – श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाशक– श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, ब ७–८, श्रीपाल अपार्टमेंटस्, पंचपाखाडी, ठाणे ४००६०२, १० ऑक्टोबर १९८९. (२) मराठी तत्त्वज्ञान– महाकोश (त्रिखंडात्मक), खंड २ रा, प्रमुख संपादक– प्रो. देविदास दत्तात्रेय वाडेकर, मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे ३० (१९७४). (३) धर्माचे मूलाधार : वेद– प्रधान संपादक– डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाशक– श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर (भीष्म), मुंबई १९९९, ठाणे, खंड ९ वा. (४) उनि., हिंदू कोणास म्हणावे? – मलपृष्ठ. (५) मार्क्स आणि विवेकानंद – पी. परमेश्वरन्, अनुवादक– चं. प. भिशीकर, प्रकाशक– श्री. ब. शं. दाते, भारतीय विचार साधना, १८४७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. (६) उनि., मराठी तत्त्वज्ञान महाकोश. (७) वेदान्त और पुरुषार्थ– आचार्य किशोर व्यास (स्वामी गोविंददेव गिरि), धर्मश्री प्रकाशन, पुणे. (८) यज्ञमय जीवन– स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (९) विश्वबंधुत्व– स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (१०) गीता प्रवचने–विनोबा– प्रकाशक–संयोजक परंधाम प्रकाशन (ग्राम सेवा मंडळ) पवनार (जि. वर्धा) २०१९. (११) विजयरथ– स्वामी गोविंददेव गिरि, प्रकाशक– 'धर्मश्री' पुणे. (१२) प्रेम–योग–साधना– स्वामी गोविंददेव गिरि, प्रकाशक– 'धर्मश्री' पुणे. (१३) अद्वितीय कर्मयोगी–श्री आद्य शंकराचार्य– प्रधान संपादक– डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाशक– श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, ठाणे, खंड ११ वा. (१४) जगत्गुरू श्रीमत् शंकराचार्य– अनुवादक– श्री. लक्ष्मण ढवळू टोपले, मूळ हिंदी लेखक– स्व. पंडित दीनदयाळजी उपाध्याय, मोरया प्रकाशन, पुणे/ डोंबिवली. (१५) अपूर्व गुरू–शिष्य दर्शन– स्वामी गोविंददेव गिरि (आचार्य किशोरजी व्यास), धर्मश्री प्रकाशन, पुणे. (१६) ब्रह्मन– संपादक– डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाशक– श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, ठाणे, खंड १२ वा. (१७) Exclusive Interviews of "Swami Govind Dev Giriji Maharaj" on... Swami Govind Dev Giri (Kishor Madangopal Vyas), 23 January 2015 (Uploaded by Sanskar T.V.) (१८) उनि., मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड २ रा. (१९) होय! आम्ही हिंदू आहोत...– ले. लक्ष्मण टोपले, प्रकाशक– वनवासी कल्याण आश्रम, नाशिक–५. (२०) भारत– शाश्वत संस्कृतीची यक्षभूमी– भारतीय इतिहास व संस्कृती यांचा यथार्थ अभ्यास, खंड १३ वा, डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाशक– श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, मुंबई. (२१) तत्रैव. (२२) तत्रैव. (२३) तत्रैव. (२४) वेदान्त और पुरुषार्थ– स्वामी

गोविंददेव गिरि (आचार्य किशोरजी व्यास), धर्मश्री प्रकाशन, पुणे. (२५) तत्रैव. (२६) तत्रैव. (२७) तत्रैव. (२८) तत्रैव. (२९)तत्रैव. (३०) तत्रैव. (३१) विश्वबंधुत्व- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (३२) उनि., भारत-शाश्वत. (३३) उनि., वेदान्त और... (३४) श्रीरामकथा- नवनीत- स्वामी गोविंददेव गिरि, शब्दांकनकर्ते- श्री. सुनील चिंचोलकर. (३५) तत्रैव. (३६) जीवन संग्रामातील विजयरथ- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (३७) योगवासिष्ठ प्रवचने- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (३८) उनि., जगत्‌गुरू श्रीमत् शंकराचार्य. (३९) भारत विहंगम दर्शन- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (४०) राष्ट्रगुरू- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (४१) शिवदृष्टी आणि शिवसृष्टी- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन, पुणे. (४२) तत्रैव. (४३) तत्रैव. (४४) उनि., योगवासिष्ठ... (४५) उनि., यज्ञमय जीवन. (४६) तत्रैव. (४७) कार्यकर्ता सह-चिंतन- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन. (४८) कार्यकर्ता सह-चिंतन- स्वामी गोविंददेव गिरि, धर्मश्री प्रकाशन. (४९) तत्रैव.

* *

## ।। सात ।।

# संत, तत्त्वज्ञ, कवी, बहुभाषाप्रभु पू. स्वामी गोविंददेव गिरि

संत श्री स्वामी गोविंददेव गिरि महाराज :– पू. स्वामींचे संतविषयक संकल्पनेचे स्पष्टीकरण – पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वात सर्वार्थाने संतपदाचा आविष्कार – तत्त्वज्ञ पू. स्वामी गोविंददेव गिरि – गुरुपरंपरेने तत्त्वज्ञान स्वीकार प्रक्रिया – डॉ. कुमठेकर प्रतिपादित ब्रह्मसूत्राचे शांकरभाष्य सारांशरूप – अद्वैत वेदान्त आणि संतांचा भक्तिमार्ग यांचा अनुबंध – योगदर्शनाशी वेदान्तदर्शनाचा अनुबंध – वेद आणि वेदान्त सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक धन – वेदान्त अर्थात उपनिषदांवरच्या आक्षेपांचे राष्ट्रपुनरुत्थापनासाठी स्पष्ट शब्दांत निराकरण – सनातन हिंदूधर्मराष्ट्रधारिणी श्रीमद् भगवद्गीता – श्रीमद् भागवत–कथाज्ञानयज्ञ आणि राष्ट्रयोग – भगवान माउली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा राष्ट्रधर्म – संत श्री गुलाबराव महाराज – स्वामी विवेकानंदांच्या भूमिकेचा परिणाम – शिवसमर्थ योगाचा आदर्श – कवी पू. स्वामी गोविंददेव गिरि – वाग्यज्ञातील काव्यात्मकता – पू. स्वामी विरचित आरती गीते – प्रार्थनांचा अनुवाद – पू. स्वामींची प्रार्थना – संस्कार–प्रेरणागीते – वंदनीय विभूतिमत्त्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन – बहुभाषाप्रभू पू. स्वामी गोविंददेव गिरि – राष्ट्रयोगी पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातील चतुरंगदर्शन.

## ।। सात ।।

# संत, तत्त्वज्ञ, कवी, बहुभाषाप्रभु पू. स्वामी गोविंददेव गिरि

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे विभूतिमत्त्व अनेकविधतेने अनुभवास येत आहे. आचार्य किशोरजी व्यास यांनी संन्यास ग्रहण केल्यानंतरही हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाचे कार्य सतत पुढे सुरू ठेवले आहे. त्यांच्या कार्याचे स्वरूप ज्ञानोत्तर भक्तीसारखे आहे. *'बुडती रे जन देखवे डोळा'* या संत तुकारामांच्या सर्वप्रसिद्ध उक्तीमध्ये थोडा बदल करून असे म्हणता येते, *'बुडते हे राष्ट्र न देखवे डोळा'*. त्यासाठी सनातन हिंदूधर्मराष्ट्र हेच परमेश्वरस्वरूप होय. अशा आत्मज्ञानपूर्वक पू. स्वामींचे कार्य सुरू आहे.

अध्यात्म हा सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा आत्मा आहे. परकीय आक्रमणे, मतामतांचा गलबला अर्थात अन्य धर्म, पंथ, मते तसेच भौतिक जीवनकेंद्रित मते यांच्या विक्षेपक आक्रमणांमुळे, हस्तक्षेपामुळे, प्रचारामुळे आणि मुख्यतः राजसत्ता आणि अर्थसत्तेच्या प्रभावामुळे भारतीय अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे इतिहासातील वैभवसंपन्न रूप बाधित झाले. विश्वबंधुत्वावर आधारलेले सनातन, आध्यात्मिक तथा सांस्कृतिक राष्ट्र छिन्नभिन्न झाले. विशेषतः पाश्चात्त्यांच्या फोडा-झोडा नीतीमुळे तसेच तथाकथित साम्यवादी, पुरोगामी, आर्थिक समतावादी, लैंगिक मानसशास्त्रीय सिद्धान्तवादी, त्याचबरोबर अतिरेकी व तथाकथित अतिविज्ञानवादी अथवा तथाकथित बुद्धिप्रामाण्यवादी असे व्यक्ती, समूह, संघटना, समाज, पंथ,

तथाकथित धर्म म्हणविणारे पोथीनिष्ठ मतप्रवाह यांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्राला निस्तेज करण्याचा प्रयत्न केला. एक प्रकारे गत हजार-दीड हजार वर्षे घडलेल्या अशा आक्रमणांमुळे सनातन सत्य, प्रेम, करुणा यावर आधारित वेदोपनिषदातील स्वाभाविक वैश्विक भूमिकेसह पुरुषार्थपूर्ण मानवी समाज एक प्रकारे निद्रावश झाला आहे असे वाटू लागले.

ही परिस्थिती बदललीच पाहिजे, यासाठी प्रयत्न झालेच नाहीत असे नाही; परंतु कलियुगाच्या कल्पनेने सामान्य जनता जेवढी जागृत व्हावयास हवी तेवढी ती जागृत झाली असे दिसत नाही. भगवान श्रीमद् आद्य शंकराचार्यांपासून ते मध्ययुगीन माउली ज्ञानेश्वर, तुकाराम, स्वामी समर्थ रामदास अशा संतांनी तसेच छत्रपती शिवरायांनी यासाठी निकराचे प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर त्यानंतरच्या काळात स्वामी विवेकानंदांनी विश्वबंधुत्वाचा जागर वैश्विक व्यासपीठावर केला. असे स्वयंप्रकाशी तेजस्वी तारे निर्माण झाले.

असे असले तरी ही सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानाची प्रक्रिया पूर्णत्वास गेलेली नाही; याकडे पू. स्वामी गोविंददेव गिरी यांचे लक्ष वेधले गेले. प्राप्तकाल कलियुग म्हणून मान्य केला तर कलियुगाचे ठिकाणी संघशक्तीच्या रूपाने परमात्मा आपले वचन पूर्ण करतात. ह्या वचनाचा आठव द्रष्ट्या महामानवांना झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानासाठी कटिबद्ध असलेल्या संस्था तथा संघटना याच ज्ञानवान कर्मशीलतेने ध्यास घेऊन, समर्पणबुद्धीने व्रतस्थ झाल्या.

व्यक्ती, संस्था, समूह यांच्याद्वारे सुरू असलेल्या राष्ट्रपुनरुत्थानाच्या यज्ञात सर्वसामर्थ्याने उभे राहून राष्ट्रपुनरुत्थानाचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी राष्ट्रयोगी म्हणून पू. गोविंददेव गिरिजी महाराज प्रकटले आहेत याचा प्रत्यय प्रतिक्षणी त्यांच्या विभूतिमत्त्वातून आणि कार्यस्वरूप आविष्कारातून येत राहतो. या एकविसाव्या शतकात सर्वसमावेशक समन्वयात्मक भूमिकेने जगद्गुरूस्वरूप भासमान होणारे संत श्री गुलाबराव महाराज प्रक्रियेच्या कार्यासाठी दीपस्तंभासारखे पू. स्वामींना प्रतीत होतात. आपल्या कुलाकडून, गुरुपरंपरेकडून आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थानासाठी व्रतस्थ झालेल्या तेजस्वी ताऱ्यांकडून, स्वप्रज्ञेने, स्वयंभूपणे स्वतःला राष्ट्रयोगीस्वरूपात सिद्ध करून कार्यमग्न करणारे पू. गोविंददेव गिरि महाराज यांचे विभूतिमत्त्व अनेकविधतेने सर्वांना प्रतीत होत आहे.

**संत श्री स्वामी गोविंददेव गिरि महाराज :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे सर्वांना प्रतीत होणारे विभूतिमत्त्व म्हणजे त्यांच्यातील संतत्वाचे दर्शन होय. संतत्वाचे दर्शन असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा स्वाभाविकपणे आपल्या डोळ्यासमोर महाराष्ट्रातील मध्ययुगीन कालखंडातील संत श्री माउली ज्ञानेश्वर महाराज, संत श्री तुकाराम महाराज, संत श्री समर्थ रामदास स्वामी अशी नामावली उभी राहते. या नामावलीतील सर्वांनीच संत पदाविषयी भाष्य केलेलेही आढळते. कलियुगाच्या ठिकाणी प्रेमस्वरूपा भक्ती हेच सर्वार्थे जीवनसाफल्याचे साधन आहे, असे परंपरेने नमूद केले आहे. 'प्रबोधनकार का स्वधर्म' या व्याख्यानात संतपदाविषयी स्वामीजींनी प्रकट केलेले विचार मननीय आहेत - 'भगवान के साथ की अन्तरंग समरसता जिनकी 'प्रज्ञा'के माध्यम से प्रकट होती है वे 'ऋषि' कहलाते हैं, जिनकी 'प्रचार' के माध्यम से मुखर होती हैं वे 'आचार्य' होते हैं और जिनकी 'प्रेम' के माध्यम से अभिव्यक्त होती हैं वे कहलाते हैं 'सन्त' ।'

**ऋषियों की विशेषता है 'प्रज्ञा ।**
**आचार्यों की विशेषता है 'प्रचार', तथा**
**सन्तों की विशेषता है 'प्रेम' ।**

सन्तों ने सदा प्रेम का ही मार्ग अपनाया, सिखाया । भगवान से समरसता तीनों में है । तीनों में प्रज्ञा, प्रचार, प्रेम हैं । भेद है तो बस इतना ही कि इन तीनों में से बल किस पर दें । ऐसा नहीं है कि ऋषिगण प्रेम नहीं जानते थे । परन्तु उनमें प्रधानता थी प्रज्ञा की । आचार्यों के पास भी प्रज्ञा थी, प्रेम भी था । परन्तु प्रचार उनका प्रधान पक्ष था । उसी प्रकार, सन्तों में प्रज्ञा है, वे प्रचार भी जानते हैं परन्तु प्रेम की प्रमुखता होने के कारण वे दोनों पक्ष उनके लिए गौण हैं । सन्तों का जीवन याने भगवान का निरन्तर चिन्तन और विश्व से गहरा प्रेम । ऐसे सन्तों के विषय में श्रीमद् भगवद्गीता में भगवान कहते हैं -

**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।।**

इन महात्माओंका जीवन दैवी संपत्ति से परिपूर्ण होता है । भगवद्गीता के १६ वें अध्याय के प्रारम्भ में दैवी संपत्ति के २६ गुण बताये हैं ।

**अभयं सत्त्वसंशुद्धिः ज्ञान–योग–व्यवस्थितिः**

दानं, दमश्च, यज्ञश्च ... आदि आदि ये २६ गुण हैं । अंग्रेजी पद्धति से कहें तो ये २६ गुण याने A to Z । इन २६ गुणों में समूचे जीवनमूल्यों का सार है ।'

संत या विषयाची चर्चा प्रामुख्याने 'भागवत' या संदर्भाने केली जाते. संतांचे विभूतिमत्त्व त्यांच्या प्रेममय आविष्कारातून व्यक्त होते. सर्वच वैष्णवांचा आविष्कार प्रेममय असावा हे स्पष्ट आहे. भगवत्–प्रेम म्हणजे भक्ती होय. भक्तीची अनेक रूपे किंवा मार्ग नारदीय भक्तिसूत्रात मांडलेली दिसतात. भागवताच्या सप्तम स्कंधात, भक्त प्रल्हादाच्या मुखाने आलेला, भक्तीचे वर्णन करणारा श्लोक भक्तिप्रवाहाचे अधिष्ठान ठरला आहे. तो श्लोक म्हणजे –

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदम् ।।**

हा होय. भागवत धर्म म्हणजेच भक्तियोग होय. या संदर्भात 'भागवत विहंगम दर्शन' या पुस्तकात पू. स्वामी लिहितात –

अशा प्रकारे श्रीमद् भागवत महापुराणात विविध विषयांचा समावेश झाला असला तरी त्यातील मुख्य विषय भागवत–धर्म किंवा भक्तियोग हाच आहे कारण–

**यथा हरौ भगवति नृणां भक्तिर्भविष्यति ।**
**सर्वात्मन्यखिलाधारे इति संकल्प्य वर्णय ।।**

ही भागवताची मुख्य प्रेरणा आहे. या ग्रंथातून ज्ञानाचे प्रतिपादन अशा प्रकारे झाले आहे की, त्याची प्राप्ती भक्तीच्या माध्यमातून व्हावी व त्याचे पर्यवसानही पराभक्तीत व्हावे. या दृष्टीने भक्ती हे भागवताचे प्राणतत्त्व आहे.

'श्रीमद्भागवत कथा–सारामृत' या विवेचनात, माँ आणि पू. कपिलमुनी यांच्या संवादात पू. स्वामींनी पू. कपिलमुनींच्या मुखाने संतलक्षण स्पष्ट केले आहे. ते सांगतात, 'संत वही जो सहनशील हो गया । प्रतिकार करने की क्षमता न होने के कारण सहता है वह सन्त नहीं है । प्रतिकार करने की क्षमता होनेपर भी जो शान्तिपूर्वक सहता है वह सन्त है । उनकी करुणा दूसरों के लिए है । सन्त वही है जो सबका भला चाहते हैं । अपने शत्रू का भी भला चाहते हैं क्योंकि उनकी दृष्टि में कोई शत्रू है ही नहीं । यदि आप विशुद्ध है तो अपनी निन्दा का

भी आनन्द ले सकेंगे । संत वह है जो शत्रू किसी को भी नहीं मानते । जो शान्त हैं । जिनके चित्त की शान्ति कभी हिलतीही नहीं । चित्त इतना गहरा है कि अथांग सागर के समान है । सन्त वे होते है जो भगवान की अनन्य भक्ति कहते है ।' पू. कपिलमुनींच्या मुखाने प्रकटलेल्या संतलक्षणाची प्रचिती पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वात कोणालाही घेता येते.

संत श्री एकनाथ महाराज श्रीमद् भागवताच्या एकादश स्कंधावर भाष्य करताना संत या पदाला पर्यायी शब्द 'साधू' असा आलेला असल्याचे लक्षात घेऊन, द्वितीय अध्यायातील –

**भूतानां देवचरितं दुःखाय च सुखाय च ।**
**सुखायैव हि साधूनां त्वादृश्यामच्युतात्मनाम् ।।५।।** यावर –
**देवांपासूनि भूतसृष्टी । सुखदुःखे शिणे पोटीं ।**
**अतिवृष्टी का अनावृष्टी । भूतकोटी आकांतु ।।५४।।**
**त्या देवांपरीस साधु अधिक । हे साचचि मज मानले देख ।**
**देवचरितें उठी सुखदुःख । साधु निर्दोख सुखदाते ।।५५।।** अर्थात

देवांपासून जीवसृष्टीला सुखे आणि दुःखे प्राप्त होऊन तिला यातना भोगाव्या लागतात. अतिवृष्टी किंवा अनावृष्टी झाली की प्राण्यांमध्ये आकांत उसळतो. (५४) ह्याकरिता त्या देवांपेक्षा साधू हेच श्रेष्ठ होत, असे मला खरोखर वाटते. कारण देवांच्या करणीने दुःखमिश्रित सुख उत्पन्न होते; पण साधू हे निर्दोष सुखांचे दाते. अर्थात दुःखलेशरहित सुख देणारे आहेत.(५५)

उपरोक्त भागवतातील नवविधा भक्तीचा अनुसार भागवत धर्मात केला जातो. स्वाभाविकपणे, भागवत संतांच्या जीवनशैलीत या नवविधा भक्तीचा अनुसार कसा केला जातो, कसा असावा, त्यातील संकल्पना दासबोधामध्ये पद्धतशीरपणाने उलगडून दाखविली आहे. या धर्माचे मर्म अर्थात भागवत संतांच्या जीवनशैलीचे मर्म संत श्री तुकाराम महाराज पुढील अभंगातून स्पष्ट करतात –

**विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।।**
**कोणाही जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।।**

मात्र या जीवनशैलीचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना संत तुकाराम महाराज म्हणतात–

**आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी ।**
**बोलले जे ऋषि । साच भावे वर्ताया ।।**

## पू. स्वामींचे संतविषयक संकल्पनेचे प्रकट स्पष्टीकरण :–

२३ जानेवारी २०१५ रोजी संस्कार टी.व्ही. चॅनलवर 'संत साक्षात्कार' या उपक्रमांतर्गत पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना, संत कोणास म्हणावे, या स्वरूपाचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर स्वामीजींनी स्पष्टपणाने प्रकाश टाकला. ते म्हणाले– ऋषि, मुनी, आचार्य, साधू, योगी, सिद्ध आदी सर्व प्रकारचे शब्द आपल्या व्यवहारात वापरले जातात. अशा सर्व विभूतिमत्त्वांना 'संत' या पदानेच संबोधिले जाते. संत या पदाची थेट व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल – अंतरंग–समरसतेने परमात्म्याशी जो समर्पित भावाने वर्तन करतो तो 'संत' होय. परमात्मा प्राप्त करणे किंवा परमात्मास्वरूप होणे ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतील अनेक स्तर संभवितात. ते म्हणजे परमात्मा मिळविण्यासाठी साधना सुरू करण्यापासून परमात्मसिद्धीपर्यंत – साधक, प्रगत साधक आणि सिद्ध असा हा क्रम आहे. या स्तरावरील प्रत्येकास 'संत' म्हटले जाते. सत्यनिष्ठा, तितिक्षा, लोकांवर प्रेम आणि सर्व लोकांविषयी करुणा ज्याच्या ठायी प्रतीत होते; तो संत होय. सर्वांना भगवंताकडे घेऊन जाणारे ते संत होय. अर्थात आत्मोद्धार साधण्याबरोबरच लोकोद्धार साधण्यातच जे कृतार्थता मानतात किंबहुना लोकोद्धार हाच आत्मोद्धार होय, अशी ज्यांची जीवनशैली असते ते संत होत. संतांचा व्यवहार कधीही जडवत् नसतो. कारण त्यांच्या ठायी सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांचा परिपोष झालेला असतो.

संत ही अशी एक जीवनधारा आहे, की एका तीरावर शास्त्रीय ज्ञानासह लोकांच्या भौतिक अभ्युदयाचा ते विचार करतात; तर दुसऱ्या तीरावर सम ाजजीवनामध्ये सत्यनिष्ठा, सर्वांभूती प्रेम आणि करुणा निर्माण होऊन आत्मोन्नतीने जीवनात शांती, सुख कसे प्राप्त होईल यासाठी धडपडतात. ते अगदी पतितातल्या पतितालासुद्धा भगवंताचा अंश जाणतात. त्यामुळे ते लोकांचे उत्पीडन करीत नाहीत. तसेच ते शास्त्राची उपेक्षाही करीत नाहीत. शास्त्र आणि समाज यांचा समन्वय साधणारे विभूतिमत्त्व म्हणजे संत होय.

याच प्रकटीकरणामध्ये नवविधा भक्तीच्या दृष्टीने पू. स्वामींनी मूर्तिपूजन किंवा प्रतीकपूजन याविषयी चर्चा केली आहे. विठ्ठलाची पूजा करता–करता स्वतःच विठ्ठल होऊन जाण्याची प्रक्रिया भक्तिमार्गाने घडते. अर्थात भक्ती, ज्ञान, वैराग्य अशी प्रक्रिया घडून सत्य, प्रेम, करुणा संवेदनांनी समत्वदृष्टी प्राप्त होते.

अवघे विश्व समत्वाने पाहतो, तो संत. सनातन हिंदूधर्मराष्ट्राची विश्वबंधुत्वाची किंवा माउली ज्ञानेश्वरांच्या पसायदानातली विश्वकल्याणाची संवेदना संतपदाच्या ठायी ओतप्रोत असते. या संवेदनेसह संत अखिल मानवजात एकात्म भावाने पाहतो व मानवजातीच्या कल्याणासाठी एवढेच नव्हे तर चराचराच्या कल्याणासाठी संत समर्पित भावाने जगतो.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे संत-पदाविषयीचे प्रकटीकरण अशा व्यापक आशयाने प्रकटते. यामुळेच सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा अर्थात भारतीय राष्ट्राचा आत्मा अध्यात्म हा आहे; असे ते स्पष्टपणाने सांगतात. स्वामी विवेकानंद आणि ज्ञानेश्वर महाराज या दोहोंच्याही वाणी-आविष्कारातून हीच संकल्पना स्पष्ट होते.

## पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वात सर्वार्थाने संत पदाचा आविष्कार :-

उपरोक्त विवेचनामध्ये ज्या सर्व उपयोजित शब्दांसाठी आणि स्तरांसाठी मध्ययुगापासून संत हे नामाभिधान प्रचलित झाले आहे, त्या सर्व अवस्थांतील परिपूर्ण अर्थच्छटा पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या जीवनशैलीत प्रत्ययास येतात. निमित्ता-निमित्ताने अनेक साधकांनी, भक्तांनी, अनुग्रहितांनी, कार्यकर्त्यांनी, राष्ट्रभक्तांनी याविषयी प्रांजळ निवेदन केले आहे.

वेदमूर्ती अनंत सुमंतराव मुळे, पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वाविषयी लिहितात- 'पू. स्वामीजींचा गेल्या १५-१६ वर्षांपासून खूप अंतरंगातून परिचय झाला. त्यांच्या अंगी असलेल्या अलौकिक दैवी गुणांचे दर्शन घडले. कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ति संतसम्राट ज्ञानेश्वर महाराजांविषयी असलेली त्यांची निष्ठा म्हणजे श्री ज्ञानेश्वरनिष्ठेचा एक श्रेष्ठ आदर्शच होय.'

संतांचे, महात्म्यांचे पूजन कसे करावे ते कळते स्वामीजींच्या सहवासातूनच. '*अमानी मानदो मान्यः ।*' हे तंतोतंत जुळते ते इथेच. आयुष्यभर एक अकिंचन परिव्राजक राहून अनादिनिधना भगवन्निश्वासिता श्रुतिमाउलींचे अखंड वर्धमान सेवेचे व्रत हे त्यांच्या जीवनदर्शनात अलौकिक आहे.

वेदमूर्ती मुळे आणखी लिहितात- 'समर्थांनी सद्‌गुरूंची जी दशलक्षणे सांगितली आहेत त्यांपैकी 'स्वरूपस्थिती' हे एक लक्षण सांगितले आहे. संदेहनिवृत्ती होऊन देहबुद्धी निमाली अथवा देहाहंकृती मावळली म्हणजे 'स्वरूपस्थिती' प्राप्त होते.

**''सदा स्वरूपानुसंधान । हे मुख्य साधूचे लक्षण ।**
**जनी असोन आपण । जगावेगळा ।।'' (८-९-९)**

अन्य नऊ लक्षणांचा केवळ उल्लेख करून पुढे जातो - विमळ ज्ञान, निश्चयाचे समाधान, प्रबळ वैराग्य, उदासीन वृत्ती, अंतर्बाह्य निर्मळ आचार, हरिकथा-निरूपण, कीर्तन, अध्यात्मश्रवण, परमार्थ-विवरण यांचा साकल्याने उद्घोष व तद्द्वारा जनजागरण करून जनप्रवाहास सन्मार्गाकडे वळविणे, सारासार विचार, जगदोद्धाराची तळमळ आणि विविधा भक्तिसाधन ही सद्गुरूंची लक्षणे होत. समर्थांनी व्यक्त केलेल्या लक्षणांचा अनुभव पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातून प्रत्यही येत राहतो.

श्रीमती प्रेमलता कमल राठी लिहितात- श्री महाराज जी के संपर्क में आने पर जाना कि संतों का जीवन अत्यधिक विचारमंथन, साधना, संयम, विश्रामरहित और व्यस्ततम दिनचर्या से भरा होता है । वेदविद्यालयों का निर्माण, कई विद्यालयों को अनुदान, वैदिक विद्वानों का सम्मान, होनहार विद्यार्थीयों को आर्थिक मदद, वैदिक साहित्य का प्रकाशन, अपने प्रवचनों के माध्यम से भक्ति की ज्योत जलाना और कई संस्थाओं के कार्य एकसाथ सफलतापूर्वक संचालित करना तथा यह सब करते हुए यह कर्मयोगी अपने कर्मपथ पर दृढता से अग्रेसर है ।'

स्वामी मकरंदनाथ लिहितात- स्वामी माधवनाथांच्या अंतरंगाचे प्रगाढ प्रेम लाभलेल्या व्यक्तींमध्ये किशोरजींची गणना न होती तरच नवल! स्वामी माधवनाथ किशोरजींचे वर्णन समर्थांच्या एका ओवीतून करीत असत.

**तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त ।**
**व्युत्पन्न आणि वादरहित । तरी हे ही अपूर्वता ।।**

किशोरजींनी चतुर्थाश्रम स्वीकारल्यानंतर भगव्या वस्त्रांखेरीज त्यांच्या दर्शनात काहीही फरक जाणवला नाही. शांत, प्रसन्न मुद्रा, निगर्वी, प्रेमळ स्वभाव, ऋजु सौजन्यशील अंतःकरण हे त्यांचे व्यक्तिविशेष प्रथमपासून तसेच होते. मात्र पवित्र अशा संन्यासधर्माच्या भगव्या वस्त्रांमुळे त्यांचे पूर्वीचेच गुणविशेष अधिक शोभायमान झाले. आचार्यजींना पाहताक्षणीच काय लक्षात येत असेल तर त्यांचे सहजसुंदर वैराग्य!

डॉ.सौ. कुमुद गोसावी लिहितात- ''आपल्या आजवरच्या नाथवाङ्मयावरील

अभ्यास-चिंतनाच्या, संशोधन-लेखनाच्या कितीतरी पल्याड नेणारं हे निरूपण आहे,'' असं म्हणत मी त्या ज्ञानचिंतकाला मनोमन विनम्र अभिवादन केलं. उरला-सुरला अहंभाव गळून पडला. खरं संतत्व काय असतं? ते उमगलं. संतवाङ्मयाभ्यासाची एक नवी दिशा प्राप्त झाली.

''संत ही प्रकाशाची बेटं आहेत'' असं ऐकलं होतं. ''ती असा अज्ञानाचा अंधकार छेडून ज्ञानप्रकाशाची निरांजनं माणसाच्या अंतरी अखंड तेवत ठेवतात.'' हा विश्वास आचार्यश्रींनी अंतःकरणपूर्वक दिला होता. ''सतत नामस्मरण करीत राहणं'' ही स्मरणभक्ती त्यांनी जागवली होती.

नवविधा भक्ति-आविष्कारानं ओथंबलेलं, नाथ-चरित्र-वाङ्मयकार्यातून नेमकं कार्य नि कसं वेचायला हवं याचं अचूक मार्गदर्शन करणारं आचार्य किशोरजींचं कीर्तन खूप काही सांगून गेलं.'

पुणे येथील श्री. मधुसूदन चंदुरकर लिहितात- 'दिसंबर २००५ का एक किस्सा तो मैं कभी नहीं भुला पाऊँगा। दत्त जयंती का शुभ दिन था। कार्यालयीन कामकाज के लिए शाम ६ बजे के आसपास मैं आचार्य श्री से मिलने गया। आचार्यश्री कुर्सी पर बैठकर पढने में व्यस्त थे। उनके चेहरे के इर्दगिर्द तेजोवलय दिखायी पड रहा था। उनका वह तेजस्वी रूप देखकर मैं २-३ मिनट के लिए द्वार पर ही खडा उन्हें निहारता रहा। उनके इस सुंदर एवं निश्चल स्वरूप को देखकर मैं उनसे विना बात किये वापस चला आया। आचार्यश्री के रूप में श्री दत्तगुरु के दर्शन का आभास हो रहा था। उस वर्ष मैंने हर माह एक इस तरह कुल ग्यारह बार गुरुचरित्र के पारायण किये थे। पारायण की समाप्ति हो चुकी थी। उसीका यह प्रसाद था।'

श्री. शेखर वशिष्ठ लिहितात- 'आचार्यश्री के व्यवहार को देखकर मैं प्रायः आश्चर्यचकित हो उठता था कि ये कितने सरल साधुसंत है कि अपनेआप स्वतः बिना किसी संकोच के दूसरों से मिलने में पहल करते हैं। जिनकी उनको याद आती है, अपनेआप दूरभाष पर सम्पर्क कर लेते हैं। दीपावलि के दिनों में आप पुणे, धर्मश्री में रहते हैं। अपने ग्राम अपने मंदिर (बालाजी मंदिर) जाते हैं। वृद्धजनों तथा अपने बाल्यावस्था के मित्रों, गुरुजनों से मिलते हैं। वास्तव में आप अंतरंग में एकाकी जीवन अपनाते हुए भी लोकमर्यादा, सामान्य व्यवहार को अत्यंत दक्षता के साथ निभाते हैं। बहिरंगरूप में समाज के सभी व्यक्तियों

से मिलते हुए भी भीतर से प्रभुभक्ति व चिंतन में तल्लीन रहते हैं ।'

आचार्य पंडित नथमलशास्त्री दाधीच आपल्या कवितेत भावना व्यक्त करतात –

**दधीचिवंशस्य महाविभूतिर्व्यासः किशोरः प्रथितो गुणज्ञः ।**
**संन्यासदीक्षां समवाप्य योगी गोविन्ददेवो जयते गिरिश्रीः ।।२।।**
**त्यागी तपस्वी कुशलो मनस्वी धीरो विपश्चिद्गुरुभक्तिनिष्ठः ।**
**या क्रान्तद्रष्टाऽपि च राष्ट्रसन्तो गोविंददेवो जयते गिरिश्रीः ।।३।।**
**आचारहीनान् पतितान्विमूढानज्ञान् जनान्दुर्वसने निमग्नान् ।**
**प्रबोधयत् ज्ञानकथा प्रसङ्गे गोविन्ददेवो जयते गिरिश्रीः ।।४।।**

हरिद्वारचे श्री. अविनाश मोरे आठवण सांगतात – 'मे १९९२, मी व स्वामीजी कारने संभाजीनगर, औरंगाबाद येथे पोहोचलो. तेथे बालिका-संस्कार शिबिराचे आयोजन केलेले होते. श्री. बलदवा यांचे निवासस्थानी माडीवर मी व स्वामीजी थांबलो होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी व स्वामीजी नित्य संध्या-पूजा आटोपून शोभायात्रेसाठी निघालो. निघण्यापूर्वी स्वामीजींनी देवाचे दर्शन घेतल्यावर मी स्वतः कुलूप लावले व त्यांचे सोबतच शोभायात्रेत सामील झालो. मी व स्वामीजी ११ वा. परत निवासस्थानी आलो. मी कुलूप उघडले. स्वामीजींनी देवाचे दर्शन घेतले व दोन मिनिटे स्तब्ध राहिलो. देवासमोरील तुलसी सोन्याच्या मण्यांची माळ तिथे दिसली नाही. त्यांनी मला विचारले, ''तू कुठे ठेवलीस का? बघितलीस का?'' मी 'नाही' म्हटले. आम्ही दोघांनी सर्वत्र बघितले. वाटले, उंदराने तर नेली नाही? नंतर स्वामीजी परत एकदा स्तब्ध राहिले व मला म्हणाले, ''तू ठेवली नाहीस ना? तर जाऊ दे, कोणताही विचार करू नकोस.'' दुपारची विश्रांती झाली. पुन्हा शिबिराचे कार्य सुरू झाले. त्याच दिवशी स्वामींना दृष्टांत झाला की, देवाजवळ जे श्रीफळ आहे ते सांभाळून ठेवा व गाणगापूरला संगमावर वाढवा.

त्याच दिवशी श्री. भांगडियाजी (हैद्राबाद) आले. 'आम्हास गाणगापूर येथे आपल्या श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करायचे आहे. तरी तारीख द्यावी' अशी विनंती केली. स्वामीजींनी पंचांग पाहून जानेवारी १९९३ ची तारीख दिली. माळ हरवल्याची चर्चा स्वामीजींनी त्या वेळी कुणाजवळही केली नाही. फक्त वरील सर्व प्रकार आम्हा दोघांनाच माहीत होती. शिबिर कार्यक्रम आटोपून मी

व स्वामीजी संगमनेर येथे आलो व ते श्रीफळ व एका वस्त्रात गुंडाळून ठेवले.

प.पू. स्वामीजी गाणगापूर येथे गुळवणी महाराज मठात पोहोचले व त्याच दिवशी पं. प्रमोदजी गर्गे यांचे सोबत संगमावर स्नानासाठी पोहोचले. स्नान-दर्शन झाल्यानंतर त्यांनी ते श्रीफळ वाढविले आणि काय चमत्कार, तीच तुलसी-सोन्याची माळ श्रीफळातून बाहेर पडली. हा प्रकार पाहून स्वामीजींचे आनंदाश्रू थांबले नाहीत. हीच खरी प्रभुकृपा. माझ्यावरील पारिवारिक संकटेही स्वामीजींमुळेच नाहीशी झाली. माझ्या जीवनातील खरा परीस स्वामीजींच्या रूपाने मला मिळाला आहे.'

वाराणसीच्या सौ. वसुधा देव सांगतात- 'माझ्या पतिदेवांना अपघात झाला होता. त्या वेळी स्वामींची कथा सुरू होती. त्यांना कळताच ते भेटायला आले. आम्हाला मोठा आधार वाटला. त्यांनी मला भीमरूपी स्तोत्राचा पाठ करावयास सांगितला. मी तो पाठ सुरू केला आणि काही दिवसांतच त्यांना बरे वाटले.

श्री. शामराव आपटे सांगतात- ''पू. किशोरजींनी पुष्कळ लोकांना त्यांच्या दोषांसकट स्वीकारले. त्यांच्यातील दोष घालविण्याचा प्रयत्नही केला. पण दोष सुधारले नाहीत तर त्यांना सोडून दिले नाही, तर त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून गुणांचा, महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानच्या प्रगतीसाठी उपयोगच करून घेतला.''

बीड येथील ॲड. के. पी. ठिगळे सांगतात- पू. स्वामींना सरस्वतीदेवीचे जन्मसिद्ध वरदानच आहे.

**अंतर क्षाळीले गुरू प्रतीति । बाह्य क्षाळीले शास्त्र युक्ती ।**
**ऐसे शुचित्य निज निश्चिती । अद्वैत स्थिती नांदे तेथे ।।**

या उक्तीची प्रचिती येते आणि

**या लागी बाह्य विभागु । कर्मे धूमला चांगू । ज्ञाने फेडिला वंगु । अंतरीचा ।।**

या ज्ञानेश्वर माउलींचे वचनाची सार्थता पटते.

उज्जैन येथील पूर्वप्राचार्य श्री. बी. के. कुमावत लिहितात- 'श्रीमद् भगवद्गीता के ७ वें अध्याय के तीसरे श्लोक में कहा गया है-

**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ।।**

अर्थात हजारो मनुष्यों में कोई एक मेरी प्राप्ति के लिए यत्न करता है और

उन यत्न करनेवाले योगियों में भी कोई एक मेरे परायण होकर मुझको तत्त्व से अर्थात यथार्थ रूप से जानता है । ऐसे तत्त्वज्ञानी पूज्य स्वामी गोविन्ददेव गिरि (आचार्य किशोर व्यास जी) महाराज भारतीय संस्कृति एवं धर्म की अमूल्य निधि हैं । सनातन धर्म के लिए वे जो भी कार्य कर रहे हैं वह न केवल सराहनीय है अपितु स्तुत्य भी है । विगत चालीस वर्षों से अनवरत श्रीमद् भागवत, श्रीरामकथा आदि के माध्यम से धर्मप्रबोधन देकर भारतीय संस्कृति का दिव्य संदेश जन-जन तक पहुँचा रहे हैं तथा संस्कृत एवं संस्कृति के उन्नयन में महत्त्वपूर्ण भूमिका निभा रहे हैं ।'

ते पुढे लिहितात- 'आचार्य स्वामी गोविंददेव गिरि का भारतीय-संस्कृतिरक्षण का महाकार्य निरंतर चल रहा है । उनका शिष्ट, सात्त्विक तथा धार्मिक साहित्य का संवर्धन और वितरण निश्चय ही अनुपम, सर्वानुकरणीय है । वे भगवद्भक्ति, राष्ट्रभक्ति, गुरुभक्ति, सात्त्विक प्रेमभाव, सन्निष्ठा आदि सद्गुणों के आदर्श रूप कहे जा सकते हैं । लुप्त होती जा वेदविद्या की सेवा के लिए सन्नद्ध हो देशभर में वेदविद्यालयों की अद्भुत शृंखला खडी कर सैंकडो वैदिकों के निर्माण से वेदाध्ययन-अध्यापन को मूर्त रूप देने तथा उसे अक्षुण्ण बनाए रखने में आचार्य स्वामी गोविन्ददेव गिरि का योगदान अविस्मरणीय रहेगा इसमे कोई संशय नहीं है ।'

मला (अनिल सहस्रबुद्धे) पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे ठिकाणी संतत्व तथा दिव्यत्व असल्याचा अनुभव मोठ्या विलक्षणपणाने आला.

माझे जन्मगाव अकोले (अहमदनगर). प्रवरातीरावर एका बाजूला हे गाव आणि पलीकडच्या बाजूला भगवान महर्षि अगस्ती मुनींचा आश्रम. शैशवावस्थेपासूनच प्रवरेचे स्नान, पान व प्रवरेत डुंबणे आणि अगस्ती आश्रमात खेळणे, बागडणे, अभ्यास करणे नित्याचेच. १९८५ साली अहमदनगरला, पेमराज सारडा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झालो तरी अकोल्याला आले रे आलो की प्रवरा आणि अगस्ती आश्रमात जाणे व्हायचेच. २०००-२००१ सालातली गोष्ट असावी. सन्मित्र, ब्लॅक कॅट कमांडो, श्री. रावसाहेब देशमुख सुट्टीवर अकोल्याला येणार होते म्हणून मीही मुद्दाम सुट्टी घेऊन अकोल्याला गेलो. दोघे प्रवरेत मुराद डुंबत होतो. मी सूर मारून डोके वर काढले, तो समोर प्रवरेच्या तीरावरील आम्रवृक्षाखाली भगवान महर्षि अगस्ती मुनी ऋषिवृंदासह

उपस्थित होते. माझ्याकडे रोखून पाहत त्यांनी मला आज्ञा केली, ''मला लिहून प्रकट कर!'' मी रावसाहेबला दाखवू लागलो तो तेथे कोणीच नाही. रावसाहेबने तर मला वेड्यातच काढले. भास झाला असेल, अशी संभावना केली.

पुढे मीही विसरून गेलो. जाणे-येणे सुरूच होते. फारसे काही घडले नाही. प्राचार्य झाल्यानंतरची गोष्ट. दर्शनाला गेलो. डोके टेकले. मला गदगदून हलवत शब्द घुमले, ''विसरलास. मला लिहून प्रकट कर सांगितले होते!'' तोच आवाज, तीच आज्ञा. घाबरलो. सर्वांगाला घाम फुटला. कसाबसा घरी परतलो. आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेजचा प्राचार्य, त्याला असे दिसले. म्हणजे भास झाला असेल हे सांगणेही वेडगळपणाचे होते. कोणालाही न सांगण्याचा निर्णय घेतला. गुदमरलो. कॉलेजचे नॅक परीक्षण तोंडावर होते. त्यात झोकून लक्ष घातले आणि विसरण्याचा प्रयत्न केला. मनातले काही गेले नाही. शब्द कानात घुमत होते. महर्षिंविषयी काहीही माहिती नव्हती. संशोधनप्रक्रियेची माहिती असल्याने संदर्भ गोळा करायचे ठरविले. संदर्भांची रास झाली. त्यातच केव्हाही, कधीही अगदी रात्री-अपरात्रीसुद्धा शब्द घुमत. झोप उडाली. भणभणल्यासारखे होऊ लागले. मोकळे व्हावे म्हणून पत्नीला सांगितले तर ती चिंतेत पडली. जवळच्या ज्येष्ठ सहकाऱ्याला सांगितले तर तो म्हणाला, ''सांभाळ रे बाबा; अशाने वेड लागते.''

योगायोगाने पू. स्वामी गोविंददेव गिरि नगरला आले होते. आमचे एक ट्रस्टी, श्रीमान नंदलालजी मणियार, यांच्या फार्म हाउसवर निवासाची सोय होती.

आमचे दुसरे ट्रस्टी श्रीमान श्यामशेठजी सारडा यांना पू. स्वामींची, त्यांच्या कवितासंग्रहासाठी प्रस्तावना हवी होती. त्यांनी मला बरोबर येण्याची विनंती केली. त्यांच्याबरोबर गेलो. त्यांचे आणि पू. स्वामींचे बोलणे सुरू असताना मनात विचार आला; पू. स्वामी, नगर जिल्ह्यातले. तसे परिचित. उत्तुंग आध्यात्मिक उन्नती केलेले. ह्यांनाच आपण का विचारू नये? भीत-भीत अनुमती घेतली. अगदी जवळ जाऊन कानाशी लागलो. घडलेले सांगितले. पू. स्वामींनी, माझ्या नजरेत रोखून पाहिले. काही कळण्याच्या आत, ताडकन् उठून आतल्या दालनात गेले. तेवढ्याच गतीने हार, आम्रफले आणि ग्रंथ घेऊन बाहेर आले.

हा प्रकार दर्शनार्थ जमलेले तीन-साडेतीनशे लोक बघत होते. पू. स्वामी

म्हणाले, ‘‘सहस्रबुद्धे, समोर या.’’ आणि सर्वांकडे पाहत म्हणाले, ‘‘हा प्राचार्यांच्या ज्ञानाचा सत्कार आहे.’’ माझ्या हातात आम्रफले आणि संत श्री गुलाबराव महाराजांचे पुस्तक देऊन तो भलामोठा हार माझ्या गळ्यात घातला. वंदनार्थ हात जोडले. प्रसंगावधान राखून मीही झुकून वंदन केले. ‘‘तुम्हाला महर्षिंनी आज्ञा केली आहे. ते सांगतील तसेच लिहा. घाबरू नका.’’ स्वामींनी आज्ञापिले.

जणू पुन्हा महर्षिंचे शब्द कानात घुमले. पुढे या साक्षात्कारामुळे एका सलग बैठकीत ९३७ ओव्यांचा ‘अगस्त्य माहात्म्य’, ओवीबद्ध उपासना ग्रंथ लिहून भगवान महर्षि अगस्त्यांच्या चरणी अर्पण झाला. याच कालावधीत हेतुपूर्वक ‘अगस्त्य’ या कादंबरीचे लेखन केले. या ग्रंथाचे प्रकाशनही मोठ्या नाट्यमयतेने प्रसन्न आणि मंगल वातावरणात पू. स्वामींच्याच हस्ते होळीपौर्णिमेच्या दिवशी घडले. मी शांत झालो. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या कृपेने भगवान महर्षिंच्या आज्ञेचे पालन मी करू शकलो.

पू. स्वामी गोविंददेव गिरी यांच्या अभिव्यक्तीतून, आविष्कारातून विविध प्रकारच्या लोकोद्धारक कार्यामधून तसेच हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठीच्या अथक उपक्रमतेतून, त्यांचे संतत्व देश-विदेशातल्या दृष्ट-अदृष्ट लोकांना प्रतीत होत आहे. ‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति’, ‘संत हेच भूमीवर चालते-बोलते परमेश्वर’ याचा साक्षात्कार पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातून प्रत्यही घडत आहे.

## तत्त्वज्ञ पू. स्वामी गोविंददेव गिरि :-

सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोगी असे विभूतिमत्त्व पू. स्वामींच्या संपर्कात येणाऱ्या, अनुग्रह घेणाऱ्या, सेवाकार्यात सहभागी होणाऱ्या, श्रोतृवृंदांमध्ये समाविष्ट असणाऱ्या सर्व व्यक्तींना प्रत्ययास येत आहे. राष्ट्रयोगविचार असा वैचारिक व्यूह त्यांच्या आविष्कारातून प्रकटपणे अनुभूत होतो. त्यापाठीमागची चर्चा आपण ‘सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार’ या प्रकरणात केली आहे. हा तात्त्विक व्यूह स्वामीजींच्या ठिकाणी त्यांच्या तत्त्वज्ञ या विभूतिमत्त्वातून प्रकटला आहे.

सामान्यतः पू. स्वामी गोविंददेव गिरि हे वेदप्रामाण्य मानणारे; वेदान्त-तत्त्वज्ञान अनुसरणारे सिद्ध तत्त्वज्ञ होत असे म्हणता येते. तत्त्वज्ञ स्वामींचे त्यांच्या ठायी परिपोषित झालेले, तत्त्वज्ञान त्यांच्या विभूतिमत्त्वातून प्रसारित होते.

## गुरुपरंपरेने तत्त्वज्ञान स्वीकार प्रक्रिया :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे दीक्षा तथा मोक्षगुरू कांची कामकोटी पीठाचे पीठाधीश श्रीमद् शंकराचार्य, श्री जयेंद्र सरस्वतीजी महाराज होत; तर त्यांचे संन्यासदीक्षागुरू हे पूर्वशंकराचार्य, भारतमाता मंदिराचे संस्थापक, पू. श्री सत्यमित्रानंदजी महाराज हे होत. याचा अर्थ श्रीमद् शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्त हे पारंपरिक तत्त्वज्ञान पू. स्वामींनी स्वीकारले असे दिसते. वेदान्त तत्त्वज्ञान किंवा वेदान्त दर्शन हेच उत्तरमीमांसा दर्शन म्हणूनही ओळखले जाते. ब्रह्मसूत्र हा या वेदान्त दर्शनाचा आधारभूत ग्रंथ होय. व्यासांच्या ब्रह्मसूत्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे डॉ. उदय कुमठेकर यांनी, प्रसाद प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या प्रथम आवृत्तीत पुढीलप्रमाणे दिले आहे -

'ब्रह्मसूत्राच्या पहिल्या अध्यायाची पहिली चार सूत्रे वेदान्त दर्शनाची चतुःसूत्री म्हणून ओळखली जाते. ब्रह्मसूत्राची ही चतुःसूत्री वेदान्ताचे सारच म्हणता येते. ब्रह्मसूत्राचा पहिला अध्याय 'समन्वयाध्याय' म्हणून ओळखला जातो. याच्या चार पादात ३९ अधिकरणे व १३४ सूत्रे आहेत. यात विविध श्रुतिवाक्यांचा समन्वय साधत ब्रह्म हेच जगताचे निमित्तकारण तसेच उपादानकारण असल्याचे प्रतिपादन करण्यात आले आहे.

ब्रह्मसूत्राचा दुसरा अध्याय 'समन्वय विरोध परिहार अध्याय' म्हणून ओळखला जातो. यात ४७ अधिकरणे व १५७ सूत्रे आहेत. ब्रह्म हे जगताचे उपादान कारण नसल्याचे प्रतिपादन, विविध मतांचे खंडन या अध्यायात करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने सांख्य-खंडनाचा समावेश होतो.

ब्रह्मसूत्राचा तिसरा अध्याय 'साधनाध्याय' म्हणून ओळखला जातो. या अध्यायात ६७ अधिकरणे १८६ सूत्रे आहेत. अपरोक्षानुभूतीसाठी वैराग्याचा साधना मार्ग आवश्यक असल्याचे निरूपण या अध्यायात करण्यात आले आहे.

ब्रह्मसूत्राचा चौथा अध्याय 'फलाध्यायन म्हणून ओळखला जातो. या अंतिम अध्यायात ३८ अधिकरणे व ७८ सूत्रे आहेत. या अध्यायात जीवनमुक्तीरूप फलाचे निरूपण करण्यात आले आहे.

'ब्रह्मणः सूचकानि वाक्यानि ब्रह्मसूत्राणि - ब्रह्माचे निरूपण करणारी सूचक वाक्ये म्हणजे ब्रह्मसूत्रे होत. हे स्पष्टीकरण ब्रह्मसूत्राची प्राचीनता स्पष्ट करते.' ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यापूर्वी इतर अनेक भाष्ये होती. पूज्यपाद शंकराचार्यांचा

काळच इ.स.पू. ५०० च्या आसपास येतो. हे लक्षात घेता ब्रह्मसूत्र त्यापूर्वी किमान हजार-पाचशे वर्षे असले पाहिजे.

उत्तरमीमांसा म्हणजे ब्रह्मसूत्रांवरील भाष्यग्रंथ होय. वेदान्त-दर्शनाचे सार संग्रहित करणाऱ्या ब्रह्मसूत्रावर अनेक भाष्यग्रंथ आहेत. पूज्यपाद आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य व मध्वाचार्य या आचार्यत्रयींचे भाष्य महत्त्वाचे आहे; परंतु डॉ. उदय कुमठेकर, पूज्य आद्य शंकराचार्यांचे मत हेच अद्वैत वेदान्त मत म्हणून ओळखले जाते असे म्हणतात.'

## डॉ. कुमठेकर प्रतिपादित ब्रह्मसूत्राचे शांकरभाष्य सारांशरूप :-

शांकरभाष्य तत्त्वज्ञानाचे काही महत्त्वाचे सिद्धांत सारांशरूपाने खालीलप्रमाणे मांडता येतील-

१) ब्रह्मसूत्राच्या प्रस्तावनाभाष्यात आचार्यांनी अध्यासाचा सिद्धांच मांडला आहे. हे संपूर्ण चराचर परब्रह्माने व्यापले आहे. तथापि त्याचे वास्तवस्वरूप अज्ञानी जीवाला कळून येत नाही. परब्रह्माच्या वास्तव स्वरूपावर जगताच्या अवास्तव स्वरूपाचा अध्यास होतो.

२) परब्रह्म परमेश्वर सत्-चित्-आनंद चैतन्यस्वरूप असून एकमेव-अद्वितीय आहे.

३) परब्रह्म परमेश्वर हेच जगताचे निमित्तोपादान कारण आहे.

४) जीव अज्ञानाने बांधलेला आहे. अज्ञानामुळे त्यास या चराचरात ओतप्रोत असलेल्या ब्रह्मचैतन्याचा अनुभव येत नाही.

५) अज्ञानाचा निरास झाला म्हणजे ज्ञान स्वतः सिद्ध आहे.

६) श्रुती हे अंतिम प्रमाण आहे.

७) जगताची सत्ता अ-पारमार्थिक असून ब्रह्मावर विवर्ताने अनुभवास येते.

८) जीवाचे बंधन मायोपादिक आहे. वास्तवात जीव ब्रह्मस्वरूपच आहे.

९) द्वैतानुभव केवळ व्यावहारिक सत्तेतच येतो.

१०) पारमार्थिक दृष्ट्या अद्वैताची अपरोक्षानुभूतीच वास्तव आहे.

श्रीमद् शंकराचार्यांच्या गुरुपरंपरेप्रमाणे पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी वेदान्त तत्त्वज्ञान हा आपल्या विभूतिमत्त्वाचा गाभा म्हणून परिपोषित केले आहे.

महाराष्ट्रातील भागवत किंवा वारकरी संप्रदायातील संतांनी वेदान्ताचा भक्तिमार्गी आविष्कार केलेला आहे. याला श्री स्वामी समर्थ रामदासही अपवाद

नाहीत. एवढेच नव्हे तर अगदी विसाव्या शतकातील प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज यांच्यासारख्या संतांचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्तावरच उभे आहे. भागवत संत अर्थात वैष्णव संत हा पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या केवळ जिव्हाळ्याचाच विषय नव्हे तर तो आत्मिकतेने अनुसरण्याचा विषय आहे. या दृष्टीने अद्वैत वेदान्त आणि संतमंडळाचा भक्तिमार्ग यांचा अनुबंध पू. स्वामींच्या आविष्कारातून सतत प्रकट होत राहतो.

## अद्वैत वेदान्त आणि संतांचा भक्तिमार्ग यांचा अनुबंध :-

डॉ. कुमठेकर हा अनुबंध सप्रमाण मांडून दाखवतात. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या कथाज्ञानयज्ञातून, प्रवचनातून याच प्रकारे हा अनुबंध सप्रमाण प्रकट होत असतो. डॉ. कुमठेकर यांचे विवेचन असे- भक्तिमार्गातील उपास्य दैवताविषयीचे परमप्रेम आणि त्यातून साधले जाणारे एकत्व हे अद्वैत वेदान्तावरच आधारलेले आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात- (ज्ञा. १३-८३३-६७)

**ते ज्ञान गा ऐसे । आदि जया नसे ।**
**परब्रह्म आपैसे । नाम जया ।।**
**जे नाही म्हणे जाईजे । तव विश्वाकारे देखिजे ।**
**आणि विश्वचि ऐसे म्हणिजे । तरी हे माया ।।**

आदि आणि अंत नसलेले परब्रह्म हेच ज्ञेय आहे. ते नाही म्हणावे तर या विश्वरूपात अभिव्यक्त झालेले दिसते आणि विश्व म्हणावयाला जावे तर माया ठरते!

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज म्हणतात- (गाथा २०२९)

**ध्येय ध्याता ध्यान विठ्ठल संपूर्ण ।**
**ज्ञेय ज्ञाता पूर्ण विठ्ठल माझा ।।**
**योग याग तप विठ्ठल नाम जप ।**
**पुण्य आणि पाप विठ्ठल बोला ।।**

संपूर्ण चराचरात एकमात्र विठ्ठलाचे रूप अनुभवणाऱ्या एकनाथांचे हे बोल अद्वैत वेदान्ताहून वेगळे नाहीत. हाच भाव प्रकट करीत तुकारामबुवा म्हणतात-

**अद्वय चिद्वय झालेचि कारण ।**
**धरिले नारायणे भक्तिसुख ।।**

**अपरोक्ष आकार झाला चतुर्भूज ।**
**एकतत्त्वी बीज भिन्न नाही ।।**

तुकाराम महाराजांची ही वचने अद्वैत वेदान्ताचाच भक्तिमार्गी आविष्कार आहेत. समर्थ रामदास म्हणतात– (दास. ९–९–१–२–३५)

**ब्रह्म वारिता वारे ना । ब्रह्म सारिता सारेना ।।**
**ब्रह्म काही वोसरेना । येकीकडे ।।**
**ब्रह्म भेदिता भेदेना । ब्रह्म छेदिता छेदेना ।।**
**ब्रह्म परते होईना । केले तरी ।।**
**वृत्ति ऐसि वाढवावी । पसरून नाहीच करावी ।।**
**पूर्णब्रह्मास पुरवावी । चहूकडे ।**

सर्वत्र ब्रह्मबुद्धी विकसित करून सापेक्ष अहंभावाचा नाश करावा हेच समर्थ सांगतात.

सद्गुरू गोरक्षनाथ, महात्मा कबीर, शीख संप्रदाय आद्य गुरू ग्रंथसाहेबा यातील विचारांची दिशा अद्वैत वेदान्ताला अनुसरणारी आहे यात शंका नाही.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी तत्त्वज्ञान विद्यापीठात आणि नंतर काशीनगरीत प्रत्यक्ष गुरुगृही राहून भारतीय तथा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास, चिंतन व आजवरच्या प्रवासात विविध दर्शनांच्या संबंधाने विविध तत्त्वज्ञ व्यक्तींशी खंडनमंडनात्मक चर्चा करीत आपला दृष्टिकोण सर्वकल्याणकारी अशा समन्वयवादी दृष्टीने तसेच सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुनरुत्थान–प्रक्रियेला पूरक अशा प्रकारे संशोधित स्वरूपात मंडित केला आहे.

## योगदर्शनाशी वेदान्तदर्शनाचा अनुबंध :–

पू. स्वामी गोविंददेव गिरि पातंजल योग विज्ञानावर सर्वव्यापकतेने चर्चा करतात. पातंजल योग विज्ञान हे भारतीय मानसशास्त्र आहे, हे स्पष्ट करून वेदान्ताची अनुभूती मानवाच्या ठिकाणी प्रत्यक्ष घडविण्याचे सामर्थ्य योगदर्शनात आहे, असा निर्वाळा स्वामी देतात. तत्त्वज्ञानाचा अंतिम उद्देश बृहदारण्यक उपनिषदातील *‘ॐ तमसो मा ज्योतिर्गमय । ॐ असतो मा सद्गमय । ॐ मृत्योर्मा अमृतं गमय ।’* असा आहे. त्यामुळे वेदान्ताचे साध्य सिद्ध करण्यासाठी योगदर्शन महत्त्वाचे ठरते, असे सांगत पू. स्वामीजी योगमार्ग हा सर्व मते व पंथ यासाठी आध्यात्मिक प्रयोगशाळा आहे, असे सूचित करतात. वैश्विक

पातळीवरील वेदान्तून उद्भवलेले वेददर्शन कल्याणकारीच आहे, असे ठामपणाने सांगतात. आस्तिक तसेच नास्तिक, वैदिक तसेच अवैदिक, ईश्वरवादी तसेच निरीश्वरवादी, आत्मवादी तसेच अनात्मवादी या सर्वांसाठी हा मार्ग सद्बुद्धीचा, सत्कर्माचा, स्वाध्यायाचा आणि सत्संगाचा असून मानवाला देवत्व प्राप्त करून देणारा आहे, असे स्पष्ट करतात.

**वेद आणि वेदान्त सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक धन :–**

रामकृष्ण मठात 'वेदान्त और पुरुषार्थ' याविषयी तीन दिवसीय व्याख्यानमालेत वेद, वेदान्त यांचा प्रत्यक्ष जीवनव्यवहारातील पुरुषार्थ संपादण्यासाठीचा अनुबंध पू. गोविंददेव गिरि यांनी स्पष्ट करून सांगितला. या व्याख्यानातून वेद आणि वेदान्त यावरील पू. स्वामींचा श्रेष्ठतम अधिकार स्पष्ट होतो.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी अर्थात राष्ट्रयोग–जागरणासाठी त्यांची ही तत्त्वज्ञान प्रसृती अतिशय महत्त्वाची वाटते. रामकृष्ण मिशन विवेकानंद आश्रम, रायपूर (छत्तीसगढ)चे अध्यक्ष, स्वामी सत्यस्वरूपानंदजी महाराज यांनी पू. स्वामींच्या या तत्त्वज्ञान प्रतिपादनावर अभिप्राय दिला आहे – ''पू. किशोरजीने सरलतापूर्वक निःसंदिग्ध रूप से यह प्रतिपादित किया है कि वेदान्त पुरुषार्थ का धर्म है, पुरुषार्थ का दर्शन है । आज के युग में इस वेदान्त की अत्यधिक आवश्यकता है ।''

**वेदान्त अर्थात उपनिषदांवरच्या आक्षेपांचे राष्ट्रपुनरुत्थानासाठी स्पष्ट शब्दांत निराकरण :–**

पू. स्वामी उपरोक्त रामकृष्ण मठातील व्याख्यानमालिकेत प्रचलित आक्षेपांचे पूर्णतः खंडन करतात आणि वेदान्ताचे महत्त्व पटवून देतात–

अनुभव कहता है वेदान्त के विषय में अनेक आक्षेप हम परंपरा में देखते हैं । इन आक्षेपों की ओर गहन दृष्टि डालें, तो ध्यान में आता है कि इस प्रकार के आक्षेप जिनका कोई निहित स्वार्थ नहीं हैं, ऐसे लोगों द्वारा भी उठाये जाते हैं । आलोचना करनेवाले अप्रामाणिक ही होते हैं, ऐसा सोचना ठीक नहीं होता । कभी–कभी लोक अल्पज्ञता के कारण इस प्रकार का भाव वेदान्तशास्त्र के लिए रख सकते हैं । वेदान्त के विषय में यह भी कहा जाता है कि जब हम इन प्राचीन ग्रंथों को पढते हैं और उनको प्रमाण के रूप में ग्रहण करने का आग्रह दिखता है, तो हमारी आज की विज्ञाननिष्ठा आहत होती है । विज्ञाननिष्ठा

में तर्कबुद्धि का और अनेक प्रक्रियाओंका - जिसमें निरीक्षण, प्रयोगादिक हैं समावेश होता है । यह विज्ञाननिष्ठा या बुद्धिनिष्ठा महाराष्ट्र में जिसको बडे आदर के साथ बुद्धिप्रामाण्यवाद कहा जाता है, उसके विरुद्ध वेदान्त की धारणाएँ है, ऐसा कभी-कभी आक्षेप होता है ।

कभीकभी यह भी आक्षेप होता है कि सारा वेदान्त निराशा से भरा हुआ है । इसलिऐ यह संन्यास की प्रवृत्ति को विशेष महत्त्व देता है उसके कारण समाज में अनेक बार ऐसे लोगोंकी वृद्धि होती है । अर्थशास्त्र की भाषामें कहा जाय तो इनकी Productivity कुछ भी नहीं होती । इनका कार्य unproductive होता है, इसलिए अर्थशास्त्र की दृष्टिसे वे हमारे लिए भारभूत भी हो जाते हैं । ऐसा आक्षेप न केवल हम पढते हैं, बल्कि पूज्य स्वामी विवेकानंदजी ने अपने जीवन में अनेक बार लोगों को बोलते हुए देखा और उन्हें अनेक बार उनका सामना करना पडा । ऐसा भी कहा जाता है कि वेदान्त एक संप्रदाय है । वेदान्त एक संस्कृत भाषा में दी गयी हम लोगोंकी विचारधारा है । यदि एक ही विचारधारा को महत्त्व दिया जाये तो उचित नहीं क्योंकि इस प्रकार की विचारधारा ने समाज को बांटा । ऐसी विचारधाराओं ने धर्म के रूप में खडे होकर समूची मानवता को छिन्न-विछिन्न कर दिया ।

वेदान्त के बारे में इस प्रकार का भी आक्षेप किया जाता है कि हमारे सामने मायावाद का एक बहुत बडा हौआ खडा कर वेदान्त ने हमें सांसारिक कर्तव्यों के प्रति विमुख कर दिया । उससे पराङ्मुख कर दिया । जगन्मित्थ्यात्ववाद हमारे सामने रख इसी वेदान्त ने हमारे पौरुष की हानि की । हमें ऐहिक उन्नति में निरंतर आगे बढते पराक्रम करते रहना चाहिए । यह भाव जगन्मित्थ्यात्ववाद के कारण, 'ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या' के कारण नष्ट हुआ । इस प्रकार के बहुत सारे आक्षेप हैं ।

आलोचनाएँ जो की जाती हैं, वे या तो हेतुतः वेदान्त के कुछ विचारों का प्रचार कम हो इस उद्देश्यसे योजनापूर्वक निंदा के रूप में । अनेक बार ग्रंथोंका तात्पर्य ठीकसे न समझकर भी आलोचना होती है । अज्ञान के कारण कभीकभी इस अहंकारसे भी कि जाती है की हमारे प्राचीन ऋषियों ने आखिर सोच-सोचकर कितना सोचा होगा, उनकी बुद्धि कितनी कही होगी? बुद्धिनिष्ठा अथवा बुद्धिवाद तो आधुनिक काल में बढा इस प्रकार के अहंकार से युक्त

आक्षेप भी हो सकता है । इन बातों का विचार क्रमशः किया जा सकता है । यह बात हम शांति से बैठकर भी देख सकते हैं कि इनमें से एक-एक आक्षेप निर्मूल है । वेदान्त इस आक्षेपों से परे है । इन आलोचनाओंका सही उत्तर हमें विचार करनेपर अपनेआप प्राप्त हो जाता है, जब हम वेदान्त के उस अमृतसागर में डुबकी लगाने का प्रयास करते हैं ।

**सनातन हिंदूधर्मराष्ट्रधारिणी श्रीमद् भगवद्गीता :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना शैशवावस्थेपासूनच श्रीमद् भगवद्गीता मुखोद्गत झाली होती. अखंड चिंतन आणि कुतूहलपूर्वक मनोमनी संज्ञापन करीत जीवनसंघर्षाचे अंतिम उत्तर श्रीमद् भगवद्गीतेत कोणत्या प्रकारे मिळते? भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेच्या रूपाने सर्व उपनिषदांचे साररूप अर्थात वेदान्त श्री अर्जुनांना राज्य संपादण्यासाठी सांगितला की, राष्ट्र, धर्मशास्त्र आणि योगशास्त्र यांचा नेमका संबंध काय? अशा अनेक प्रश्नांची उकल पू. स्वामी गोविंददेव गिरि, *'आपुलाचि वाद आपणासी ।'* या तऱ्हेनं करीत होते.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानासाठी भगवद्गीतेच्या दर्शनातून राष्ट्रयोगसिद्धी घडते, असे निश्चितच वाटू लागले आहे असे दिसते. ऋषिकेश येथे गीता साधना शिबिरात, 'श्रीमद्भगवद्गीता में समाहित समग्र योग' या विषयावर व्याख्यान देताना 'योग के सभी आयामों की प्रकाशक है गीता' या विषयांतर्गत राजर्षि छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देऊन सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी समर्पित योगसाधना कशी केली; हे पू. स्वामी स्पष्ट करून सांगतात. ते म्हणतात- 'एक होता है राजा, राजा कैसे होते हैं आप जानते हैं । लेकिन कुछ राजा ऐसे होते हैं, जिनकी जीवन की शैली ऋषि के जैसी होती है । वे हो गये राजर्षि । छत्रपति शिवाजी महाराज का वर्णन समर्थ रामदास स्वामी ने किया । और कोई ऐरा-गैरा वर्णन करता तो मैं उसको मानता ही नहीं । लेकिन जिन्होंने अपना पूरा का पूरा जीवन भगवान के लिए अर्पण किया और वैसा करके दिखाया है, ऐसे *''शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे । कवि वाल्मिकासारखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।।''* यह उनका परंपरा में वर्णन है । जिनका ज्ञान वसिष्ठ के समान है, जिनका वैराग्य शुकदेव के समान है, जिनकी काव्य प्रतिभा महर्षि वाल्मिकी के समान है, ऐसे रामदास स्वामी जब छत्रपति शिवाजी महाराज का वर्णन करते

हैं, तो क्या कहते हैं?

*''निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।''* यहे ऐरे-गैरे व्यक्ति के द्वारा किया गया सम्मान पत्र नहीं है । यह आजकल के पद्मभूषण-पद्मविभूषण, पद्मश्री वाला मामला भी नहीं है, यह दूसरा ही मामला है । सरकार तो अपने ढंग से यह सब देती है । वीतराग महापुरुष अपने लिए क्या बोलते हैं, उनकी अपने लिए क्या धारणा है? जो निःस्पृह है, जो राजगुरू होने पर भी, छत्रपति शिवाजी महाराज के दीक्षागुरू होने पर भी, उनके राज्याभिषेक में उपस्थित नहीं थे । जो इतने निःस्पृह हैं, ऐसे व्यक्ति के द्वारा किया गया उनका यह वर्णन है । तो यह जो ''श्रीमंत योगी'' शब्द है न, यह राजर्षि का अर्थ है । अब शिवाजी महाराज के ऊपर ही बोलने लग जायँ, उनके जीवन की पवित्रता के बारे में, उनकी विलक्षणता के बारे में, वह एक अलग ही बात है ।

'पूर्णयोगबोधिनी गीता' स्पष्ट करताना *'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे'*, यातील ब्रह्मविद्या योगशास्त्राच्या मार्गाने स्पष्ट केली आहे. याचा स्पष्ट अर्थ स्वामीजींना सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या धारणा-प्रक्रियेसाठी पुरुषार्थपूर्ण व्यष्टी आणि समष्टीची अपेक्षा आहे. त्यासाठी पू. स्वामीजी 'व्यक्तिगत, पारिवारिक एवं सामाजिक संतुलन की अनिवार्यता' यावर लक्ष केंद्रित करतात. ते सांगतात- ''गीता संदेश'' यदि आप लोगोंने देखा होगा, तो उसमें एक वाक्य मैंने लिखा है । वह वाक्य भगवद्गीता के सार के रूप में ही लिया है - ''व्यक्तिगत संतुलन को योग कहते हैं और सामाजिक संतुलन को धर्म ।'' धर्म यह applied योग है । और इसलिए भगवान भगवद्गीता का मोक्षानुगामी उपदेश करते समय भी, योग के लिए उपयोगी उपदेश करते हुए भी, समाज की वर्तमान स्थिति की उपेक्षा नहीं करना चाहते । और समाज की वर्तमान स्थिति अच्छी कब रहेगी? वह तब रहेगी जब हर व्यक्ति अपना अपना कर्म ठीक करेगा ।

श्रीमद् भगवद्गीतेचा विचार करताना; आध्यात्मिक उन्नती आणि भौतिक; अभ्युदय तसेच सगुण व्यवहारातून निर्गुण संवेदनेकडे प्रवास घडण्याच्या दृष्टीने वेदान्ताचा भक्तियोगाच्या माध्यमातून विनियोग होणे; पू. स्वामींना विशेष महत्त्वाचे वाटते. भक्ती अर्थात प्रेम, सत्य आणि करुणा या संवेदना ठायी असल्याशिवाय वेदान्तमूलक समत्वदृष्टीने प्रपंच घडत नाही. यासाठी जगद्गुरू श्रीकृष्णांनी

भक्तियोग साधनेचे महत्त्व सांगितले आहे, असे पू. स्वामी ठामपणाने प्रतिपादन करतात. त्यासाठी ते माउली ज्ञानेश्वरांचे प्रमाण देतात. 'ज्ञानेश्वरी चिंतन' या ग्रंथात ते म्हणतात– भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज जीवन की पूर्णता भक्ति में जानते हैं । *''चहु पुरुषार्थांचे शिरी । भक्ति जैसी ॥''* उन्होंने स्वयं भक्ति को इन चारों पुरुषार्थोंसे भी ऊपर रख दिया । पू. स्वामी गोविंददेव गिरिजी श्रीमद् भगवद्‌गीता हा वेदान्तप्रणीत सनातन हिंदूधर्मराष्ट्र धारणा करणारा ग्रंथ आहे, असा विचार मांडतात.

**श्रीमद् भागवतकथाज्ञानयज्ञ आणि राष्ट्रयोग :–**

श्रीमद् भागवत पुराण हे भक्तिरसामृत सागर आहे, अशी पू. स्वामींची वंशपरंपरेने आलेली मनोधारणा आहे. भक्तीची अनन्यता ते परोपरीने भागवताच्या आधारे कथाज्ञानयज्ञातून स्पष्ट करतात. भक्ती म्हणजे प्रेम. हे प्रेम परमेश्वराशी समरसून प्रकट होते. ते परमेश्वराशी समर्पित होते. मात्र सर्वाभूती परमेश्वर ही संवेदना म्हणजे भक्तीचा परमोत्कर्ष होय. ही भक्तीची विश्वव्यापकता व्यवहारात आणणे अतिशय महत्त्वाचे असते. व्यवहारामध्ये पुरुषार्थतेने व्यवहार करीत सर्वाभूती पमेश्वराची समरसात्मक संवेदना असणे आवश्यक असते; हे विविध कथांमधून स्वामीजी परोपरीने सांगत असतात. या त्यांच्या कथनात व्यक्ती, कुटुंब, परिवार, समाज, एकात्म धर्मराष्ट्र आणि विश्वकुटुंबत्व या तऱ्हेने कर्तव्य पुरुषार्थ प्रकटविण्याचे आवाहन असते. विश्वात्मक परमेश्वराशी एकरूप होऊन द्रष्टेपणाने प्रत्येक स्तरावर आरोग्यसंपन्नतेने, म्हणजे प्रेम आणि शक्ती सत्यनिष्ठेने प्रकट करून; व्यवहार केला तरच विश्वकल्याण होईल; असा संदेश पू. स्वामीजी सतत देत असतात.

भागवत कथाज्ञानयज्ञाच्या सुरुवातीला श्रीमद् भागवत–माहात्म्य स्पष्ट करताना पू. स्वामी सांगतात– 'कर्तव्य के रूप में सामाजिक कार्य करो । इनमें अटको नहीं और कह दो कि मैं किसीका ऋणी नहीं । मैं सिर्फ श्रीकृष्ण का हूँ ।' अशा तऱ्हेने निष्काम कर्मयोगाची शिकवण आणि पुरुषार्थाची शिकवण भागवत–कथाज्ञानयज्ञातून देत राष्ट्रयोगाचा परिपोष करतात. त्यांच्या कथायज्ञाचे साध्य असते–

**ज्ञानेन योगेन च कर्मणा च**
**भक्त्या च सर्वस्व समर्पणेन ।**

आराधिताभ्यां श्रुतिमार्गदक्षैः
नमो नमः श्रीगुरुपादुकाभ्याम् ।।३।।

## भगवान माउली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा राष्ट्रधर्म :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि स्वतःला श्री ज्ञानेश्वरपदाश्रित मानतात. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, विविध प्रकारचे अभंग हे स्वात्मबोधपर मनःशांती देणारे वाङ्मय प्रस्तुत केले आहे. पू. स्वामी मात्र ज्ञानेश्वरीचिंतनावर लक्ष केंद्रित करतात. याचे स्पष्ट कारण, भगवद्गीतेतील पूर्णयोगप्रबोध माउलींनी ज्ञानेश्वरीच्या स्थलकालपरिस्थितिसापेक्षतेने प्रकट केला आहे. सनातन हिंदूधर्मराष्ट्राची वेदान्तप्रणीत विश्वात्मक एकात्म भावाची अर्थात विश्वात्मक राष्ट्रभावाची प्रेरणा माउली ज्ञानेश्वर विश्वात्मक परमेश्वराकडे मागितलेल्या पसायदानातून देतात. संघर्ष हा जीवनाचा आत्मा आहे; हा संघर्ष पुरुषार्थपूर्णतेने सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेने केला तर विश्वातील भूतमात्रांचे कल्याण होईल; हा ज्ञानेश्वरीतील संदेश ते आत्मीयतेने प्रकट करतात. दृष्टादृष्ट अशा सर्वांच्या विजयासाठी सत्यनिष्ठेने प्रेमजागृतीने अपार करुणेने कर्म करणे पू. स्वामीजींना अपेक्षित असते.

## संत श्री गुलाबराव महाराज :-

माउली ज्ञानेश्वरकन्या प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराजांचे स्थान अनन्यसाधारण आहे. पू. स्वामी, संत श्री गुलाबराव महाराजांना जगद्गुरुस्वरूपात अनुभवतात. गुलाबराव महाराजांचा प्रभाव पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या तत्त्वज्ञान-प्रसृतीकरणावर स्पष्टपणे जाणवतो. ते संत गुलाबराव महाराजांना समन्वयक महर्षि असे संबोधतात सर्व तत्त्वज्ञानाचे परिशीलन सूक्ष्मातिसूक्ष्मतेने करताना पू. स्वामींना पडलेल्या प्रश्नांची सोडवणूक आणि पथदर्शन संत श्री गुलाबराव महाराजांच्या समन्वयदृष्टीतून घडले. विशेषतः अद्वैत आणि भक्ती यांचा समन्वय अतिशय चपखलतेने करून त्यांनी वेदान्तविषयक सर्व प्रश्नांचे निराकरण केले.

संत श्री गुलाबराव महाराज यांचा आपल्या स्वतःच्या तत्त्वज्ञानचिंतनावर कोणत्या प्रकारे प्रभाव पडला हे स्पष्ट करताना 'समन्वय-महर्षि संत गुलाबराव महाराज' या ग्रंथाच्या मलपृष्ठावर पू. स्वामी गोविंददेव गिरि लिहितात- 'विश्वमंगला वेदसंस्कृति क्यों जगमे सर्वोत्तम है? आर्योंके सिद्धांत तर्कसे सही प्रमाणित होते हैं? उपासना मत संप्रदाय के भेद कभी मिट सकते हैं? अखिल विश्वके धर्ममतोंका

कभी समन्वय संभव है? भाग्य नहीं पुरुषार्थ प्रबल है ऐसी श्रद्धा कैसे हो? कर्म, ज्ञान से योग, भक्ति का सुंदर संगम कैसे हो? सोपानोंसे दार्शनिकोंका सरल समन्वय कैसे हो? ऐसे अगणित प्रश्नोंमें क्यों मानव उलझाया हैं? संत गुलाबराव का वाङ्मय पथप्रदर्शन करता है । नहीं मिलेगा कहीं विश्वमें ऐसा अनुपन अमृत है । उसका थोडा स्वाद चखाया इस छोटी पुस्तक में है ।'

पू. स्वामी कथाज्ञानयज्ञ करीत असताना अथवा विविध ठिकाणी व्याख्याने देत असताना, स्थलकालपरिस्थितिसापेक्ष हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण करताना; जो पुरुषार्थपूर्ण कर्मसारणीतील समन्वय आणि समरसतेचा विचार मांडतात; तो संत श्री गुलाबराव महाराजांच्या प्रभावाने प्रकट होत असतो, हे स्वामीजी अनेकदा स्पष्टपणे बोलून दाखवितात.

**स्वामी विवेकानंदांच्या भूमिकेचा परिणाम :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरि, स्वामी विवेकानंदांच्या विश्वबंधुत्वाच्या आणि अध्यात्मनिष्ठ सनातन हिंदूधर्मराष्ट्र जागरणाच्या विचाराला अतिशय नम्रतेने आदर्शभूत म्हणून स्वीकारतात. त्यांच्या दृष्टीने स्वामीजींचा वर्तमानासाठी अत्यंत प्रभावी विचार पू. स्वामीजी स्पष्ट करतात – 'स्वामीजी का अत्यंत मूलगामी निष्कर्ष था कि अगर भविष्य में विश्व–कल्याण होना है, तो भारतीय विचार से ही हो सकता है । अतः भारतीय संस्कृति में जिन विचारोंका पोषण हुआ, जो विचार स्वामीजी ने प्रस्तुत किया वह भारतीय संस्कृति का था । अन्य लोगों के पास भी धर्मविचार है; परंतु भारतीय धर्मविचारों जैसी व्यापकता किसी में नहीं हैं ।'

**शिवसमर्थ योगाचा आदर्श :–**

पू. स्वामींच्या मते संत भौतिक अभ्युदयासाठी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी सत्य, प्रेम, करुणा संवेदनेने कार्यरत असतात. तशाच प्रकारचे विभूतिमत्त्व व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही ठिकाणी प्रकटावे अशी संतांची दृष्टी असते. त्याची सिद्धी करण्यासाठी ते लोकव्यवहारात संचार करीत असतात. कोणताही संत केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन करीत नाही. संत पारलौकिकवादी किंवा इहवादी असा नसतो. वेदान्त–तत्त्वज्ञानाचे मर्म म्हणजे या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे अनुभूत होणे होय. वर्तमानकालात अध्यात्मनिष्ठेने समग्र मानवी जीवन प्रकट होणे ही वैश्विक शांततेसाठीची अपरिहार्यता आहे, असे पू. स्वामींना वाटते.

आधुनिक काळातील संतद्वयींचे तत्त्वज्ञान आणि व्यवहारात्मक जीवन पू. स्वामी आदर्शभूत म्हणून आपल्या सर्व प्रकारच्या आविष्कारातून अतिशय नम्रतेने आणि अतिशय ठामपणे सांगतात. हे संतद्वयी म्हणजे पू. प्रातःस्मरणीय संत श्री स्वामी समर्थ रामदास आणि छत्रपती श्री शिवाजी महाराज होत.

पू. स्वामी सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध राष्ट्रयोगी अशा विभूतिमत्त्वाने वर्तमानात प्रतीत होत आहेत. यामागे तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञानात्म क व्यवहार किंवा ज्ञान आणि ज्ञानोत्तर भक्ती यासाठी आदर्शभूत असलेले राष्ट्रगुरु संत श्री स्वामी समर्थ रामदास आणि छत्रपती श्री शिवाजी महाराज हेच होत. वेद आणि वेदान्त यांचा प्रत्यक्ष वस्तुपाठ या दोन विभूतिमत्त्वांतून साक्षात होतो.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांची वाग्यज्ञातील वाङ्मयमूर्ती आणि प्रत्यक्ष रचनात्मक कार्यातील गणेशमूर्ती म्हणजे थेट समर्थ आणि शिवछत्रपती यांची आठवण करून देणारा, तत्त्वज्ञानाचा आविष्कार असतो. याच अर्थाने पू. स्वामी राष्ट्रयोगी आहेत.

## कवी पू. स्वामी गोविंददेव गिरि :–

भारतीय परंपरेमध्ये 'ऋषि' या पदाला पर्यायी पद या अर्थाने 'कवी' हे पद वापरलेले दिसते. द्रष्ट्या ऋषिंच्या ठिकाणी नावीन्याचा शोध भावोत्कटता उत्स्फूर्तता व त्यामुळे संवेदनेला प्राप्त झालेली नाद आणि लयमयता व त्यातून स्फुट झालेले वाणीआविष्कार हा स्वाभाविक गुण आढळतो. वैदिक परंपरेमध्ये सर्व ऋषिंनी छंदोबद्ध, गेय अशा उत्स्फूर्त रचना मांडलेल्या दिसतात. या रचनांना स्वभावतःच नर्तन, वादन, गायन अर्थात संगीतबद्धता आपसूकच चिकटलेली दिसते. या सर्व छंदोबद्ध गेय रचनांचा हेतू आनंदप्राप्तीबरोबरच आध्यात्मिक आणि भौतिक अभ्युदयाला प्रेरणा देणे असाच होता. 'काही तरावया गावे' असे ध्येय या काव्याविष्काराला अनुस्यूत होते. *''ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणिक्षमता अंतरंग ओथंबुनि ओसंडे ती सुंदरता । या सौंदर्य स्फुरणा म्हणती चैतन्यस्फूर्ती प्रसाद भगवंताचे देणे नैसर्गिक शक्ती ।''* अशी काव्यप्रकटीकरणाची प्रक्रिया ऋषि, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत यांच्या ठायी स्वाभाविकपणे असतेच. प्रातीभ ज्ञानाचा प्रतिभाविलास ठायीच सहज घडतो. पू. स्वामी गोविंददेव गिरि हे या परंपरेतील कवी होत.

## वाग्यज्ञातील काव्यात्मकता :–

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा वाणीआविष्कार सतत सुरू असतो. चर्चा, सभासंमेलने, प्रवचने आणि कथाज्ञानाविष्कार या सर्व उपक्रमांचे वेळी त्यांच्या ठायीच्या परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चारही प्रकाराने त्यांचा वाणीआविष्कार सुरू असतो. वाणीआविष्कार ही प्रयोगसिद्ध वाङ्मयकला आहे. त्याबरोबरच ही कला केवळ रंजनात्मकतेसाठी नाही तर तो विधिनाट्यात्मक ज्ञानयज्ञ असतो. त्यामुळे वाणीचे लावण्य श्रोतृसंवाद घडताना भावोत्कटता आपसूकच निर्माण होते. स्वामींच्या या वाणीयज्ञात जणू मंगलमूर्ती गणराया आणि प्रतिभादेवी सरस्वती पू. स्वामींच्या रसनेवर संगीतविहार करीत असतात. *'काव्येषु नाटकं रम्यम्'* असे म्हटले जाते, ते स्वामींच्या काव्यात्मक वाग्यज्ञसंदर्भात यथार्थ वाटते. माउली ज्ञानोबारायांनी म्हटल्याप्रमाणे या वाणीआविष्कारप्रसंगी *'बोलें इंद्रियां लागे कळभां'* अशी अवस्था स्वाभाविकपणे सत्संगी श्रोत्यांच्या ठिकाणी प्रकटते. शांतरसासह नवरसात्मकतेने प्रकटणारी ही काव्यात्म वाणी प्रामुख्याने सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी ओजस्वितेने प्रकटते तेव्हा श्रोतृवृंद वक्त्यासह कीर्तनरंगात रंगून गेलेला असतो. अष्टसात्त्विक भाव आणि पुरुषार्थप्रवण ओजस्वमूलक तेजस्विता ओथंबून ओसंडत असते.

## पू. स्वामी–विरचित आरती गीते :–

कविता छंदोबद्ध असते; किंबहुना ती असावी लागते आणि हा छंद उत्स्फूर्तपणेच प्रकट होत असतो. या कारणानेच नाट्य–शास्त्र मंडित करणारे भरतमुनी यांनी, 'काव्य ब्रह्मदेवाने प्रदान केले आहे' असे म्हटले आहे. अलीकडच्या काळात आधुनिक कवितांच्या प्रांतांत तथाकथित काव्यशास्त्र्यांनी कविता आणि गीत यात अकारण वितंड निर्माण केलेला दिसतो. अक्षरगणवृत्ते, मात्रावृत्ते, ध्रुपदासह प्रकटणारी मात्रावर्तनी किंवा अक्षरावर्तिनी कवितादेखील छंदोबद्धच असते. मुक्तछंद हादेखील एक छंदप्रकारच आहे. भारतीय परंपरेमध्ये प्रासात्मकता आणि यमकात्मकता काव्यरचनांशी जोडलेल्याच असतात.

मध्ययुगीन संतांच्या कवितेत ध्रुपदकेंद्रित भावगीतसदृश छंदोबद्ध शरण्यभावात्मक आणि स्तुतिसूक्तात्मक आत्यंतिक भावोत्कट अशा आरती–रचना संतांनी केलेल्या दिसतात.

भक्तीची उत्कटता आणि आराध्याचे यशगान हा आरती–गीतांचा

व्यवच्छेदक असतो. याच प्रकारांनी अथवा गुणधर्मांनी पू. स्वामी गोविंददेव गिरि आरती-रचना करताना दिसतात.

त्यांची 'संत श्री ज्ञानेश्वर की आरती' ज्ञानेश्वरांचे भावपूर्ण वर्णन करते. उदा.

**धर्मसंस्थापक गुरुवर की । आरती श्री ज्ञानेश्वर की ।।धृ।।**
**रम्य इंद्रायणी तट विलसे**
**सिद्धेश्वर शिवजी नित्य वसे**
**आलंदी क्षेत्र निवासी की । आरती ... ।।१।।**
**विश्व चिन्मय स्वरूप हरिका**
**बंधुसम भाव रहे सबका**
**बोध अमृत रस दाता की । आरती ... ।।२।।**

अशाच प्रकारची श्री संत गुलाबराव महाराजांची आरती -

**आरति संत गुलाबराव की**
**अद्‌भुत अनुपम श्रीसद्‌गुरु की ।।धृ।।**
**धन्य विदर्भ धरा भई पावन**
**संत पधारे जगदुद्धारण ।**
**शैशव से लीला विस्तारण**
**प्रज्ञाचक्षु जगद्‌गुरुवर की ... ।।१।।**
**वेदधर्म शुभ विश्वोद्धारक**
**विज्ञानानुकूल हितकारक**
**भक्ति चरम सिद्धांत निदर्शक**
**धर्मसमन्वय कुशल सिद्ध की ... ।।३।।**

भारतमातेची आरती सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या दृष्टीने लक्षणीय ठरते. वेदान्तप्रणीत धर्मराष्ट्राचे जागरण विश्वव्यापकतेच्या भावनेने घडते आहे ही भावनाही तीतून प्रकटते.

**आरती भारत माता की**
**जगत की भाग्यविधाता की ।।धृ।।**
**मुकुटसम हिमगिरिवर सोहे,**
**चरण को रत्नाकर धोए,**

**देवता कण–कण में छाये**
**वेद के छंद, ग्यान के कंद, करे आनंद,**
**सस्यश्यामल ऋषिजननीकी ।।१।। जगत की ...**
**बढाया संतों ने सम्मान,**
**किया वीरों ने जीवनदान,**
**धर्म में सदा निहित है प्राण,**
**चलेंगे साथ, हाथ में हाथ, उठाकर माथ,**
**शपथ गीता–गौमाता की ।।५।। जगत की ...**

छत्रपती शिवाजी महाराजांची आरती सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी सिद्ध राष्ट्रयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांचे एक प्रकारे सूक्तच विरचित केले आहे –

**हर हर महादेव आरती, हिंदुसाम्राज्य शुभंकर की ।**
**जय भवानि जय शिवाजि राजा, जय भगवा ध्वज की ।।धृ।।**
**धर्म–नीतिमय शुभ आचार**
**अनाथ जनता का आधार**
**कार्य करों से अद्‌भुत प्यार**
**कार्यदक्षता धन्य छत्रपति, शिवाजि राजा की ।।२।। हर हर ...**
**सदाचार पुरुषार्थ जगाये**
**क्षात्रतेज संचार कराये**
**शौर्य, धैर्य, उत्साह बढाये**
**देश–धर्म–सेवा–स्फूर्ति–प्रद कथा शिवाजी की ।।५।। हर हर ...**

## प्रार्थनांचा अनुवाद :–

मराठीतील माउली ज्ञानेश्वरांचे पसायदान ही सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या विश्वात्मक भूमिकेची संहिता आहे. या पसादयानाचा भावानुवाद पू. स्वामीजींनी तेवढ्याच प्रासादिकपणे राष्ट्रभाषा हिंदीमध्ये केला आहे. उदा.– त्यातील अंश असा –

**– पसायदान –**

**विश्वात्मक परमात्मा अब इस, वाक्–यज्ञ से राजी हो ।**
**प्रसन्न होकर मुझे प्रभो बस, यह वरदान प्रसादी दो ।।१।।**

**और विशेष रूप से जिनका, जीवनधन यह ग्रंथ रहे ।**
**इह–परलोक कहीं भी उनके, विजय सर्वदा साथ रहे ।।८।।**
**यह सुनकर विश्वेश्वर बोले, यही मिलेगा प्रसाद दान ।**
**पाकर यह वर ज्ञानेश्वर भी हुए पूर्ण आनंद मगन ।।९।।**

राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज प्रातःस्मरणीय पू. समर्थ रामदास यांचा 'राष्ट्रगुरू' म्हणून गौरव करतात. सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे आदर्श राष्ट्रपुरुष प्रभु रामचंद्र यांच्याकडे समर्थांनी 'पावनभिक्षा दान' प्रार्थना केली आहे. त्याचा भावानुवाद पू. गोविंददेव गिरि यांनी केला आहे. त्यातील उदाहरणार्थ अंश –

**– पावन भिक्षा –**

**राम राम जय राजाराम... पावन भिक्षा दे दो राम ।।धृ।।**
**कोमल वाणी दे दो राम । निर्मल करणी दे दो राम ।**
**प्रासंगिक मति दे दो राम । चतुराई भी दे दो राम ।।१।।**
**हितकारक जो दे दो राम । जनसुखकारक दे दो राम ।**
**इंगितज्ञता दे दो राम । बहुजनमैत्री दे दो राम ।।२।।**
**तन्मयता मोहे दे दो राम । अर्थारोहण दे दो राम ।**
**सज्जनसंगति दे दो राम । अलिप्तता मोहे दे दो राम ।।७।।**
**ब्रह्म अनुभव दे दो राम । अनन्य सेवा दे दो राम ।**
**पूर्ण समर्पण दे दो राम । दास कहे मोहे दे दो राम ।।८।।**

## पू. स्वामींची गुरुदेवांप्रत प्रार्थना :–

पू. स्वामींनी गुरुदेवांकडे केलेली प्रार्थना सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी केलेली प्रार्थनाच म्हणावी लागेल. या प्रार्थनेत त्यांच्यातील राष्ट्रयोगी विभूतिमत्त्वाच्या ध्येयसिद्धीची उत्कट अपेक्षा व्यक्त झाली आहे –

**– प्रार्थना –**

**है प्रार्थना गुरुदेवसे, हो स्वर्गसम माँ भारती**
**संसार में उन्नत रहें, सबजन उतारे आरती ।**
**हो आचरणसे शुद्ध हम, इस विश्व से मैत्री करें**
**हर दुःख–दैन्य–दरिद्रता, निज बोध से सबकी हरे ।।१।।**
**धन–धान्यसे समृद्ध हो, धरती यहाँ की सर्वदा**
**हो मुक्त आधि–व्याधि से, आये न कोई आपदा ।**

**विज्ञानमय मस्तक हमारा, स्नेह अंतरमें बहें**
**वेदान्तकी हो दृष्टि हरपल, हाथ सेवा में रहें ।।२।।**
**परिवार में सुख–शांति हो, कर्तव्यतत्पर व्यक्ति हो**
**आरोग्य–शिक्षा–धन उपार्जन, सर्वधा उपलब्ध हो ।**
**ग्रामीण पिछडे बंधुओंकी, शीघ्र होवे उन्नति**
**गिरिवासि–वनवासी–अपंगों को मिले सेवा–तति ।।३।।**
**स्वातंत्र्य–समता–बंधुता हो विविधता में एकता**
**हो सर्व भेद विलीन समरस जागती राष्ट्रीयता ।**
**सद्बुद्धि–बल–पुरुषार्थ से चारित्र्य और विवेक से**
**संपन्न हो युववर्ग भी सर्वत्र दिग्विजयी रहें ।।४।।**
**यह विश्व है हरिरूप इसकी, कर्मसे पूजा करें**
**हम दीपवत् जलकर स्वयं इस, संस्कृति का तम हरें ।**
**कल्याण होवे विश्वका, निर्वता का भाव हो**
**मंगल समन्वय–मंत्र गूँजे धर्मकी यह राह हो ।।५।।**
**।। भारत माता की जय ।।**

**संस्कार–प्रेरणागीते :–**

'कार्यकर्ता सहचिंतन' बैठकीच्या निमित्ताने कार्यकर्त्यांना 'संस्कार'–साधना कशी करावी याविषयी प्रेरक मार्गदर्शन करताना संस्कार–साधनागीत लिहिले आहे. त्या प्रेरक गीताचा वेचक अंश असा–

**संस्कार–साधना**

**कार्य साधना अविरत अपनी, संस्कारों का सजन करें ।**
**आदर्शों के पथ पर चलते, देश नया निर्माण करें ।।धृ।।**
**वन्दे मातरम् – २**
**संयम, सेवा ज्ञानार्जन से सदाचारमय श्रद्धा से,**
**कर्मयोगमय जीवन अपना, भरा रहे सात्त्विकता से ।**
**देशप्रेम अरु मानवता का रग रग में संचार करें ।**
**आदर्शों के पथ पर चलते, देश नया निर्माण करें ।।२।।**
**ईश्वरमय है अखिल विश्व यह, संतों की पावन शिक्षा,**

**अपनाकर वैज्ञानिक दृष्टि, करें संस्कृति की रक्षा ।**
**चलें विवेकानंद–मार्ग पर, त्याग–शील साकार करें ।**
**आदर्शों के पथ पर चलते, देश नया निर्माण करें ।।३।।**

Success Strategies For Students... या युवक विद्यार्थ्यांसमोरील प्रबोधनवर्गात, भारतीय म्हणून आपण कोणते उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले पाहिजे व जन्मभर त्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत; याविषयी प्रबोधन करताना पू. स्वामीजी उत्स्फूर्त काव्यपंक्ती सादर करतात. –

**'Bharat as a Nation -**
**Undivided Bharat -**
**Independent Bharat !**
**Aim high - Dream big**
**Live & Strive for the Motherland**
**Strive for excellence -**
**Cultivate morality & highest virtues**
**Hold on to rightousness !**
**This leads to a successful meaningful life !**

संगमनेर येथे संस्कार शिबिरामध्ये शिबिरार्थींना प्रेरक अशा प्रकारचे गीत पू. स्वामी सादर करतात. या संस्कार–प्रेरणा गीतातील काही अंश असे–

**संस्कार–प्रेरणागीत – १**

**सदाचार ही सत्य धर्म है, पवित्र वेदोंका उद्‌गार ।**
**भारतीय संस्कृतिका डिंडिग, सदाचार से ही उद्धार ।।**
**शरीर–मानस–वाणी सब की, सन्मार्गोपर सदा बढे ।**
**यही कामना लेकर अपने, साथी इस कार्यार्थ खडे ।।**
**देश–धर्म की सेवा ही है, मानव के जीवन का सार ।**
**जिसमें यह संस्कार न आया, वह तो निरा भूमि का भार ।।**
**अगणित दीप जलेंगे ऐसे, समत् एक दिन भागेगा ।**
**पौरुष की आहुति से निश्चित, भाग्य देशका जागेगा ।।**

याच संस्कार–प्रेरणागीताचा मराठीतील अनुवादाचा अंश असा–

**‘सदाचारही सत्यधर्म’ हा**
**पवित्र वेदांचा उद्‌गार,**
**गर्जत आपुली संस्कृति–भारती**
**सदाचार करितो उद्धार ।।१।।**
**काया वाचा मनसा पाउल**
**सन्मार्गावर सदा पडो**
**हीच सदिच्छा धरुनि हृदयी**
**देहाने सत्कर्म घडो ।।४।।**
**सदाचारमय जीवन अपुले**
**देशभक्तिमय हो व्यवहार**
**संस्कारांची ज्योत चेतवुनि**
**भरा प्रकाशाने संसार ।।७।**
**देश धर्म यांची सेवा करी**
**मानव जन्माचे हे सार**
**या संस्काराविण जो जगला**
**तो झाला भूमिला भार ।।८।।**
**सोबत कोणी असू–नसू दे**
**मार्गक्रमणा सतत घडो**
**आत्मदीप तव अंधकार हा**
**नाशायाला सदा जळो ।।९।।**

कार्यकर्ता सहचिंतन बैठकीच्या निमित्ताने आणखी एक संस्कार–साधनागीत स्वामीजींनी मलपृष्ठासाठी लिहिले आहे. त्यातील अंश असा–

**सद्‌गुणों की साधना में, ध्येय–ज्योति नित जलें ।**
**संग्राममय जीवन धरापर, विजय रथ ले हम चलें ।।धृ।।**
**बुद्ध जैसे कारुणिक हो, धीर हम महावीर–से ।**
**ध्रुवबाल जैसे निश्चयी, सत्याग्रही प्रह्लाद–से ।**
**दुर्दम्य सारे संकटों में, अग्निपथपर भी खिलें ।।२।।**
**हनुमान से सेवाव्रती, जिज्ञासु हो नचिकेत–से ।**
**कर्मयोगी कृष्ण जैसे, वीर हो हम पार्थ–से ।**
**बलिदान गोविंदसिंह–सा हो, स्वार्थ सारा ही जले ।।३।।**

**वंदनीय विभूतिमत्त्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन :-**

स्व. पं. मदनगोपालजी व्यास (पिताश्री) यांच्या चरित्रग्रंथलेखनाच्या निमित्ताने मलपृष्ठावर कृतज्ञतापूर्वक ते गौरव करतात.

**– पुण्यश्लोक –**

**वेदश्रद्धा, सदाचार अन् कुटुंबवत्सलता ।**
**भगवद्भक्ति सर्वांसाठी समता अन् ममता ।।**
**या जीवनमूल्यांचे दर्शन हे तुमचे जीवन ।**
**त्यांचे पुण्यस्मरण आम्हाला दैवे दिधले धन ।।**
**तेच जपाचे हृदयी आणिक सतत वाढवावे ।**
**ऐसे दे बळ देवा आम्हा प्रार्थतसू भावे ।।**
**बिल्वपुरी ही धन्य जाहली तुम्हास पावोन ।**
**केशव–गोविंदांची छाया मिळो आम्हा पूर्ण ।।**

शिवसमर्थ गडावर शिवजयंतीच्या दिवशी तसेच तुकाराम बीज अर्थात संत तुकाराम महाराज पुण्यतिथीच्या पर्वात धर्मसंस्थापक राजा शिवछत्रपती यांना आपल्या हृदयसिंहासनावर स्थानापन्न करताना, पू. स्वामी गोविंददेव गिरिजी कृतज्ञतापूर्वक शिवछपतींना गौरवान्वित करून स्वा. सावरकर प्रणीत प्रार्थना करतात.

'शिवदृष्टी आणि शिवसृष्टी' याविषयी चर्चा करत रामरक्षेतील श्लोकाप्रमाणे श्लोकबद्धतेने पू. स्वामीजी शिवसमर्थांचा गौरव करतात. तो श्लोक असा–

**चरितं रघुनाथस्य, शास्त्रं योगेश्वरस्य च ।**
**कार्यं शिवसमर्थस्य प्रत्यूषे प्रत्यहं स्मरेत् ।।**

'वेदान्त और पुरुषार्थ' या निमित्ताने रामकृष्ण मठातील व्याख्यानात 'वेदान्त एवं पुरुषार्थका संगम – भक्ति' या निमित्ताने भारतात्मा विवेकानंद आणि नरकेसरी लोकमान्य टिळक या महान विभूतिमत्त्वांचा गौरवपूर्वक उल्लेख करतात.

विविध प्रसंगांनी पू. स्वामी गोविंददेव गिरि आपल्या उत्कट भावनांचा आविष्कार सहज स्फूर्ततेने काव्यबंधात करतात. अलिकडेच अयोध्या येथे प्रभु श्रीराम–मंदिराच्या उभारणीसाठी अर्थात राष्ट्रमंदिराच्या उभारणीसाठी पू. स्वामींनी कोषाध्यक्षाची जबाबदारी स्वीकारली. सर्व भारतीय नागरिकांचा सहयोग कोषसंकलनात असावा यासाठी भारताचे प्रथम नागरिक महामहिम

राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्याकडे निधिसंकलनासाठी गेले. या अत्युत्कट रोमांचकारी प्रसंगाच्या निमित्ताने त्यांनी कविता लिहिली आणि तेवढ्याच रोमांचिततेने ती प्रसार माध्यमांसमोरही सादर केली. राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा कवितालेखन प्रपंचदेखील *'राष्ट्राय स्वाहा! इदं न मम्'*, असाच सुरू आहे. सहजच स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण या निमित्ताने होणे अपरिहार्य आहे.

**बहुभाषाप्रभू – पू. स्वामी गोविंददेव गिरि :–**

भाषाप्रभू असणे म्हणजे त्या भाषेतून मनन, चिंतन, लेखन, श्रवण, सहज संवाद व सहज विचारप्रवर्तन घडणे आवश्यक असते. त्याचबरोबर शब्दसंग्रह, शैलीलाघव आणि मातृभाषेतून सहज प्रतिभाविलासाचे सामर्थ्य असावे लागते. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या वाणीआविष्कारातून या सर्व परिणामांनी त्यांचे बहुभाषाप्रभुत्व श्रोते, वाचक, सहयोगी कार्यकर्ते, अनुयायी, अनुग्रहित यांना सतत अनुभूत होत राहते. त्यांचा वाग्यज्ञ राष्ट्रभाषेत शब्दांकित करून सर्वत्र प्रचाराच्या दृष्टीने ग्रंथमांडणी केलेली दिसते.

असे असले तरी बालवयातच त्यांच्या ठायी भाषाप्रज्ञा प्रकट झाली आणि ते संस्कृत, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या चारही भाषांतून, तीच मातृभाषा असल्याप्रमाणे बोलू-लिहू लागले. प्राचीन भारतीय संस्कृत वाङ्मयाचा अर्थात वेदोपनिषदे, षट्शास्त्रे, ज्योतिर्विज्ञान आदींचा त्यांचा व्यासंग घराण्याच्या परंपरेपासून ते काशीनगरीतील आचार्य म्हणून पदवीसंपादनापर्यंत सतत वर्धिष्णु राहिला.

याचा प्रत्यय कथाज्ञानयज्ञातून, प्रवचनातून मुळातील संदर्भांचे सादरीकरण करण्यामधून सहज प्रत्ययास येतो. महाराष्ट्रातील मराठी संतवाङ्मयाचा त्यांचा अभ्यास आणि संतमालिकेविषयीची कृतज्ञता त्यांच्या विभूतिमत्त्वातून व सहज स्फुट होणाऱ्या संदर्भातून लक्षात येते. अलीकडील काळात इंग्लिश मीडियम-शिक्षित श्रोत्यांच्या समोर त्यांचा इंग्रजी भाषेतील वाक्विलास मंत्रमुग्ध करणारा असतो. विविध विदेशांमध्ये ते इंग्रजीमधूनच सत्संग करताना दिसतात. भारतात सामान्यतः हिंदी भाषेतून त्यांचा वाणीआविष्कार घडतो.

असे असले तरी राजस्थानात राजस्थानी तथा मारवाडी भाषेतून, गुजराथमध्ये गुजराथी भाषेतून, महाराष्ट्रात मराठी भाषेतून तर दक्षिणेत इंग्रजी भाषेतून त्यांचा

कथाज्ञानयज्ञ सुरू असतो.

श्रीमद् आद्य शंकराचार्यांप्रमाणे सतत भ्रमंती, सतत सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थान विचार यासाठीची राष्ट्रयोगसाधना सुरूच असते. यातील आणखी वैशिष्ट्य असे की, इंग्रजी असो किंवा भारतीय भाषा असो, त्यांच्या वाक्यज्ञातील विवेचन अचूक पारिभाषिक शब्दांचा वापर करीत तसेच त्यांचा सोप्या स्थलकालपरिस्थिती सापेक्ष भाषेत सतत उलगडा करून दाखविणे सुरूच असते. असे भाषाप्रभुत्व संपादन करणे केवळ थक्क करणारे आहे.

**राष्ट्रयोगी पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातील चतुरंग दर्शन :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे राष्ट्रयोगी असे विभूतिमत्त्व अनेकविध पैलूंनी प्रकाशित होते. त्यातील संत, तत्त्वज्ञ, कवी आणि बहुभाषाप्रभू या विभूतिमत्त्वातील पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न येथे केला आहे. विभूतिमत्त्वाचे दर्शन समग्रतेनेच घडत असते. रत्न जसे समग्रतेने प्रकाशते तथापि त्यातील प्रत्येक पैलू हा त्या समग्रतेचे सौंदर्य आपल्या पृथक अस्तित्त्वाने तरी समरसतेने प्रदर्शित करीत असतो. त्याचप्रमाणे पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वातील पैलूंचे चतुरंगदर्शन वैशिष्ट्यपूर्णतेने घेता येते.

* *

## ।। आठ ।।

# राष्ट्रयोग्याचा कथाज्ञानयज्ञ

कथाज्ञानयज्ञाचे वेगळेपण - भक्तिमार्गाने राष्ट्रयोगसाधनेची परंपरा - राष्ट्रयोग्याचा कथाज्ञानयज्ञ साध्य आणि साधनही - श्रीमद् भागवतकथा - श्रीमद् देवीभागवत महापुराण - महाभारत कथा - हनुमान कथा - रामकथा-ज्ञानयज्ञ - तत्त्वज्ञानात्मक कथाज्ञानयज्ञ - कथाज्ञानयज्ञातून सर्वांगीण प्रबोध.

## ।। आठ ।।

# राष्ट्रयोग्याचा कथाज्ञानयज्ञ

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या कथाज्ञानयज्ञाची सुवर्णम होत्सवी वाटचाल सुरू आहे. नारदीय परंपरेने अखिल विश्व प्रेमस्वरूपा भक्तीने भरून भारून जावे. विश्वातील अखिल मानवमात्र स्वरूपसिद्धीने सिद्ध पुरुषार्थपूर्ण व्हावा, स्वतःबरोबर संपूर्ण विश्व कैवल्यक्रीडामग्न व्हावे यासाठीचा हा वाक्यज्ञ. परमात्म्याची विश्वात्मक आविष्कार अनुभूती प्रत्येकाच्या ठायी घडावी, परमात्म्याच्या वैश्विक आविष्कारातून संवेदित झालेली जीवनलीला सत्य, प्रेम, करुणा ह्या संवेदनेने घडावी, वासनादेहाच्या देहभूत विकारातून व्यवहारात जीवाला त्रिविध तापाने व्यापणारी आसक्तीने, अहंकाराने, स्वकेंद्रिततेने मुळात सच्चिदानंदस्वरूप असलेली आत्मानुभूती, बाधित होऊन; शोषक संघर्षाने जीवाजीवाला अशांत करणारी वासनाविकार अवस्था निवारावी, यासाठी ही वाक्यज्ञलीला मोठ्या तितिक्षेने पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज आरंभापासूनच करीत आहेत.

वयाच्या अवघ्या किशोरअवस्थेतूनच पूर्ण ज्ञानावस्था ज्यांच्या ठायी प्रकटली अशा दिव्य व्यक्तिमत्त्वाचा हा प्रवास आजही चालू आहे.

भगवान श्रीकृष्णांच्या चराचराला दिलेल्या अभिवचनाच्या कलियुगातील परिपूर्तीसाठीचा पायिक होऊन हा भगवद्भक्त योगी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.

परात्पर जगद्गुरू भगवान श्रीकृष्ण, महर्षि वेदव्यास, श्रीमद् जगद्गुरू आद्य

शंकराचार्य यांच्या विश्वशांतीसाठीच्या योगप्रक्रियेचा भाग म्हणून अखंड चिंतन, अखंड भ्रमण, अखंड प्रबोधन करीत हा श्रीमंत योगी स्वतःबरोबर सत्संगी सर्वांना बरोबर घेऊन ज्ञानजागरणाचे कार्य करीत आहे. या कार्याचा वाणीआविष्कार म्हणजे प.पू. गोविंददेव गिरि यांचा कथाज्ञानयज्ञ होय.

**कथाज्ञानयज्ञाचे वेगळेपण :–**

संपूर्ण भारतवर्षात कथाज्ञानयज्ञ करणाऱ्या आचार्यांची, संतांची संख्या अक्षरशः हजारोंवर पोहोचली आहे. कथाज्ञानयज्ञात सहभागी होऊन स्वतःला पावन करून घेण्याची अहमहमिका अक्षरशः कोट्यवधी सत्संग-साधकांच्या ठिकाणी जागृत झाली आहे. कथाज्ञानयज्ञाच्या आयोजनातून प्रसिद्धी, प्रतिष्ठा आणि पावनता प्राप्त करून घेता येते आणि आध्यात्मिक जागरणाचे श्रेयही संपादन करता येते; यासाठी समाजातील धनवान, प्रतिष्ठित तसेच सामाजिक, राजकीय धुरीणत्व करणारे नेते, विविध सांस्कृतिक मंडळ्या, अनेक संस्था हिरिरीने पुढे सरसावत आहेत. या निमित्ताने भाविक भक्तांची मांदियाळी निर्माण होते आहे; ही गोष्ट सात्त्विक वातावरणनिर्मितीसाठी आश्वासक आहे हे खरेच.

यातून प्रापंचिकांना प्रपंच-व्यवहाराविषयीचा प्रबोध करताना प्रपंच-व्यवहाराविषयीची नश्वरता आणि आध्यात्माची शाश्वतता, आध्यात्मिक उन्नतीसाठी आणि मनःशांतीसाठी भक्तीचा प्रसार आणि प्रचार घडतो आहे हेही समाजधारणेच्या दृष्टीने गरजेचे आहे हे खरे. भक्ती, ज्ञान, वैराग्य या मार्गाने आत्मोद्धारासाठी प्रत्येकाला सिद्ध करता यावे तसेच पारमार्थिक विचाराने कौटुंबिक, सामाजिक सामंजस्य निर्माण व्हावे यासाठी नारदीय परंपरेने भगवद्‌भक्तीचा प्रचार करणे आवश्यकच आहे.

ही भगवद्‌भक्ती-परंपरा नवविधा भक्तीरूपाने युगे युगे सुरू आहे. या भगवद्‌भक्तीबरोबरच चतुर्युगात आविष्कृत झालेल्या चराचराच्या मानवकेंद्रित भौतिक आणि पारमार्थिक सहजीवनाच्या सत्य, प्रेम, करुणामय वैश्विक, एकात्म जीवनाचा मार्ग ऋषिपरंपरेने आपल्या प्रज्ञेने प्रकटविला.

वैश्विक एकात्म कल्याणकारी भौतिक आणि आध्यात्मिक सुखाचा व्यवस्थापूर्ण धर्म, राष्ट्रविचार प्रस्तुत केला. हा सनातन धर्मराष्ट्र विचार कलियुगाचे ठिकाणी संघशक्तीस्वरूपात जागृत करून; मनुष्यमात्राच्या सात्त्विक, एकात्म जीवनासाठी दुष्ट प्रवृत्तींचे निर्दालन करून, सत्प्रवृत्तींचे प्रतिष्ठापन करण्यासाठी

नवविधा भक्तीतील हा कथा ज्ञानयज्ञ मार्ग अतिशय फलदायी होतो; या जाणिवेने प.पू. गोविंददेव गिरि महाराज आरंभापासूनच स्वतःतील राष्ट्रयोगविचार परिपोषित करीत; सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानासाठी कथाज्ञानयज्ञ विधिनाट्याच्या अधिष्ठानपूर्वक, प्रयत्नशील आहेत हे पू. स्वामींच्या कथाज्ञानयज्ञाचे वेगळेपण आहे.

रंजन, भक्ती, मनःशांती याबरोबरच राष्ट्रीयत्वाच्या स्फुल्लिंगाचे जागरण भारतीय मनामनाच्या ठिकाणी करण्याचा हा प्रयत्न कथाज्ञानयज्ञाचे आगळेपण सिद्ध करतो. श्रीमद् भागवत, श्रीरामकथा, श्रीकृष्णकथा, महाभारतकथा, श्रीमद् भगवद्गीता-कथाप्रसंग, श्रीमद् योगवासिष्ठ-कथाप्रसंग, रामभक्त हनुमानकथा आणि शक्तीचे जागरण करणारा देवीभागवत-कथायज्ञ, श्री ज्ञानेश्वरी-प्रवचन, सत्संग या आणि अशा अनेक कथाज्ञानयज्ञातून राष्ट्रयोग्याच्या भूमिकेतून हा कथाज्ञानयज्ञ सुरू आहे.

## भक्तिमार्गाने राष्ट्रयोगसाधनेची परंपरा :-

भारतीय सनातन परंपरेचा विचार केला तर; सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाचे प्रयत्न, भक्तिमार्गाने जागरण करीत, राष्ट्र-आराधन करण्याची परंपरा अतिप्राचीन आहे.

नारदीय भक्तिसूत्रांची व नारदीय लोकजागरणाची परंपरा ही भारतीय सनातन संस्कृतीचे सात्त्विकतेने जतन करण्यासाठीचीच आहे. ब्रह्ममानसपुत्र ऋषिंचे कार्य हे विश्वातील मानवमात्रांना भौतिक अभ्युदय आणि आध्यात्मिक उन्नती या दोन्हींच्या दृष्टीने सदैव मार्गदर्शन करते आहे.

ऋषिंनी मानवी जीवनाच्या कल्याणासाठी भौतिक विश्व आणि अध्यात्म अर्थात प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधत, वैश्विक मानवाच्या एकात्मिक सामूहिक जीवनाची वांछा सदैव ठेवली. वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृतिग्रंथ या प्राचीनतम भारतीय वाक्धनातून सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थान प्रक्रियेची साक्ष मिळते.

पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी वेदान्ताचा संदेश देत, धर्मजागरणाच्या माध्यमातून सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाचा प्रयत्न केला. गत दोन हजार वर्षांच्या काळात, एका बाजूला वेदान्तप्रणीत सत्य, प्रेम, करुणा यावर आधारित विश्वात्मक मानवाच्या समग्र कल्याणासाठी सनातन भारतीय राष्ट्रीय जाणिवा

हेतुपूर्वक बोथट करण्याचा प्रयत्न सुरू असताना; वेदप्रामाण्य मानणाऱ्या आस्तिक मतप्रणाली यांनी पंथोपपंथांच्या उदा. शाक्त, शैव, वैष्णव, दत्त, नाथ, गाणपत्य अशा भक्तिमार्गी पंथांनी, वैश्विक कल्याणाचा विचार करीत लोकजागरण करण्याचा प्रयत्न केला.

मध्ययुगात भागवत संप्रदाय तथा वारकरी संप्रदायाने अर्थात वैष्णव संप्रदायाने वैश्विक एकात्म मानवाच्या भूमिकेतून धर्मराष्ट्रभावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. माउली ज्ञानेश्वरांचे भगवद्गीतेवरील प्रवचन हा वैश्विक मानवाच्या भूमिकेतून सनातन हिंदूधर्मराष्ट्र–जागरणाचा कथाज्ञानयज्ञच होता. संत तुकाराम महाराजांनी *'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषि । साच भावे वर्ताया ॥'* असे म्हणत ज्ञानोत्तर भक्तीचे पाठबळ शिवछत्रपतींच्या पाठीशी उभे केले.

संत श्री स्वामी समर्थ रामदास यांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुरुष म्हणून प्रभु रामचंद्रांचा आदर्श आणि महाबली हनुमान यांचा सिद्ध राष्ट्रयोगी रामभक्त, असा आदर्श आपल्या वाक्‌यज्ञातून उभा करीत, शिवछत्रपतींच्या रूपाने सनातन हिंदूधर्मराष्ट्रपुरुषाची आणि राष्ट्रयोगी मावळ्यांची आदर्शवत मांडणी केली. भक्तिमार्गाने सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान साधता येते; याचे जाज्वल्य उदाहरण जगासमोर ठेवले.

आधुनिक काळात ब्रिटिशांनी भारतीय संस्कृतीचा विच्छेद केला तर सनातन हिंदूधर्मराष्ट्रभावनाच नाहीशी होईल, या दृष्टीने हेतुतः प्रयत्न केले. हे लक्षात येताच; लोकमान्य टिळकांपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत अनेक तेजस्वी ताऱ्यांनी भक्तिमार्गाने राष्ट्रजागरणाचा प्रयत्न केला.

म. गांधी, विनोबाजी भावे यांनीही वैष्णव धर्माचे जागरण करून राष्ट्रसंवेदना पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला.

ज्ञानेश्वरकन्या संत श्री गुलाबराव महाराज, संत तुकडोजी अशा काही श्रेष्ठ संतांनी भक्तिमार्गाने राष्ट्रजागरणाची परंपरा पुढे चालू ठेवली. सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थान करण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा राष्ट्रध्वज गुरुस्थानी ठेवून गुरुभक्ती, राष्ट्रभक्ती आणि सांस्कृतिक परंपरांची भक्ती तसेच राम, कृष्ण, हनुमान, पार्थ आदी राष्ट्रपुरुषांची भक्ती यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून; शिवसमर्थयोगाप्रमाणे राष्ट्रयोगी निर्माण करण्याचे गुरुकुल रा. स्व. संघाने

प्रस्थापित केले.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी याच भक्तिजागरणातून भौतिक आणि आध्यात्मिक यांचा समन्वयात्मक अभ्युदय साधत, सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाचे स्फुल्लिंग जागृत करता येते आणि मनामनात राष्ट्रयोगाचे जागरण करून; राष्ट्र-पुनरुत्थान साधता येते असा विचार करून; संकल्पपूर्वक या प्रदीर्घ परंपरेने पायिक होत कथाज्ञानयज्ञाला राष्ट्रजागरणाचे परिमाण देत कथाज्ञानयज्ञाचे अनुष्ठान मांडले.

**राष्ट्रयोग्याचा कथाज्ञानयज्ञ – साध्य आणि साधनही :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज गेली पन्नास वर्षे श्रीमद् भागवतादी कथाज्ञानयज्ञ करीत आहेत. प्रगाढ व्यासंग आणि अमोघ वक्तृत्व यामुळे दिवसेंदिवस श्रोतृवर्ग त्यांच्याकडे श्रद्धापूर्वक आकर्षित होत आहे.

पू. स्वामींनी वांशिक परंपरेने कथाज्ञानयज्ञमंडनाची कला आत्मीयतेने आणि सिद्ध प्रज्ञेने आत्मसात केली आहे. रसाळ वाणीने भक्तिरसाचा अत्युत्कट परिपोष करीत ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. प्रापंचिकांना संघर्षमय जीवनामध्ये अनिवार्य झालेली शांतीची तृष्णा भक्तिरंगात रंगवून, प्रदान करण्याचे सिद्ध कौशल्य पू. स्वामींच्या ठायी दिव्यत्वाने प्रकटले आहे. नवविधा भक्तीतील श्रवण, कीर्तन या मार्गाने श्रोत्यांना आत्मिक समाधान आणि मनःशांतीचा लाभ होतो आहे. अध्यात्मसाधना, सत्संग यांचे साध्य आत्मशांती हेच असते. ही आत्मिक शांती मिळविण्याचे साध्य पू. स्वामींच्या कथाज्ञानयज्ञातून नक्कीच सिद्ध होते.

भागवतातून घडणारा कृष्णभक्तीचा परमोत्कर्ष श्रोत्याला अनुभूत होऊन श्रोता ठायीच शांत होतो. रामकथेच्या निमित्ताने संघर्षमय जीवनावर सामंजस्याने, श्रद्धेने मात करता येते याची साक्ष पटते. देवीभागवत कथेतून मातृशक्तीचा जागर प्रापंचिकांना आत्मविश्वासपूर्वक प्रपंच करण्यासाठी शक्तिमत्ता देतो. हनुमानकथेतून अनन्य भक्तीने रामरूप होऊन; समुद्रोल्लंघन करता येते व शोषकांची लंका जाळून टाकता येते; असे आत्मबल प्राप्त होते. महाभारतातून पुरुषार्थसिद्धीचा न्याय्य मार्ग अवगत होतो; तर भगवद्गीता-ज्ञानयज्ञातून ज्ञानवान कर्मपूर्वक आत्मोद्धार साधता येतो. अशा सर्व प्रकारच्या अनुभूतीने श्रोत्यांच्या ठायी आत्मशांतीचा अनुभव भक्तिसाधनेतून मिळविण्याचे आत्मबल सिद्ध होते. पू. स्वामींच्या सिद्ध प्रज्ञेने आत्मशांती हे आध्यात्मिक साध्य सिद्ध होते.

ज्ञानयज्ञाचे साध्य सिद्ध होत असले तरी पू. स्वामी गोविंददेव गिरि केवळ भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि मोक्ष या आध्यात्मिक शांति-सिद्धिप्रक्रियेच्या दृष्टीने कथाज्ञानयज्ञ मांडीत नाहीत.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान होऊन; सत्य, प्रेम, करुणा या अधिष्ठानावर, वैश्विक एकात्म मानवाचे जागरण करण्यासाठी वर्तमानात, जेथे मानवी समूहाला हिंदू म्हणून पृथकतेने मानले जाते, त्या भारतभूमीत सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे स्फुल्लिंग मनामनात जागृत झाले पाहिजे; तसेच विश्वात जेथे म्हणून सनातन हिंदूधर्मराष्ट्रसंस्कृतीचे अनुसरण करणारे भारतीय राहतात, त्यांच्याही ठिकाणी हे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे स्फुल्लिंग जागृत व्हावे असा दृष्टिकोण, सिद्ध राष्ट्रयोगी म्हणून संकल्पपूर्वक पू. स्वामींच्या ज्ञानयज्ञाच्या मुळाशी असतो. सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा आत्मा अध्यात्म आहे. त्या अध्यात्माचे जागरण कथाज्ञानयज्ञातून होते तर आध्यात्मिक मनःशांतीयुक्त शाश्वत, वैश्विक मानवी समाजाचे चिरस्थायी अस्तित्त्व अर्थात धर्मराष्ट्र उभे करण्याचे साधन म्हणून कथाज्ञानयज्ञाचे उपयोजन करता येऊ शकते असे स्वामींना वाटते.

स्वामी विवेकानंदांच्या मनातील हिंदूराष्ट्र, स्वामी रामदासांच्या मनातील 'महा-राष्ट्र-धर्म' प्रेरित 'आनंदवनभुवन', प्रभु रामचंद्रांचे विश्वकल्याणकारी राष्ट्र, छत्रपती शिवरायांचे हिंदवी स्वराज्य उभे करण्यासाठी कथाज्ञानयज्ञातून राष्ट्रयोगसाधना करता येऊ शकते असा विश्वास पू. स्वामींना वाटतो.

अद्वैत तत्त्वज्ञानाचे विश्वगुरुत्व आणि भारतीय प्राचीनतम विश्वकल्याणासाठी दृष्टी असलेल्या सनातन संस्कृतीचे जागरण झाले तरच विश्वकुटुंब ही वैदिक संकल्पना सिद्ध होईल. यासाठी बलशाली, सत्यनिष्ठ, प्रेममय, कारुण्यपूर्ण असा एकात्मिक समाज अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्र उभे राहिले पाहिजे. यासाठीचा प्रयास कथाज्ञानयज्ञातून घडू शकतो.

योगेश्वर श्रीकृष्ण अर्थात आध्यात्मिक शांती आणि धनुर्धर पार्थ अर्थात पुरुषार्थ यांचा समन्वय घालून; सनातन हिंदूधर्मराष्ट्राची उभारणी कथाज्ञानयज्ञातून करता येऊ शकते; ही स्वामी समर्थ रामदासांची वहिवाट पू. स्वामी गोविंददेव गिरि गुरुपरंपेच्या कृपेने, सिद्ध वाणीआविष्काराने अवलंबितात. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा कथाज्ञानयज्ञ असा साध्य आणि साधनही असतो.

**श्रीमद् भागवतकथा :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरि बालवयापासून भागवत–कथाज्ञानयज्ञ करीत आहेत. सर्व वेदान्ताचे सार श्रीमद् भागवतात स्पष्टपणे आणि अतिशय सुंदर व प्रगल्भ भाषेत निवेदित केले आहे. भागवताच्या आगळ्यावेगळ्या रसाळ शैलीचे वर्णन करण्यासाठी स्वामींनी, श्री गोपदेवांनी मांडलेली श्रीमद् भागवतलेखनाची कारणमीमांसा 'भागवत विहंगम दर्शन' यात दिली आहे.

महाभारतानंतरसुद्धा भागवत लिहिण्याचे हे एक कारण आहे. श्री. बोपदेवांनी ही बाब फारच चपखलपणे मांडली आहे. ते म्हणतात–

**वेदाः पुराणं काव्यं च प्रभुर्मित्रंप्रियेव च ।**
**बोधयन्तीति हि प्राहुस्त्रिवद् भागवतं पुनः ॥**

म्हणजे वेदग्रंथ मालकाप्रमाणे आज्ञा करतात, पुराणग्रंथ मित्राप्रमाणे समजावून सांगतात तर काव्यग्रंथ प्रिय पत्नीप्रमाणे लडिवाळपणे समजावतात. श्रीमद् भागवत हा ग्रंथ मात्र प्रसंगानुसार तीनही शैलींचा उपयोग करून आपला बोध श्रोत्याच्या मनावर ठसवितो. म्हणूनच आबालवृद्ध, तार्किक, भाविक, सर्व प्रकारच्या संमिश्र श्रोतृसमुदायाच्या मनाची पकड घेणारा हा अजोड ग्रंथ ठरला आहे.

प्रज्ञाचक्षु संत समन्वय महर्षि गुरुजन व महाराज यांनी श्रीमद् भागवत हे माझे 'मंगळसूत्र' आहे असे म्हटले. स्वामी विवेकानंदांनी भागवताचे वर्णन करताना; त्यास intellectually convincing and psychologically satisfying असे म्हणून गौरविले आहे. या दोन्ही उक्तींकडे लक्ष वेधून पू. स्वामी गोविंददेव गिरि हे भागवतात प्रतिपादित विषयांकडे आवर्जून लक्ष वेधतात. ते म्हणतात–

भागवत ग्रंथात कोणकोणत्या विषयांचे प्रतिपादन आहे हे ग्रंथकाराच्याच शब्दात–

**अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषण मूतयः ।**
**मन्वंतरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रयः ॥**

असे आहे. त्यानुसार सर्ग म्हणजे सृष्टिप्रक्रिया, विसर्ग म्हणजे वासनाविशिष्ट सृष्टीचे प्राकट्य, स्थान म्हणजे दोन्ही प्रकारच्या सृष्टीची उत्पत्ती झाल्यावरची स्थिती, पोषण म्हणजे भगवंताचा कृपानुग्रह, ऊति म्हणजे कर्मवासना, मन्वंतर म्हणजे सद्धर्माने सृष्टीचे पालन करणाऱ्या, मनूच्या दीर्घकालिक कारकीर्दीच्या सत्कथा, ईशानुकथा म्हणजे ईश्वरभक्तीस उपोद्बलक भगवत्कथा, निरोध

म्हणजे परमेश्वरद्वारा स्वतःच्या सर्व शक्तींचे संवरण करून; स्वरूपस्थित होणे अथवा धर्मसंस्थापनेसाठी अवतार घेऊन दुष्टांचा विनाश करणे, मुक्ति म्हणजे स्व-रूपस्थिती आणि आश्रय म्हणजे सृष्टीचे - सर्व जीवांचे व वरील नऊ तत्त्वांचे आधारस्थान म्हणजेच परब्रह्म तत्त्व होय. या सर्व बाबींचे यथास्थानी प्रतिपादन ज्यात आढळते असा हा ग्रंथ म्हणजेच श्रीमद् भागवत महापुराण होय.

**श्रीमद् भागवत बीज स्वरूप,**

**अहमेवासमेवाग्रे नान्यद् यत् सदसत् परम ।**
**पश्चादहं यदेतच्च योऽ वशिष्येत सोस्यहम् ।।१।।**
**ऋतेऽर्थं यत प्रतीयेत न प्रतीयेत चात्मनि ।**
**तद्विद्यादात्मनो मायां यथा ऽऽ भासो तथा तमः ।।२।।**
**यथा गहान्ति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु ।**
**प्रविष्टान्य प्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम् ।।३।।**
**एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनाऽऽत्मनः ।।**
**अन्वयव्य तिरेकाभ्यां यत् स्यात् सर्वत्र सर्वदा ।।४।।**

अशा चतुःश्लोकी भागवताच्या, द्वादश स्कंधात विस्तारित झालेल्या, ज्ञानप्रकाशामध्ये सच्चिदानंदस्वरूप विश्वोत्पत्तीचे कारण असलेल्या पूर्णावतार भगवान श्रीकृष्णलीलांचे, गोपगोपींचे, राधेच्या प्रेमस्वरूपास्थितीचे आपल्या मधाळ लाघवी वाणीने, समरसून वर्णन करीत श्रोत्यांना भक्तिरसात चिंब करीत मोक्षमुक्तीचा अष्टसात्त्विक भावात्मक आविष्कारातून ठायीच अनुभव घडविता-घडविताच पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज, भगवंताच्या, धर्मसंस्थापनार्थ स्वीकारलेल्या अवतारकार्याकडे लक्ष वेधून; ओजस्वी वाणीने, सनातन शाश्वत अशा हिंदूधर्मराष्ट्र विचाराचे चित्तवेधक स्मरण करून मोक्षमुक्ति आणि प्राप्त कर्तव्यतत्पर कर्मधर्मासाठी श्रोत्यांना जागवितात.

श्रीमद् भागवतकथा केवळ भक्तिरसामृतपान घडविणारी कथा राहत नाही अथवा राधाकृष्ण-अद्वैतातून सच्चिदानंदस्वरूप जीवनमुक्ततेचा आनंद देणारी कथा राहत नाही तर विश्वस्वरूपामध्ये प्रकटलेल्या, चराचरात वसलेल्या भगवान श्रीकृष्णस्वरूपाची कथा होते.

प्रत्येकाच्या ठायी योगेश्वर श्रीकृष्ण प्रकटतो आणि सत्य, प्रेम, करुणेच्या संवेदनेने विश्वात्मक कृष्णभाव कर्तव्यतत्परतेने, ज्ञानात्मक कर्म करीत प्रत्येक जण

स्वतः सिद्ध होतो.

या अनुभूतीत श्रोता आणि वक्ता यांचे राष्ट्रयोगीत्व स्वरूपात अद्वैत अनुभवास येते. अशी अनुभूती घडविण्याची शक्ती पू. स्वामींच्या वाक्‌यज्ञात असते. या कथाज्ञानयज्ञात पू. स्वामीमुखानं परावाणी प्रकट होत असते. सर्वांभूती परमेश्वराचा साक्षात्कार घडवीत एकात्म सनातन धर्मराष्ट्राची संवेदना ठायीच प्रकटलेली असते. प्रत्यक्ष भगवंत, राष्ट्रपुरुषस्वरूपात वक्ता आणि श्रोते यांच्या ठायी भासमान होऊ लागतो.

भागवत महापुराणकथा अशी वेदांचे साररूप होऊन विश्वात्मक परमेश्वराची स्वरूपसंवेदना प्रत्येकाच्या ठायी अनुभूत होते. पू. स्वामींच्या भागवत-कथाज्ञानयज्ञाचे वेगळेपण या साक्षात्कारी नाट्यमयतेत दडलेले आहे. म्हणूनच अलौकिक अवीट गोडीच्या भागवत कथेची अवीट गोडी पू. स्वामींच्या भागवत-कथाज्ञानयज्ञात शतगुणित होते.

**श्रीमद् देवीभागवत महापुराण :-**

पुराणवाङ्मयात वेदतुल्य सर्व लक्षणांनी युक्त असे शाक्त भागवत म्हणून ओळखले जाणारे, श्रीमद् देवीभागवत पुराण पू. स्वामी हेतुपूर्वक सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न करतात.

वास्तविक परब्रह्म स्वरूपामध्ये महाशक्ती प्रतिष्ठितच असते. मात्र परब्रह्माचा ब्रह्मस्वरूप आविष्कार घडत असताना, ती परब्रह्मस्वरूपात स्थायीच असलेली महाशक्ती, परब्रह्माचा आविष्कार घडविण्यासाठी भारतीय परंपरेत विश्वाचे सर्जन, पालन आणि संहार करणारी आदिनारायणी शक्ती असते.

या महाशक्तीचे पूजन नवदुर्गा, दशमहाविद्या, अन्नपूर्णा, जगद्धात्री, कात्यायनी, ललिता, अंबा, गायत्री, भुवनेश्वरी, काली, तारा, बगला, षोडशी, त्रिपुरा, धूमावती, मातंगी, कमला, पद्मावती, दुर्गा अशा असंख्य रूपांत पूजनीय असते. हीच महाशक्ती भक्ती आणि शक्ती, नर आणि नारी, माता-धाता अशा सर्व स्वरूपांत अधिष्ठित आहे. एक प्रकारे संपूर्ण जगत् या महाशक्तीची लीला आहे.

अलीकडील काळात स्त्रीशक्तीचा जागर, स्त्रीचे सक्षमीकरण, स्त्रियांचे कुटुंब, समाज, व्यवहार, राजव्यवहार यातील स्थान याविषयी अभिनिवेशाने चर्चा केली जाते. पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज या स्थिति-गतीकडे लक्ष

वेधून 'महाशक्ती हीच सनातन कालापासून संस्कृती स्वरूपात स्थित आहे' हे आपल्या कथाज्ञानयज्ञातून स्पष्ट करतात.

'संस्कृती ही जणू सुमूर्त. स्त्री माझे नाव असे' ही उक्ती सार्थ ठरविणाऱ्या कथा सादर करताना, पुरुषप्रधानतेचा अभिनिवेश आणि अहंकार सहज बाजूला सारतात. भगवान श्रीकृष्णांच्या हृदयस्थ राधा आहे आहे म्हणूनच भगवान श्रीकृष्णांचा सत्य, प्रेम, करुणाविष्कार घडतो. स्त्री ही शक्ती आहे. ती प्रेमस्वरूपा, मातृरूपिणी अशी असल्याने जगतातील सर्व प्रकारचा आविष्कार हा, त्या शक्तिस्वरूपाचा आविष्कार असतो हे श्रीमद् देवी भागवत महापुराण कथायज्ञातून पू. स्वामी आपल्या रसाळ वाणीने आणि शक्तिजागराच्या अभिनिवेशाने सांगत असतात.

सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानामध्ये स्त्रीशक्तीचे अनन्यसाधारण महत्त्व, पू. स्वामी परोपरीने पटवून देत असताना; सत्य, प्रेम, करुणा यांच्या अधिष्ठानावर सनातन हिंदूधर्मराष्ट्र उभे करावयाचे असेल तर सीता, द्रौपदी, मंदोदरी, अहिल्या, तारा या स्वरूपात स्त्रीशक्ती प्रकट व्हावी लागेल. प्रसंगी दुर्गा, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या स्वरूपात स्त्रीशक्तीला जागृत व्हावे लागेल, याकडे कथानिवेदनात ते लक्ष वेधतात. शिवछत्रपतींचे हिंदवी स्वराज्य उभे करणाऱ्या मातृशक्तीचा जागर परोपरीने स्वामी गोविंददेव गिरि करतात.

'यदा यदा हि धर्मस्य...' या श्लोकातील अर्थप्रतीति महाशक्तीच्या अवतारलीलांच्या संदर्भाने घडवितात. *'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।'* या स्मृतिवचनाकडे लक्ष वेधून, पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज, आपल्या वाणीआविष्कारात शांत रसासह नवरसांचे रंग भरीत शक्तिस्वरूपाचे दर्शन घडवितात.

हे करीत असताना स्त्रीशक्तीला संयम, विवेक आणि राष्ट्रीय भावना यांचे गुणात्मक परिपोष करण्याचे आवाहन करतात. ज्या स्त्रीशक्तीने इतिहास घडविला; वर्तमानातील पालन आणि पोषण जी स्त्रीशक्ती करते; त्या शक्तीमध्ये आसुरी वृत्तींचा संहार करण्याची शक्तीही असते; याचे जागरण करीत या आदिशक्तीला सर्व क्षेत्रांमध्ये राष्ट्रशक्ती म्हणून उभे राहण्याचे आवाहनही प.पू. स्वामी करतात.

**महाभारतकथा :-**

राष्ट्रयोग्याच्या सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानासाठी महाभारत पुरुषार्थस्वरूप कथा अतिमहत्त्वाची ठरते. *'युद्धस्य वार्ता रम्या'* या उक्तीप्रमाणे महाभारतकथा

ही मुळातच चित्तवेधक असते.

पू. स्वामींच्या कथाज्ञानयज्ञात, श्रीकृष्णलीला-प्रसंगांच्या निमित्ताने वाणीआविष्काराला अष्टसात्त्विक भावयुक्त राधाभक्तीचा बाज येतो; तर, कौरव-पांडवांच्या संघर्षकथांमध्ये ओजोगुणांनी आवेशात्मकता येते.

भगवान वेदव्यासांच्या दृष्टीने वेदान्तप्रणीत सनातन संस्कृती राष्ट्रनिर्मितीचे शास्त्रस्वरूप म्हणजे महाभारत आहे. स्वतः वेदोव्यासांच्या मते वेदांचा विस्तार आणि रहस्य, उपनिषदांचे सार, इतिहासपुराणातील उन्मेश आणि निमेश, वर्णाश्रम विधान, ज्योतिर्परिणाम, न्याय, शिक्षा, चिकित्सा, दान, आत्मशक्तीचे महत्त्व, भारतवर्षाचे समग्र वर्णन एवढेच काय राजनीती, कर्मयोग, भक्ती आणि अध्यात्म यांचे शास्त्र आणि आर्यांचा इतिहास असा सर्व शास्त्रसंग्रह; त्याचबरोबर सर्वात महत्त्वाचे म्हणजे सच्चिदानंदस्वरूप विश्वोत्पत्तीचे मूळ कारण भगवान श्रीकृष्ण यांचा उत्कट गुणगौरव आहे.

पू. स्वामी गोविंददेव गिरि म्हणतात त्याप्रमाणे, भक्ती, नीती, शक्ती, युक्ती आदी सर्व संपत्तिमंतांचा समुच्चय महाभारतात अनुभवता येतो. सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाच्या दृष्टीने योगेश्वर कृष्णांचा पांडवांना लाभलेला प्रेममय तरी अलिप्त तत्त्वोपदेश आणि पांडवांनी साधलेला विवेक आणि पुरुषार्थपूर्ण निष्काम कर्मयोग, पू. स्वामींना अतिमत्त्वाचा वाटतो. आपल्या अभिनव नाट्यपूर्ण, अमोघ वक्तृत्वशैलीने महाभारतकथा चित्रदर्शित्वाने उभी करत असताना पू. स्वामी अक्षरशः भगवत्कथारूप झालेले असतात.

**हनुमानकथा :-**

शिवस्वरूप अंजनीपुत्र, वायूसुत, भगवान रामभक्त हनुमान हे विभूतिमत्त्व सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाच्या दृष्टीने पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना आदर्शवत विभूतिमत्त्व वाटते.

राष्ट्रपुरुष प्रभु रामचंद्र यांच्या रामराज्य तथा सत्य, प्रेम, करुणा अधिष्ठित विश्वबंधुत्वाचा आणि समत्वाचा साक्षात्कार घडविणारे राष्ट्र; हे निश्चितच संकटमोचक, महाबली, सर्वश्रेष्ठ बुद्धिमान राष्ट्रयोगी हनुमानामुळेच शक्य झाले. भगवंतांनी महाप्रलयापर्यंत चिरंजीवित्वाने, सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे, त्यातील व्यष्टीपासून समष्टीला संकटमुक्त करून; संरक्षित करण्याचे प्रभुकार्य महाबली हनुमानांवर सोपविले.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज श्रीमद् गोस्वामी तुलसीदास यांच्या श्रीरामचरितमानसाच्या विवेचनातून उल्लेखित झालेल्या, महाबली हनुमंतांच्या विभूतिमत्त्वासह तसेच अध्यात्म-रामायणाच्या भावमुद्रांसह, श्री वाल्मिकी रामायणाच्या वाल्मिकी ऋषिवर्णित हनुमानजींच्या विभूतिमत्त्व प्रदर्शनासह आणि विविध हनुमत्पुराणरचयितांच्या संदर्भासह, महाबली हनुमानांचे वर्णन करतात.

हनुमंतांची रामभक्ती, वीर्य, शौर्य, निरागसता, औदार्य, राष्ट्रभक्ती, बांधवांविषयीचे अलौकिक प्रेम, बालकसदृश लडिवाळपणा याविषयी पू. स्वामी वाणीआविष्कार करू लागले की प्रत्यक्ष महाबली हनुमान स्वरूपतः श्रोते आणि वक्त्यांच्या अंतःकरणात प्रकट झाले आहेत असे वाटू लागते.

राष्ट्रनिर्मितीसाठी समर्पित भावनेने समरसतेने जेव्हा राष्ट्राचे पायिक राष्ट्रआराधन करू लागतात, तेव्हाच महाआसुरी संपत्तीचा पराभव होऊन सत्य, प्रेम, करुणेचे साम्राज्य प्रत्येक नागरिकाच्या मनात प्रकटते. जेथे हनुमान तेथे रामराज्य आणि जेथे रामराष्ट्राची आकांक्षा तेथे हनुमंतांचा आविष्कार; असे प्रभु आणि भक्त यांचे अद्वैत पू. स्वामी श्रोत्यांच्या समोर सुमूर्त करतात.

हनुमानकथा-ज्ञानयज्ञामध्ये समर्थ प्रभु रामचंद्रांचे, सामर्थ्यसंपन्न भक्त हनुमानांचे, चरित्र मांडताना; राष्ट्रगुरु स्वामी समर्थ रामदास यांचा आठव पू. स्वामी गोविंददेव गिरि यांना आवर्जून होतो. सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानासाठी महाबली हनुमानांची भक्ती, निष्ठा आणि शक्ती यांची व्यक्तीचे ठायी उपासना आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती स्वात्मभावाने हनुमत्स्वरूप झाली; तर भारत विश्वगुरू झाल्याशिवाय राहणार नाही. असा दृढ विश्वास श्रोत्यांच्या ठायी पू. स्वामी गोविंददेव गिरि जागवितात. तेव्हा वक्ता आणि श्रोते यांच्या ठायी प्रत्यक्ष राष्ट्रपुरुषाचे जागरण झालेले असते; अशी अनुभूती येते.

**रामकथा-ज्ञानयज्ञ :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या ठायी विश्वोत्पत्तीचे कारण भगवान श्रीकृष्ण यांचे भावात्म अद्वैत जसे झाले आहे तसे या राष्ट्रयोग्याच्या ठिकाणी राष्ट्रपुरुष म्हणून प्रभु रामचंद्रांचे अधिष्ठान हृदयसिंहासनावर आहे याची अनुभूती भागवत-कथाज्ञानयज्ञ आणि रामकथा-ज्ञानयज्ञ या दोन्ही प्रसंगी, श्रद्धावंत श्रोत्यांना येते.

रामकथा सांगत असताना पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या मुखे समर्थ श्री रामदास किंवा रामभक्त हनुमान प्रकट होत आहेत असे वाटते. श्री रामदासांची

रामभक्ती, श्रीमद् गोस्वामी तुलसीदासांची सर्वांगसुंदर रामकथा, संत एकनाथ यांची भावार्थ रामायणकथा, अध्यात्म-रामायण अशा अनेक रामायणकथा पू. स्वामींच्या मुखे मुखरित होतात.

समत्वदृष्टीने विवेक आणि पुरुषार्थपूर्णतेने मानवी जीवनातील सर्व भूमिका समर्थपणे कशा अनुसरता येतात; याचा आदर्श प्रभु रामचंद्रांच्या कथांमध्ये मिळतो याकडे पू. स्वामी लक्ष वेधतात. रघुकुलातील राम जीवनतत्त्व म्हणून जीवनात कसे अवलंबिता येते, याचा वस्तुपाठ स्वामी श्रोत्यांपुढे मांडतात. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या श्रीरामकथेतील विचारधन 'श्रीरामकथा नवनीत' या पुस्तकात मांडताना श्री. सुनिलजी चिंचोलकर लिहितात- 'आपलं व्यक्तिगत, कौटुंबिक आणि संपूर्ण सामाजिक जीवन उजळून टाकण्याकरता ज्या दिव्य गाथेची, ज्या दिव्य कथेची, ज्या दिव्य आदर्शाची आज आवश्यकता आहे ती रामकथा आहे.' ते पुढे लिहितात- 'या जगात एक नियम आहे. Law of Compensation. कुठेही short-cut नसतात. जितकं महान मंदिर मला उभारायचंय तितकी पायाभरणी मला जाणीवपूर्वक केली पहिजे आणि त्याकरता अखंड उद्योगाची आवश्यकता आहे.' चिंचोलकर पू. स्वामींच्या दृष्टीने रामकथेचं महत्त्व स्पष्ट करताना लिहितात- 'महर्षि वाल्मिकींची ही रामकथा केवळ आध्यात्मिक कथा नाही किंवा कौटुंबिक कथा नाही. रामकथेतून आत्मविश्वास तथा पुरुषार्थ कसा प्रकटतो, हे स्वामीजी परोपरीने समजावून देतात. त्याविषयी चिंचोलकर लिहितात- 'माझ्या जीवनात येणारं सुख मीच खेचून आणणार आणि माझ्या जीवनात येणाऱ्या दुःखाला मीच जबाबदार आहे. दुसऱ्यावर जबाबदारी टाकण्याची आपली भूमिका पहिल्यांदा आपण बदलून टाका. प्रारब्धवाद हासुद्धा जरा नीट तपासून पाहिला तर पुरुषार्थवादच आहे.'

रामकथेतून काय शिकावं यासाठीची पू. स्वामींची विचारप्रेरणा महत्त्वाची वाटते. - 'रामचंद्रांची वानरसेना रामाशी हृदयातील प्रेमाने बांधली गेली आहे म्हणून श्रीराम एवढं महत्कार्य करू शकले. नियमावर बोट ठेवून केलेली कामं आणि हृदय पिळवटून जीव ओतून केलेली कामं यात एक अंतर असतं. शिस्त असावी पण तितकाच प्रेमाचा ओलावाही असावा. मातृभूमीवर प्रेम कसं करावं हे श्रीरामांकडून शिकावं. जगात कुठेही जा, कितीही मोठे व्हा; पण जन्मग्रामाला विसरू नका, भारतवर्षाला विसरू नका. मग जगातले अन्य देश कितीही मोठे

असोत. ''राजा प्रकृतिरंजनात्'' ही भारतीय संकल्पना आहे. राजा म्हणजे प्रजेचा उपभोगशून्य स्वामी.'

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या रामकथेचे सारभूत तत्त्वप्रतिपादन म्हणजे राम हे रामतत्त्व असून सत्य, प्रेम, करुणाधिष्ठित, पुरुषार्थपूर्ण मानवी जीवनसारणीचे सूत्र आहे. म्हणूनच सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान म्हणजे रामस्वरूप राष्ट्रयोगसाधना होय.

**तत्त्वज्ञानात्मक कथाज्ञानयज्ञ :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि, योगवासिष्ठ, श्री ज्ञानेश्वरी, श्रीमद् भगवद्‌गीता, दासबोध, संत श्री गुलाबराव महाराज, स्वामी विवेकानंद अशा तत्त्वज्ञानात्मक कथा-ज्ञानयज्ञाचे मंडन करतात.

मानवाच्या पुरुषार्थपूर्ण जीवनसारणीसाठी तत्त्वज्ञानात्मक आदर्श प्रतिपादित करून कुटुंब, समाज, राष्ट्र आणि विश्व या संबंधाने मानवाच्या सर्वांगीण भौतिक अभ्युदयाच्या दृष्टीने आणि मनःशांतीच्या दृष्टीने जीवनसारणीला कोणते वळण लावावे, याचे प्रबोधन करतात.

हे करत असतानाही पू. स्वामींच्या समोर व्यक्ती-व्यक्तींच्या मनात सनातन हिंदूधर्मराष्ट्रजागरण घडावे असा हेतू असतोच. ज्ञानेश्वरपदाश्रित किंवा रामचरणी समर्पित या दृष्टीनेच त्यांचे विवेचन असते.

**कथाज्ञानयज्ञातून सर्वांगीण प्रबोध :-**

भारतीय प्राचीनतम कल्याणकारी जीवननिष्ठ साहित्याचे संरक्षण, शास्त्रीय ज्ञानाचा विकास; अंधविश्वास, स्वार्थ, दांभिकता आदी अवगुणांच्या विनाशासाठी घणाघाती प्रखर प्रबोध; भक्ती, समरसता, कारुण्य, समत्वदृष्टी, सश्रद्धता आणि सफल जीवनासाठी, स्थलकालपरिस्थितिसापेक्ष, सर्वांगीण विकासाच्या सामंजस्यपूर्ण व्यवहारासाठी, पुरुषार्थपूर्ण व्यक्तिमत्त्व संपादण्याकरिता वर्तमानातील दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांचा सुरू आहे.

'ज्ञान बनो कर्मवान, कर्म ज्ञानवान', या प्रकारे मानवाने जीवन व्यतीत करीत, एकात्म राष्ट्र जीवनाचे आराधन करावे, या दृष्टीने अखंड जागरण सुरू असते. त्यांचा कथाज्ञानयज्ञ असा विश्वकल्याणाची आकांक्षा ठेवून सर्वसमन्वयकतेने सुरू असतो.

* *

## ।। नऊ ।।

# द्रष्टा प्रबोधक

कथाज्ञानयज्ञ आणि प्रवचने यातील वेगळेपण – सा विद्या या विमुक्तये – युवाशक्तीच्या आत्मनिर्भरतेचा जागर – संस्कारित मनाने जीवन आणि राष्ट्र संपन्न करावे – वेद–वेदान्त–अनुबंधित प्रबोधन – महान विभूतिमत्त्वांच्या प्रकाशात विचारप्रवर्तन – प.पू. द्वितीय सरसंघचालक श्री. मा. स. गोळवलकर गुरुजींच्या अंतिम संदेशाचा प्रभाव – राष्ट्रयोगी पू. स्वामी यांचा राष्ट्रयोगसाधकांशी हृदयसंवाद – समग्र जीवनपरिपोषक प्रबोधन.

## ।। नऊ ।।

# द्रष्टा प्रबोधक

भारतीय परंपरेमध्ये वैदिक ऋषिंना द्रष्टा हे विशेषण लावलेले आढळते. विश्वातील विविध शक्ती आणि त्या शक्तींचा मानवासाठी तसेच प्राणिमात्रांसाठी व चराचराच्या व्यवस्थापनासाठी, स्थलकालपरिस्थितिसापेक्षतेने, वर्तमानात आणि भविष्यात सर्वकल्याणार्थ कोणत्या प्रकारे विनियोग होऊ शकतो; हे प्रातीभ ज्ञान ऋषिप्रज्ञेला झाले. म्हणूनच त्यांना द्रष्टा हे विशेषण नेमकेपणाने गौरवान्वित करण्यासाठी, भारतीय परंपरेमध्ये देण्यात आले. संतांच्या ठायीदेखील मानवकल्याणार्थ असे द्रष्टेपण अनुभवास येते.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज असे द्रष्टे संत आहेत. त्यांच्या, 'द्रष्टा प्रबोधक' या विभूतिमत्त्वाचे दर्शन प्रत्यही देश-विदेशातील त्यांच्या प्रवचनांच्या प्रसंगी जाणवते.

**कथाज्ञानयज्ञ आणि प्रवचने यातील वेगळेपण :-**

पू. स्वामींचा कथाज्ञानयज्ञ आणि प्रवचने, यात मूलभूत निराळेपण असते. कथाज्ञानयज्ञात एक संपूर्ण कथा, उदा. रामचरितकथा, कृष्णचरित्रकथा, हनुमान चरित्रकथा इ. या कथा प्रामुख्याने रामायण, महाभारत आणि पुराणे तसेच विशिष्ट वेधक समग्र ग्रंथ उदा. दासबोध, योगवासिष्ठ इ. कथाप्रसंगी, कथेतील लीलादर्शनाला अधिक महत्त्व असते. या लीला रसात्मकतेने, लालित्यपूर्णतेने आणि भक्तिपरिपोषात्मकतेने पू. स्वामींच्या ढंगदार, अमोघ, लयबद्ध, नाट्यमय, संगीतबद्ध वाणीआविष्कारातून सादर करणे याला प्राधान्य असते. हे ज्ञानयज्ञ,

पाच-सात-नऊ अशा दिनकालावधींचे आणि शुभारंभ ते संपन्नता अशा निश्चित कालमर्यादेत श्रोत्यांनाही नाट्यमयतेने भजन-कीर्तनात समाविष्ट करून घडत असतात.

कथेतील लीलाप्रसंगांचे सादरीकरण होत असताना, भजन-कीर्तनाच्या ओघात अनुषंगाने वर्तमान स्थितिगतीच्या आणि भविष्याच्या कल्याणाच्या दृष्टीने प्रबोधन करण्याचा प्रयत्न असतो. पू. स्वामी असे प्रबोधन करताना दुर्गुणांवर, दुर्व्यवहारांवर कठोर प्रहार करतात. त्याचबरोबर कल्याणकारी प्रबोधन आणि समुपदेशन माउलींच्या ममतेने करतात. सर्वांभूती प्रेम हा पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वाचा स्थायी भाव या प्रसंगी दिव्यत्वाने आविष्कृत होतो.

प्रवचन व्याख्यानाच्या स्वरूपाचे असते. विशिष्ट विचारप्रवर्तन, विशिष्ट विचारप्रवर्तन, विशिष्ट विषयाचे मंडन, विशिष्ट विषयांचे किंवा विचारांचे तुलनात्मक व प्रासंगिक हितकारकतेने अभ्यासात्मक विवेचन, कधी संत श्री गुलाबराव महाराजांसारख्या किंवा विवेकानंदांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचे वैशिष्ट्यपूर्ण विभूतिमत्त्व दर्शन, असे स्वरूप असते.

काही प्रवचने ही अभ्यासवर्गांसाठी, शिबिरांसाठी, संस्कारवर्गांसाठी निश्चित हेतूने, प्रबोधन आणि समुपदेशनासाठी होत असतात. प्रवचनांमध्ये रंजकतेपेक्षा विचारदर्शनांना अधिक महत्त्व असते. सहज लक्ष वेधण्यासाठी किंवा आळस, मरगळ झटकून टाकण्यासाठी पू. स्वामी विनोदगर्भ किंवा नाट्यगर्भ शैलीचा उपयोग करतात; मात्र त्यांच्या प्रवचनाचा मुख्य भर हा विचारप्रवर्तन यावर असतो.

कथाज्ञानयज्ञ आणि प्रवचने या दोन्ही वाणीआविष्कारातील साम्य स्वामींच्या विभूतिमत्त्वातून प्रकटते; ते म्हणजे सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी द्रष्टेपणाने मानसिक जागरण हे होय. मानवी जीवनाच्या मन, विचार, आहार, विहार, आरोग्य, ज्ञानार्जन, शक्तिअर्जन या सर्व गोष्टींना वैश्विक मानवतेच्या दृष्टीने विश्वबंधुत्वाचे आणि हिंदूधर्मराष्ट्राचे परिमाण असणे हे भविष्यातील युगानुयुगाच्या प्रवासासाठी आवश्यक आहे अशा भूमिकेने पू. स्वामींच्या विभूतिमत्त्वाचा आविष्कार कथा आणि प्रवचनप्रसंगीच्या ठिकाणी घडत असतो. वैभवसंपन्न सनातन हिंदूधर्मराष्ट्र उभे राहणे हाच विश्वकल्याणाचा एकमेव मार्ग आहे, हे पू. स्वामींच्या द्रष्ट्या प्रज्ञेला जाणवते.

पू. स्वामींच्या प्रवचनप्रसंगांचा प्रवास, हा सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठीच्या द्रष्ट्या प्रबोधकाचा प्रवास असतो. अनुभवलेल्या प्रवचनांचे लिखित शब्दांकन करून, निर्माण झालेल्या पुस्तकांमधून हे सहज प्रत्ययास येते.

**सा विद्या या विमुक्तये :–**

जगभरात अचानक कोरोना साथ फैलावली. श्वास रोखून सारेच स्तब्ध झाले. निःशस्त्रतेने, निरुपायाने मन खचू लागले. घरात कोंडून घेऊन माणसा–माणसाच्या सान्निध्याचा संशय घेत, जगण्यावरच प्रश्नचिन्ह घेऊन, अस्तित्त्वाची तडफड सुरू झाली. आबालवृद्ध निराशेने पछाडले.

अशा काळात प.पू. गुरुदेव स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या कृपेने 'You Tube', 'Facebook' अशा अत्याधुनिक डिजिटल संपर्क–माध्यमांद्वारा संवाद प्रस्थापित करण्याचा चंग बांधला गेला. आत्मचिंतनास प्रेरित करून, सकारात्मक चिंतनाची ऊर्जा निर्माण करणारी उद्‌बोधनमालिका सुरू झाली. या उद्‌बोधन मालिकेत नियमितपणे १३४ भाग प्रसारित झाले.

पुणे येथील गीता परिवाराने यातील १०–१० सलग भागांची एकेक पुस्तिका करून, पू स्वामींची प्रवचने ‘जीवनविद्या’ या नावाने भागशः प्रसारित करण्याचा निर्धार केला. पहिल्या भागात, १) महान अवसर बार–बार नहीं आते, २) सर्वांगीण जीवन का समग्र लाभ ले, ३) लक्ष्यप्राप्ति हेतु दृढ संकल्प आवश्यक, ४) लक्ष्यनिर्धारण में स्वाभाविक रुचि की भूमिका, ५) मनुष्य का सबसे बडा संबल :– आत्मविश्वास, ६) अपना ज्ञान अद्यतन रखना आवश्यक, ७) अपने सच्चे मित्र और शत्रु आप ही हैं ।, ८) जीवन में समय का सर्वाधिक महत्त्व, ९) चित्त की एकाग्रता ही सफलता की कुंजी है ।, १०) अतिमहत्त्वपूर्ण उपकरण है शरीर : इसे ठीक से संभालें । असे दहा प्रवचनांचे सार ग्रथित केले आहे.

या ‘जीवनविद्या’ नावाने प्रसिद्ध होणाऱ्या प्रवचनमालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे ‘पूर्णयोगबोधिनी श्रीमद्‌ भगवद्‌गीता’ ही, यातील सर्व प्रबोधनाच्या केंद्रस्थानी आहे. मानवी जीवनात त्रिताप स्वरूपात अनेकदा प्रलयंकर प्रसंग येतात. वस्तुतः ही भगवंताच्या विश्वस्वरूपातील लीला असते. ह्या भगवंतांच्या पूर्णयोगलीलेचे ज्ञान होण्याचे भाग्य आणि बळ केवळ मानवाला लाभले आहे. नरदेहाची ही शक्ती ओळखून अंतर्बाह्य संघर्ष करीत, पुरुषार्थपूर्णतेने स्वरूपस्थितीत माणसाला

कृतार्थ होता येते. भगवद्‌गीतेने दिलेली ही सकारात्मक ऊर्जा माणसाला सर्वथा यशस्वी करू शकते.

पू. गोविंददेव गिरि महाराज, या प्रवचनांमधून भगवद्‌गीतेच्या आधारे पूर्णपुरुषत्वाने उभे राहण्याचा संदेश, आपल्या प्रवचनातून देतात.

या सर्व प्रवचनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतेतर पाश्चात्त्य आणि पौर्वात्य विविध दर्शनांची, शास्त्रांची तुलनात्मकतेने अपूर्णता सूचित करीत, हेतुतः भारतीय तत्त्वज्ञानाला मागासलेपणाचा छाप मारून अंधारात ढकलून देण्याचा कुटिल उद्योग गत हजार-दोन हजार वर्षांत कसा घडला; हे पू. स्वामी उघड करून सांगतात.

भारतीय ज्ञानविज्ञान कसे सर्वांग, परिपूर्ण आहे, हे सप्रमाण पटवून देतात. श्रीमद् भगवद्‌गीता, योगवासिष्ठ, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंदांची भाषणे, संत श्री गुलाबराव महाराजांचे समन्वयक विचार, श्रुति, स्मृति, पुराणे यातील थेट संदर्भ देऊन भारतीय ज्ञानविज्ञानाची सर्वांग परिपूर्ण दृष्टी मनामनात ठसवितात.

भारतीयांची मने आत्मविश्वासाने जिजीविषेने, पुनःपुरुषार्थ सिद्ध होण्यासाठी सिद्ध होतात हेच स्वामींच्या कृपेचे आणि वाणीसामर्थ्याचे वैशिष्ट्य होय.

मॅनेजमेंटसारखा विषय, जो आजकाल सर्व क्षेत्रांत कळीचा मुद्दा बनला आहे, त्याकडे लक्ष वेधून प्रत्येक क्षेत्रात वेगळ्या प्रकारची प्रबंधनविद्या, याच्या पलीकडे जाऊन जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सहज उपयुक्त होईल आणि यश प्राप्त होईल; अशा प्रकारचे प्रबंधनविद्येचे समग्र विवेचन, भारतीय प्रज्ञेने कसे घडविले आहे; याचे आत्मभान पू. स्वामीजी भारतीयांना करून देतात.

ज्ञान आणि विज्ञान क्षेत्रात सनातन हिंदूधर्मराष्ट्र परिपूर्ण होते, या आत्मभानाने 'जीवनविद्येचे' अर्जन करणे यासाठीचे प्रबोधन पू. स्वामीजी करतात. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर-

'भारतीय प्रज्ञा : पूर्ण एवं श्रेष्ठ - मैं आधुनिक विषयों पर बोलना नहीं चाहता और न ही आधुनिक ग्रंथों का ऊहापोह करना चाहता हूँ । हां, संदर्भ के लिए वे आ भी जावें, तो मुझे आपत्ति नहीं है । किन्तु इन भी उपरोक्त विषयोंमें भारतीय ऋषियों का योगदान क्या है, इस प्रसंग में हम, महाभारत, योगवासिष्ठ तथा रामकथा का योगदान क्या है, यह देखना चाहेंगे । इस प्रकार आचार्य चाणक्य व समर्थ रामदासजी का और सर्वोपरि श्रीमद् भगवद्‌गीता का

योगदान भी देखना चाहेंगे । ये सब केवल देखना ही नहीं; अपितु इनका महत्त्व पहचानना, हमारा कर्तव्य भी है; क्योंकि ये बहुत बडा खजाना हमारे यहाँ पर भरा हुआ है और दुर्भाग्य से हम इससे अनभिज्ञ हैं । इस ओर हमारा कभी ध्यान ही नहीं गया ।

मैंने विचार किया कि भारतीय ऋषि-प्रज्ञा ने जो-जो बातें हमारे सामने रखी हैं, उन्हें हम समझें, तो पूरे जीवन का एक परिपूर्ण प्रबंधनशास्त्र, भारत संपूर्ण विश्व को दे सकता है । केवल इसी दृष्टिकोण को लेकर, कुछ चिंतन आपके समक्ष कुछ दिनों तक करने का मन में विचार किया है ।'

एक स्वतंत्र व्याख्यानात 'आनंदमय जीवनाची जीवनविद्या' स्पष्ट करताना पू. स्वामी सांगतात- 'भगवद्‌गीताकार कहते है, अर्जुन, सही सही enjoyment तो वे करते हैं ।

**मच्चिताः मद्‌गतः प्राणः बोधयंतः परस्परम् ।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।**

गीता का शब्द है 'रमन्ति' । उसका सीधा अनुवाद है enjoy. They are really satisfied and do enjoy. गीताकार कहते हैं कौन? जिनका चित्त परमात्मा में लग गया जो निरन्तर परमात्मा के बारे में बोलते हैं, जो निरंतर परमात्मा के बारे में सुनते हैं । उनका जीवन एक अलग स्तर का हो गया । उनकी चिंता का वहन करनेवाला भी वह प्रभु हो गया । जो आनंद का सागर है और इस अवस्था तक पहुँचते-पहुँचते उस अनुभूति में वे पहुँच जाते हैं; जिनका वर्णन महाराष्ट्र के संत करते हैं,

**आनंदाचे डोही । आनंद तरंग ।**
**आनंदचि अंग । आनंदाचे ।।**

अरे! आनंद के सागर का मैंने अनुभव किया । भीतर आनंद, बाहर आनंद, नीचे ऊपर सर्वत्र आनंद ही आनंद । उनका जीवन परमात्मा के साथ एकरूप हो गया । बाहर से भले ही वे अपना साधन करते हुए दिखते हैं । सामान्य-मनुष्य सा जीवन जीते हुए खाते-पीते दिखते हैं लेकिन वे आनंद के साथ एकरूप हो गये ।'

जीवनकला या विषयावर उपाय सुचवित असताना; महर्षि वसिष्ठ, श्रीमद् शंकराचार्य, आर्य चाणक्य यांचा अभ्यास केला तर तो विशिष्ट विषयांचे परिपूर्ण ज्ञान देणारा असतो हे खरे; परंतु जीवनकलेसाठी जीवनाच्या सर्व अंगांचे ज्ञान

आवश्यक असते.

आजकाल Leadership, Selfhelp, Management, Relationship ह्याविषयी विदेशात खूप लिहिलं जातं; पण महाभारतासारखं इतरत्र आढळत नाही. ''पिटर ड्रकर पासून स्टीफन क्लोवि पर्यंत मी वाचलं; पण सगळे खुजे आहेत. आमच्या योगवासिष्ठाच्या पत्रावळीची शितं आहेत. जीवनकलेचे परिपूर्ण ज्ञान घ्यायचे असेल तर दासबोधाला पर्याय नाही''; असे सांगून पू. स्वामी 'जीवनकला' पुस्तकात म्हणतात– 'समर्थांनी भक्तीची व्याख्या करताना 'विभक्त नव्हे तो भक्त' असे सांगितले.

समाजात कार्य करावं; पण आसक्त असावं आपल्या अंतःकरणातील प्रभु रामचंद्रांवर. 'मी स्वतःला रामापासून वेगळा करूच शकत नाही' अशी आसक्ती अंतरंगात आणि विरक्ती बाहेर असावी. ह्या आयुष्याची चिंता करत बसू नका. *'आयुष्य दो दिसांची वस्ती । कुठेतरी करावी ।।'* असा महत्त्वाचा विचार दिला. एवढेच सांगतो, जीवन जगण्याची कला आत्मसात करताना व्यवहाराच्या पहिल्या पायरीपासून अध्यात्माच्या शेवटच्या स्थितीपर्यंत तुम्हाला जे-जे मार्गदर्शन लागेल ते-ते सर्व दासबोधात मिळेल. त्याचा आपल्या सर्वांकडून स्वाध्याय घडावा हीच भगवत्चरणी प्रार्थना. जय श्रीराम!'

'भारतीय प्रबंधनशास्त्र' याविषयी पू स्वामीजी म्हणतात– 'हे शास्त्र परंपरेने आपल्याला प्राप्त झाले आहे. व्यवस्थापनशास्त्र महाभारतातून शिकावे, रिलेशनशिप रामकथेतून शिकावी, आत्मविकास (self-help) योगवासिष्ठातून शिकावे, नेतृत्त्वगुण चाणक्याकडून व समर्थ रामदास स्वामींकडून शिकावे.'

भारतीय जीवनविद्या अर्थात भारतीय परंपरेतील ज्ञानसंचित, माणसाला भक्ती, ज्ञान, वैराग्य या मार्गाने पूर्णत्त्व प्राप्त करून देते. त्याच्या अंतरात्म्यामध्येच स्वतःचे जीवन परिपूर्ण करण्याची शक्ती आहे हा विचार पू. स्वामी प्रवचनातून जगवितात. म्हणूनच ते भारतीय व्यक्तीला स्वतःचा आत्मविश्वास जागविण्यासाठी, 'मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार' हा मंत्र देतात. ते सांगतात– 'भगवद्गीताकारांचे एक आग्रही म्हणणे आहे. आपले जीवन महान बनवायचे असेल तर एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, माझ्या जीवनाचा शिल्पकार मीच आहे.'

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव व ह्यात्मनो बन्धुरात्मैवरिपुरात्मनः ।।**

कुरुक्षेत्राच्या प्रांगणामध्ये भगवंत अर्जुनाच्या निमित्ताने आपल्या सर्वांना एक गोष्ट समजावून सांगतात, 'तुमचा उद्धारकर्ता तुमच्याशिवाय अन्य कोणी असूच शकत नाही. तुमचा विनाशकर्ता पण तुमच्याशिवाय अन्य कोणी असूच शकत नाही.' याच्यामुळे असे झाले, त्याच्यामुळे माझे जीवन वाया गेले, अशी तक्रार करण्याची सोय भगवंताने भगवद्गीतेत ठेवलेली नाही. बाहेरच्या लोकांचे साहाय्य घेता येते, पण आधी उभारी आपली असायला लागते, मग साहाय्याचा उपयोग होतो. प्रथम आपल्या मनातला हा भाव निघून जावा की, माझे जीवन घडवत असताना मी कोणावरतरी अवलंबून आहे. आपण अनेक तक्रारी करतो, दहा सबबी सांगतो. पण पुरुषार्थाचा उपदेश करणारे श्री भगवान या गोष्टी नाकारतात. ते सांगतात– तुमच्या उत्थानाला कारण केवळ तुम्ही आणि तुमच्या पतनालाही कारण केवळ तुम्ही आहात.

**आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैवरिपुरात्मनः ।**

तुमचे खरे शत्रू आणि तुमचे खरे मित्रही तुम्हीच.

सोलापूर येथील तीन दिवसीय व्याख्यानमालेत 'तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार' याच विषयावर विस्तृत चिंतनात्मक प्रबोधन करून पू. स्वामींनी – 'मलाच' 'माझ्या' 'अंतरंगातून' 'मलाच' 'माझं' 'बहिरंग जीवन' घडवायचं असतं! 'घडविणारा मी' आणि 'घडवून घेणाराही मीच'! या शब्दांत व्याख्यानमालेचा समारोप केला.

## युवाशक्तीच्या आत्मनिर्भरतेचा जागर :–

युवकांनी स्वयंप्रकाशी, स्वयंनिर्भर, स्वयंशासित आणि पुरुषार्थपूर्ण व्हावे तरच सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करून, परमवैभवसंपन्न राष्ट्र उभे राहू शकेल, असा विश्वास पू. स्वामींना वाटतो.

स्वामी विवेकानंद यांनी युवकांच्या बळावरच वैभवसंपन्न राष्ट्रनिर्मितीचे स्वप्न पाहिले. मुक्ता गरसोळे–कुलकर्णी यांनी, 'युवकांसाठी संस्काराची नवी दिशा' या अनुषंगाने घेतलेल्या मुलाखतीत, समर्थांची *'आपल्या पुरुषार्थ वैभवे सकळांस सुखी करावे ।'* या उक्तीची आठवण करून देऊन; त्यांनी संपूर्ण जीवन सफल करण्याकरिता, सार्थक करण्याकरिता, मानवजातीच्या कल्याणाकरिता, भारतीय प्राचीन ग्रंथनिर्मिती झाली आहे; हे लक्षात घेऊन त्याकडे पाहिले पाहिजे याकडे लक्ष वेधले. या मुलाखतीत पू. स्वामी युवाशक्तीला स्वतःच स्वतः

ला सुसंस्कारित करण्यासाठी चार महत्त्वाच्या गोष्टी सांगतात- १) अतिप्रगत अशा संपर्कसाधनांचा उपयोग सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्त्व-विकासासाठी करावा. २) व्यसनापासून दूर राहावे कारण व्यसनाधीन जीवनाला कोणतीही गोष्ट वाचवू शकत नाही. ३) घरच्या संबंधांमध्ये विकृती आणता कामा नये. ४) भगवान बुद्धांनी म्हटल्याप्रमाणे आत्मदीप बनून स्वतःचे व इतरांचेही जीवन सुखी करावे.

लायन्स क्लबमधील 'युवा-उद्‌बोधन' या व्याख्यानात, आपल्या संस्कृतिसंचिताचा गौरव पू. स्वामी करतात. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी समर्थ रामदास यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख करून; आपल्या परंपरेने आपल्याला मूल्य दिले आहे; त्या मूल्यांचे जतन करावे असे बजावतात. त्या मूल्यांमध्ये कर्तव्यपालन हा सर्वात मोठा धर्म आहे, याची पू. स्वामी आठवण करून देतात. माउली ज्ञानेश्वरांच्या-

**'तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची तीरा ।**
**पूजा केली होय अपारा । तोषालागि ।।'**

ह्या उक्तीप्रमाणे परमेश्वराला कर्मपुष्प सर्वप्रिय आहे. त्या फुलांनी परमेश्वराची सेवा करावी. ते सांगतात- 'मेरे कर्म शुद्ध हों, स्वार्थरहित हो, पूरी तरह निष्ठा के साथ और निरपेक्ष बुद्धि से किये गये हो तो वह मेरे कर्म ही भगवान की पूजा बन जाते हैं । इस प्रकार की पूजा अगर हम सबके द्वारा की जाए, तो यह राष्ट्र उठ सकता है । वह सारे संसार की सेवा करेगा, संसार को सुखमय बनाने में अपनी भूमिका निभायेगा ।'

'मी व माझा देश' याविषयी तरुणांना उद्देशून भाषण करताना पू. स्वामी देशाची संकल्पना अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राची संकल्पना स्पष्ट करताना सांगतात- 'आमचा देश हा कुठला 'जमिनीचा तुकडा' आहे अशा प्रकारची भावना आमच्या देशातील अत्यंत श्रेष्ठ पुरुषांची कधीच नव्हती. ती भूमी तर आहेच. ती भूमी तर मला मातेसमान वाटतेच आहे, पण अनादि कालापासून ह्या भूमीवर जी अत्यंत श्रेष्ठ परंपरा नांदत आली, ती परंपरासुद्धा मला 'माझा देश' म्हणत असताना आठवायला हवी. ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या सुंदर ओवीत-

**हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपण जाहला ।।'**

संपूर्ण विश्व हा माझा परिवार आहे, असे म्हटले आहे. माझा देश म्हणताना

केवळ भौगोलिक गोष्टी अपेक्षित नाहीत, तर तीन गोष्टी अपेक्षित असतात. माझी परंपरा, माझी भूमी, माझा समाज हे मिळून झालेला असा माझा देश.

जो-जो भारताच्या विरुद्ध आहे, तो-तो माझा नाही आणि जो-जो भारताला अनुकूल आहे तो तो माझा आहे. पण माझी आई, माझे बाबा, माझे पूर्वज ह्यांना आपल्या अंगावर वाढविणारी ही भारत नावाची माता मला पहिल्यांदा दिसावी आणि तिच्याकरता आपला प्राण रात्रंदिवस तळमळावा इतकीच तुम्हाला प्रार्थना.' असे विनवितात.

'मी व माझा परिवार' या व्याख्यानमालेत तरुणांना मार्गदर्शन करताना पू. स्वामीजी सांगतात- 'मुख्यतः व्यक्ती आणि समाज या दोघांच्या मधला दुवा असलेला जो परिवार आहे; त्याचा विचार भारतीय परंपरा सर्वात अधिक करते. एक-एक परिवार जर संस्कारक्षम घडविता आला तर आपोआप समाज चांगला होईल.'

पू. स्वामी रामकथेचे उदाहरण देतात. ते म्हणतात- 'आपली संपूर्ण रामकथा ही एका परिवाराची कथा आहे. कुठल्याही पैलूंनी पाहिलं तरी त्यात एका सुंदर परिवाराचं दर्शन घडतं. भगवान श्रीरामांनी जे-जे केलं ते एका परिवाराचा घटक म्हणून केलं आणि कसं करावं हे लोकांना फार उत्तम रितीने शिकवलं.'

ते पुढे म्हणतात- 'आज Generation gap चा विचार लोकांच्या डोक्यात शिरला आहे. अशा स्थितीत या परिवारसंस्थेचा विचार होणं अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक सगळ्याच Information Technology मुळे जग एका खोलीत सामावलं. तरी एका खोलीत राहणारे दोघे एकमेकांपासून दुरावले आहेत त्याचे काय?'

पू. स्वामी पांडवांची कथा उदाहरण म्हणून देताना सांगतात- 'पांडवांना भेटायला जाणाऱ्या श्रीकृष्णाजवळ कुंतीने सांगितले- केशवा, वनात गेल्यावर माझ्या मुलांना एकच गोष्ट सांग की, तुम्ही पाच भाऊ आपापसांत भांडू नका.' पू. स्वामींनी तरुणांना, मी आणि माझ्या परिवाराविषयी एक सूत्र सांगितले- East or West, Home is the Best' - माझं घर म्हणजे माझा स्वर्ग आहे. माझी सुखदुःखेही माझ्या घराशी जोडली आहेत. मला माझा परिवार सुखी करायचा आहे. माझं घर नाही. भगवंताचं घर आहे. आम्ही सगळे एकमेकांचे सेवक आहोत. *'परस्परं भावयन्तः!'* गृहस्थाश्रम व्यक्तीसही धन्य करतो आणि समाजाचीही उन्नती

करतो.

सोलापूर येथील विकास सहकारी बँक आणि रोटरी क्लब यांच्या विद्यमाने व्याख्यानमालेत, 'यशाकडे झेप' या व्याख्यानात योगेश्वर श्रीकृष्णांचे आणि पार्थाचे रूपक समजावून सांगताना पू. स्वामी यशाची गुरुकिल्ली तरुणांच्या हाती देतात. ते म्हणतात– 'आधुनिक भाषेत सांगतो, योगेश्वर श्रीकृष्ण म्हणजे Brain Fitness आणि धनुर्धर पार्थ म्हणजे Body Fitness. ज्या ठिकाणी या दोन्ही गोष्टी असतील तिथे आपोआप यश अनुगत होतं आणि त्या व्यक्तीला यशाकडे झेपावता–झेपावता यशाचं सर्वोच्च शिखर गाठता येतं.

यशाचं गमक म्हणजे प्रयत्नवाद होय; असे सांगून पू. स्वामी म्हणतात– 'झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि महाराणा प्रताप हे दोघेही आपल्याला, ते हरलेले असतानाही वंद्य वाटतात कारण अखंड प्रयत्नवाद होय. यशासाठी आपली प्रज्ञा घडवावी लागते आणि सारासार विवेक विकसित करावा लागतो.'

'आत्मविश्वास के प्रभावी सूत्र' या विषयावर सुविद्य लोकांसमोर व्याख्यान देताना, पू. स्वामी सांगतात– 'आत्मविश्वास ही मनुष्य है । जिसके भीतर आत्मविश्वास है वह कुछ भी कर सकता है । इस आत्मविश्वास को किसी प्रकार ढीला पडने देना यह स्वयं का आत्मनाश है । इसको वृद्धिंगत करने के लिए यह आत्मसूचन या स्वयंमोहन किया जाय । आत्मविश्वास यह मनुष्य को आगे ले जानेवाला महत्त्वपूर्ण सिद्धांत है ।

If Health is lost nothing, is lost,

If Wealth is lost something is lost,

If Character is lost everything is lost इससे आगे बढकर मैं कहता हूँ, If confidence is lost everything is lost forever.'

'जीवन संग्रामातील विजयरथ' या विषयावरील सोलापूर येथील व्याख्यानात महाभारताचा उल्लेख करून, महाभारताचे मूळ नाव 'जय' आहे असे सांगून, या पंचम वेदाविषयी संत गुलाबराव महाराजांचा अभिप्राय पू. स्वामी नोंदवितात. संत गुलाबराव महाराज म्हणत की, भारतीय संस्कृतीचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ महाभारत हा आहे. पू. स्वामीजी सांगतात– *'भारतं भवने यस्य तस्य हस्तगतो जयः ।'* विजयरथाचं स्पष्ट सूत्र सांगताना पू. स्वामी *'यतो कृष्णः ततो धर्मः । यतो धर्मः ततो जयः ।'* असे सांगून भगवान मनूंनी धर्माचं वर्णन करताना दहा

जीवनमूल्यं समोर ठेवली–

**‘धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचं इंद्रियनिग्रहः ।**
**धीविद्या सत्यं अक्रोधः दशकं धर्मलक्षणम् ।।’**

धर्मगुण म्हणज सद्‌गुण होय. सद्‌गुण विजयरथ ध्येयाप्रत घेऊन जातात. हे स्पष्ट करताना पू. स्वामी म्हणतात– ‘मानवी जीवन हे बहिरंगाच्या, तसेच अंतरंगाच्याही पातळीवर जिंकून आपल्याला खरोखर इहलोक आणि परलोक या दोन्हींना साध्य करायचं असेल; तर ज्या सद्‌गुणांचं संवर्धन आपल्या जीवनात आवश्यक आहे, त्या सद्‌गुणांचा उपदेश भगवान रामचंद्रांनी बिभीषणाच्या निमित्तानं आपणा सर्वांना केला.’

विद्यार्थ्यांना साफल्यसूत्रे आणि महानतेचा मंत्र देताना, विविध ठिकाणच्या व्याख्यानात, माउली ज्ञानेश्वर, शिवछत्रपती, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी तारुण्यात पदार्पण करताना महान कार्याचे संकल्प केले; तसा संकल्प तरुणांनी केला पाहिजे. असा संकल्प करताना तो स्वतःच्या मनाने व स्वतःच्या जिद्दीने करावा आणि त्या वेळी, मी जीवनात काहीतरी असाधारण कार्य करून दाखविणार असा निश्चय केला पाहिजे. शुद्ध मनाने केलेला संकल्प सिद्ध होतोच; असे सांगून, पू. स्वामी एका कवितेची ओळ मंत्रस्वरूपात विद्यार्थ्यांपुढे ठेवतात–

**‘मन शुद्ध तुझं, गोष्ट आहे पृथ्वी मोलाची ।**
**तू चाल पुढे, तुला रे गड्या भीति कुणाची ।।’**

विद्यार्थ्यांना महानतेची उदाहरणे देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अर्जुन, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगवान आदिशंकराचार्य, डॉ. आइनस्टाइन, छत्रपती शिवाजी महाराज यांनी तारुण्यात पाहिलेल्या स्वप्नांची आठवण करून देऊन, पू. स्वामी ‘सगळ्यात मोठे स्वप्न म्हणजे राष्ट्रीय भारत, स्वतंत्र भारत, अखंड भारत! समर्थ भारत होणे व हा देश त्याच्या परंपरेप्रमाणे टिकून राहणे यासाठीचे प्रयत्न हे महान कार्य आहे’. त्यासाठी पू. स्वामी तरुण विद्यार्थ्यांना संदेश देतात–

**‘जीवनात महान बनण्याचे स्वप्न पहा !**
**देशाकरिता जगण्याची आकांक्षा ठेवा !**
**त्याकरिता जीवनात सद्‌गुणांची जोपासना निरंतर करत रहा.**
**यातच जीवन साफल्य आहे !’**

'Success Strategies For Students' या व्याख्यानात ते विद्यार्थ्यांना सांगतात–

'In short, youngsters should, try to know themselves thoroughly imbibe dicipline and march courageously and cautiously, step by step towards their goal in life!

All said and done one has to toil, grind and sweat to lead a balanced life if one is in pursuit of knowledge!

Youngsters must make positive choices so as to reach their maximum potential!'

सोलापूर येथील व्याख्यानमालेत युवकांना 'स्वप्नपूर्तीची दिशा' या व्याख्यानात, पू. स्वामी स्वप्नपूर्तीचं तंत्र सांगतानाच सामाजिक व राष्ट्रीयत्त्वाचं भान आणून देतात – 'आपल्याला लाभलेलं हे मानवी जीवन नेमकेपणाने समजून घेऊन, स्वतःचा शोध घेऊन जाणीवपूर्वक जगणं हे स्वप्नपूर्तीचं तंत्र आहे! मनुष्याच्या अंतरंगात निर्माण होणाऱ्या स्वप्नांच्या पूर्ततेकरिता परमेश्वरानं त्याला अतिशय चांगली साधनसामग्री दिलेली आहे. ती साधनसामग्री जर त्याला नीट उपयोगात आणता आली, तर त्याला आपल्या स्वप्नांची पूर्ती करता येईल. ही साधनसामुग्री कोणती, हे समजावून घेणं फार आवश्यक असतं.' 'मनुष्याची बुद्धी, त्याची विचारशक्ती ही स्वप्नांच्या पूर्तीकरिता भगवंतानं दिलेली अपूर्व साधनं आहेत.'

'स्वप्नपूर्तीसाठी उपलब्ध सामुग्री : मित्रपरिवार व समाज – याच्याही पलीकडे आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. आपण ज्या परिवारात व समाजात वावरतो; त्या परिवाराचा, परिचितांचा व मित्रांचा तसेच समाजाचाही आपल्याला, आपल्या विकासाकरिता उपयोग करून घेता येतो.'

'मनुष्य हा समाजाचं एक अंग आहे. म्हणून आमच्यामधला मुख्य विचार – *'सहनाववतु सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै'* – असाच आहे. सगळे मिळून एकत्र मोठं होणार, सगळे मिळून महान कार्य उभं करणार, अशी आमची प्राचीन धारणा आहे. म्हणून जर योग्य पद्धतीनं सर्वांना सोबत घेता आलं तर आपल्या स्वप्नाच्या पूर्तीकरिता आपण ज्या घरात जन्माला आलो ते घर, ज्या समाजामध्ये वाढलो तो समाज, हे सर्व उपयोगी ठरू शकतात. या सर्वांचा आपल्याला

आपल्या स्वप्नपूर्तीकरिता उपयोग करून घेता येईल. पण तो उपयोग कसा करायचा हे मला कळायला हवं.'

सोलापूर येथील व्याख्यानमालेत, 'कृतार्थ करू या अपुले जीवन' याविषयी प्रबोधन करताना 'मानवी जीवन एक सुंदर भेट आहे' याकडे लक्ष वेधून; वेदव्यास, भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद अशा पूजनीय विभूतिमत्त्वांचे स्मरण करून देऊन, पू. स्वामीजी समर्थ रामदासांचा दासबोध आदर्शभूत ग्रंथ म्हणून तरुणांसमोर ठेवतात. ते म्हणतात– समर्थांनी प्रथम ही प्रेरणा दिली–

**'नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधीन ।।**
**परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तिरूपे उरवावा ।।'**

पू. स्वामी पुढे म्हणतात– 'भगवंताच्या कृपेनं आपणा सर्वांना लाभलेलं हे मानवदेहाचं लेणं कृतार्थ व्हावं. अवघ्या जगाला असं वाटावं की, खरोखर ही व्यक्ती असल्यामुळे अवघी गल्ली धन्य झाली, गाव धन्य झालं, प्रदेश धन्य झाला, देश धन्य झाला, जग धन्य झालं! अशा प्रकारे रुंदावत जाणाऱ्या कक्षांमधून आपल्या अस्तित्वानं ज्याला लोकांच्या मनामध्ये धन्यतेचा उद्गार निर्माण करता येतो, तसं आपलंही जीवन असायला काय हरकत आहे?

आपल्याला कुठल्या मार्गानं गेलं पाहिजे, कुठला मार्ग चोखाळला पाहिजे? अवघं विश्व ही दूरची गोष्ट आहे. पण मी ज्यांच्यात वावरतो, त्यांच्या मनात तरी अशा प्रकारची भावना निर्माण व्हावी यात जीवनाची कृतार्थता आहे. जीवनाची धन्यता आहे. ती स्थिती प्राप्त होण्याकरिता एक रोडमॅप आवश्यक आहे. त्यासाठी विशिष्ट पद्धतीनं आपला विकास करून घेणं आवश्यक आहे. तो विकास जर साधायचा असेल, तर सद्गुणांची साधना करावी लागेल.'

सोलापूर येथील व्याख्यानमालेत, 'जगावेगळे ऐसे जीवन' या विषयावर प्रबोधन करताना, 'वेगळ्या जीवनाचा निश्चय आवश्यक असतो' असे सांगून पू. स्वामी म्हणतात– 'वेगळी जीवनं अशांची ठरतात, ज्यांच्या जीवनात पुढील तीनपैकी एक गोष्ट निश्चित असते. He or She must be FIRST, He or She must be BEST and He or She must be DIFFERENT ! लक्षात असेच लोक राहतात जे 'सर्वोत्कृष्ट' असतात, जे 'सर्वप्रथम' असतात आणि जे 'सर्वांपेक्षा वेगळे' असतात! अशा प्रकारची जीवनं जगाला पुष्कळ काही शिकवून

जातात.'

असं वेगळेपण सिद्ध करण्यासाठी मनुष्यानं उत्तम यश मिळविण्याचा संकल्प करणं आवश्यक आहे. त्याचबरोबर उदंड आत्मविश्वास, व्रतस्थ जीवनाची तयारी, सेवेचा दृढसंकल्प असे गुण प्रयत्नपूर्वक संपादावे लागतात. हे करताना आधुनिक तंत्राचा उपयोग विवेकाने करणे आवश्यक असते. संत श्री तुकाराम महाराज म्हणतात– *'उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।'*

**संस्कारित मनाने जीवन आणि राष्ट्र संपन्न करावे :–**

मातीला कुंभार जसा आकार देतो; तसा बालक आणि अज्ञजनांना माउलीच्या ममतेने, जीवनाला आणि राष्ट्राला संपन्न करता येते. समस्यांनी घेरलेल्या समाजात आणि राष्ट्रात संस्काराच्या प्रेरणा मानवी जीवनाला दुर्गतीपासून मुक्त करण्याचा प्रयत्न करतात.

पू. स्वामींनी संस्कारकार्याला प्रधानता देऊन, 'गीता परिवार' संस्था उभी केली. बालकांना सुसंस्कारित करून उज्ज्वल भवितव्यासाठी सिद्ध करावे आणि वैभवसंपन्न राष्ट्रनिर्मितीसाठी त्यांना प्रवृत्त करावे; यासाठी कार्य हाती घेतले. हे कार्य यशस्वी करण्यासाठी संस्कार घडविणाऱ्या कार्यकर्त्यांना तसेच घराघरातील माउलींना मार्गदर्शन करण्यासाठी, पू. स्वामींनी, आपल्या प्रवचनातून प्रबोधन केले.

साधनेचा शुभारंभ कोठून करावा; मानवजन्म किती अनमोल आहे, संस्कारप्रक्रिया कशी घडते, सामान्य कार्यकर्ता आणि श्रेष्ठ कार्यकर्ता यांच्या कार्यशैलीत कोणता भेद निर्माण होतो; सफल जीवन आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्र संपन्न करण्यासाठी स्वामी विवेकानंदांसारखी महामना कोणती शिकवण देतात; श्रीमद् भगवद्गीता सफल जीवनशैलीचा आणि यशस्वी राष्ट्रनिर्मितीचा कोणत्या प्रकारे जागर करते; मने संस्कारित करण्यासाठी मातृशक्तीचे किती महत्त्व आहे अशी मनोभूमिका ठेवावी, ईश्वरनिष्ठ असावे, समग्र जीवनात भारतीयता असावी, विज्ञानदृष्टीने जीवनव्यवहार करावा असा आग्रही उपदेश शिबिरातील कार्यकर्त्यांना करतात.

श्रेष्ठ कार्यकर्ता होण्यासाठी कार्यकर्त्यांनी स्वतःला अत्मसंस्कारित करावे, असे सांगून; भगवंतांनी अर्जुनाला प्रबोधित करावे, तसे कार्यकर्त्यांना प्रबोधित करताना; पू. स्वामी म्हणाले– 'एक लक्षात घ्या, हे कार्य होणारच. अर्जुन जेव्हा

मी लढणार नाही म्हणाला, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला समजावले व शेवटी सांगितले तू मारल्यामुळे कोणी मरत नाही आणि तू वाचविल्यामुळे कोणाचे मरण टळत नाही, मला जे हवंय तेच घडेल!

**द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।**
**मया हतांस्त्वं जहि ना व्यथिष्ठाः युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ।।'**

(११-३४)

आता परमेश्वराचीच इच्छा आहे की, भारताचे उत्थान व्हावे आणि म्हणून परिवर्तन तर होणारच! त्यात आम्ही निमित्त बनून आमचेही जीवन ऊर्जस्वल बनवून घ्यायचे आहे. प्रभू अर्जुनाला म्हणाला, मी तुला एवढ्यासाठी लढायला सांगतोय, की तुझे नाव मोठे व्हावे!'

'संस्कार पाथेय' या पुस्तकात कोटा येथे गीता परिवारातील कार्यकर्त्यांच्या स्वाध्याय-शिबिरात दिलेल्या प्रवचनामध्ये, पू. स्वामींनी, सुखी परिवारासाठी संस्कार, प्रेम आणि ज्ञानाची आवश्यकता, भगवद्‌गीता हा संस्कारांचा स्रोत, स्वतःपेक्षा कार्याला प्राथमिकता देण्यावर भर, मनाच्या संतुलनाचे महत्त्व, भारतमातेच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध करणारे संस्कार, वैज्ञानिक दृष्टिकोन, तरुणांचा आदर्श स्वामी विवेकानंद आदी विषयांवर महिला-कार्यकर्त्यांना प्रबोधित केले.

या प्रबोधनाचा संदेश थेट घराघरातील महिलांपर्यंत जावा यासाठी 'संस्कार पाथेय' या ग्रंथाची निर्मिती केली. भारतमाता मंदिराचे संस्थापक, स्वामी सत्यमित्रानंद गिरि यांनी या उपक्रमाची प्रशंसा केली.

भारतीय मजदूर संघाचे संस्थापक श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी प्रस्तावनेच्या स्वरूपात पू. स्वामींच्या प्रवचनांमधील मर्म उलगडून दाखविले आहे. ते लिहितात- 'बालसंस्कार का अधिकतम दायित्व माँ का होता है । महिलाओं को केवल अपने बच्चों की माता न बनकर समाजके सारे बच्चोंकी माँ बनना है । भगवद्‌भक्ति का एक साधन समझकर यह कार्य करते हुए व्यक्तिधर्म एवं समाजधर्म का संतुलन रखने के लिए बालमनपर भगवद्‌गीता का संस्कार करने की आवश्यकता है । इसीके साथ भारतमाता ते श्रेष्ठता की पहचान कराकर उसके लिए प्राणार्पण करने की तैयारी रखनेका उदात्त ध्येय उनके मनपर अंकित करना चाहिए । भारत के सभी महापुरुषों के प्रति उनके मनमें श्रद्धा जागृत करें । किन्तु अपने विचारों में कहीं भी अंधश्रद्धा को स्थान न दें । अपितु वैज्ञानिक दृष्टिकोण विकसित करें ।

भगवद्‌भक्ति, भगवद्‌गीता, भारतमाता की आराधना और वैज्ञानिक दृष्टि इन चारों सूत्रों का एकत्रित दर्शन करवाने हेतु सबके सामने श्रेष्ठतम प्रतीक के रूप में स्वामी विवेकानंदजी का आदर्श रखना यह गीता परिवार का पाँचवां सूत्र है । स्वामीजी के जीवनमें अध्यात्म और राष्ट्रभक्ति, प्राचीनता और आधुनिक तथा साधना की सभी पद्धतियों का सुंदर समन्वय दिखता है ।'

कार्यविस्ताराच्या संदर्भात पू. स्वामी अपेक्षा व्यक्त करताना म्हणतात- 'यहाँ से हम एक दीपक लेकर जायें और वह दीपक सामान्य दीपक नहीं, वह दीपक संस्कारों का दीपक हो । यहाँ का प्रकाश लेकर हम अंधकार में ही जायें, ऐसा नहीं । इस प्रकाश को हम अपने घरों में भी ले जाए । एक बात मैं सदा कहता आया हूँ - हम मंदिरों में जाते हैं, बहुत अच्छी बात है । मंदिरों में जाना चाहिए । लेकिन उससे भी बढिया यह बात है कि ऐसे वातावरण को अपने घर में लाकर अपने घर को ही मंदिर बना दें ।'

अगदी संक्षेपाने 'संस्कारांचे मूलमंत्र' सांगताना पू. स्वामीजी सांगतात- *'यदेव विद्यया करोति, श्रद्धया उपनिषदा वा तदेव वीर्यवत्तरम् भवति ।'* कुठलेही कार्य हाती घेताना त्याचा उद्देश नीट लक्षात घेऊन ते श्रद्धेने, श्री सद्‌गुरूच्या मार्गदर्शनाखाली केले तर त्याचे मूल्य आणि फल आपोआपच वाढते. ज्ञानेश्वरीत म्हटले आहे, *''कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे.''*

'संस्कारकार्यात पाच गोष्टींचा समावेश असावा - १) भगवद्‌भक्ती २) भगवद्‌गीतेचा अभ्यास ३) भारतमातेची सेवा ४) उत्तम चारित्र्यनिर्मितीसाठी श्रेष्ठ व्यक्तींचा आदर्श ५) वैज्ञानिक दृष्टी.

सोलापूरच्या व्याख्यानमालेत 'प्रेम-योग-साधना' याविषयी चिंतन करताना पू. स्वामी गोविंददेव गिरि 'प्रेम' या भावनेचा विश्वव्यापक अर्थ समजावून सांगतात.

ते म्हणतात- 'प्रेमाचा दुष्काळ आजकाल अगदी आपल्या सामान्य घरापासून जगात सर्वत्र भासू लागला आहे. अशा परिस्थितीत प्रेमाचं चिंतन सर्वांना उपयोगी पडेल.' ते म्हणतात- 'अशा परिस्थितीमध्ये अतिशय समर्पकपणे 'Sow the seeds of Love' - प्रेमाचे बीज लावा, प्रेम उमलू द्या, प्रेम-अंकुर फुलू द्या, प्रेमाचा वृक्ष मोठा होऊ द्या, प्रेमाच्या वृक्षाला खूप-खूप फुलं लागू द्या, प्रेमाच्या थंडगार छायेत लोकांना निवांत विसावा घेऊ द्या, प्रेमाच्या रसाच्या

आस्वादाने त्यांना तृप्त होऊ द्या; अशा प्रकारची वाक्यं ज्यांनी योजिली त्यांनी खरोखर समाजाची आणि व्यक्तीची सार्वकालिक आवश्यकता लक्षात घेतलेली आहे.'

प्रेम आपल्या जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून राहिलं आहे. ब्रह्मर्षि नारदांनी प्रेमाची केलेली व्याख्या सर्वोच्च मानली जावी. नारद म्हणतात– 'प्रेम म्हणजे आसक्ती हे खरं; पण प्रेमाची आसक्ती आणि कामाची आसक्ती यात एक महत्त्वाचं अंतर आहे. प्रेमाची व्याख्या करताना देवर्षि नारद म्हणतात–

**गुणातरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानम्**
**सूक्ष्मतरम् अनुभवरूपं प्रेमस्वरूपम् ।**

खरं प्रेम जिथे असतं, ते गुणांचा विचार करीत नाही.'

प्रेम हे जीवनमुक्ततेपर्यंत घेऊन जाते. प्रेमाने दुःखमुक्ती होत अनंताची आसक्ती वाढते. प्रेम म्हणजेच भक्ती. राधेचा प्रेमयोग अद्वैतापर्यंत घेऊन जातो. विश्वात्मक प्रेमभाव प्रकट करावयाचा असेल तर सर्वांभूती प्रेमभाव या धर्माने वागावे. प्रेम म्हणजेच अध्यात्म. विश्वबंधुत्वाचा आधार प्रेम हाच आहे.

प्रेमाची व्यापकता व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, विश्व या क्रमाने वाढत जाते. प्रेमाची कसोटी त्यागात आहे. राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी अशा प्रेमयोगाची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे उदाहरण पाहिले तर मातृभूमीच्या प्रेमाचा उदय झाल्याबरोबर सर्वस्वाच्या त्यागाची परिसीमाही गाठली गेली. प्रेमभावना अशी सत्यापर्यंत घेऊन जाते. अशी प्रेमयोग साधना करावी.

'सुशिक्षितांना कर्तव्यबोध' करताना – शिक्षणाचा खरा अर्थ कर्तव्यबोध हा आहे, हे स्पष्ट केले.

उदाहरणे देताना पू. स्वामी सांगतात– 'संत गुलाबराव महाराजांनी शिक्षणाची व्याख्या करताना सरळ-सरळ असं म्हटलेलं आहे, ''संस्कारांचं दान म्हणजे शिक्षण.'' प्रह्लादानं एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला. त्याने म्हटले– *तत् उत्तमं धीतं मन्ये* – सर्वात उत्तम अध्ययन ते आहे, ज्याने भक्तीचा संस्कार निर्माण होतो.'

शिक्षणाचा खरा अर्थ 'कर्तव्यतत्पर होणे' हा आहे. राष्ट्रीय भावनेच्या संदर्भाने पू. स्वामी सांगतात – 'जर आपण विद्यावान असू, जर आपण सुशिक्षित असू तर ज्याप्रमाणे आपण आपल्या आईच्या दुखण्याच्या वेळेला धावून जातो त्याप्रमाणे आपल्या भारतमातेच्या सगळ्या दुखण्यांच्या वेळेला धावून जाणे हे

आपले पहिले कर्तव्य आहे, हे आपल्याला जाणवले पाहिजे.' विश्वामित्रांनी प्रभु रामचंद्रांना शिक्षणाचा 'कर्तव्यतत्परता' हा अर्थ समजून देताना एक मिशन दिले. त्या मिशनमधले एक वाक्य जाणकार शिक्षणतज्ज्ञ अशा रामाने स्वतः उच्चारले आहे - *'गोब्राह्मणहितार्थाय देशस्य च हिताय च ।'* गायीकरता, धर्माकरता, सामान्य गोरगरिबांच्या करता मी आजीवन कष्ट करीत राहीन. ह्याच्या आड येणारा कोणीही असो त्याचा नाश केल्याशिवाय मी राहणार नाही.'

## वेद-वेदान्त-अनुबंधित प्रबोधन :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी 'यज्ञमय जीवन', असा वेदवेदान्तातील ऋषिंनी केलेला प्रबोध, आपल्या व्याख्यानातून कलकत्ता येथील भक्तीपर प्रवचनातून केला आहे.

वैदिक ऋषिंची यज्ञपरंपरा ही केवळ तांत्रिक परंपरा नसून, ज्ञानात्मक कर्मपरंपरा आहे; असे सांगून भगवद्गीतेतील श्रीकृष्ण भगवंतांचा अर्जुनाशी झालेल्या संवादातून यज्ञप्रधानतेकडे ते लक्ष वेधतात -

**'यज्ञ दान तपः कर्म न त्याज्यम् कार्यमेव तत् ।**
**यज्ञो दानं तपश्चैव च पावनानि मनीषिणाम् ।।'**

'भगवान ने स्वयं कहा, यज्ञ, दान और तप ये तीन कर्म ऐसे हैं, जिनका किसी भी अवस्था में मनुष्य को त्याग नहीं करना चाहिए । थोडासा विचार करेंगे तो यज्ञ, दान और तप इन तीन तत्त्वों में भी प्रभु ने ज्किा नाम पहले लिया है, वह सर्वाधिक महत्त्वपूर्ण है । यज्ञ का नाम पहले लिया । आगे चलकर आप देखेंगे कि दान और तप इन दोनों का भी समाहार यज्ञ के अन्तर्गत किया जा सकता है । प्रभु ने आगे चलकर दान को भी यज्ञ कह दिया । इसके पूर्व प्रभु ने तप को भी यज्ञ ही कहा । तप शब्द का समाहार भी यज्ञ में ही होता है । दान शब्द का समाहार भी 'यज्ञ' में होता है । इसलिए इन तीन शब्दों में सर्वप्रधान शब्द यदि कोई होगा, वह यज्ञ शब्द है ।'

यज्ञाचे स्वधर्मयज्ञ, सत्कर्मयज्ञ, जपयज्ञ, नमस्कारयज्ञ असे विवेचन करून, यज्ञ दिग्दर्शन करताना अग्निदेवांचा आदर्श, पू. स्वामी प्रतिपादित करतात.

अग्नी स्वतःच्या समर्पणातून सर्वकल्याणार्थ प्रज्ज्वलित झालेला असतो. याच अर्थाने श्रीमद् भगवद्गीतेत यज्ञसंस्थेची चर्चा केली आहे. पंचमहायज्ञ समजावून सांगत असताना, यज्ञाच्या माध्यमातून देह, प्राण, चित्त यांची शुद्धी होऊन

आध्यात्मिक उन्नती साधते. यासाठी भक्ती, सेवा, समर्पण या दृष्टीनं भगवान मनूंनी पंचयज्ञ सांगितले आहेत –

**'देवयज्ञं पितृयज्ञं ऋषियज्ञं तथैव च ।**
**नृयज्ञं भूतयज्ञं च यथाशक्ति समाचरेत् ।।'**

यज्ञाच्या संदर्भात संपूर्ण जीवन यज्ञमय व्हावे, असा विचार पू. स्वामींनी सांगून, छोट्या-छोट्या गोष्टींमध्येही कर्माला यज्ञाचे अधिष्ठान देऊन जीवनात मांगल्य निर्माण केले आहे.

'वेद-प्रदीप' म्हणजे वेदान्तील मंत्रांवरील जीवनसाधनेच्या दृष्टीने केलेले विवेचन होय. यात 'वेद' शब्दाचा अर्थ 'ज्ञान' असा आहे हे सांगून, वेदांतील मंत्र हे जीवनमार्गावर पथप्रदर्शक ठरतात; असे सांगत चारही वेदातील मंत्रांच्या आधारे गृहस्थाश्रमाची धन्यता, बालसंस्काराचे महत्त्व, आदर्श गृहवधूचे स्वरूप, प्रेम, कामना, आदरभाव, त्याग, मनःशक्ती, मातृभूमिभक्ती, आत्मदर्शन, प्रसन्न जीवन, सद्बुद्धिसंवर्धन अशा विषयांवर चर्चा केली आहे.

'गुरु-शिष्य' संबंधावर भाष्य करताना पू. स्वामी म्हणतात- आमच्याकडे गुरुमाउली असा एक शब्द आहे. आम्ही ज्ञानेश्वरांना माउली असे संबोधतो. या दृष्टीने संस्कार करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे आई बनावे. आई आणि लडिवाळ बालक असा गुरु-शिष्य संबंध असावा.

'वेदान्त और पुरुषार्थ' यावरील रामकृष्ण मठातील व्याख्यान सत्रांमध्ये वेदान्त म्हणजे वेदांचे तत्त्वज्ञान आत्मसात करण्यासाठी मांडलेली उपनिषदे, ब्रह्मसूत्र आणि भगवद्गीता अशी वेदातील तत्त्वज्ञानाची चर्चा करणारे ग्रंथ होत.

वस्तुतः उपनिषद वाङ्मय हा वेदांचा अखेरचा भाग असल्यामुळे त्यास वेदान्त असे म्हणतात. वेदान्त वाङ्मय विश्वातील अलौकिक वाङ्मय होय. यावर चर्चा करताना धर्माचे सर्वाधिक महत्त्व, निष्काम कर्म, निवृत्ती आणि परप्रवृत्ती चर्चा, सच्चिदानंदस्वरूपाची आराधना या विषयावर चर्चा करून नचिकेता याज्ञवल्क्य यांच्या उदाहरणांतून श्रीमद् भगवद्गीता आणि योगवासिष्ठ यातील चर्चेवरून पुरुषार्थविचार स्पष्ट केला आहे.

भौतिक अभ्युदय आणि पारमार्थिक शांती हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विश्वकल्याणाच्या दृष्टीने आणि कर्तव्यतत्परतेने धर्म, अर्थ काम आणि मोक्ष साधण्यासाठी भक्तिमार्गाचे अवलंबन करणे; अर्थात सत्य, प्रेम, करुणा यांचे

ठायीच अनुष्ठान मांडणे होय. असे सांगत, भारतात्मा विवेकानंद आणि नरकेसरी लोकमान्य टिळक यांच्या पुरुषार्थसाधनेची उदाहरणे दिली आहेत.

वेदान्तानुसार भक्तिमार्गाने पुरुषार्थ कसा सिद्ध करता येतो याचे उद्‌बोधन करण्यासाठी समर्थ रामदास स्वामी यांचे विभूतिमत्त्व आदर्श म्हणून सर्वांसमोर ठेवले आहे.

'सुगम कर्मयोग' या स्वामी माधवानंद उपाख्य डॉ. माधवराव नगरकर यांच्या 'कर्मयोग' या ग्रंथाचे प्रकाशन करतानाच्या व्याख्यानात, पू. स्वामी म्हणतात– 'कर्माचा आग्रह आपल्याला भगवद्‌गीतेमध्ये मिळतो. म्हणून ती तिची अपूर्वता आहे. आत्मानंदापर्यंत पोहोचण्याकरता जर आपल्याला रोजच्या कर्मांच्यामध्ये माझ्या देहाचा उपयोग करायचा असेल तर आता तिथे कर्मयोग हा शब्द येईल. भगवद्‌गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी जी पुष्पिका येते त्यामध्ये 'योगशास्त्र' हा शब्द येतो आणि हा योग साधणं म्हणजे संपूर्ण जीवन जगत असताना त्या जीवनातल्या सुखदुःखांपासून मला मुक्त होता येणं, त्यांच्यापासून वेगळं होऊन मला आनंदात आत्मानंदामध्ये निमग्न राहण्याची कला साधता येणंही भगवद्‌गीतेची योगाची व्याख्या आहे.'

**'तं विधाद् दुःखसंयोग वियोगं योगसंज्ञितम् ।'**

यादृष्टीने भगवान पतंजली म्हणतात–

**'सत्यं प्रतिष्ठायां क्रिया फलाश्रयत्वं ।**
**अहिंसा प्रतिष्ठायां तत् संन्निधौ वैरत्यागाः ।**
**अस्तेय प्रतिष्ठायां सर्वोरत्नोपस्थानं ।।'**

रोजचं कर्तव्यकर्म आपण नीटपणे, निःसंग बुद्धीने, फलाकांक्षारहित केलं की आपोआप त्यातून आपल्या अंतरंगामध्ये चित्तशुद्धी होऊन सिद्धी साकारतात; ही महत्त्वाची गोष्ट. याला म्हणतात कर्मयोग.'

पू. स्वामी पुढे म्हणतात– 'मी कर्मयोगाचे दोन पैलू सांगितले. भगवंताचं अस्तित्व न मानताही चित्तशुद्धीच्या मार्गाने कर्तव्यबुद्धी म्हणून मी कर्म करूनही चित्तशुद्धी करून आत्मस्थितीला पोहोचता येईल. पण भगवंताचा विचार करून सर्वांच्यामध्ये सत्स्वरूपानं मी नटलेलो आहे या बुद्धीनं विचार करून जो सर्वांच्याकरता निरंतर कर्म करत असतो; पण सर्वांच्याकरता करूनही लोकांच्याकरता केले असं ज्याला वाटत नसते, असा महापुरुष हा भगवद्‌गीतेचा

परमोच्च आदर्श आहे.'

'योगवासिष्ठ' हा ग्रंथ उलगडून सांगण्यासाठी, सौ. रत्ना दाढे यांच्या घरी झालेल्या प्रवचनसत्रात, पू. स्वामीजी योगवासिष्ठ ग्रंथाचा अल्प परिचय करून देताना म्हणतात– 'श्रीगीता हे उपनिषदांचं सार आहे, तर योगवासिष्ठ हा त्यांचा विस्तार आहे. उपनिषदांत अनेकदा एकदम ज्ञानाचं विधान केलेलं असतं. त्याची चर्चा नसते. आधुनिक मनांना हे निष्कर्ष चटकन पटत नाहीत. त्यांची तर्कशुद्ध मांडणी हवी असते. चर्चा हवी असते. अशा वेळी अशा बौद्धिक चर्चेसाठी योगवासिष्ठांकडे अपरिहार्यतेने वळावं लागतं.'

योगवासिष्ठ या ग्रंथात वैराग्य, सद्गुरू, पुरुषार्थ योग, विचार, संतसंग, जगत्, मनापलीकडे, साधना आणि स्वानंद या विषयांवर चर्चा करून ऋषिंनी सात्त्विकतेचा दिलेला संदेश पू. स्वामी विस्ताराने प्रतिपादित करतात. या सात्त्विकतेने जीवन सर्वार्थे सफल होईल व परतत्त्वस्पर्श लाभेल असे स्पष्ट करतात.

पू. स्वामी सांगतात– 'ईश–साक्षात्कार जीवनाचा पाया नि उद्दिष्टही – संपूर्ण विश्वाचं स्थूप रूप बाजूला (विवेकानं) सारून विश्वाची एकात्मता ध्यानी घेणं नि संपूर्ण जीवन–व्यवहार या एकात्मतेच्या पायावर करणं, ही 'ज्ञानाची बैठक' आहे! अनुभूती नसेल, पण शास्त्रांवर, संतांच्या उपदेशांवर प्रगाढ विश्वास ठेवून विश्वाची चिन्मय एकात्मता हीच जीवनाचा पाया मानायला हवी. तसेच या दृढ श्रद्धेनं (भक्तीनं) त्या एकात्मतेची अभिव्यक्ती आपल्या जीवन–कर्मातून व्हावी.

जीवनातील सारी कर्मं म्हणजे एकात्मतेचा भावमय आस्वाद व्हावा. असा आस्वाद 'जीवनाच्या सुखातूनही नि दुःखातूनही घेता येतो', हे विशेष! हेच जीवनाचं उद्दिष्ट आहे. हाच तो जीवनाला 'परतत्त्वस्पर्श'! पू. स्वामी म्हणतात– 'योगवासिष्ठाच्या रूपानं महर्षि वसिष्ठांनी जीवनाचा आध्यात्मिक वस्तुपाठ दिला आहे. आपण सर्वांनी त्याचं चिंतन–मनन करावं नि आपलं दैनंदिन जीवन आनंदमय करून सोडावं!'

'ज्ञानेश्वरी चिंतन' या ग्रंथाच्या निमित्ताने ज्ञानेश्वरीतील चित्ताकर्षक वाक्विलास आणि वेदान्ताचे सार कथन करणारी पू. माउली ज्ञानेश्वर महाराज यांची विश्वात्मक भूमिका, त्याचबरोबर ज्ञानेश्वर महाराजांच्या, श्रीमद् भगवद्गीतेवरील भाष्यात्मकतेच्या निमित्ताने घडलेल्या अत्युत्कट शांत रसाच्या वर्षावाकडे पू. स्वामीजी लक्ष वेधतात.

मुळात भगवद्‌गीता हा पू. स्वामींचा अतिशय आवडता आणि अगदी शैशवापासून चिंतनाचा विषय. ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची केलेली अतिशय सोपी आणि यथार्थ व्याख्या– *'पाहणे आपणासि आपण । या नाव ज्ञान ॥'* उद्‌धृत करून प्रपंचातील लिप्ततेतून बाजूला होऊन, अद्वैत साधता येते; हे ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगताना–

**'तरी झडझडोनि वाहिला निघ ।**
**इथे भक्तिचिये वाटे लाग ।**
**जया पावसी अव्यंग ।**
**निजधाम माझे ॥'**

भगवद्‌गीतेच्या आणि पर्यायाने ज्ञानेश्वरीच्या समुपदेशनाची अपेक्षा पू. स्वामी व्यक्त करतात– *''विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।''* स्वयं अपने कर्तव्य के पालन में यह विश्व तल्लीन हो जाए । और मैं अपने धर्म का पालन करते हुए जिस मंगल आकांक्षा को अंतःकरण में निर्माण करूँ वह आकांक्षा पूर्ण हो जाए ।'

**महान विभूतिमत्त्वांच्या प्रकाशात विचारप्रवर्तन :–**

पू. स्वामी यांच्या गत पन्नास वर्षांतील प्रबोधन प्रपंचामध्ये, पू. स्वामींना प्रभावित करणारी, ज्ञान, व्यवहार आणि राष्ट्र या संदर्भात पथदर्शी ठरलेली; तसेच सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थानासाठी दीपस्तंभासारखी विभूतिमत्त्वे पू. स्वामींनी आपल्या प्रवचनांच्या निमित्ताने सर्वांसमोर चिंतनासाठी उल्लेखित केली. त्या विभूतिमत्त्वांच्या प्रकाशात भौतिक अभ्युदय आणि आध्यात्मिक उन्नती या दृष्टीने पू. स्वामींनी अशा विभूतिमत्त्वांची चर्चा केलेली दिसते. या चर्चेचे स्वरूप किंवा विचारप्रवर्तनाचे स्वरूप पाहिले तर, पू. स्वामींच्या राष्ट्रयोगी विभूतिमत्त्वाचे दर्शन घडते.

'भगवान महावीर' यांच्या चरित्राचे उद्‌घाटन ज्ञानेश्वरीच्या ओव्यांच्या आधारे करीत, महावीरांनी धर्मप्रवर्तन कसे केले; सत्य, प्रेम, करुणा ही उत्तुंग संवेदना महावीरांच्या ठायी कशी होती, त्याचबरोबर कठोर ब्रह्मचर्य, अचौर्यव्रत आणि अहिंसा परमो धर्मः । यांची उकल पू. स्वामींनी ज्ञानेश्वरीतील वचनांच्या आधारे करून दिली आहे. जैन आचार्यांच्या बारा वैराग्य–भावना ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगताना ते ओवी उद्‌धृत करतात –

**'वीतरागते सारिखा । जोडूनि ठेवला नित्य सखा ।**
**तो आघवियाची भूमिका । स्वये चाले ।।'**

महावीर प्रभूंनी विवेकाला प्राधान्य देऊन पार्श्वनाथांच्या परंपरेशी कौशल्याने समन्वय साधला आहे. धर्मप्रसारासाठी त्यांनी केलेले व्यवस्थापन लक्षणीय आहे – आचार्य– आचारविधी शिकविणारे, उपाध्याय– शास्त्राभ्यास शिकविणारे, स्थविर– वय, दीक्षा आणि अध्ययनाने अधिक अनुभवी, प्रवर्तक– आज्ञा, अनुशासन यांचे पालन करविणारे, गणी– गणाची व्यावहारिक व्यवस्था बघणारे, गणधर– ज्याच्यावर गणाची संपूर्ण जबाबदारी असे आणि गणावच्छेदक– संघाच्या व्यवस्था पद्धतीचे विशेषज्ञ. पू. स्वामी म्हणतात– 'इतक्या प्राचीन काळी, इतके चांगले व्यवस्थापक विकसित होणे खरोखरी विस्मित करणारे आहे.'

लातूर येथील संस्कृतिजागरण मंच याद्वारे प्रवचनकारांच्या समोर समुपदेशन करण्यासाठी पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी 'प्रबोधनकार का स्वधर्म' या विषयावर व्याख्यान करताना महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर ते तुकाराम या संतांची विभूतिमत्त्वे प्रवचनकारांच्या समोर मांडली. संतांप्रमाणे लोकांमधील सात्त्विकता जागृत करणे म्हणजे धर्म होय, असे सांगितले. प्रबोधनकारांनी माउली ज्ञानेश्वरांनी सांगितलेले साध्य सतत डोळ्यासमोर ठेवावे; ते साध्य असे–

**'किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होवोनि तिहीं लोकीं ।**
**भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।'**

'राष्ट्रगुरू' म्हणून स्वामी समर्थ रामदासांचा उल्लेख करताना, त्यांच्या विभूतिमत्त्वांच्या प्रकाशात, सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण करण्यासाठी समर्थांमधील नेमक्या गुणात्मक व्यवहाराचे निर्देशन पू. स्वामींनी केले– 'निर्भय, विजिगीषु, सदाचारी व संघटित असा सामर्थ्यसंपन्न समाज घडविणे हे त्यांच्या प्रयत्नांचे महत्त्वाचे लक्ष्य आहे आणि यासाठी जे–जे करणे आवश्यक व शक्य आहे ते–ते त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून केलेले दिसते. मुळात त्यांच्या स्वतःच्या चिंतनाची, स्वभावाची व लोकव्यवहाराची बैठक त्यांनी जागरूकपणे, या ध्येयासाठी अनुकूल ठेवलेली दिसते. त्यांच्या विचार, उच्चार व आचारामध्ये कुठेही विसंगती आढळत नाही. भक्तिप्रधान अध्यात्मोपदेशाने सहिष्णु बनलेल्या समाजाच्या अंतःकरणात जयिष्णुतेचे स्फुल्लिंग चेतविणे व ते धडधडते ठेवणे व समाजाचे मानसिक परिवर्तन व्यापक प्रमाणात घडविणे, हे महत्त्वाचे व अवघड

कार्य समर्थांकडून पार पडले.'

जिजाऊसाहेब, स्वामी समर्थ रामदास यांच्या प्रेरणेतून आणि संस्कारांतून स्वयंभूपणे प्रकटलेले शिवरायांचे विभूतिमत्त्व हे राष्ट्रयोग्यांच्या दृष्टीने आदर्शभूत आहे, असे पू. स्वामी ठामपणाने सांगतात.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करायचे असेल तर 'शिवदृष्टी आणि शिवसृष्टी' यांचे अनुकरण आणि अनुसरण अपरिहार्य आहे. श्री समर्थ म्हणतात त्याप्रमाणे–

**''निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।**
**अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।**
**यशवंत किर्तीवंत । सामर्थ्यवंत, वरदवंत ।।**
**पुण्यवंत नीतिमंत । जाणता राजा ।।''**

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान अशा 'शिव–प्रेरणा' अनुसरण्यातून होईल; हे जसे पू. स्वामींना वाटते तसेच वैश्विक व्यासपीठावर हिंदूंचा स्थायी भाव 'विश्वबंधुत्व' या विषयी ठाम प्रतिपादन करणारे स्वामी विवेकानंद यांचे विभूतिमत्त्व आणि राष्ट्रयोगी बनण्यासाठी तरुणांमध्ये केलेले जागरण अध्यात्म भक्ती आणि सर्वपरी राष्ट्रभक्ती याविषयी स्वामी विवेकानंदांनी केलेले समुपदेशन लक्षात घेणेही अनिवार्य आहे, असे पू. स्वामींना वाटते.

पूज्यपाद आद्य शंकराचार्य, श्री संत माउली ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री गुलाबराव महाराज ही विभूतिमत्त्वे पू. स्वामींच्या दृष्टीने जगद्गुरू स्वरूपाची आहेत.

विश्वबंधुत्वाचा, विश्वकुटुंबीयत्वाचा आणि सर्वात्मक परमेश्वराचा अद्वैत भावाने अनुभव घडविणारा वेदान्त हा सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थानाचा पायाभूत विचार होय. या विभूतिमत्त्वातील ज्ञानेश्वरकन्या प्रज्ञाचक्षू जगद्गुरु संत श्री गुलाबराव महाराज यांचे विभूतिमत्त्व एकात्म समाज तथा राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीने अति महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन पू. स्वामी, गुलाबराव महाराजांच्या समन्वय दृष्टीचा विचार सर्वांपुढे मांडतात. ते सांगतात– 'श्री महाराज एक बात डंके की चोट पर कहते हैं कि वेदों का विचार और पुराणों का विचार इनमें जरा भी अंतर नहीं । वैदिकों का और अवैदिकोंका भी और सारे के सारे धर्मों का भी समन्वय कैसे किया जा सकता है यह बतलाने के लिए महाराज ने नौ सीढियाँ

बतायी । महाराज यह कहते हैं कि जिन-जिन संप्रदायों की स्थापना करनेवाले जो-जो आचार्य हैं वे सब यही बात बोल रहे थे ।' पू. स्वामी संत श्री गुलाबराव महाराजांच्या या समन्वयदृष्टीने सर्व विचारप्रवाहांविषयी, तत्त्वज्ञानशाखांविषयी आक्षेप आणि शंका कशा फिटून जातात आणि निर्मळ वेदान्त भाव अर्थात सत्य, प्रेम, करुणा कशी प्रकटते; हे सांगून 'समन्वय महर्षि संत गुलाबराव महाराज', असा त्यांच्या विभूतिमत्त्वाचा गौरव करतात.

**प.पू. द्वितीय सरसंघचालक श्री. मा. स. गोळवलकर गुरुजींच्या अंतिम संदेशाचा प्रभाव :-**

द्वितीय सहसंघचालक पू.श्री. मा. स. गोळवलकर यांचे, ठाणे येथे संघ आणि संघपरिवारातील पदाधिकाऱ्यांच्या अभ्यासशिबिरात अकरा बौद्धिक वर्ग झाले. पू. गुरुजींच्या आयुष्यातील हे शेवटचे अभ्यासवर्ग. सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी कटिबद्ध होत असलेल्या, कटिबद्ध असलेल्या आणि पुढील अनेक शतके राष्ट्रसाधक म्हणून उभे राहणाऱ्या, सर्व राष्ट्रयोगसाधकांच्या दृष्टीने दीपस्तंभासारखे पथदर्शी ठरणारे हे अभ्यासवर्ग आहेत, हे पूजनीय स्वामी गोविंददेव गिरि यांना द्रष्टेपणाला जाणवले आणि त्यांनी श्री गुरुजींच्या जन्मशताब्दी-वर्षाच्या निमित्ताने, मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी या बौद्धिकांचे हिंदी भाषेत केलेले संकलन- 'श्री गुरुजी अंतिम संदेश' या नावाने 'धर्मश्री'च्या माध्यमातून मराठीत प्रसिद्ध केले आणि द्रष्ट्या प्रबोधकाने कार्यकर्त्यांना शतकांसाठी दिशाबोध ठरेल असे या पुस्तकांच्या रूपाने राष्ट्रयोगगुरूंना अर्थात पू. श्री गुरुजींना ज्ञानमूर्तिस्वरूपात पुन्हा प्रकट केले. श्री गुरुजींच्या संदेशातील महत्त्वाचे अंश सतत चिंतनासाठी सर्वांसमोर ठेवणे आवश्यक आहे.

'संकल्प-विकल्परूपी तरंग थांबविल्यास आपल्याला बाह्य निमित्ताविनाही असीम सुखाची अनुभूती प्राप्त होऊन सर्व प्रकारे समाधान आणि कृतकृत्यता यांची प्रचिती येईल.'

'आम्ही आग्रहपूर्वक म्हटले आहे की, माझे समर्थ हिंदू राष्ट्र आहे. या राष्ट्राच्या जीवनाचे एक वैशिष्ट्य आहे, की जे समग्र मानवतेच्या कल्याणाचे आहे.'

'राष्ट्र नावाचा विशिष्ट प्रवृत्तीचा जो एक समष्टिरूप असा मानव समाजाचा देह आहे; तो धर्म आणि संस्कृती यांच्या विना बनू शकत नाही.'

‘आपला सिद्धान्तदृष्टीपुढे ठेवून आपापल्या क्षेत्रात काम वाढवा. त्या क्षेत्रातील आपल्या समृद्धीचा विचार करा. राजकीय सत्तेचा, उत्पादनाचा आणि परब्रह्मस्वरूप जीवनाचाही विचार करा.’

‘आपण तर आपला सारा समाज एक करू आणि आपले राष्ट्रजीवन इथे प्रस्थापित करू. यासाठी कोणाशी संघर्ष करावा लागला तर तो करू आणि त्यात विजयी होऊ.’

‘प्रथम अंतर्मुख होऊन आपलेच परीक्षण आणि निरीक्षण करावे आणि मग ठरवावे की, आपण पूर्णपणे मन ओतून काम करतो आहोत, असे आपण म्हणू शकू काय?’

‘संपत्तीचे विकेंद्रीकरण व्हावे, हीच त्यात मुख्य गोष्ट आहे. हे विकेंद्रीकरण न्याय्य असावे आणि त्यामुळे समाजातील कोणीही व्यक्ती जीवनातील किमान गरजांना वंचित राहू नये, एवढाच त्याचा अर्थ आहे.’

‘आपली अस्मिता, स्वाभिमान, देशप्रेम, राष्ट्रप्रेम यांचा आविष्कार व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या विकृत कल्पनेने बाधित होणार नाही, ह्याची काळजी घेतली पाहिजे.’

‘हे सर्व घडून येण्यासाठी माणूस कसा हवा? ज्याच्या हृदयात संपूर्ण समाजासंबंधी आत्मीयता आहे, करुणा आहे, जो समाजाच्या दुःखांनी व्यथित होतो, ज्याचा स्वार्थ नियंत्रणाखाली आहे.’

‘ज्या क्षेत्रात आपण काम करतो तिथे काम करता-करता त्या कामासंबंधी प्रेम निर्माण होऊ शकेल, हे काही प्रमाणात खरे आहे. परंतु ही सर्व कामे करीत असताना आपण जे मूळ आहे, त्याचे स्मरण राहावे.’

‘अशा उत्स्फूर्त पद्धतीने काम करू शकणारी, नियंत्रण ठेवू शकणारी, लोकांचे श्रद्धाकेंद्र बनणारी शाखा प्रयत्नपूर्वक उभी करावी लागेल.’

‘आपण संकल्प केला की आंतरराष्ट्रीय धोरणाने केले जाणारे राजकारण राष्ट्रीय मार्गावर आणू.’

‘संघाच्या कार्यात सगळ्यांचे पोषण आहे. संघाच्या मूळ विचारधारेला अनुसरून आपल्याला सर्व क्षेत्रात काम करायचे आहे, असा विचार आपण सगळ्यांनी करावयास हवा. सर्व क्षेत्रांमध्ये हा विचार प्रभावी करू या.’

‘योजनापूर्वक चांगले काम करणारे, निर्दोष काम करणारे असे यशस्वी

कार्यकर्ते आपल्याला सर्वत्र मिळू शकतील.'

'अशा प्रकारचा श्रेष्ठ, गुणसंपन्न, त्यागी आणि कार्याची योग्य दृष्टी असलेला कार्यकर्त्यांचा वर्ग जर आपण उभा करू शकलो नाही, तर बाकीच्या लांबलचक गप्पा मारून काही लाभ व्हावयाचा नाही.'

'संघ हे साऱ्याच कामांचे मूळ आहे. तर या मुळाच्या ठिकाणी असलेल्या कार्यकर्त्यांचे पावित्र्य, शुद्धता, त्याग, कामाविषयीची तळमळ आणि आत्मसमर्पण यांचा प्रभाव अन्य कार्यांवरही पडेल.'

**राष्ट्रयोगी पू. स्वामी यांचा राष्ट्रयोग साधकांशी हृदयसंवाद :–**

नागपूर येथे विश्व हिंदू परिषदेच्या चिंतनबैठकीत राष्ट्रयोगी पू. गोविंददेव गिरि महाराज यांची विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांसमोर प्रवचने झाली.

या प्रवचनप्रसंगी 'मैं आपका सहयात्री' असा स्वतःचा आवर्जून उल्लेख करून, पू. स्वामींनी साधक राष्ट्रयोग्यांना विश्वासात घेतले.

विश्व हिंदू परिषदेच्या कार्याचा संदर्भातील एक प्रकारे गुरुपरंपेचा उल्लेख करीत अर्थात पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा दृष्टिकोण, सद्गुरु कांची पीठाचे आचार्यजी आणि पू. सत्यमित्रानंदजी महाराज यांचा उल्लेख करून; अशोकजी सिंघलांच्या आग्रहाने मी संन्यासीवेशात आपल्यासमोर आहे; अन्यथा बाल्यावस्थेपासून मी संघाच्या विचाराने प्रेरित झालेलो असून; राष्ट्रकार्याकरिता संन्यासी व्हायचे ठरविले होते; हे सांगून जवळीक निर्माण केली.

पू. सरसंघचालक गोळवलकर गुरुजी, पं. दीनदयाळ उपाध्याय आणि त्यांच्या पश्चात श्री. दत्तोपंत ठेंगडी तसेच स्व. लक्ष्मणरावजी इनामदार या सर्वांनी मला, बौद्धिक देणे बंद करून; प्रत्यक्ष कार्यामध्ये सहभागी होण्याचा आग्रह केला. आज मी आपल्याशी, मला आपणांत पाहत, संवाद करीत आहे. आपले सर्वोच्च कार्य हिंदू राष्ट्र उभे करणे हे आहे. देशव्यापी संघटन उभे करून, संपूर्ण राष्ट्र एक मंदिर आहे असे मानले तर; त्यातील आराध्य देवता भारतमाता आहे. संपूर्ण विश्वाचे कल्याण करायचे असेल तर भारत सामर्थ्यसंपन्न झाला पाहिजे आणि भारताच्या सामर्थ्यसंपन्नतेसाठी धर्मजागरण आणि अनुसार महत्त्वाचा ठरतो. आपले काम–

**'विधायास्य धर्मस्य संरक्षणम् ।**
**परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम् ।'**

अशा तऱ्हेने पू. स्वामींनी ध्येय, सद्‍गुणसाधना, विजयाचे सूत्र, आदर्श प्रचारक, धर्माचे स्वरूप, हिंदूधर्मोपदेश अशा अनेक मुद्द्यांना स्पर्श करीत साधक राष्ट्रयोग्यांना समुपदेशन करून चेतविले.

**समग्र जीवनपरिपोषक प्रबोधन :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि, आपल्या विविध प्रवचन प्रसंगांतून मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करीत पुरुषार्थपूर्ण व्यक्ती उभे करण्याचे कार्य करीत आहेत. ते इतिहासाचा मागोवा घेत, वर्तमानाच्या स्थितिगतीचे सम्यक दर्शन घडवीत, वैभवसंपन्न सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थापित करण्यासाठी, भविष्यातील निर्दोष गुणात्मक विश्वबंधुत्वावर आधारित सत्य, प्रेम, करुणेच्या संवेदनेने अवघा समाज कसा उभा राहील; यासाठीचा द्रष्टेपणाने वेध घेत, सनातन ज्ञानसंचिताच्या बळावर प्रबोधन करतात. त्याचबरोबर व्यक्ती व्यक्तीला या प्रबोधनातून विश्वबंधुत्वाच्या भूमिकेने कार्यासाठी कटिबद्ध करतात.

या त्यांच्या प्रबोधक कार्याची नोंद मान्यवर संस्थांनी घेतली आहे. अनेक पुरस्कारांनी व गौरवांनी त्यांना सन्मानित केले गेले आहे. भृंग ऋषी पुरस्कार (नगर), दधीच समाजरत्न पुरस्कार, ऋग्वेद भूषण पुरस्कार (पुणे), स्वामी स्वरूपानंद पुरस्कार (पुणे विद्यापीठ), सामाजिक कृतज्ञता पुरस्कार (पुणे), विद्वान तपस्वी पुरस्कार (पुणे), राष्ट्रीय चारित्र्य पुरस्कार (पुणे), समर्थ सेवा पुरस्कार (सातारा), श्री गोळवलकर गुरुजी जनकल्याण पुरस्कार, स्वामी चंद्रशेखरेंद्र सरस्वती राष्ट्रीय गौरव पुरस्कार (कांची कामकोटी), श्री अटलबिहारी वाजपेयी हिंदी विश्वविद्यालय भोपाल द्वारा सन्मान्य डी.लिट, संस्कृत साधना शिखर सन्मान (राजस्थान सरकार), प.श्री. रमेशभाई ओझा यांच्या सान्दीपनि आश्रमाच्या वतीने देवर्षि पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार (आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर) आणि महाराष्ट्र शासनाचा ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार अशा निवडक पुरस्कारांची नोंद विशेष महत्त्वाची ठरते.

* *

॥ दहा ॥

# ज्ञानवान – कर्म – यज्ञ

महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान – महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान : कार्यस्वरूप – महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान–संचालित वेदविद्यालयांचे जाळे – 'वेदश्री तपोवन' संकल्प – श्रीकृष्ण सेवा निधी – श्री गणेश समन्वय आश्रम – वंचितांचा आधार – स्वागत आपुले, आपुल्या धर्मगृही – संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलाचे कार्य – श्री ज्ञानेश्वरकन्या वात्सल्यधाम – कीर्तनकार सेवा – श्री गोविंद बालसंस्कार केंद्र – संत ज्ञानेश्वर वेदविद्यालय, वृंदावन – संत ज्ञानेश्वर आश्रम, कॅनडा – करुणामूर्ती पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सेवाकार्याचा गोवर्धन.

## ।। दहा ।।

# ज्ञानवान – कर्म – यज्ञ

राष्ट्रयोगी, सिद्धप्रज्ञ पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या ठायी बालपणीच सर्वज्ञता प्रकाशली. श्रुति, स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत यातून ज्ञानग्रहण आणि ज्ञानवितरण असे कार्य, दाधिच वंशात पिढ्यान्‌पिढ्या सुरूच होते. हे सर्व ग्रंथ आणि मौखिक परंपरा या दोन्हीचाही वारसा त्यांना वांशिक परंपरेनेच मिळाला. सखोल अभ्यास, व्यापक व्यासंग, श्रेष्ठ समर्थ गुरुपरंपरा यांचे आशीर्वाद, अमोघ वक्तृत्त्व, उपवेदांचा अभ्यास आणि कलासाधना या सामर्थ्यासह पू. स्वामी गोविंददेव गिरि यांची प्रज्ञा देशविदेशात प्रकटते आहे याचा अनुभव सर्वांना येत आहे. अभ्यास आणि व्यासंगाने स्वामी पदापर्यंत वर्धिष्णुपणाने प्रकाशमान होत गेलेले संत, समर्थ पू. स्वामी हे भारतीय परंपरेतील ऋषिमुनींच्या मालिकेतील राष्ट्रयोगी होत.

प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेच्या आधाराने आणि ऋषिकुलांच्या दिव्य मार्गदर्शनातून सुप्रतिष्ठित झालेल्या सनातन, श्रेष्ठ, वैश्विक संस्कृतीचे दर्शन स्वामींच्या दिव्य प्रतिभेला सतत आवाहन देत आहे. भारतवर्ष हे प्राचीनतम कालापासून वैश्विक सद्‌गुरुराष्ट्र होते; याचे दर्शन स्वामींना प्राचीन ज्ञानसंचितातून घडले. गुरुकुलांचा आदर्श पुन्हा प्रत्यक्षात रचनात्मक कार्यातून उभारला पाहिजे, असा संकल्प त्यांच्या मनात स्फुरला.

गत दोन–अडीच हजार वर्षांत आक्रमकांनी हेतुपूर्वक सनातन वैश्विक सांस्कृतिक राष्ट्र नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला आहे हे पू. स्वामींना सतत

जाणवते आहे. भारताची धर्मधारणा उद्ध्वस्त केली तर हे सनातन, सार्वभौम, सांस्कृतिक राष्ट्र यावच्चंद्रदिवाकरौ भौतिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीत ढकलले जाईल. असे घडले की त्याचा राजकीय, आर्थिक फायदा आपल्याला मिळेल. तसेच तथाकथित धर्मप्रसाराने भारतीय मने सनातन अस्मितेला पारखी होऊन, पोथीनिष्ठ धार्मिक होतील; असे कल्पून राजकीय आणि धार्मिक साम्राज्यवादी आक्रमकांनी, या राष्ट्राचे विश्वात अजोड आणि मौल्यवान असलेले ज्ञानसंचित केवळ भ्रामक, कपोलकल्पित, रानटी अवस्थेतील असल्याचा आक्रमक डांगोरा पिटला, विश्वगुरुत्व म्हणून प्रकाशमान असलेले सनातन हिंदूधर्मराष्ट्र गुलामीच्या गर्तेत लोटून दिले.

हा इतिहास लक्षात घेऊन, द्रष्टे, राष्ट्रयोगी, महर्षि पू. स्वामी गोविंददेव गिरि स्वप्रतिभेने, द्रष्टेपणाने कार्यमग्न झाले.

गत अडीच हजार वर्षांत हिंदू धर्म पुनरुत्थानाचे सातत्याने झालेले प्रयत्न सनातन हिंदूधर्मराष्ट्र वैभवसंपन्नतेने 'विश्वगुरू' म्हणून पुनःप्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक भारतीयाच्या अर्थात हिंदूच्या मनात वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर राष्ट्रआराधन सतत सुरू राहिले पाहिजे यासाठी प्रयत्नशील असलेल्या सर्व संस्था, संघटना यांनी सतत कार्यरत राहण्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन पू. स्वामी सनातन हिंदूधर्मराष्ट्र–जागरणाचे असिधाराव्रत घेऊन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक तथा कार्यकर्ते झाले.

नारदीय परंपरेने, नवविधा भक्तिमार्गाने, सनातन ज्ञानसंचिताचे जागरण करीत असतानाच, स्थलकालपरिस्थितिसापेक्षतेने नव्या अत्याधुनिक साधनांसह पूर्व दिव्य ज्ञानसंचिताचे पुनर्जागरण, उपयोजन, विकसन, संरक्षण घडले पाहिजे यासाठी माउलीच्या ममतेने स्वतः आणि संपर्कात येणाऱ्या सर्वांना प्रवृत्त करून, ज्ञानवान कर्माची परंपरा उभी करण्याच्या कार्यात ज्ञानकर्मसमाधीत मग्न आहेत. त्यांच्या ठायीच्या सत्य, प्रेम, करुणा या संवेदनांचा आविष्कार अर्थात वेदान्तज्ञानाचा आविष्कार पू. स्वामींच्या करुणापूर्ण कर्मयज्ञातून वर्धिष्णुपणे घडू लागला आहे.

**महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान :–**

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी विचारपूर्वक कार्यक्रमयोजना संकल्पित केली. सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थापित करून सुप्रतिष्ठित करावयाचे

असेल, वेदज्ञानाचे विश्वगुरुत्व विश्वकल्याणासाठी पुन्हा प्रकट करावयाचे असेल, तर या राष्ट्राचे पायाभूत ज्ञानसंचित प्रथमतः संरक्षित केले पाहिजे हे लक्षात घेतले.

वेदज्ञान प्रथम कोणत्या भाषेत, अर्थात आज उपलब्ध असलेल्या संस्कृत भाषेच्या कोणत्या भाषिक रूपात प्रकटले असेल, ते संरक्षित करावयाचे असेल तर या ज्ञानाच्या प्रसृतिकरणाची मौखिक परंपरा अनुसरणे अत्यावश्यक आहे याकडे लक्ष वेधले. वेदांचे मंत्रसामर्थ्य हे गुरुकुलांमधून दिल्या जाणाऱ्या मौखिक परंपरांतून मंत्रसामर्थ्याने प्रकट प्रवाहित होत राहिले आहे. या प्राकट्याचे तीन भाग स्पष्टपणाने परंपरेतील उल्लेखातून समोर येतात. १) वाणीविन्यास, २) यज्ञसंस्था व ३) विद्यासाधनेसाठी विशिष्ट वस्तू किंवा साधनपरंपरा. हे ज्ञान समग्र जीवनाच्या अंगोपांगांसाठी वैशिष्ट्यपूर्ण आणि विशिष्ट स्वरूपात उपयोजित केले जात असे. व्यष्टीपासून समष्टीपर्यंत सर्व प्रकारच्या सांस्कृतिक तथा भौतिक परंपरांच्या प्राकट्यासाठी आणि उपयोजनासाठी त्याचा विनियोग अतिशय पावित्र्याने केला जात असे. म्हणजेच आहार आणि विहार यासाठी पायाभूत विचार, आचार यांच्या साह्याने समग्र जीवनव्यवहार असे वैदिक संस्कृतीचे वैशिष्ट्य होते, यावर लक्ष केंद्रित केले.

मानवी जीवनाचा कुटुंबव्यवहार, समाजव्यवहार, राजव्यवहार, न्यायव्यवहार, आरोग्यव्यवहार यासाठी ज्ञानात्मक मनोवृत्तीने प्राकट्य घडले तर अखिल मानवमात्राचे लौकिक आणि पारलौकिक कल्याण साधता येते, या दृष्टीने ऋषिपरंपरेने, द्रष्टेपणाने मनुष्यमात्राच्या ज्ञानात्मक व्यवहारासाठी दृष्ट झालेले ज्ञान सुविहितपणाने वाणीस्वरूप चैतन्यव्यवहारामध्ये अर्थात मंत्रस्वरूपामध्ये मांडले. पू. स्वामी गोविंददेव गिरि म्हणतात– 'वेद म्हणजे ज्ञान'. ज्ञानात्मक कर्म अर्थात ज्ञानवान कर्म मनुष्यमात्राच्या सर्वंकष कल्याणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

ज्ञानाचा प्रवास हा नित्य चैतन्यशाली असा असल्यामुळे ज्ञान-प्रक्रिया सनातनातून वर्तमानाकडे आणि भविष्यकालासाठीही अप्रतिहतपणे सुरू असते. स्थल, काल, परिस्थितीप्रमाणे ज्ञानाचे प्रकटीकरण आणि उपयोजन होणे अपरिहार्य असते. त्यामुळे प्राचीन काळातील सुविहित मांडणी केलेले ज्ञानसंचित हे मौखिक परंपरेतील आणि लिखित परंपरेतील स्वरूपांचा प्रयोगसिद्ध अभ्यास करून, वर्तमानातील जीवनासाठी खुले केले पाहिजे असे ठरविले. ज्ञान हे कधीही

जुने, बुरसटलेले, टाकाऊ असूच शकत नाही. त्याचा द्रष्टेपणाने विनियोग करणे हे आपल्या हाती असते. आधुनिक सर्व शास्त्रांतील शास्त्रज्ञांनी अभ्यासकांनी हे समजून घेऊन, त्याचा स्थल-काल-परिस्थितिसापेक्ष स्वरूपात विनियोग केला पाहिजे यावर भर दिला.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आणि त्याच्या वैभवसंपन्नतेसाठी प्रथम त्या ज्ञानसंचिताचे मूल्य द्रष्टेपणाने समजावून घेऊन जतन आणि पुनरुद्घाटन केले पाहिजे. वेद हे विश्वाचे आदिम वाङ्मय आहे. ते भारतीय परंपरेमध्ये ऋषिंना दृष्ट झाले. त्या ज्ञानाच्या आधारावर, ऋषिंच्या मार्गदर्शनाने भारतीय सनातन संस्कृती परिपोषित झाली. म्हणूनच वेद हा भारतीय संस्कृतीचा मूलाधार आहे. वेद म्हणजे ज्ञान; ज्ञान म्हणजे परमात्मा; परमात्मा म्हणजेच अध्यात्म. याचा अर्थ ऋषि, मुनी, तपस्वी, श्रीमद् आद्य-शंकराचार्य यांचेपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत; एवढेच नव्हे तर सिद्धप्रज्ञ, महर्षि, राष्ट्रयोगी पू. गोविंददेव गिरि हे 'अध्यात्म हा भारतीय राष्ट्राचा आत्मा आहे' असे स्पष्ट ज्ञान सर्वांसाठी प्रसृत करतात.

आत्मा जोपर्यंत देहाचे ठायी आविष्कृत आहे तोपर्यंत देहही स्वरूपाने आविष्कृत होत असतो. यासाठीच सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करावयाचे असेल तर या अंतरात्म्याचे ज्ञान मनुष्यमात्राला झाले पाहिजे आणि त्याने ज्ञानात्मक व्यवहार सुरू केला पाहिजे. असा समग्र विचार करून पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी *''वेदाः सर्वहितार्थाय ।।''* या बोधवाक्याने 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान' या न्यासाची श्रीमान ओंकारशेठ मालपाणी यांच्या जन्मदिनी पू. स्वामी सत्यमित्रानंदजींच्या शुभहस्ते स्थापना केली. (रजि.क्र. इ. १४३८, पुणे)

या पवित्र वेदांचे संरक्षण करण्याचे कार्य सात्त्विक आचरणासहित, मौखिक परंपरेने भारतीय परंपरेत अनादि कालापासून चालत आले आहे. आधुनिक वातावरणामध्ये घडलेल्या परकीय सांस्कृतिक आक्रमणांमुळे तसेच तथाकथित भौतिक विज्ञानात्मक अभ्युदय-कल्पनेने वेदविद्येचा भीषण ऱ्हास झाला आहे. परकीय संस्कृतीच्या वाढत्या प्रवाहाने वेदाधिष्ठित विचार आणि मूल्यांना रोधितही केले जाऊ शकते. त्यातच या वातावरणात वेदज्ञानाची सामाजिक आणि शासकीय उपेक्षाही होते आहे. या गोष्टींकडे द्रष्टे प्रबोधक पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

काही धर्मप्रेमी सज्जनांच्या साहाय्याने, पुणे जिल्ह्यातील सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र

तथा माउली ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीचे क्षेत्र अशा 'आळंदी' या गावी 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानाची' स्थापना केली.

**महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान : कार्यस्वरूप :-**

श्रुति, स्मृति, पुराणे यांचे जतन आणि अभ्यास करण्यासाठी अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे संस्कृत भाषेचे ज्ञान होय. या वैश्विक ज्ञानाचे जतन, संरक्षण आणि अभ्यास व्हावयाचा असेल तर विश्वातील प्रचलित शिक्षणव्यवस्थेत आणि स्वतंत्रपणे संस्कृत भाषा अवगत होणे आवश्यक ठरते. परकीय आक्रमणांच्या झपाट्यात आणि 'जगभाषा' ह्या नावाखाली इंग्रजी भाषेच्या प्रचाराने शिक्षणव्यवस्थेमध्ये संस्कृत भाषा शिक्षणाकरिता विद्यार्थ्यांना, व्यवस्थापकांना, शासनाला प्रोत्साहित करणे, हे अतिमहत्त्वाचे कार्य प्रतिष्ठानने प्रथम हाती घेतले.

किमान 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान'च्या वतीने, जी म्हणून वेदविद्यालये गत तीस वर्षांत उभारली गेली व उभारली जात आहेत अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे तसेच अन्य प्रचलित विद्यालयातील शिक्षणापेक्षा सहज सुलभतेने शिकता यावे यासाठी वैदिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची योजना करण्यात आली.

वेदाभ्यास करण्यासाठी अर्थात संस्कृत भाषाभ्यास व त्यापुढे वेदाभ्यास घडविण्यासाठी वेदपाठशाळांना अनुदान देणे, युवक विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य देणे त्याचबरोबर वैदिक शिक्षणाची परंपरा महत्प्रयासाने जतन करून पुढील पिढीकडे घेऊन जाणाऱ्या वृद्ध वैदिकांना गौरवदक्षिणा देणे, असे अर्थसाहाय्य देणारे उपक्रम हाती घेण्यात आले.

वेदविद्यालयांमध्ये चार वेदांचे अध्ययन घडविण्यासाठी प्रयत्नपूर्वक अध्यापन करू शकणाऱ्या अध्यापकांची व्यवस्था करण्यात आली ही गोष्ट सोपी नव्हती. तशीच ती अद्यापही सोपी झालेली नाही. स्वतंत्रपणाने, स्वेच्छेने अशा प्रकारचे वेदाध्ययन करून पारंगत झालेल्या व नेटकेपणाने वेदविद्या शिकवू शकणाऱ्या आचार्यांची वानवा जाणवत असताना असे आचार्य मिळविणे व प्रसंगी त्यांना प्रशिक्षित करणे या गोष्टींकडेही प्रतिष्ठानने लक्ष वेधले आहे.

वेदाध्ययन, मौखिक परंपरा आणि त्यांचे उपयोजन याकरिता शिबिरे, परिषदा आणि संमेलने यांचे आयोजन निरनिराळ्या ठिकाणी केले जात आहे. अशा प्रयत्नातून वेदाध्ययन करणाऱ्या उत्तम युवकांना अध्यापक म्हणून प्रशिक्षित

करून त्यांच्या सहयोगाने देशातील विभिन्न भागात वेदपाठशाळा सुरू करून वैदिक परंपरा पुनःस्थापित करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने केला आहे.

**महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान-संचालित वेदविद्यालयांचे जाळे :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या निदिध्यासाने, प्रेरणेने आणि पाठबळाने वेदविद्यालयांची संख्या वृद्धिंगत होत आहे. या कामी पू. स्वामींच्या संपर्कात आलेल्या, प्रभावित झालेल्या, अनुग्रहित झालेल्या अनेक राष्ट्रयोगसाधकांचे साहाय्य प्रत्यही मिळत आहे.

या अथक प्रयत्नातून- १) श्री सद्गुरू निजानंद महाराज वेदविद्यालय (आळंदी), २) श्री समथ वेदविद्यालय (ढालेगाव), ३) श्री चतुर्वेदेश्वर धाम (सावरगाव), ४) संत श्री गुलाबराव महाराज गुरुकुल (बेलोरा), ५) जय जगदंबा वेदविद्यालय (खामगांव), ६) श्रीराम वेदविद्यालय (धुळे), ७) वैदिक पौरोहित्य पाठशाला (जिंतूर), ८) आचार्य वेदशास्त्र पाठशाला (परभणी), ९) श्री विक्रम विनायक वेदविद्यालय (रेवदंडा), १०) श्रुति स्मृति विद्यापीठम् (त्र्यंबकेश्वर), ११) संत गुलाबराव महाराज वैदिक महाविद्यालय (आळंदी), १२) जीवन ज्योति वेदविद्यालय (पिरंगुट), १३) श्री विनायक वेदपीठम् (पालघर), १४) बुलढाणा अर्बन वैदिक गुरुकुल (बुलढाणा), १५) स्वामी स्वरूपानंद वेदविद्यालय (कोल्हापूर), १६) संत नामदेव महाराज वेदविद्यालय (औंढा नागनाथ), १७) श्री ब्रह्मासावित्री वेदविद्यापीठ (पुष्कर), १८) श्री दधिमथि वैदिक गुरुकुल (गोठमांगलोद), १९) श्री अवध नारायणजी ब्रह्मचारी संस्कृत वैदिक गुरुकुल (नोखा), २०) स्वामी सत्यमित्रानंद वेदविद्या केंद्र (सुरत), २१) श्री गायत्रीदेवी वेदविद्यालय (अंजार), २२) स्वामी श्री गोविंददेव गिरि वेदविद्यालय (वाघोडिया), २३) समन्वय वेदविद्यालय (हरिद्वार), २४) श्री ओंकारानंद गायत्री वेदविद्यालय (ऋषिकेश), २५) संत ज्ञानेश्वर वेदविद्यालय (वृंदावन), २६) वे.मू. विश्वनाथ देव गुरुकुल (वाराणसी), २७) श्री गौरांग वेदविद्यालय (कोलकत्ता), २८) श्रीमती शांतिदेवी जालान आंतर्राष्ट्रीय वैदिक केंद्र (कोलकत्ता), २९) महाराजा प्रतापसिंह वेदविद्यालय (जम्मू), ३०) मणिपूर वेदविद्यापीठ (मणिपूर), ३१) श्रीकृष्ण वेदविद्यालय (पानीपत), ३२) देवी अहिल्या वेदविद्यालय (इंदौर). अशी वेदविद्यालये सुरू आहेत.

महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानच्या या अध्ययन-अध्यापन व्यवस्थेमुळे वेदाध्ययन-

क्षेत्रात संतोषजनक काम करणाऱ्यांना भिन्न-भिन्न स्वरूपात अर्थसाहाय्य देऊन या कार्याला गतिमान करण्याचा प्रयत्न होत आहे.

या कार्याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि या क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्यांना अधिक प्रोत्साहित करण्यासाठी, वैदिक साधकांना, कार्यकर्त्यांना ''महर्षि वेदव्यास पुरस्कार'' देऊन गौरव केला जातो.

प्रतिष्ठानच्या माध्यमातून भारतातील २२ प्रांतांतील १६० वेदपाठशाळांशी संपर्क करण्यात आला आहे. त्याचबरोबर ४००० वर वैदिक विद्यार्थ्यांशी संपर्क आणि १००० वर वैदिक विद्वानांना या कार्याचा परिचय करून देण्यात आला आहे.

गत ३० वर्षांच्या वाटचालीत २८ ज्येष्ठ तथा श्रेष्ठ वैदिक विद्वानांना ''महर्षि वेदव्यास'' पुरस्कार देऊन गौरविले आहे.

या राष्ट्रीय कार्यामध्ये कोट्यवधी धर्मप्रेमींना, भाविकांना समाविष्ट करून घेण्यासाठी संपर्क अभियानाचे अवलंबनही केले जाते.

जिद्द, प्रयत्न, दृढ संकल्प आणि सर्वसमावेशक लोकसहभाग या माध्यमातून पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे हे कार्य विकसित होत आहे. स्वतःबरोबर असंख्य राष्ट्रयोगसाधकांना उभे करणे यासाठी पू. स्वामींबरोबर हजारो राष्ट्रसाधक अथक प्रयत्न करीत आहेत. या कार्यात तन-मन-धन या स्वरूपात सहभागी होण्यासाठी सर्व राष्ट्रप्रेमींना प्रतिष्ठानची द्वारे खुली आहेत. महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे विश्वस्त मंडळ यासाठी सेवाकार्य म्हणून सतत समर्पित भावाने कार्यरत आहे.

## 'वेदश्री तपोवन' संकल्प :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा निश्चय-प्रकल्प म्हणजे; विश्वाचे कल्याण साधणाऱ्या वैदिक संस्कृतीच्या लोकोपयोगी वैशिष्ट्यांचे पुनरुद्‌घाटन आणि वेद प्रचारासाठी विद्यापीठाची स्थापना होय.

या विद्यापीठाला *'ॐ वयं राष्ट्रे जागृयाम ।'* या ध्येयवाक्यासह 'वेदश्री तपोवन' असे नाव निश्चित करण्यात आले आहे. 'वेदश्री तपोवन' कशासाठी? याचे उत्तर पू. स्वामी गोविंददेव गिरि द्रष्टेपणाने आणि आत्माभिमानाने देतात. ते म्हणतात-

**भरतभूमि के अंग अंग में**
**वेदोंके स्वर गूँजेगे ।**
**यज्ञज्वाला प्रज्ज्वलित हो**
**धर्मध्वज लहराएंगे ।।**
**'वेद हमारे, हम वेदोंके',**
**जीवन–मंत्र बनाएंगे ।**
**जीवन–आहुति से भारत का**
**सुवर्ण–युग फिर लाएंगे ।।**

'वेदश्री तपोवन' विद्यापीठाच्या संकल्पनिश्चितीविषयी स्पष्टीकरण देताना प्रतिष्ठानच्या वतीने निवेदन देतात– कोणे एके काळी आमचे भारतवर्ष सुवर्णभूमी म्हणून ओळखले जात होते. हा देश विश्वातील सर्वात समृद्ध आणि शक्तिशाली राष्ट्र होता. ज्ञानविज्ञानाच्या सर्व शाखा पूर्णपणे विकसित होत्या. येथील प्रत्येक व्यक्ती शिक्षित, सदाचारसंपन्न आणि सुखी होती. हे राष्ट्र आध्यात्मिक ज्ञान आदर्शभूत राष्ट्रपुरुषत्व, स्वयंपूर्ण सामर्थ्य आणि विश्वकल्याणाची मंगलमय भावना यामुळे या राष्ट्राला 'विश्वगुरू' म्हटले जात होते.

वैदिक ज्ञान, वैदिक संस्कृती तसेच वैदिक जीवनदृष्टीमुळे भारतराष्ट्र वैभवसंपन्नतेच्या शिखरावर पोहोचले होते. कालाच्या प्रदीर्घ प्रवाहात वैचारिक दोषपूर्णता, आंतरिक दुर्बलता, मानवी स्वभावाची स्वार्थांधता, पाश्चात्य आणि परकीय संस्कृतीचे आक्रमण, इंग्रजांची कुटिल नीती, मेकॉलेप्रणीत गुलामगिरीवश करणारी शिक्षणपद्धति आणि आधुनिक भोगवादी वातावरण यामुळे वेदविद्येची केवळ उपेक्षाच नव्हे तर विनाश झाला.

वेदविद्येच्या पुर्नजागरणाच्या एकमात्र ध्येयाने 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान' स्थापन करून, एक प्रकारे पुनरुत्थान–प्रक्रियेचा रोमांचक शंखनाद करण्यात आला. आज प्रतिष्ठानच्या वतीने उपरोक्त ३२ वैदिक गुरुकुले अर्थात नवीन वेदविद्यालये वेदाध्ययनाच्या पवित्र कार्यात गढून गेली आहेत.

'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान'च्या सर्व विद्यालयांचे केंद्रस्थान म्हणून 'वेदश्री तपोवन' विद्यापीठ कार्यरत होईल. या विद्यापीठात वेदांचे सर्वोच्च शिक्षण, व्याकरण, वेदांगे, आयुर्वेदादी उपवेद यांच्या अध्ययन–अध्यापनाबरोबर वेदांच्या निश्चित यथार्थ अर्थाचे स्पष्टीकरण अर्थात वेदरहस्य अर्थात वेदान्ताचे

ज्ञान भारतीय समाजातील सर्व वर्ग आणि स्तरांतील बालकांना दिले जाईल. त्यांच्यातून समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या आदर्श वेदअध्यापकांचे तसेच वैदिक ज्ञानाचे स्पष्ट प्रकटीकरण करणारे प्रवक्ते आणि प्रचारक निर्माण केले जातील. स्वास्थ्य, कृषी, पर्यावरण अशा सर्व क्षेत्रांत सर्वांना उपयुक्त अशा वैदिक सिद्धान्ताचे प्रात्यक्षिकांसह थेट प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रयत्नाने, भारतीय समाज आणि राष्ट्र यांना पुन्हा एकदा गौरव प्राप्त होऊन विश्वगुरुत्वाचा सन्मान मिळेल.

पू. स्वामींच्या या दुर्दम्य आत्मविश्वासपूर्ण ध्येयासक्तीला खरोखरीच वंदन करावे लागेल. त्यांचा हा निश्चय-प्रकल्प त्यांच्यातील राष्ट्रयोगी विभूतिमत्त्व अत्यंत तेजस्वितेने प्रकट करतो. हे काम सोपे नाही याची जाणीव पू. स्वामींना आहे म्हणूनच १९९० साली 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान' अतिशय द्रष्टेपणाने स्थापन करून या महान गुरुकुलाची अर्थात विश्वविद्यालयाची पूर्वतयारी त्यांनी केली. या पूर्वतयारीने त्यांनी भारतीय परंपरेतील समस्त ऋषिपरंपरेला पुनर्जागृत करण्याचा जणू हटयोग आरंभिला. याकरिता प्रत्येक भारतीयाने आत्मभानपूर्वक जमेल तसे सर्व शक्तिनिशी राष्ट्रयोगसाधनेत स्वतःला समर्पित भावनेने जोडून घेतले पाहिजे. हेच स्वामींच्या सिद्धप्रज्ञेचे आणि संघमनोवृत्तीचे सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या सर्व संतानांना आवाहन आहे.

## श्रीकृष्ण सेवा निधी :-

सच्चिदानंदस्वरूप भगवान श्रीकृष्ण यांच्या लीलांमधून भगवंतांचा चराचराविषयीच्या अपार करुणेचा मूर्त आविष्कार घडतो. भगवंतांच्या सत्य, प्रेम, करुणा या विश्वव्यापक संवेदनांशी एकरूप झालेले पू. स्वामी आर्त बालकांसाठी, जनसामान्यांसाठी आणि मठमंदिरांच्या जीर्ण-शीर्णतेला पाहून, आपल्या कारुण्याच्या छायेत त्यांना प्रेमभराने पुनर्जीवनासाठी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

१९८६ मध्ये 'श्रीकृष्ण सेवा निधी'ची स्थापना झाली. या माध्यमातून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची सेवा घडू लागली.

अध्यात्म हा भारतीय राष्ट्राचा आत्मा आहे; तर मंदिरे ही त्या आत्म्याचे मानवी श्रद्धेतून प्रकटलेले भावपूर्ण मूर्त स्वरूप आहे. समूहमनाच्या भक्तिसाधनेचे

केंद्र आहे. समाजमनाचा सत्य, प्रेम, करुणापूर्ण विसावा आहे. ही समूहमनातील अपार श्रद्धा बाधित होता कामा नये, यासाठी *'धर्मो रक्षति रक्षितः ।'* या न्यायाने श्रद्धेच्या पुनर्जागरणासाठी, श्रीकृष्ण नामस्मरणाने मंदिरांचा जीर्णोद्धार होऊ लागला.

बालरूप हेच गोकुळातील भगवंताचे नित्य स्वरूप आहे. प्रत्येक बालकातून योगेश्वर श्रीकृष्णस्वरूपता प्रकट व्हायची असेल तर बालक ज्ञानवान आणि आरोग्यवान व्हावयास हवा. यासाठी त्याला समाजाने साहाय्य केले पाहिजे. बालक हेच भावी भारतराष्ट्र आहे हे लक्षात घेऊन, पाया भक्कम झाला तर इमारतही भक्कम होईल या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी 'श्रीकृष्ण सेवा निधी'चे वितरण आणि उपयोजन सुरू झाले.

आर्तांच्या आरोग्याची काळजी घेतली तर आर्त प्रजा, मग ती आबालवृद्ध स्त्री-पुरुष कोणीही असो, ती शरीराने आणि मनाने आरोग्यवान असली पाहिजे. आरोग्याच्या रक्षणासाठी अर्थसाहाय्याची गरज असेल तर त्यापासून व्यक्ती वंचित राहता कामा नये यासाठी श्रीकृष्णस्वरूप करुणेचा झरा प्रवाहित झाला.

**श्री गणेश समन्वय आश्रम - वंचितांचा आधार :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त बीड जिल्ह्यातील नामलगाव या क्षेत्री, वंचित समूहापर्यंत वैदिक संस्कृती पोहोचविणारे आध्यात्मिक अभियान सुरू झाले. वेदान्ताच्या पायावर उभ्या असलेल्या वैदिक संस्कृतीचा मूलाधार मानवता हा आहे. म्हणूनच केवळ माणूस नव्हे तर पशुपक्ष्यांसह निसर्गाची पूजा करण्याचे संस्कार वैदिक संस्कृतीने भारतीयांना दिले. ८ जुलै २००८ रोजी सुरू झालेल्या 'श्री गणेश समन्वय आश्रमात' या सांस्कृतिक दृष्टिकोणाचा प्रत्यक्ष कार्यात व्यवहार सुरू झाला.

समाजातील आर्थिक क्षमता नसलेल्या कुटुंबातील मुले शिक्षण आणि सुसंस्कारांपासून वंचित राहू नयेत, अशा मुलांना सुसंस्कारित करून; त्यांची बौद्धिक क्षमता विकसित व्हावी, तसेच त्यांचे वैचारिक आणि सांस्कृतिक उत्थान होऊन; राष्ट्रभक्ती वृद्धिंगत व्हावी यासाठी हे कार्य सुरू झाले.

पू. स्वामींच्या मार्गदर्शनानुसार बालवयातील म्हणजे इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची व्यवस्था या आश्रमात करण्यात आली. बालके सर्वांग परिपूर्ण व्हावीत व भारतीय राष्ट्राचे आधारस्तंभ म्हणून उभी राहावीत

यासाठी शालेय पारंपरिक शिक्षणाबरोबरच सर्व प्रकारच्या उन्नतीसाठी गुरुकुल पद्धतीने शिक्षणप्रक्रिया सुरू केली.

संस्कृत भाषा, गाथा, ज्ञानेश्वरी, गीता, हरिपाठ, मनाचे श्लोक, हनुमान चालीसा इ. प्रकारे संतवाङ्मय व भारतीय संस्कृतीचे शिक्षण दिले जाऊ लागले. प्राणायाम, योगासन, सूर्यनमस्कार आणि विविध खेळ यांचे प्रशिक्षण सुरू झाले. विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणातील इंग्रजी, गणित यांसारख्या विषयांसाठी तसेच विज्ञानाच्या अभ्यासासाठी विशेष परिश्रम घेतले जाऊ लागले.

नवोदय व स्कॉलरशिपसारख्या उपक्रमांमध्ये परिश्रमपूर्वक प्रोत्साहित करून भाग घेण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. काळानुसार संगणक-प्रशिक्षण देण्याची व्यवस्था झाली. तसेच सुसज्ज ग्रंथालयही उभारण्यात आले. शिक्षणापासून कोणत्याही जातिधर्माची बालके वंचित राहता कामा नयेत याची काळजी घेऊन, वैदिक ज्ञान हे समस्त भारतीयांचे संचित धन आहे म्हणून वैदिक ज्ञान घेण्यासाठी अर्थात भारतीय संस्कृतीच्या अध्ययनाची द्वारे सर्वांसाठी खुली आहेत; 'सबके लिए खुला है, मंदिर ये हमारा' या दृष्टीने पू. स्वामींचे हे कार्य प्रगतिपथावर आहे.

## स्वागत आपुले, आपुल्या धर्मगृही :-

बालवयातच ठायीच दिव्य ज्ञान प्रकटलेल्या, पू. गोविंददेव गिरि यांचे तारुण्यसुलभ मन आत्मपरीक्षण करीत होते. पूर्वाश्रमींच्या किशोरजी व्यासांचे, आपल्याच धर्मातून आपले घर सोडून, परधर्मात गेलेल्या लोकांकडे पाहून, मन विद्ध होत होते. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या किशोरजींना, १९४७ साली द्विराष्ट्रवादाच्या नावाखाली छिन्नभिन्न झालेली भारतमाता स्वस्थ बसू देत नव्हती. ब्रिटिशांच्या सांस्कृतिक आक्रमणाने भूल देऊन शल्यचिकित्सा करावी; तशी धर्मांतरे घडविलेली जाणवत होती. कधीकाळच्या विशाल भारताचे नागरिक अर्थात आर्य संस्कृतीची संताने आर्थिक, मानसिक आणि राजकीय गुलामगिरीमध्ये निराश, निःसहाय, निराधार होत तथाकथित पोथीनिष्ठ आणि साम्राज्यवादी धर्मांध सत्ताधीशांच्या वळचणीला गेली.

हे ऐतिहासिक शल्य किशोरजींच्या मनाला अस्वस्थ करीत होते. गेल्या दोन-अडीच हजार वर्षांत सनातन हिंदूधर्मराष्ट्राची लेकरे राष्ट्रमाउलीचा हात सोडून स्वतःच्याच घरी आत्मवंचनेने 'दूरचा पाहुणा' असल्यासारखे अभिनिवेशाने,

कडवेपणाने मातृधर्म, मातृभूमी, मातृसंस्कृती आणि अतिउदात्त अध्यात्मविचार सोडून स्वतःचे पृथकत्व सिद्ध करण्याच्या प्रयत्नात दिसत होती.

ज्या प्रवरेच्या तीरावर किशोरजींचा जन्म झाला, त्याच प्रवरेच्या तीरावर सनातन संस्कृतीत उद्‌भवलेल्या अंधविश्वासात्मक रूढिपरंपरांच्या जुलमी धर्मसत्तेत स्वतःला हीन, पतित, अन्यायी, पापी समजून आर्तपणाने, केविलवाणेपणाने स्वधर्ममार्तंडांकडे पाहत स्वतःचे अस्तित्व समाज शोधीत होता.

अशा कितीतरी लेकरांना माउलीच्या ममतेने कवटाळण्यासाठी, माउलीच्या ममतेने आपल्या या आर्त भावंडांना पुन्हा सन्मानपूर्वक स्वगृही सुप्रतिष्ठित करण्यासाठी, भगवान श्रीकृष्णांचे समत्वाचे आणि सामरस्याचे वेदान्त तत्त्वज्ञान उजळीत; विश्वात्मक परमेश्वराला आवाहन करीत; *'जे खळांची व्यंकटी सांडो'* असे म्हणत, *'किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिही लोकी । भजिजो आदिपुरुखी । अखंडित ।'* अशी अपेक्षा कृष्णभगवंतांकडे, माउली ज्ञानेश्वर व्यक्त करीत आहेत असे किशोरजींना जाणवत होते.

अंध, रूढिग्रस्त, अंधकारमय युगातून *'हे विश्वचि माझे घर ।'* असे ठामपणे, ज्ञानात्मकतेने सत्य, प्रेम, करुणा यावर आधारलेल्या वेदान्तनिष्ठ हिंदू धर्माची विश्वबंधुत्वाची पताका स्वामी विवेकानंदांनी विश्वाच्या व्यासपीठावर फडकविली; हेही भागवत कथाज्ञानयज्ञ करणाऱ्या, भगवद्गीतेतील वेदान्त उलगडून सांगणाऱ्या आणि *'कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ।'* या संकल्पाने अखंड हिंदुस्थानात विश्वात्मक भूमिकेने सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी कटिबद्ध असलेल्या; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असलेल्या किशोरजींना जाणवत होते.

राष्ट्राचे पुनरुत्थान करावयाचे असेल तर भ्रामक कल्पनांनी धर्म-परिवर्तनाचे जोखड आर्तांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन, त्यांच्या मानेवर ठेवणाऱ्या तथाकथित पुण्यवान करुणामूर्ती म्हणविणाऱ्या परधर्मीयांच्या कचाट्यातून कोंडीत सापडलेल्या, कुंठित मनांना आणि भ्रामकतेने, या कुंठलेपणालाच कट्टर धार्मिकता म्हणविणाऱ्या आपल्या बांधवांना, खऱ्या अर्थाने सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेने स्वधर्माची जाणीव करून देणे अपरिहार्य आहे हे किशोरजी व्यासांना जाणवले.

ठायीच्या वेदान्त ज्ञानात्मकतेने अशा आर्त प्रजेला पुन्हा स्वतःच्या गृही आणण्याच्या चळवळीत सेवाकार्य करण्याचा संकल्प किशोरजींनी केला. भोवतालच्या अशा भ्रामक धर्मपरिवर्तित बांधवांना मन-शुद्धीकरणपूर्वक स्वगृही

आणण्याचे सेवाकार्य, गोदाप्रवरेच्या पावन सांस्कृतिक खोऱ्यात ७०० वर आर्त बंधुभगिनींना करण्याचा निश्चय केला. शुद्धीकरण-चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या 'धर्मभास्कर' ब्रह्मचारी विश्वनाथजी यांच्या उपस्थितीत पू. स्वामींनी सन्मानपूर्वक स्वधर्मगृही अर्थात हिंदू धर्मात पुनः सुप्रतिष्ठित केले. स्वधर्मगृही परतविण्याचा हा नगर जिल्ह्यातील पहिला ऐतिहासिक प्रसंग ठरला.

अशा प्रकारच्या शुद्धीकरणाने धर्मांतरितांना स्वगृहधर्मी आणणे एवढेच करून भागणारे नाही, तर द्वितीय सरसंघचालक पू. मा. स. गोळवलकर गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे विश्वबंधुत्वाच्या वैश्विक दृष्टिकोणातून मानवमात्राला उभे करावयाचे असेल तर सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान केले पाहिजे. त्यासाठी 'अध्यात्म हा भारतीय राष्ट्राचा आत्मा आहे' या आत्मनिष्ठेने भारतीय राष्ट्र उभे करण्यासाठी भारतीयांच्या सर्व जाती-जमातीत, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आर्त प्रजेसाठी आणि अन्य दुभंगलेल्या मनांसाठीदेखील सेवाकार्य सुरू केले पाहिजे.

हे सेवाकार्य उपकार म्हणून नव्हे तर विराट पुरुष-प्राकट्यासाठी उत्कट भक्तिभावाने आत्मीयतेने हे सेवाकार्य घडले पाहिजे. विश्व हिंदू परिषदेच्या व्यासपीठावर घडणाऱ्या या वैचारिक मंथनातून आचार्य किशोरजी व्यास यांच्यातील राष्ट्रयोगी विभूतिमत्त्वाचे जागरण झाले.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध भागवतस्वरूप आचार्य किशोरजी व्यासांनी करुणापूर्णतेने आपल्या भोवतीच्या धर्मप्रेमी प्रियजनांच्या साहाय्याने सेवाकार्याचा संकल्प केला. 'श्रीकृष्ण सेवा निधी', 'वेदव्यास प्रतिष्ठान' यांसारखी सेवाकार्ये या भावनेनेच सिद्ध होऊ लागली.

**संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलाचे कार्य :–**

संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी पुण्यपर्वाच्या निमित्ताने, प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी परमवेदप्रेमी आणि सकलविश्वहितैषी संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या नावाने 'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल' या संस्थेची पुण्यात स्थापना केली. या गुरुकुलाच्या माध्यमातून अनेक सेवाकार्ये सुरू झाली.

अनादि काळापासून श्रुति, स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत आदी ग्रंथांत ऋषिमुनींनी ग्रथित केलेले विद्या-विचार-धन या देशातील नवविधा भक्तिमार्गाने सेवारत असलेल्या संतांनी हे विचारधन लोकभाषेत प्रयोगसिद्धतेने

प्रस्तृत केले आहे. या मार्गाने मध्ययुगातील आणि आधुनिक काळातील परकीय आक्रमणांच्या विकराळ आणि अंधकारमय कालखंडात; भारतीय संस्कृतीचे तथा सनातन हिंदूधर्मराष्ट्र संवेदनेचे लोकमानसात संरक्षण केले; त्या संतांच्या विचारांचे अध्ययन, अध्यापन, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून जे लोक जतन, संवर्धन आणि प्रसार करीत आहेत ते एक प्रकारे भारताच्या अतिप्राचीन श्रुति, स्मृति, पुराणे, सनातन संस्कृती यांचे संतांनी केलेले जागरण पुन्हा संतसेवेच्या स्वरूपात लोकांच्या ठायी करीत आहेत. त्यांच्या या कार्यातून सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यासाठी भारतीय मने सिद्ध होत आहेत.

याकरिता मूलभूत स्वरूपात धर्मजागरण करणाऱ्या या संतस्वरूप साधकांना सर्वतोपरी सहायभूत होण्यासाठी 'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलाची' स्थापना करण्यात आली. गत २० वर्षे या माध्यमातून पू. स्वामींचे सेवाकार्य सुरू आहे. 'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल' या माध्यमातून पू. स्वामी गोविंददेव गिरि आपल्या शिष्यांना तथा साधकांना साधनेसाठी मार्गदर्शन करतात.

संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांना सद्गुरू मानून आपण स्वतः त्यांचे मंत्रदीक्षा देण्याचे साधन आहोत असे मानून शिष्यांना मंत्रजप, आचारप्रणाली यांसह प.पू. स्वामी गोविंददेव गिरि अनुग्रहित करतात. अशा प्रकारे अनुग्रहित शिष्यांची संख्या ३१,००० च्या पलीकडे पोहोचली आहे. गुरुकुलाचे सर्व उपक्रम या शिष्यांसाठी आणि शिष्यांद्वाराच राबविले जातात.

साधकांसाठी सप्तदिवसीय गीतासाधना-शिबिराचे आयोजन गुरुकुलाच्या वतीने केले जाते. साधेपणा आणि शांतिपूर्ण अनुशासन अशा वातावरणात या शिबिरात पहाटे ४ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत योग, ध्यान, व्यायाम, गीता इ. ग्रंथांची संथा, पूजाविधीचा प्रात्यक्षिकासह अभ्यास, जप, प्रवचन, चिंतनिका इ.चा परिचय असे उपक्रम प.पू. स्वामीजींच्या सहवासात, गंगेच्या पवित्र तटी आयोजित केले जातात. हा उपक्रम सफल करण्यासाठी गुरुकुल, गीता परिवारातील समर्पित कार्यकर्ते आणि वानप्रस्थाश्रमाचे प्रबंधक बाबा काली कमलीवाले या आश्रमाचे सर्व पदाधिकारी यांचे साहाय्य लाभते.

शिबिराच्या अखेरच्या दिवशी अर्थात गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला 'साधक-संमेलनाचे' आयोजन करण्यात येते. शिबिरार्थींच्या बरोबरच दीक्षित होऊ इच्छिणाऱ्या साधकांचाही समावेश होतो. साधनेसंदर्भातील शंका, समस्या

याविषयीचे मार्गदर्शन प.पू. स्वामीजी करतात. या संमेलनात गुरुबंधूंचा परस्पर परिचय होतो.

**श्री ज्ञानेश्वरकन्या वात्सल्यधाम :-**

स्वतःला संत ज्ञानेश्वरकन्या मानणारे आणि भगवान श्रीकृष्णाला पती मानणारे, प्रज्ञाचक्षू समन्वयमहर्षि संत श्री गुलाबराव महाराज, यांच्या ज्ञानात्मक कार्याच्या स्मरणासाठी, त्यांच्या नावाने हा सेवा-उपक्रम सुरू आहे.

या माध्यमातून आळंदी, देहू, पंढरपूर आदी तीर्थस्थळांत राहणाऱ्या संतसेवकांना, या प्रकल्पांतर्गत सेवा दिली जाते. २००३ मध्ये सुरुवातीला या प्रकल्पांतर्गत आळंदी येथील ६० वारकरी विद्यार्थ्यांना मधुकरी भिक्षा, वस्त्रप्रावरणं, आर्थिक साहाय्य, ज्ञानेश्वरी तथा तुकाराम गाथा-अभ्यासकांना साहाय्य आणि पुरस्कार देण्यात आले. आळंदी, पंढरपूर क्षेत्रात नित्य परिक्रमा करणाऱ्या भक्तांना सेवा प्रदान केली जाते. अशा सेवाकार्यातून धर्मप्रसारकांची फळी उभी करता येते असा विचार पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी केला.

**कीर्तनकार सेवा :-**

संतपरंपरेचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्या कीर्तनकारांना सर्वतोपरी सहायभूत व्हावे या दृष्टीने हे सेवाकार्य सुरू झाले. या सेवा-प्रकल्पातून वयोवृद्ध, ज्येष्ठ तसेच अतिविशिष्ट कीर्तनकारांचा सन्मान केला जातो. त्याचबरोबर त्यांना दक्षिणाही दिली जाते. याच सेवेअंतर्गत, नव्या अध्ययनशील उमेदवार कीर्तनकारांना, छात्रवृत्तीच्या स्वरूपात अर्थसाहाय्य दिले जाते. या निमित्ताने वयोवृद्धांना कृतार्थता वाटावी आणि नवोदितांना नवी उमेद मिळावी, या उद्देशाने पू. स्वामींनी हे सेवाकार्य सुरू केले आहे.

**श्री गोविंद बालसंस्कार केंद्र :-**

बाल हे तर बालकृष्णांचे स्वरूप होय. या निरागस वयात सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेचा संस्कार बालमनावर व्हावा; तळागाळातल्या वस्तीवरील मोलमजुरी करणारे मागासलेले पालक शिशु-शिक्षण, संस्कार आणि संगोपन या तीनही गोष्टींकडे नीट लक्ष देऊ शकत नाहीत. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाच्या संकल्पाने आणि कार्यशीलतेने प्रभावित झालेले 'लोकमंगल प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते श्री. व श्रीमती बेलुरे यांनी पूर्ण समर्पण-भावाने या मागास वस्तीतील शिशुसंगोपनाच्या सेवाकार्यात झोकून

देण्याचे ठरविले.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या नावाने आणि मार्गदर्शनाने बालसंस्कार केंद्र सुरू झाले. याद्वारे शिशुसंगोपनार्थ अन्न, वस्त्र इ. मूलभूत गरजा पूर्ण करून शिशु-शिक्षणवर्ग सुरू केले. या वर्गातून शिशुंवर भारतीय परंपरेनुसार, पू. स्वामींच्या मार्गदर्शनानुसार संस्कार केले जातात. गत १० वर्षांपासून हे कार्य मोठ्या निष्ठेने केले जात आहे.

## संत ज्ञानेश्वर वेदविद्यालय, वृंदावन :-

संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वेदान्त-प्रामाण्य स्वीकारून, वेदांना विश्वमाता असे स्थान दिले आहे. पू. स्वामी गोविंददेव गिरि हे संत ज्ञानेश्वर माउलींना सद्गुरू मानतात. संतपरंपरेने आणि संतसमूहाने वेदविचारधारा स्पष्टपणाने, परंपरेने प्रसारित करण्याचे काम सुरू ठेवले आहे.

वेदान्त, वैश्विक चराचराच्या कल्याणाच्या विचाराने अर्थात समत्वाने आणि सामरस्याने पुरुषार्थपूर्ण जीवन घडविले पाहिजे असे सुचवितो. सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेने मनुष्यमात्राचा व्यवहार घडण्याची अपेक्षा त्यातून व्यक्त होते. ज्ञानेश्वरांनी वैश्विक कल्याणासाठी विश्वात्मक परमेश्वराकडे पसायदान-स्वरूपात प्रार्थनेद्वारा याचना केली. याच दृष्टीने वृंदावनात 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान'च्या माध्यमातून एका मंदिराच्या प्रांगणात 'संत ज्ञानेश्वर वेदविद्यालयाची' सुरुवात झाली.

'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलाने' वेदसेवा करण्याच्या हेतूने वृंदावनात विद्यालयासाठी स्वतंत्र भूमी खरेदी करून स्वतःच्या विद्याभवनात हे विद्यालय चालविण्याचा संकल्प केला. पू. स्वामींच्या आवाहनाला प्रतिसाद देत भक्तांनी उत्साहपूर्वक प्रतिसाद देऊन भूमी खरेदी केली आणि तेथे हे विद्यालय आता सुरू आहे.

## संत ज्ञानेश्वर आश्रम, कॅनडा :-

पू. स्वामी गोविंददेव गिरि गत २५ वर्षांपासून कथाज्ञानयज्ञ, प्रासंगिक प्रवचने, ज्ञानेश्वरी, योगवासिष्ठ, दासबोधसारख्या ग्रंथांवरील प्रवचने, अशा निमित्ताने सनातन हिंदू धर्माचे जागरण विदेशांमध्येही करीत आहेत. कॅनडामधील टोरँटो या शहरातील ब्रॅम्पटन या उपनगरात 'संत श्री ज्ञानेश्वर आश्रम' या नावाने भारतीय पारंपरिक पद्धतीने भक्तिसेवा-स्वरूपात उपक्रम सुरू केले आहेत. गत

२० वर्षे भजन, पाठ, पूजा, हवन, प्रवचन, संस्कारवर्ग आदी उपक्रमांतून नित्य भक्तिसाधना सुरू आहे.

**करुणामूर्ती पू.स्वामी गोविंददेव गिरी यांच्या सेवाकार्याचा गोवर्धन :–**

सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी भगवान श्रीकृष्णांप्रमाणे ओतप्रोत कारुण्याने आपल्या संकल्प–करांगुलीने सेवाकार्याचा गोवर्धन धारण केला आहे. *'राष्ट्राय स्वाहा! इदं न मम ।'* या भूमिकेने हजारो राष्ट्रयोगसाधक गोपालांप्रमाणे हे सेवाकार्य पेलण्यासाठी तन–मन–धनपूर्वक समर्पित भावाने पुढे सरसावले.

ह्या सर्वांचे माउलीच्या ममतेने धुरीणत्व करताना, पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलस्वरूप जगन्नाथाच्या रथाला सहायभूत होणाऱ्या अनेक महान व्यक्ती आणि साधक यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, पुरस्कारयोजना सुरू केली. या योजनेअंतर्गत 'संत ज्ञानेश्वर पुरस्कार', आणि 'संस्कृति–सेवा–प्रसाद पुरस्कार' असे दोन पुरस्कार सुरू केले.

'अन्नकूट महोत्सवा'च्या निमित्ताने पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज, आपल्या समग्र कार्यात संबद्ध असलेल्या सर्व राष्ट्रयोगसाधकांना अर्थात स्वयंसेवकांना 'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुला'च्या कार्याचा समग्र परिचय व्हावा तसेच स्वयंसेवकांचा परस्पर परिचय व्हावा कार्यकर्त्यांच्या मनातील राष्ट्रभाव, सेवाभाव, करुणा वृद्धिंगत होऊन; ते अधिक कृतीशील व्हावेत या हेतूने २००६ पासून दीपावलीच्या दिवशी पुण्यातील 'धर्मश्री' येथे 'अन्नकूट महोत्सवा'चे आयोजन करण्यात येऊ लागले.

या प्रसंगी पूजा, हवन, गोपूजन, भजन आणि प.पू. स्वामीजींच्या आशीर्वचनाबरोबरच विविध क्षेत्रांत प्रशंसनीय कार्य करणाऱ्या विशिष्ट महान व्यक्तींचा सन्मान करण्याची प्रथाही सुरू करण्यात आली.

पू. स्वामी गोविंददेव गिरि, माउलीच्या ममतेने आपल्याबरोबर या राष्ट्रकार्यात राष्ट्रयोगसाधकांना सद्गुरुस्वरूपात कारुण्याने आपलेसे करून राष्ट्रआराधन करीत आहेत.

* *

## ।। अकरा ।।

# राष्ट्रयोगसाधना–प्रेरक

गीता परिवार एक अभिनव उपक्रम - बालसंस्कार–शिबिरांचे आयोजन आणि विस्तार - संस्कार–शिबिरांचे स्वरूप आणि विस्तार - संस्कारवर्ग - कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण–शिबीर - गीता परिवाराची उपक्रमशील प्रयोगसिद्धता - गीता परिवार विद्यमाने लक्षणीय प्रयोगसिद्ध उपक्रम :- १) नाट्याविष्कार, कथाकथन २) गीता पाठांतर स्पर्धा ३) गिरिभ्रमण ४) निःशस्त्र युद्ध / नियुद्ध ५) उत्सवांतून संस्कार, संस्कृती आणि राष्ट्रीय जागरण ६) हनुमान चालीसा–भक्तिमय राष्ट्रयोगसाधना–प्रयोग ७) विशेष उपक्रम– संस्कार बालभवन ८) गीता परिवार युवा मंच ९) पालकांसाठी प्रबोधन १०) पू. स्वामी–मार्गदर्शित प्रकाशने ११) जनकल्याण कार्यालय.

## ।। अकरा ।।

# राष्ट्रयोगसाधना–प्रेरक

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांनी सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थानासाठी समर्पित जीवन जगण्याचा संकल्प केला आहे. भारत हे राष्ट्र विश्वगुरू होते; ते विश्वगुरूच होणार हे द्रष्टेपणाने आणि ठामपणाने सांगणारे, पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज, राष्ट्र होते आणि राष्ट्र होणार, यामधील पुनरुत्थान–प्रक्रियेसाठी, अखंड ज्ञानसाधना, ज्ञानदानयज्ञ, ज्ञानात्मक उपक्रमांची उभारणी करीत आहेत.

हे उपक्रम वैभवसंपन्न राष्ट्र उभे करण्यासाठी सतत ओजस्वीपणे सुरू राहिले पाहिजे, यासाठी राष्ट्रयोगसाधकांची सुसंस्कारित फळी उभे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थापित करून परमवैभवसंपन्न राष्ट्रनिर्मितीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दृढ संकल्पित आणि कटिबद्ध आहे. द्वितीय सरसंघचालक पू.श्री. मा. स. गोळवलकर गुरुजी यांच्या द्रष्ट्या मार्गदर्शनाखाली जीवनाच्या सर्व क्षेत्रात समरसतेने ‘संघपरिवार’ म्हणून कार्यकर्ते अर्थात राष्ट्रयोगसाधक अर्थात स्वयंसेवक उभे करून भारतीय राष्ट्रजागरणाचे प्रयत्न सुरू आहेत.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज तथा पूर्वाश्रमीचे किशोरजी व्यास यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी शैशवावस्थेपासूनच संबंध आला. वेदान्ताचा अभ्यास आणि श्रीमद् भागवत, भगवद्गीता, रामायण, महाभारत, देवीभागवत, योगवासिष्ठ, दासबोध अशा ग्रंथांचा सूक्ष्म तथा चिंतनात्मक अभ्यास यातूनही सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान झाले पाहिजे, भारतराष्ट्र वैभवसंपन्नतेने विश्वगुरू

म्हणून प्रकटले पाहिजे अशी दुर्दम्य कांक्षा पू. स्वामींच्या ठिकाणी प्रकटली.

सिद्धप्रज्ञ, दिव्य ज्ञानी पू. स्वामींनी राष्ट्रयोगसाधनेमध्ये *'या निशा सर्वभूतानां तस्या जागर्ति संयमे ।'* या जाणिवेने कथा-ज्ञानयज्ञप्रवक्ता या आपल्या लोकप्रसिद्ध विभूतिमत्त्वाचा प्रकर्ष, राष्ट्रपुनरुत्थानासाठी करावयाचा निश्चय केला.

संघपरिवार अशा विश्व हिंदू परिषदेच्या कार्यात, त्यांनी स्वतःला झोकून दिले. भारतवर्षातील सर्व प्रकारच्या संत व्यक्तिमत्त्वांना या कार्याशी जोडून धर्मजागरण घडविले पाहिजे, यासाठी पू. स्वामी कार्यरत झाले.

विश्वबंधुत्वाचा आणि अध्यात्म हा भारतीय राष्ट्राचा आत्मा आहे, असा संदेश वैश्विक व्यासपीठावरून देणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वात वैभवसंपन्न राष्ट्रनिर्मितीचे स्फुल्लिंग त्यांना जाणवत होते. भारतीयांना हिंदू राष्ट्रासाठी मानसिक पातळीवर भक्कमपणे उभे केले पाहिजे, या जाणिवेने कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद शिला स्मारक अभियान उपयुक्त ठरले.

या अभियानाच्या निमित्ताने सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत धर्मजागरण करून भारतीयत्व प्रकटविण्याचा मार्ग गवसला. आचार्य किशोरजी व्यास कथाज्ञानयज्ञाच्या माध्यमातून आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यातून समरसतेने कार्यरत होतेच.

स्वातंत्र्योत्तर काळात, भारतीय समाज तथाकथित 'धर्मनिरपेक्ष लोकशाही समाजवाद', या भारतीय राज्यघटनेतील स्वीकृत शब्दयोजनेसह केल्या जाणाऱ्या, राजकीय व्यवहारामुळे सनातन अखंड हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी करावयाच्या संघर्षाला सिद्ध करणे दुरापास्त होऊन बसले. एक प्रकारे पुन्हा ब्रिटिश काळासारखीच मानसिक स्थिती निर्माण झाली. भारतीयांची अवस्था कुरुक्षेत्रावरील अर्जुनाप्रमाणे झाली.

शैशवावस्थेपासून भगवद्‌गीतेचा सतत अभ्यास आणि चिंतन करणाऱ्या पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी हे ओळखले. श्रीमद् भगवद्‌गीतेतील अर्जुनाप्रमाणे राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी भारतीयांना सिद्ध करावे लागेल, हे ओळखून देशविदेशातील भारतीयांना श्रीमद् भगवद्‌गीतेच्या आधाराने भक्ती, शक्ती आणि युक्ती यांसह भक्कम मनोवृत्तीने उभे केले पाहिजे यासाठी भगवद्‌गीता-ज्ञानयज्ञ आणि महाराष्ट्रात श्री ज्ञानेश्वरी-ज्ञानयज्ञ हाच एकमेव उपाय आहे, हे पू. स्वामींना जाणवले.

भारतीयांना सुसंघटित करण्यासाठी मने सुसंस्कारित झाली पाहिजेत यासाठी मानवी जीवनाच्या सर्वांगपरिपूर्ण संस्कारांच्या दृष्टीने श्री दासबोध उपयुक्त ठरेल.

तसेच श्रीरामजीवनाचा वस्तुपाठ लोकांसमोर ठेवून राष्ट्र जागरणासाठी योगवासिष्ठ हा ग्रंथ उपयुक्त ठरेल हे लक्षात घेऊन पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज तथा पूर्वाश्रमीचे आचार्य किशोरजी व्यास यांनी, स्वतःभोवती कथाज्ञानयज्ञांच्या निमित्ताने, प्रवचनांच्या निमित्ताने संपर्कात येणाऱ्या धार्मिक, भाविक, स्नेहीजनांच्या सहाय्याने विविध उपक्रम स्वतः स्वतंत्रपणे कार्यान्वित करावयास सुरुवात केली.

विचाराने मने संस्कारित आणि संकल्पित झाली पाहिजेत. त्याचबरोबर अशा भक्कम मनाने, मने राष्ट्रीय पुनरुत्थान-जागरणाच्या कार्यासाठी राष्ट्रयोगीसाधक-स्वरूपात क्रियाशील झाली पाहिजेत, असे ठरवून श्रीकृष्ण भगवंतांचे पायिक म्हणून आचार्य किशोरजी व्यासांनी 'गीता परिवार' यासारख्या कार्याला सुरुवात केली.

## गीता परिवार एक अभिनव उपक्रम :-

कृष्ण भगवंतांनी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून, अर्जुनातील पुरुषार्थ जागृत केला. पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज अर्थात किशोरजी व्यास भारतीय समाजपुरुषामध्ये पुरुषार्थजागृती करू इच्छित होते. या पुरुषार्थसिद्धीने एक सुसंस्कारित, संघटित, अनुशासित आणि परमवैभवशाली भारत निर्माण होऊन विश्वगुरू बनावा असे त्यांचे स्वप्न आहे.

या स्वप्नाची पूर्ती होण्यासाठी ध्यास घेऊन 'गीता परिवार' अखंड कार्यरत आहे. दोन तपे उलटून गेली. गीता परिवार पू. स्वामींच्या मार्गदर्शनाखाली नवे-नवे मार्ग, नवे-नवे उपक्रम राष्ट्रयोगसाधनेसाठी उपयोजीत आहे. प्रवासात परिवाराशी संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तिच्या साधनाशक्तीनुसार कार्य दिले जात आहे. कार्याशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला राष्ट्रयोगसाधनेचा मंत्र देऊन जणू अनुग्रहित केले जाते. त्यामुळे गीता परिवार भारताच्या अनेक राज्यांत, अनेक जिल्ह्यांत, गावागावापर्यंत पोहोचला आहे.

प.पू. स्वामींनी गीता परिवारात सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला भावी राष्ट्रयोग साधकांपुढे सिद्धतेने उभे करण्यासाठी पंचसूत्र-अनुसार दिला आहे. भगवद्भक्ती, भगवद्गीता, भारतमाता, विज्ञानदृष्टी आणि स्वामी विवेकानंद ही पाच पंचसूत्रांची पंचकेंद्रे होत. भगवद्भक्ती अर्थात आस्तिकभाव आणि समर्पणभाव यासह चराचरात भगवंत असल्याची अनुमती घेणे. भगवद्गीता म्हणजे जीवनाचे, राष्ट्राचे आणि विश्वाचे परस्परांशी असलेले संबंध आणि या संबंधांसह पुरुषार्थपूर्णतेने

जीवन सफल करण्याचे ज्ञान. भारतमाता म्हणजे विश्वबंधुत्वाच्या भावनेने सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे प्रेमस्वरूप अस्तित्व. विज्ञानदृष्टी म्हणजे भौतिक अभ्युदय आणि पारमार्थिक शांती यांचा समन्वय साधणारी शास्त्रीय दृष्टी आणि स्वामी विवेकानंद म्हणजे सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आणि भारतीय राष्ट्राला विश्वगुरुस्थानी वैभवसंपन्नतेने प्रस्थापित करण्यासाठी आदर्शभूत सिद्ध राष्ट्रयोगी. गीता परिवारातील प्रत्येक कार्यकर्ता अशा पंच जाणिवांनी राष्ट्रयोगसाधक म्हणून साधना करणारा घडला पाहिजे असा पू. स्वामींचा आग्रह आहे.

गीता परिवार संघटित आणि कार्यान्वित करताना गीता परिवाराचे प्रमुख पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे नम्र अनुसारक डॉ. संजय मालपाणी म्हणतात– 'संपूर्ण भारतीय दर्शन का सार है श्रीमद्‌भगवद्‌गीता! गीता वृद्धावस्था में स्वर्ग के लिए गेट पास नहीं बल्कि जीवन जीने का शास्त्र है । बचपन में ही इस ग्रंथ के प्रति यदि बच्चों में जिज्ञासा व रुचि उत्पन्न कर दी जाय तो गीता उनके जीवन को सदैव प्रशस्त करती रहेगी ।' या दृष्टीने गीता परिवाराच्या कार्याचे केंद्र संस्कारक्षम बालक हे निश्चित करण्यात आले.

बालपणीच भगवद्‌गीतेतील सत्य, प्रेम, करुणायुक्त पुरुषार्थपूर्ण जीवनसंघर्षातून चराचराच्या जीवमात्रांच्या आणि प्रामुख्याने मानवमात्राच्या समग्र कल्याणासाठी राष्ट्रयोग साधण्याची दृष्टी मिळाली तर सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे पुनरुत्थान सत्वर घडेल या दुर्दम्य विश्वासाने गीता परिवाराचे कार्य सुरू आहे.

पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या द्रष्टेपणाची दिव्य दृष्टी आणि श्रीमान ओंकारनाथजी मालपाणी आणि श्रीमती ललितादेवी यांच्या विचारविनिमयातून घर आणि शाळा यांना पूरक असे राष्ट्रयोग साधणारे बालसंस्कार केंद्र उभे राहिले पाहिजे या जाणिवेतून १९८६ साली संगमनेर तालुका, माहेश्वरी महिला मंडळ या संस्थेच्या माध्यमातून पहिले बालसंस्कार शिबिर संपन्न झाले आणि पुढे सलग चार वर्षे, आचार्य किशोरजी व्यास यांच्या आज्ञेनुसार व मार्गदर्शनानुसार शिबिरे संपन्न होत गेली.

या शिबिरात भगवद्‌गीतेच्या श्लोकांच्या गायनासह स्वतः पू. आचार्य किशोरजी व्यास शिबिरार्थींना जागृत करीत, श्री अशोकजी आवसक प्रातः कालचा शंखनाद करीत. या शंखनादाने आणि भगवद्‌गीता श्लोकांच्या गायनाने गीता परिवाराचे कार्य सुरू झाले ही सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थापनासाठीच्या

कार्यासाठी आश्वासक पहाट म्हणता येईल.

## बालसंस्कार-शिबिरांचे आयोजन आणि विस्तार :-

स्वतः पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज तथा किशोरजी व्यास यांच्यासह सुरुवातीच्या शिबिरात, शिबिर यशस्वी करण्यासाठी श्रीमान अशोकजी आवसक, आदरणीय बाबासाहेब मुर्टेकर, प्रा. द. दि. काळे, श्री. भगवानराव जोशी, सौ. सुवर्णाकाकी मालपाणी हे सुरुवातीच्या शिबिरांचे आणि त्यातून निष्पन्न झालेल्या गीता परिवार संस्थेचे आधारस्तंभ म्हणावे लागतील.

गीता परिवाराचे कार्य संस्कार शिबिराच्या माध्यमातून हळूहळू विस्तारत गेले. पहिल्या शिबिरामध्ये बालकांवर झालेल्या संस्कारांच्या अनुभवांमुळे संस्कार-शिबिराची कीर्ति हळूहळू सर्वदूर पसरू लागली. कानोकानी पसरलेल्या कीर्तीमुळे अन्य शहरे, राज्य यांतील प्रतिष्ठित व्यक्ती शिबिराची पाहणी करण्यासाठी, स्वेच्छेने संगमनेर येथे येऊ लागल्या. विविध ठिकाणी शिबिरे आयोजित करण्यासाठीचे निमंत्रण येऊ लागले. संगमनेरबाहेर असे पहिले शिबिर सातारा येथे मुलींसाठी झाले. त्यानंतर एकेक करून सोलापूर, कोल्हापूर, जळगाव, इचलकरंजी, बीड, नांदेड, औरंगाबाद, कोलकाता, सरदार शहर इ. ठिकाणी शिबिरांचे आयोजन झाले.

डॉ. संजय मालपाणी याविषयी लिहितात- 'स्थान-स्थान से संस्कार शिबिरों के आयोजन की माँग जिस प्रकार बढ रही थी उससे यह स्पष्ट है कि भौतिकता एवं आधुनिकता के युग में भी समाज चरित्रनिर्माण का महत्त्व भूला नहीं था, प्रतीक्षा थी- एक सार्थक पहल की, दृढता के साथ कदम आगे बढाने की । शिबिरों में पूज्य आचार्यश्री की सक्रिय उपस्थिति से गीता परिवार द्वारा संचालित संस्कार शिबिरों के प्रति लोगों में एक प्रकार की विश्वसनीयता का भाव जगने लगा । इसके साथ ही गीता परिवार से आशाएँ और अपेक्षाएँ भी बढने लगीं ।'

## संस्कार-शिबिरांचे स्वरूप आणि विस्तार :-

महाराष्ट्राच्या नगर जिल्ह्यातील संगमनेर या गावी गीता परिवाराची सुरुवात झाली. गीता परिवाराचा हा प्रवाह आता भारतात जवळपास १७ राज्यांत, अनेक शहरांत, असंख्य गावांत गीता संदेश पोहोचवीत आहे व त्याद्वारे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे जागरण केले जात आहे. महाराष्ट्राबाहेर हैद्राबाद, सूरत, बंगलुरु,

कोलकाता, लखनौ, दिल्ली, कोटा इ. शहरांत शिबिरांचे आयोजन झाले आहे. यांतील कोलकाता, हैद्राबाद, लखनौ, कोटा अशा काही ठिकाणी प्रतिवर्षी संस्कार-शिबिरांचे आयोजन केले जाते.

हिवाळी किंवा उन्हाळी सुटीमध्ये पाच-सात दिवसांचे निवासी शिबिर आयोजित केले जाते. या दिवसांत बालकांना टी.व्ही., मोबाइल, कार्टून यांची आठवणही होत नाही; हे या शिबिरांचे यश म्हणता येईल. अतिशय आह्लाददायक, प्रेमळ आणि आरोग्यवान वातावरणात ही शिबिरे संपन्न होतात. प्रातःकाळी शंखनाद आणि गीतागायन यांच्या साह्याने शिबिरार्थींना जागृत केले जाते. नंतर सूर्यनमस्कार, योगासन, प्राणायाम, प्रांग- स्वच्छता, स्नान, देवदर्शन, उपासना, प्रार्थना, गीतादर्शन, संस्कार-संस्कृतिपरिचय, कराटे, दंडयुद्ध, नानचाक, चर्चा, प्रश्नोत्तरे, खेळ, इतिहासदर्शन, कथाकथन, मनोरंजन, कला-सादरीकरण अशा प्रकारची शिबिराची दिनचर्या असते.

बालकांना बालकृष्ण मानून कार्यकर्ते अतिशय भक्तिभावाने काम करतात. त्यामुळे या पाच-सात दिवसांतच कार्यकर्ता आणि शिबिरार्थी यांच्यात स्नेहबंध जोडले जातात. त्यामुळे सतत अभ्यास सुरू ठेवण्यास मदत होते.

**संस्कारवर्ग :-**

संस्कारवर्ग हा अनिवासी उपक्रम आहे. दहा ते पंधरा दिवसांचा संस्कारवर्ग सोपेपणाने आणि द्रुत गतीने पूर्ण केला जातो. त्यामुळे संस्कारवर्ग अतिशय लोकप्रिय होत आहे. मात्र कार्यकर्त्यांना रोज वाढत्या संख्येने येणाऱ्या वर्ग-विद्यार्थ्यांसाठी मोठ्या युक्तीने अनेक गोष्टी शिकवाव्या लागतात. संस्कारवर्गामुळे, पू. स्वामींचे हेतूकार्य मोठ्या गतीने दूरवर पसरते आहे.

**कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण-शिबिर :-**

शिबिरे आणि संस्कारवर्ग यांचा जसजसा विस्तार होऊ लागला, तसतशी कार्यकर्त्यांची आवश्यकता अधिक भासू लागली. अर्थात यासाठी अनेक महिला, पुरुष, युवक, पू. स्वामींच्या प्रेरणेने पुढे सरसावले.

कार्यकर्त्यांजवळ विशिष्ट योग्यता आणि गुणांची आवश्यकता आहे, याकडे पू. स्वामींनी लक्ष वेधले. असे गुणसंपन्न आणि योग्यतासंपन्न कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी 'कार्यकर्ता स्वाध्याय शिबिर' आणि 'कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग' सुरू करण्यात आले.

अशा शिबिरांमध्ये अनुभवी कार्यकर्ते बालसंस्कार कार्याविषयी वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची माहिती कार्यकर्त्यांना देऊ लागले. निवासी कार्यकर्ता शिबिरामध्ये गीता दर्शन, प्रात्यक्षिक प्रबोधन, उपासना, प्रार्थना, सूर्यनमस्कार, प्राणायाम, कथाकथन तंत्र, मैदानी आणि घरगुती खेळ, संस्कृत उच्चारण आणि बालमानसशास्त्राचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले. अशा कार्यकर्ता-शिबिरांमध्ये स्वतः पू. स्वामीजी यांचे प्रवचन कार्यकर्त्यांना मार्गदर्शक तसेच प्रेरणा आणि ऊर्जा देणारे असते. अशा शिबिरांबरोबरच एक दिवसीय प्रशिक्षण-वर्गही आयोजित केले जातात, ज्यात हजारो कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले जाते.

कार्यकर्त्यांना उभे करून बालसंस्कार-शिबिरे आणि बालसंस्कार-वर्ग यांच्या माध्यमातून गीता परिवाराचे कार्य देशात आणि देशाबाहेरही नित्य विस्तारित होत आहे. सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थान-प्रक्रियेत, राष्ट्रयोगी एक एक पाऊल पुढे-पुढे जात आहेत. बालसंस्कार ही वैभवसंपन्न राष्ट्राची आरोग्यपूर्ण पायाभरणी आहे. या पायाभरणीत अनेक राष्ट्रयोगसाधक मोठ्या संख्येने नित्य सहभागी होत आहेत. प्रयोगसिद्ध उपक्रमशीलतेने हे कार्य पुढे जात आहे.

**गीता परिवाराची उपक्रमशील प्रयोगसिद्धता :-**

ब्रिटिश कालापासून सुरू झालेल्या शालेय शिक्षणात पुस्तकी शिक्षण आणि एकांगी समुपदेशन, या एकांगी पद्धतीमध्ये शैशवावस्थेपासून तारुण्यावस्थेपर्यंत एवढेच नव्हे तर स्नातक अवस्थेपर्यंत शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग घडत नसल्यामुळे तसेच त्याच पद्धतीत नगण्य बदल करून परीक्षार्थी स्वरूपात बालऊर्जेची परिणती झाल्यामुळे विद्यार्थ्यांमधील ओजस्विता, प्रज्ञा, पुरुषार्थ-परिपोषितता, चिंतनशीलता, निर्णयशक्ती, समाजाभिमुखता, सर्वांविषयीची प्रेमपूर्णता, विवेकशक्ती आदी मनामनात राष्ट्रपरिपोषित करणाऱ्या गुणांचा अभाव होतो आहे हे पू. स्वामी गोविंददेव गिरि तथा किशोरजी व्यास यांनी ओळखले.

प्राचीनतम गुरुकुलातील स्वाध्याय, स्वयंप्रेरणा, स्वयंसेवा, विवेकपूर्वक आणि संवादात्मकतेने घडणारी ज्ञानप्रक्रिया, प्रयोगसिद्धतेने घडणारी शिक्षणप्रक्रिया हीच पुरुषार्थपूर्ण नागरिक घडविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विचार पू. स्वामींनी केला. पू. स्वामींच्या मार्गदर्शनाने गीता परिवार संस्थाचालकांनी, कार्यकर्त्यांनी उपक्रम शील प्रयोगशीलतेचा मार्ग अवलंबिला. या मार्गात बालकांचा सक्रिय सहभाग, परस्पर संवाद आणि खेळ अशा पद्धतींचे उपयोजन करून प्रात्यक्षिकप्रबोधन,

कृतिशील धन्यवाद, संस्कार, तपोसाधना, धारावाहिक बोधकथांचे नाट्यमय आविष्करण असे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आविष्कारासाठी उपयुक्त आणि रंजक तसेच मूल्यशिक्षणात्मक प्रात्यक्षिक-प्रबोधनाचे उपक्रम कार्यान्वित केले.

**गीता परिवार विद्यमाने लक्षणीय प्रयोगसिद्ध उपक्रम :-**

**१) नाट्याविष्कार, कथाकथन** - अशा लक्षणीय उपक्रमांमध्ये कथाकथन आणि बालनाटिका सादरीकरण यांचा अंतर्भाव केला गेला. त्याचबरोबर कठपुतल्यांचा खेळ या माध्यमातून नाट्याविष्कार असाही उपक्रम राबविला गेला. याअंतर्गत छत्रपती शिवाजी (६ भाग), संत ज्ञानेश्वर (६ भाग), समर्थ रामदास (२ भाग), कृष्णलीला (४ भाग), याशिवाय पंचतंत्र, ध्रुव, प्रह्लाद, नचिकेता, अष्टावक्र, महाबली हनुमान, शहीद उधमसिंह, चंद्रशेखर आजाद, भगतसिंह अशा विविध विषयांवर गीता परिवाराने नाटिकांची निर्मिती केली. नाटिका प्रभावी होतील असे आधुनिक नाट्यतंत्र वापरून, बालकांकडून या नाटिका बसवून घेऊन सादर करण्याचा उपक्रम अनुसरला. विद्यार्थ्यांमध्ये या निमित्ताने रसरसतेपणा, क्रियाशीलता आणि प्रज्ञाप्राकट्य या गुणांचा परिपोष झाला.

**२) गीता पाठांतर स्पर्धा** - शिबिरांमध्ये गीतादर्शनाच्या निमित्ताने गीतेमधील विचार बालकांपर्यंत सुलभ प्रवचनातून नेण्यात आलेच. त्याचबरोबर प्रश्नोत्तरांच्या द्वारेही भगवद्‌गीतेवर चर्चा होतच असते. तथापि पू. स्वामींना स्वतःच्या अनुभवाने बालवयातच श्रीमद्‌ भगवद्‌गीता मुखोद्‌गत झाली तर त्यावरील चिंतनाची प्रक्रिया जीवनप्रवासात आपसूकच सुरू होते आणि ठायीच स्वयंप्रेरणेने भगवद्‌गीतेतून मार्गदर्शन मिळविण्याची प्रक्रियाही सुरू होते. याबरोबरच पाठांतराची सवय, उच्चारशुद्धीकरण असे संस्कारही आपोआपच घडतात हे लक्षात घेऊन गीता परिवाराच्या वतीने गीता परिवार कार्यकर्त्यांना, पाठांतर स्पर्धा आयोजनाकरिता मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनानुसार प्रतिवर्षी गीताजयंतीच्या निमित्ताने अखिल भारतीय स्तरावर भगवद्‌गीतेच्या एका अध्यायाच्या पाठांतराकरिता स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. पाठांतर करवून घेण्यासाठी ध्वनिफिती आणि अध्यायाचे मुद्रित पत्रक सर्वांपर्यंत पोहोचविण्याचीही व्यवस्था होते. काही दिवसांपूर्वी एकट्या अहमदनगर जिल्ह्यात ३५० विद्यालयांमधून ४०,००० विद्यार्थ्यांनी बारावा अध्याय पाठ करून सादर केला. गीता परिवाराच्या

प्रयत्नांमुळे आणि ध्वनिमुद्रित तसेच छापील स्वरूपात गीता अध्याय सर्वांपर्यंत पोहोचविल्यामुळे साधारणतः एक महिन्यात रोज दहा मिनिटे खर्च करून या स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना उतरविता आले.

पू. स्वामी गोविंददेव गिरि आणि गीता परिवार समूह यांची देशातील सर्व बालकांनी पहिली ते १० वी शिकत असताना म्हणजे बालवयात संपूर्ण गीतेचे पाठांतर करावे अशी महत्त्वाकांक्षा आहे. त्या दृष्टीने गीता परिवार प्रयत्नशील आहे.

**३) गिरिभ्रमण –** गीता परिवाराच्या वतीने गिरिभ्रिमण शिबिरे आयोजित केली जातात. बालवयातच राष्ट्रयोगसाधनेचे संस्कार करावयाचे असतील तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर बालनाट्य सादर करून किंवा कथाकथन करून भागणार नाही; या गोष्टींबरोबरच शिवछत्रपतींनी ज्या गडकोट–किल्ल्यांवरून हिंदवी स्वराज्यासाठीचा संघर्षपूर्वक राष्ट्रयोग साधण्याचा प्रयत्न केला, त्या गडकोट–किल्ल्यांमध्ये, डोंगरदऱ्यांमध्ये बालकांना प्रत्यक्ष घेऊन जाऊन शिवछत्रपतींच्या ऐतिहासिक लीलांचे जागरण करावे; त्याचबरोबर अशा गिरिभ्रमण शिबिरांमधून साहस, स्वावलंबन, सहयोग, सहकार्य, परिश्रम, धैर्य इ. संस्कार बालमनावर घडवावेत असे प्रयत्न केले जातात. बालवयात सुसंस्कारातून बालमनाच्या ठिकाणी केलेले संकल्प स्वप्रज्ञेने भावी आयुष्यात ही बालके पूर्ण करू शकतात असा विश्वास पू. स्वामींना वाटतो.

**४) निःशस्त्र युद्ध / नियुद्ध –** अलीकडील काळात ज्युदो आणि कराटे या प्रकारचे युद्धप्रशिक्षण जगातील अनेक देशांमध्ये लोकप्रिय ठरले आहे. स्वसंरक्षण करण्यासाठी निःशस्त्र युद्ध तथा नियुद्ध उपयुक्त ठरते असा अनुभव आहे. व्यायाम–प्रकाराबरोबरच शरीरातील सर्व स्नायू, अस्थि आणि ऊर्जा यांच्या समन्वयातून विशिष्ट हालचालींसह प्रहार करण्याचे कौशल्य तसेच बचाव करण्याचे कौशल्य या चीन आणि जपानच्या परंपरेतून आलेल्या युद्धप्रकाराने साधता येते हे लक्षात घेऊन पू. स्वामींनी या प्रकारच्या युद्धप्रशिक्षणाला प्रोत्साहन दिले. विशेषतः कन्यांच्या दृष्टीने आत्मसंरक्षण ही गोष्ट अलीकडच्या औद्योगिक प्रगतीच्या काळातील सर्व व्यवहारात, सर्व स्थळी स्त्री–पुरुषांचा तथाकथित समानतेच्या नावाखाली होणारा वावर लक्षात घेता, या प्रकारच्या कौशल्याची आवश्यकता गीता परिवाराच्या कार्यकर्त्यांनी लक्षात घेतली. बालकांसाठी शिबिरांतर्गत आणि

स्वतंत्रपणे निःशस्त्र युद्ध अर्थात ज्युदो, कराटे यांचे वर्ग सर्वत्र सुरू करण्यात आले. या वर्गातील प्रशिक्षणाद्वारे शेकडो खेळाडूंनी 'ब्लॅक बेल्ट' प्राप्त केले आहेत, अशी माहिती डॉ. संजय मालपाणी देतात.

**५) उत्सवांतून संस्कार, संस्कृती आणि राष्ट्रीय जागरण –** रामराष्ट्रयोगी, रामभक्त हनुमान आणि विश्वराष्ट्र योगेश्वर हे भारतीय सनातन राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी बुद्धी, भक्ती, शक्ती, नीती, युक्ती आणि विवेक यांचा संस्कार घडविणारे आदर्श होत.

श्रीकृष्णजन्म, हनुमान जयंती यासारखे भारतीय परंपरेतील विशेष संस्कार घडविणारे उत्सव बालकांच्या सहभागाने, बालकांच्या नेतृत्वाखाली घडले तर बालमने स्वयंसंस्कारित होतात असा विचार करून अशा विविध उत्सवांची योजना केली गेली आहे.

भारतात जेथे-जेथे गीता परिवाराचे कार्य सुरू आहे, तेथे-तेथे राष्ट्रीय स्तरावर अशा उत्सवांचे आयोजन केले जाते. छोट्या-छोट्या नाटिका, वेशभूषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कथाकथन स्पर्धा अशा माध्यमातून विद्यार्थ्यांची प्रज्ञा, कला प्रकट करण्याची संधी उपलब्ध करून देऊन श्रीकृष्ण, महाबली हनुमान आदी भारतीय राष्ट्राला आदर्शभूत असलेल्या विभूतिमत्त्वांच्या चरित्राचे जागरण केले जाते.

**६) हनुमान चालीसा- भक्तिमय राष्ट्रयोगसाधना-प्रयोग –** हनुमान जयंतीच्या निमित्ताने रामराष्ट्रआराधन करणाऱ्या -

**'मनोजवं मारुततुल्य वेगम् ।**
**जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**
**वातात्मजं वानरयूथ मुख्यम् ।**
**श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ।।'**

या भावनेने सर्व संकटांवर मात करणाऱ्या, सर्व दुरिते नाहीसे करणाऱ्या, रामस्वरूप, संकटमोचक, हनुमानस्वरूपाची प्रेरणा भारतीय राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आणि दैनंदिन जीवनातही प्रपंच आणि परमार्थ यशस्वी होण्यासाठी मनामनाला बलवान करणारी आहे; अर्थात मनःशक्तीचा उत्कर्ष करणारी आहे हे विचारात घेऊन संत श्री तुलसीदास विरचित राष्ट्रभाषेतील हनुमान चालीसा स्तोत्रपाठ आबालवृद्धांनी करावा, असा पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा आग्रह आणि प्रयत्न

असतो.

गीता परिवाराच्या माध्यमातून हनुमान जयंतीच्या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावर एकाच दिवशी, एकाच वेळी लाखो बालके सामूहिकपणे हनुमान चालीसा पाठ करून स्वत्वाचे आणि राष्ट्रीयत्वाचे जागरण करतात.

याला अनुसरून सर्व नागरिकांनी सामूहिक स्तरावर हनुमान चालीसा पाठाच्या गायनातून व्यक्ती, संघ आणि राष्ट्र या स्तरांवर हनुमत्-स्वरूपाचा जागर करावा, यासाठी गत २५-३० वर्षांपासून महाराष्ट्रातील अहमदनगर शहर यासह अनेक शहरांत, अनेक राज्यांत, पू. स्वामींच्या प्रेरणेने हनुमान चालीसा मंडळ्या कार्यरत आहेत.

यातील काही मंडळ्या होळीपौर्णिमेपासून चैत्रीपौर्णिमेपर्यंत आपापल्या सोयीनुसार ठिकठिकाणी जाऊन सामूहिकपणे हनुमान चालीसा पाठ उत्सव करतात. या माध्यमातून सर्व नागरिक हनुमानस्वरूपाशी जोडले जातात. रामभक्ती, राष्ट्रभक्ती आणि आत्मभक्ती दोन्हींचाही जागर या माध्यमातून केला जातो.

अहमदनगरसारख्या या उपक्रमाचा शुभारंभ करणाऱ्या शहरांत,पू. स्वामी स्वतः हनुमान चालीसा पाठाच्या ठिकाणी प्रत्यक्ष सहभागी होऊन; आशीर्वाद-वचनातून उपक्रमाला भव्य प्रतिमा उत्सव संपन्न करण्यासाठी समोर ठेवून; तसेच रोशणाई करून नागरिकांना आकर्षित केले जाते. हनुमान जयंतीच्या दिवशी गीता परिवाराच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर एकाच दिवशी एकाच वेळी होणाऱ्या हनुमान चालीसा पाठामध्ये लाखो लोक सहभागी होतात. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे 'वाढता वाढता वाढे, भेदिले शून्य मंडळा' अशा स्वरूपात हे प्रकटते.

**७) विशेष उपक्रम – संस्कार बालभवन –** संस्कार-शिबिर आणि संस्कार-वर्ग अशा प्रतिवर्षी, परंतु अस्थायी स्वरूपाच्या आणि मर्यादित कालखंडासाठीच्या संस्कार केंद्रांचे जाळे देशभरात विणले जात असताना पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी, नियमित आणि स्थायी स्वरूपाचे उपक्रमही असावेत असे मार्गदर्शन केले. संस्कार-शिबिरे आणि संस्कार-वर्ग यांना स्थायी स्वरूपात आदर्शभूत ठरणारा नित्य उपक्रम उपयुक्त होईल असा या पाठीमागचा उद्देश होता. नियमित संपर्क आणि नियमित मार्गदर्शन अशा नियमित केंद्रातून घडू शकेल यासाठी नियमित उपक्रमाची आखणी करायचे ठरले.

गीता परिवाराचे नियमित कार्यकर्ते आणि आधारस्तंभ यांना बरोबर घेऊन

डॉ. संजय मालपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथे 'संस्कार बालभवन' प्रकल्पाची स्थापना केली. गीता परिवाराच्या या संस्कार बालभवनाचे रूपांतर आणि ओळख अपेक्षेप्रमाणेच बालविकासाची प्रयोगशाळा या स्वरूपात झाली. तीन वर्षांपासून बारा वर्षांच्या बालकांसाठी हे संस्कार बालभवन उभारण्यात आले. हे बालभवन १००० पेक्षा अधिक खेळांनी, तसेच बालकांचे विविध प्रकारचे कौशल्य निश्चित स्वरूपात आकार घेईल; त्यासाठीची उपयुक्त साधने यांनी हे बालभवन सुसज्ज करण्यात आले.

या बालभवनात प्रतिदिन १५० विद्यार्थी एकत्रित येतात. खेळ, हस्तकला, मृत्तिकाकार्य अशा माध्यमातून हस्तकौशल्य आणि सर्जनात्मकता यांना संधी देण्यात येते. कथाकथन, संस्कृत श्लोक उच्चारण, परस्पर मैत्रीपूर्ण चर्चा अशा माध्यमातून श्रवणशक्ती, भाषाविकास, वक्तृत्वशैली, स्मृतिविकास, बहिर्मुखता अशा गोष्टी वाढीस लागतात. कथाकथनात प्रामुख्याने सांस्कृतिक उद्‌बोधन करणाऱ्या कथांचा समावेश असतो. बालभवनात भारतीय सणोत्सव साजरे करताना मुलांवर सहज संस्कार होतील याकडे कटाक्ष असतो. नियमित संस्कारांमुळे तीन ते बारा वयोगटातील ही मुले ठायीच्या प्रज्ञेचा आविष्कार यथायोग्यपणे करण्यात पारंगत होतात.

बालभवनातील उपक्रमात बालरामकथा, हनुमानकथा, कृष्णकथा मुलांकडून सादर करून घेतल्या जातात. सादर करावयाच्या कथांची निर्मिती रंजन आणि भाषेची प्रगल्भता या दोन्ही गोष्टी डोळ्यासमोर ठेवून, नाट्यात्मकतेने विशेष लक्ष देऊन गीता परिवाराकडून निर्माण केलेले असतात.

या कथांच्या सादरीकरणासाठी प्रौढांसाठी आचार्यांद्वारा कथाज्ञानयज्ञस्वरूप ५ दिवस किंवा ७ दिवस कथा-ज्ञानयज्ञस्वरूपाचे, बालक-कथाज्ञानयज्ञ आयोजित केले जातात. मात्र या कथाज्ञानयज्ञाचे, कथाप्रवक्ता आणि श्रोते असे स्वरूप नसते; त्या-त्या कथांसंबंधात प्रश्नमंच, नाटक, कथांची झलक, चलत्‌चित्रपटाचे भाग, वेशभूषा स्पर्धा अशा विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल, अशा माध्यमांचे उपयोजन केलेले असते. याशिवाय संगीतकथा सादरीकरण असेही स्वरूप कथाकथनांना दिले जाते.

या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमामुळे रंजनात्मकतेने सांस्कृतिक ज्ञान, तत्त्वज्ञान, न्याय आणि कुटुंबव्यवहार व राजव्यवहार या संदर्भात बालक अधिक चौकस व

अधिक ज्ञान आणि माहिती संचय करू शकतो. त्याचबरोबर तो सुसंस्कारितही होतो. ह्या उपक्रमात बालके स्वयंप्रेरणेने व हिरिरीने भाग घेतात, असा अनुभव आहे.

**८) गीता परिवार युवा मंच–** सुसंस्कारित युवकांना सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थानाच्या कार्यात सहभागी करून घेणे आवश्यक आहे; हे लक्षात घेऊन गीता परिवाराने 'अर्जुन युवामंच मध्यांचल' यासारख्या विविध विभागांत ठिकठिकाणी युवा मंचांची स्थापना केली.

त्यांच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज या व अशांसारख्या आदर्शभूत व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रातील वैशिष्ट्यपूर्ण घटनाप्रसंगांच्या जागरणाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते व त्या माध्यमातून राष्ट्रयोगसाधनेसाठी युवापिढीला प्रेरित केले जाते.

**९) पालकांसाठी प्रबोधन–** पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज पालकांच्या प्रबोधनाकडेही विशेष लक्ष देतात. संस्कार–शिबिरे, संस्कार–वर्ग इ. माध्यमांतून बालकांना सुसंस्कारित केल्यानंतर, त्या संस्कारांचे दृढीकरण बालकांच्या स्वभावात व्हावे यासाठी पालकांना जागृत करणे आवश्यक ठरते. त्यासाठी पालकांचा स्वतंत्र प्रबोधन–वर्ग घेणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन गीता परिवाराच्या माध्यमातून पालकांसाठी प्रबोधन वर्ग आयोजित करण्यात येतात.

*'दो शब्द माता के लिए... दो शब्द पिता के लिए'* आणि *'विकास बालकका – सहभाग आपका'* अशा शीर्षकांनी आयोजित केलेल्या पालक प्रबोधन संवाद सभा अर्थात कार्यशाळा आयोजित केल्या जातात. देशभरात आत्तापर्यंत ३०० हून अधिक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळांमुळे पालक बालकांवर होणाऱ्या संस्कारांच्या संदर्भात जागृत तर झालेच; त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे पालक गीता परिवाराकडे आकृष्ट झाले. संस्कार–शिबिरे आणि संस्कार–वर्ग यासाठीच्या मागण्या वाढल्या. त्यामुळे गीता परिवार संख्यात्मकतेने आणि गुणात्मकतेने वाढू लागला.

## १०) पू. स्वामी मार्गदर्शित प्रकाशने :–

पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांच्या कथाज्ञानयज्ञात्मक आणि प्रवचनात्मक आयोजनांसाठीचे संपर्क केंद्र या दृष्टीने 'धर्मश्री' हे केंद्र कार्यान्वित आहे. पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराजांचे सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थान

यासाठीचे कार्य प्रामुख्याने 'महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान', 'गीता परिवार' आणि 'संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल' या व या अनुषंगाने स्थापित झालेल्या संस्थांच्या माध्यमातून सुरू आहे.

या संपूर्ण कार्याची माहिती सर्वांपर्यंत जावी; तसेच कथाज्ञानयज्ञ आणि प्रवचने ही केवळ तात्कालिक श्रोत्यांसमोर न राहता ती मौखिकाच्या लिखित स्वरूपात सर्वांपर्यंत जावी, त्या माध्यमातून राष्ट्रजागरण घडावे. नवे-नवे राष्ट्रयोग साधक मोठ्या प्रमाणात जोडले जावेत असा प्रयत्न केला जातो.

यासाठी 'धर्मश्री प्रकाशन संस्था' तसेच 'गीता परिवार प्रकाशन संस्था' आणि 'धर्मश्री त्रैमासिक' ह्या स्वरूपात प्रकाशने उपलब्ध करून दिलेली आहेत. या प्रकाशनांच्या माध्यमांतून, राष्ट्रीय मूल्यात्मकतेने, कथानिवेदन तथा विचारमंथन केले जाते. 'धर्मश्री त्रैमासिक' या व्यासपीठाचा उपयोग धर्मजागरण, राष्ट्रजागरण, प्रतिभाविष्कार, विभूतिमत्त्वदर्शन यांसाठी जसा केला जातो तसाच पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या ज्ञानयज्ञाची तसेच रचनात्मक कार्यांची, संकल्पित कार्यांची माहिती दिली जाते. त्याचबरोबर आयोजित कार्यक्रमांसाठी परिश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रीय स्तरावर परस्परांशी परिचयही होतो.

धर्मश्री प्रकाशनाने मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा भाषांमधून आत्तापर्यंत ७० वर पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. तर या प्रकाशनांबरोबर सी.डी., डिव्हीडी, पेनड्राइव्ह या स्वरूपांतही हे सर्व उपक्रम लोकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून दिले जात आहेत. गीता परिवाराच्या माध्यमातून बालसंस्कारांसंदर्भात तसेच युवक, पालक आणि सामान्य नागरिक यांच्यासाठी मिळून ५० वर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानप्रक्रियेच्या दृष्टीने दोनही प्रकाशनांची पुस्तके प्राथमिक शाळांपासून महाविद्यालयांपर्यंत तसेच सार्वजनिक वाचनालयांमध्ये संग्रहणीय आणि सतत वितरणासाठी अतिशय उपयुक्त अशी आहेत.

धर्मश्री प्रकाशन आणि गीता परिवार प्रकाशन या दोन्ही प्रकाशनांची पुस्तके प्रस्तुत ग्रंथात शेवटी परिशिष्टाच्या स्वरूपात जोडली आहेत.

**जनकल्याण कार्यालय :-**

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे 'जनकल्याण कार्यालय' दिल्ली येथे

देशविदेशातील पू. स्वामी-संचलित कार्ये, कथाज्ञानयज्ञ आणि विशेष प्रासंगिक प्रवचने, तसेच सर्व प्रकाशने या दृष्टीने उपयुक्त संपर्क कार्यालय आहे. पू. स्वामींच्या कार्याचे विश्वव्यापक स्वरूप पाहता ‘जनकल्याण कार्यालय’ सर्व कार्यासाठी आधारभूत कार्यालय ठरत आहे.

पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या अथक भ्रमंतीतून सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानाच्या दृष्टीने मार्गदर्शनातून, संचलित झालेल्या विविध संस्थांच्या माध्यमातून आणि समर्पित ध्यासपूर्ण कार्यशैलीतून सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थानासाठी सतत प्रेरक प्रस्तुती होत आहे. त्यातून राष्ट्रयोग्याची संकल्पसिद्धीकडे, प्रगमनशीलतेकडे वाटचाल सुरू आहे.

* *

## ।। बारा ।।

# राष्ट्रयोग्याचे संकल्प राष्ट्रमंदिर :– रामलल्ला–जन्मभूमिमंदिर

इतिहासाचे मनामनात जागरण :– (१) अयोध्या सनातन हिंदूधर्मराष्ट्राची राजधानी – (२) सात्त्विकतेवर साम्राज्यवादी संहारकांची आक्रमणे – (३) आक्रमणे निस्तेज करून परतविण्याचा इतिहास – (४) मूर्तिभंजक धर्मांध मोगलवंशीय बाबर – (५) संत समर्थ रामदास स्वामीशिष्य बाबा वैष्णवदास यांचे कार्य – (६) श्रीरामजन्मभूमी मंदिरासाठी ७९ लढाया – रामजन्मभूमीसाठी न्यायालयीन लढा – प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा श्रीरामजन्मभूमि–मुक्ति–आंदोलनात सुरुवातीपासूनच हिरिरीने सहभाग – श्री क्षेत्र आळंदी येथे वि.हिं.प.तर्फे धर्मसंमेलन – रामायण संमेलनातील विश्व हिंदू परिषदेचा विश्वसंचार – श्रीराम शिलापूजनाचा कार्यक्रम – निर्णायक जनआंदोलन – राष्ट्रनेता अडवाणींची रथयात्रा – रामजन्मभूमिसाठी ज्ञानेश्वरी पारायण – कारसेवा कार्यक्रमाला उधाण – कारसेवकांची निर्णायक कारसेवा – राष्ट्रनेता पंतप्रधान श्रीमान नरेंद्र मोदी सरकारला श्रीराम–मंदिर उभारण्याचा आदेश – राष्ट्रमंदिरासाठी निधिसंकलन – राष्ट्राच्या प्रथम नागरिकापासून निधिसंकलनाला सुरुवात – राष्ट्रयोगी पू. स्वामींचे घरातून निधिसंकलन – रामजन्मभूमिपूजन – राष्ट्राय स्वः इदं न मम.

## ।। बारा ।।

# राष्ट्रयोग्याचे संकल्प राष्ट्रमंदिर :– रामलल्ला–जन्मभूमिमंदिर

सभागृह आनंदाने फुलून ओसंडत होते. प्रसन्न चित्त आणि प्रसन्न मुद्रेने, तेवढ्याच उत्कट नजरेने, हिंदूधर्मराष्ट्रभक्तांचे नेत्र सभागृहाच्या प्रवेशद्वारावर खिळले होते. कृष्णा–गोदावरी खोऱ्यातील अमृतवाहिनीचा बिल्वतीर्थातून प्रकटलेला, सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुत्थापित आणि वैभवसंपन्न करण्यासाठीच्या अखंड संघर्षातील राष्ट्रयोगी, राष्ट्रयोद्धा, सभागृहात केव्हा प्रकटतो; यासाठी भक्तवृंद आतुर झाला होता.

कोरोना महामारीने विश्वाचा विनाश होतो की काय, अशा वैश्विक निराशापूर्ण वातावरणातील हे सभागृह मात्र आत्मविश्वासाने, भक्तीने ओतप्रोत, आपल्या राष्ट्रयोग्याची प्रतीक्षा करीत होते.

जिथे प्रत्यक्ष हनुमान प्रकटतात तेथे रावणाची लंकाही जळून जाते. त्या हनुमद्भक्तांची अलोट गर्दी राष्ट्रसंत, राष्ट्रयोगी, राष्ट्रयोद्धा, आध्यात्मिक नेता अशा आपल्या धुरिणाची प्रतीक्षा करीत होते!

प्रवेशद्वारात प.पू. गोविंददेव गिरि महाराज प्रकटले. अवघ्या विश्वाच्या आत्मविश्वासाने तेजःपुंज भगवान सहस्त्ररश्मी प्रकटावेत, तेवढ्याच तेजस्वीपणे महाराज प्रकटले. उत्कट नजरेने स्वामींना स्वतःच्या डोळ्यात क्षणभर साठवीत स्तब्ध झालेल्या अहमदनगर शहरातील सहकार सभागृहात, टाळ्यांचा कडकडाट

झाला. ''जय श्रीराम ! जय श्रीराम ! जय श्रीराम !'' गर्जनांनी अवघे सभागृह दणाणून गेले. हनुमान चालीसाच्या पाठक चमूला, प.पू. स्वामींना, कोठे ठेवू आणि कोठे नको असे झाले. अवघ्या सभागृहाला प्रभू रामचंद्रांचे जणू प्रत्यक्ष दर्शन, पू. स्वामी गोविंददेव गिरि यांच्या प्रसन्न मुद्रेत घडत होते.

अयोध्येतील श्रीरामजन्मभूमि-न्यासाच्या संचालक समितीमध्ये कोषाध्यक्ष म्हणून पू. स्वामीजींची नियुक्ती झाली होती. समर्पित राष्ट्रनेता पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींनी या राष्ट्रयोग्यावर अतीव विश्वासाने आणि प्रेमभराने श्रीरामलल्ला मंदिर अर्थात राष्ट्रयोग्याच्या संकल्प राष्ट्रमंदिराचे कोषाध्यक्ष म्हणून अतिमहत्त्वाची जबाबदारी सोपविली होती. पू. स्वामी गोविंददेव गिरि व्यासपीठावर विराजमान झाले आणि ''जय श्रीराम !'' च्या हनुमद्‌गर्जना थांबता थांबेनात.

**इतिहासाचे मनामनात जागरण :-**

**अयोध्या नन्दिनी सत्यनामा साकेत इत्यपि ।**
**कोसला राजधानी च ब्रह्मपुर्यपराजिता ।।** (शिवसंहिता)

अयोध्या, नन्दिनी, सत्यनामा साकेत, कोसल राजधानी, ब्रह्मपुरी, अपराजिता या नावांनी प्रसिद्ध असलेल्या अयोध्येत प्रभू रामचंद्रांच्या जन्मभूमिस्थानावर, श्रीरामलल्लांचे मंदिर पुनरुज्जीवित व्हावे ही मनामनातील कांक्षा, साकार होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. हे मंदिर अखिल विश्वातील रामभक्तांच्या अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या विश्वातील संतानांच्या सहभागातून उभे व्हावे आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानाची मुहूर्तमेढ भव्य राममंदिराच्या स्वरूपात उभी राहावी यासाठीची जबाबदारी प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी स्वीकारली होती. विश्वातून राष्ट्रआराधनेसाठी हात सरसावले. या सर्व हातांचा सन्मानपूर्वक स्वीकार राष्ट्रमंदिरासाठीच्या कोषात, प्रेमभराने प.पू. स्वामी करून घेत आहेत या जाणिवेने पू. स्वामीजींकडे सर्वांचे आतुरतेने लक्ष लागले.

त्याच वेळी मनामनात शेकडो वर्षांच्या संघर्षाचा इतिहास चलत्‌चित्रपटासारखा स्मरणपटलावर प्रकट होत होता.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी १९८४ पासूनच आपल्या रामकथा-ज्ञानयज्ञांमध्ये, अयोध्या नगरीचे सांस्कृतिक आणि राष्ट्रीय महत्त्व परोपरीने समजावून सांगत, रामजन्मभूमिमुक्तीचे महत्त्व श्रोत्यांना तळमळीने पटवून द्यायला सुरुवात केली होती.

जगाच्या इतिहासात अजरामर असलेल्या विश्व हिंदू परिषद या हिंदू संघटनेची स्थापना मुंबईतील स्वामी चिन्मयानंदांच्या सांदिपनी आश्रमात, कृष्णाष्टमीच्या मुहूर्तावर १९६४ साली प.पू. सरसंघचालक श्री गुरुजींच्या नेतृत्त्वाखाली व त्यांच्या मार्गदर्शनाने झाली. ''ही संघटना विश्वातील सर्व हिंदूसाठीची व हिंदूंची संघटना आहे. भारतातील ऋषिमुनींनी व महापुरुषांनी प्रस्थापित केलेल्या जीवनमूल्यांवर श्रद्धा असलेला व विश्वात कोठेही व कोठल्याही जाति-पंथात जन्माला आलेला आणि जो स्वतःला हिंदू म्हणवून घेतो, अशा सर्वांचा समाज, तो हिंदू समाज होय. परिषदेने अतिव्यापक व मानवतावादी अशीच हिंदुत्वाची व्याख्या केली. हिंदू-धर्म-विचार म्हणजे जीवनपद्धतीचा, समाजधारणेचा व मानवाच्या आत्मिक उन्नतीचा असा शास्त्रीय, सामाजिक व सर्वसमावेशक विचार आहे. विश्वविचार, निसर्गविचार, समाजविचार व आध्यात्मिक विचार या चौरंगावर हा सनातन (प्राचीनतम व शाश्वत) धर्म अधिष्ठित आहे. या धर्मविचारात उपासनेचे स्वातंत्र्य तर आहेच, परंतु येथे विकसित मानवतेचेच साध्य आहे.'' या घटनेच्या वेळी पू. स्वामी केवळ बालस्वयंसेवक होते. तरीदेखील हिंदूंच्या विश्वात्मक आविष्काराविषयी, पू. स्वामींच्या मनात एक प्रकारचे स्फुल्लिंग प्रकटले.

१६ नोव्हेंबर १९८३ च्या देवस्थान एकादशीच्या दिवशी, हिंदुत्वजागरणासाठी भारतभरात 'एकात्मता यात्रा' काढण्यात आली. या एकात्मता यात्रेमध्येही महाराष्ट्रात पू. स्वामी हिरिरीने सहभागी झाले होते.

२ फेब्रुवारी १९८४ या दिवशी अयोध्येतील वाल्मिकी भवनात, विनय कटियार या युवकाच्या संयोजकत्वाखाली बजरंग दलाची स्थापना झाली. त्याला जोडूनच ७ व ८ एप्रिल १९८४ मध्ये नवी दिल्लीतील विज्ञान भवनात भरलेल्या धर्मसंसदेच्या अधिवेशनात ५२८ धर्माचार्यांनी रामजन्मभूमिमुक्ततेचे कार्य अंगीकारले. २१ जुलै १९८४ रोजी अयोध्येतील वाल्मिकी भवनात, धर्मसंसदेने सर्वसंमतीने गोरक्ष पीठाधीश्वर, श्री महंत अवैधाथ यांची रामजन्मभूमिमुक्तीयज्ञ समितीच्या अध्यक्षपदी निवड केली आणि धर्माचार्यांच्या या रामजन्मभूमिमुक्तीयज्ञ समितीने कामाला सुरुवात केली.

धर्माचार्य आणि वि.हिं.प.चे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आणि ७ ऑक्टोबर १९८४ हा संकल्प दिन ठरला. २५ सप्टेंबर १९८४ पासून श्रीराम-

जानकी रथयात्रा सुरू झाली होती. ती ७ ऑक्टोबर १९८४ रोजी संकल्पयात्रा झाली आणि घोषणा प्रकटली *'हिंदू बाहू शक्ति को तोलो, रामजन्मभूमि का ताला खोलो!'* या सर्व घटनांकडे पू. स्वामींचे बारकाईने लक्ष होते.

आपल्या परीने, पू. स्वामींनी रामकथा-ज्ञानयज्ञ मोठ्या आत्मविश्वासाने, अभिनिवेशाने ठिकठिकाणी सुरू केला होता आणि त्यातून रामजन्मभूमिमुक्तीचे महत्त्व सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी कसे आवश्यक आहे, यासाठी केवढे धर्मसंगर झाले आहे हे सांगत असताना दुसरीकडे महाराष्ट्रात संतमहंतांना सुसंघटित करून रामजन्मभूमिमुक्ति-आंदोलनाशी आणि धर्मसंसदेशी जोडून घेत हिंदूराष्ट्र जागरणाचे काम करीत होते.

## (१) अयोध्या-सनातन हिंदूधर्मराष्ट्राची राजधानी :-

पू. स्वामी तथा किशोरजी व्यास रघुवंशाविषयी म्हणत- रघुवंशीयांनी अयोध्येला आपली राजधानी केली. इक्ष्वाकू वंशात मांधाता, अंबरीष, हरिश्चंद्र, सगर, भगीरथ, दिलीप, रघू, अज, दशरथ, प्रभू रामचंद्र इत्यादी अतुल पराक्रमी व नीतिमान सम्राट होऊन गेले. ते सर्व मानवमात्रांचे पूर्वज होत. ही अयोध्यानगरी, 'अयुद्ध' या शब्दापासून निर्माण झाली. अथर्ववेदात या नगरीचे वर्णन केले आहे-

**अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।**
**तस्यां हिरण्यः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ।।**

(अथर्ववेद - १०.२.३१)

अर्थात - देवानिर्मित पुरुषदेहरूपी, अष्टाचक्रा आणि नवद्वारा अयोध्या (अजिंक्य) नगरीमध्ये सुवर्णनिधी आणि ज्ञानपूर्ण स्वर्ग साठवला आहे. हे राज्य कसे होते याचे वर्णनही अथर्ववेदात केले आहे -

**प्रभाजमानां हरिणीं यशसा संपरीवृताम् ।**
**पुरं हिरण्यमयीं ब्रह्मा विवेशापराजिताम् ।।**

(अथर्ववेद -१०.२.३३)

अर्थात - तेजस्वी, सुखमय आणि यशपूर्ण अशा सुवर्णमय, अपराजित नगरीमध्ये ब्रह्म निवास करते. अशी या रामराज्याची थोरवी आहे.

रामायणात शरयू नदीचा उगम मानस सरोवरातून झाला आहे. ती अयोध्येसमीप वाहते असा उल्लेख आहे -

**कैलास पर्वते राम मनसा निर्मितं परम् ।**
**ब्रह्मणा नरशार्दूल तेनेदं मानसं सरः ।।**
**तस्मात् सुस्रव सरसः सायोध्यामुपगूहते ।**
**सरः प्रवृत्ता सरयूः पुण्या ब्रह्मसरश्च्युता ।।**

(रामायण, बालकांड, २४/८-१०)

अर्थात - हे पुरुषश्रेष्ठा रामा, कैलास पर्वतावर ब्रह्मदेवाने मनाच्या योगाने एक उत्कृष्ट सरोवर निर्माण केले व ते मनानेच निर्माण केलेले असल्याने 'मानस' ह्याच नावाने प्रसिद्ध झाले. त्या सरोवरापासून जी नदी निघाली ती अयोध्येसमीप वाहत आहे. ती सरोवरापासून निघाल्यामुळे 'सरयू' या नावाने प्रसिद्ध झाली. मराठीत जिला शरयू म्हणतात, तीच संस्कृतातील सरयू.

या शरयू नदीच्या निमित्ताने इक्ष्वाकू वंशाचा पर्यायाने रामराज्याचा विश्वव्यापक संचार ऋग्वेदात मानसातून प्रकटलेल्या नद्यांच्या निमित्ताने आला आहे. सरयूचा उल्लेख अतिप्राचीन अशा ऋग्वेदात आला आहे.

**सरस्वती सरयूः सिन्धुरूर्मिभिर्म हो महीखसा यन्तु वक्षणीः ।**

(ऋग्वेद १०/६४/९)

अर्थात- सरस्वती, सरयू आणि सिंधू या भक्तरक्षक नद्या, तसेच मातृतुल्य उदक देवता आम्हास मधुर जल देवोत. या राज्याच्या व्यापकतेविषयी ऋग्वेदात मरुतांना आवाहन केले आहे.

**मा वः परिष्ठात् सरयुः परिषिण्यस्मे इत सुम्नस्तुनः ।**

(ऋग्वेद ५/५३/९)

अर्थात - हे मरुतांनो, जलसंपन्न सरयू नदी, तसेच रसा, अजितभा, कुभा, क्रुमू या नद्या तुमचा मार्ग न थोपवोत. तुमच्या सुखराशी केवळ आम्हालाच लाभोत. कुभा म्हणजे सध्याची 'काबूल' नावाची नदी. काबूल शहर हिच्याच तीरावर आहे. क्रुमू म्हणजेच सध्याची कुर्रम नदी. ही पण अफगाणिस्तानातून वाहते.

सनातन हिंदूधर्मराष्ट्राचा आदर्श राष्ट्रपुरुष म्हणून श्रीरामांचा आणि आदर्श रामराज्य, अर्थात अयोध्या राज्याचा उल्लेख थेट वेदांपासून ते अकराव्या शतकातील अतिमगती या जैन ग्रंथकाराने केला आहे. बौद्ध वाङ्मयातही जैन वाङ्मयाप्रमाणेच कोशल महाजनपदाचा उल्लेख आहे.

हे दोन्ही पंथ आपल्या परंपरेचा इक्ष्वाकू वंशीय परंपरेशी संबंध सांगतात– ‘श्रीरामपुत्र कुश असो वा वृषभ असो, श्रीरामानंतर पुनर्वसन होताच श्रीरामाचे जन्मस्थान अयोध्येतील ज्या टेकाडावर होते, त्या जागी एक अतिभव्य, सुंदर मंदिर उभे राहिले. या मंदिराला ‘कसोटी’ प्रकारच्या दगडांचे कोरीव असे ८४ खांब होते. तेव्हापासून प्रभू रामांच्या दर्शनासाठी आणि शरयूस्नानासाठी समस्त भारतीयांचा ओघ अयोध्येकडे वाहू लागला. अयोध्येला वैभव प्राप्त झाले.

अयोध्या तीर्थक्षेत्र बनली. अयोध्या एकात्मतेचे व संस्कृतीचे प्रतीक बनली!’ ‘बखर अयोध्येची’ या लेखनाच्या रूपाने डॉ. गिरीश मुरलीधर आफळे यांनी रामजन्मभूमिमुक्ति–आंदोलनाचा इतिहासच सादर केला आहे.

### (२) सात्त्विकतेवर साम्राज्यवादी संहारकांची आक्रमणे :–

रामकथेच्या निमित्ताने परकीय आक्रमणांमुळे मंदिरे उद्‌ध्वस्त झाल्याची चर्चा जेव्हा होते; तेव्हा–तेव्हा अजिंक्य अयोध्या आणि अजिंक्य श्रीराम यांच्याविषयी आत्माभिमानाने आणि राष्ट्रीय अभिनिवेशाने चर्चा होते.

माणसांच्या ठायी दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती असते. दैवी संपत्ती सात्त्विक असते तर आसुरी संपत्ती आत्यंतिक स्वार्थी असते. आसुरी संपत्तीचा विजय हा तात्कालिक स्वरूपाचा आणि विनाशकारी असतो. आसुरी संपत्ती ही अहंकारवश होऊन स्वतःच स्वतःचा शत्रू बनते तर दैवी संपत्ती सात्त्विकतेने सत्यनिष्ठेने प्रेमाने आणि कारुण्याने विश्वाला आपलेसे करून यशस्वी होते. भारतीय परंपरेत एवढेच नव्हे तर वैश्विक पातळीवर ‘सत्यमेव जयते’ हा सिद्धान्त नेहमीच खरा ठरत आला आहे.

सत्य या तत्त्वाला कोणतीही शक्ती असत्य ठरवू शकत नाही. एकवचनी, एकबाणी, धनुर्धारी प्रभू रामचंद्र हे मूर्तिमंत सत्य होते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत ते केवळ दाशरथी राम म्हणून ओळखले जात नाहीत; तर तत्त्व म्हणून ओळखले जातात. ‘राम’ असेल तर कोणत्याही गोष्टीत अर्थ असतो. ‘राम’ नसेल तर ती गोष्ट निरर्थक ठरते.

इक्ष्वाकू अर्थात रघू वंशाची परंपराच अशी आहे की, ‘प्राण जाये पर वचन न जाये’. सनातन हिंदूधर्मराष्ट्र हे अशा रामतत्त्वस्वरूप सत्य, प्रेम, करुणा या संवेदनेने वैश्विक भूमिकेतून विश्वबंधुत्वाची भावना जपत उभे होते; मनामनात उभे आहे आणि याच तत्त्वाने ते पुनरुत्थापित होऊन रामराज्य म्हणून अवतरेल

आणि विश्वगुरुत्व सिद्ध करील, असे विवेचन मोठ्या आत्मविश्वासाने पू. स्वामी करतात.

साम्राज्यवादी संहारकांनी आक्रमणे केली, परंतु ती आक्रमणे स्वतःत राम असलेल्या पुरुषार्थपूर्ण राष्ट्रयोद्ध्यांनी, समूहांनी परतवून लावली.

रामजन्मभूमी, कृष्णजन्मभूमी आणि विश्वेश्वर काशिनाथ ही भारतीय परंपरेची सांस्कृतिक बलस्थाने आहेत. सत्य, प्रेम, करुणात्मक पुरुषार्थाची मनामनात स्फुरणे घडविणारी ही स्थाने आहेत. ही नेस्तनाबूत केली की सनातन हिंदूधर्मराष्ट्र लयाला जाईल, अशा अहमहमिकेने वेळोवेळी आक्रमणे झाली.

रामभक्तांनी अस्मितापूर्ण पुरुषार्थाने त्यावर मातही केली. प्रसंगी बलिदाने झाली परंतु अयोध्येतील अयुद्ध तत्त्व अर्थात अजिंक्त्व आणि रामतत्त्व लयाला जाऊ लागले नाही जाणार नाही; कारण सत्य हेच शाश्वत असते हे रामजन्मभूमि विषयक इतिहासाने दाखवून दिले आहे.

## (३) आक्रमणे निस्तेज करून परतविण्याचा इतिहास :–

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज अर्थात किशोरजी व्यास, हे आक्रमणे प्रभावशून्य करणाऱ्या घटनांचा इतिहास सांगतात. त्यामुळे सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या अस्मितेचे जागरण घडते.

इ.स.पू. १५० मध्ये अयोध्येवर पहिले विदेशी आक्रमण झाले. ते यवन राजा मिनँडर याचे होते. यवन म्हणजे ग्रीक. त्या वेळेपर्यंत मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्म अस्तित्त्वातच नव्हते. बौद्ध मताचा प्रभाव उत्तर भारतात खूप होता. मंदिराच्या रूपाने असलेले सांस्कृतिक ऐक्य नष्ट केले तर आपण यशस्वी होऊ असे मिनँडरलाही वाटत होते. परंतु मनामनातील राम नष्ट करण्याची शक्ती अद्याप कोणाच्याही अंगात निर्माण झालेली नाही. केवळ तीन महिन्यांतच शुंग वंशीय राजा द्युमत्सेन याने कौशंबी ही मिनँडरची राजधानी जिंकून त्याला भारताबाहेर पाठविले.

इ.स.पू. १०० च्या सुमारास विक्रमादित्याच्या काळात शकांचा विध्वंस करणाऱ्या विक्रमादित्याने अयोध्येला वैभव प्राप्त करून देऊन राममंदिराचा जीर्णोद्धार तर केलाच. राममंदिराच्या अवतीभोवती ३६० मंदिरे उभी राहिली. अयोध्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक, सांस्कृतिक राजधानी बनली.

तेव्हापासून गझनीचा मूर्तिभंजक भारतात खोलवर घुमला. त्याने अनेक

स्वाऱ्या करून मंदिरे उद्ध्वस्त केली. त्याच्या बरोबरच्या स्वारीतील ज्या मसूर सालारने सोमनाथची मूर्ती फोडली, त्याची नजर अयोध्येकडे वळली. त्याने शरयू तीरावरील कुबेरनाथाचे मंदिर उद्ध्वस्त केले आणि कनकभवनवर त्याने हात उचलला; परंतु श्रावस्तीचे सम्राट सुहेलदेवांचे नेतृत्वाखाली अनेक हिंदू राजांनी एकत्र येऊन असा काही तडाखा मारला, की त्याला अयोध्येतून माघारच घ्यावी लागली.

त्यानंतर १२५ वर्षांत हिंदुस्थानवर आक्रमण झाले नाही. ते आक्रमण इ.स. १३०० च्या सुमारास अल्लाउद्दीन खिलजीने केले. इ.स. १३२७ मध्ये हरिहर व बुक्क यांना खिलजीने मुसलमान केले होते. त्यांना संकेश्वरचे शंकराचार्य स्वामी विद्यारण्य यांनी परत हिंदू धर्मात घेऊन चक्क राज्य स्थापले. पुरुषार्थ जागवला तर मनातला आणि राज्यातला रामही अबाधित ठेवता येतो, हा इतिहास आहे.

## (४) मूर्तिभंजक धर्मांध मोगल वंशीय बाबर :–

इ.स. १५२६ मध्ये मेवाडचा राजा संग्राम सिंह तथा राणा संग याच्याशी झालेल्या लढाईत बाबरानेच मार खाल्ला; परंतु परतत असताना त्याची नजर तेथे डौलाने उभ्या असलेल्या श्रीराम–मंदिराकडे गेली.

मंदिर उद्ध्वस्त केल्याशिवाय हिंदुस्थान जिंकता येणार नाही, हे त्याने लक्षात घेतले. त्या वेळी साधू श्यामानंद मंदिराची व्यवस्था पाहत होते. ख्वाजा अब्बास मुसा अशिकान व जलाल शहा या दोन फकिरांनी श्यामानंदांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यांनी फंदफितुरी करून बाबराच्या मनात मंदिर पाडून मशीद बांधण्याची ईर्षा उत्पन्न केली. राणा संगाला नाहीसे केल्याशिवाय हे शक्य नाही हे लक्षात घेऊन पूर्ण तयारीनिशी बाबराने राणा संगावर आक्रमण केले. बाबराचा पराभव होत असतानाच राणा संगाचा हत्ती जखमी झाल्यामुळे तो पळू लागला आणि विजयश्री अचानक बाबराकडे वळली. दोन फकिरांच्या आशीर्वादानेच हे घडले असे लक्षात घेऊन बाबराने श्रीराम–मंदिर उद्ध्वस्त करून आपला सेनापती मीर बाँकी याच्यावर ती जबाबदारी सोपविली. श्यामानंदांना मंदिराचा बचाव करणे शक्य नव्हते. श्यामानंदांनी, काळ्या दगडावर कोरलेली मंदिरातील श्रीरामाची सुंदर मूर्ती, शरयूला अर्पण केली. मीर बाँकीने २३ मार्च १५२८ रोजी मंदिर उद्ध्वस्त केले आणि १५२८–२९ च्या दरम्यान मशिदीचे बांधकाम पूर्ण केले.

मूर्तिभंजन करणाऱ्यांना 'गाझी' असा किताब दिला. राणा संगाविरुद्ध जिहाद पुकारल्यानंतर, अल्लाच्या मर्जीने मूर्तिपूजकांच्या मूर्तींचे तुकडे-तुकडे करू, अशी बाबराने प्रतिज्ञा केली. मूर्तिभंजनाचा इतिहास 'तारीखे बाबरी' या बाबराच्या भक्ताने लिहिलेल्या ग्रंथात मूर्तिभंजनाचे पुरावे आढळतात.

अलिकडच्या काळात आपण पुरावे गोळा करायला लागल्यानंतर, या ग्रंथातील २/४/१५२८ ते १८/९/१५२८ या काळातील दैनंदिनीची पाने कोणी गायब केली होती, असे लक्षात आले. कदाचित बाबराचा मुलगा हुमायून देशोधडीला लागल्यानंतर ही पाने नष्ट केली असावीत. मीर बाँकीने मंदिर उद्ध्वस्त करून बांधलेल्या मशिदीच्या वास्तूत काळ्या दगडाचे चौदा कोरीव खांब आहेत. असेच खांब ख्वाजा मुसा अशिकन या फकिराच्या कबरीच्या बांधकामातही वापरले आहेत.

मीर बाँकी हे काम करीत असताना, अयोध्येच्या रक्षणासाठी अक्षरशः हजारो लोकांनी आपले रक्त सांडले. अनेक महिने हा संघर्ष चालू होता. इतिहासकारांच्या नोंदींप्रमाणे १,७१,००० हिंदू वीरांनी बलिदान केले. या बलिदानामुळेच हिंदूंमधील राम जागृत राहिला. मीर बाँकीच्या एका विचित्र निर्धाराचा हा प्रताप होता. अखेर बाबराने हिंदू साधू व मुस्लीम फकिरांची बैठक बोलावली. त्यात त्याने बांधलेल्या मशिदीचे नाव 'सीता की रसोई' असे ठेवायचे व त्याचप्रमाणे मंदिराभोवती प्रदक्षिणेचा मार्ग पूर्ववत कायम ठेवायचा. घुमटाच्या दारात लाकडे लावायची. बाजूला मिनार उभारायचे नाहीत व हिंदू साधूसंतांना त्या वास्तूत पूजाअर्चा करायची परवानगी द्यायची; एवढ्या गोष्टी ठरल्या. 'तुजुक बाबरी' या बाबराच्या आत्मवृत्तात हा प्रसंग स्वतः बाबराने वर्णन केला आहे. याचा अर्थ मंदिर-रक्षणाचा लढा चालूच राहिला.

रामभक्त देवीदिन पांडे या 'सनेथी' गावच्या नेत्याकडे नेतृत्त्व आले. ७०,००० फौज उभी राहिली. ३ जून १५२८ रोजी देवीजींच्या फौजेने मीर बाँकीच्या फौजेवर झडप घातली. परंतु मीर बाँकीच्या गोळीला देवीदिन पांडे बळी पडला. ७०,००० युवकांचे बलिदान झाले.

त्यानंतर हंसवर रियासतीतील राणा रणविजय व त्याची पत्नी जयराज कुमारी यांनी प्रयत्न केले. राणा रणविजय मारला गेला. या लढ्यात स्वामी महेश्वरानंद व अनेक आखाड्यांच्या साधूसंतांनी हातात शस्त्रे घेतली. कारण

नागा, गोरक्ष, निर्मोही आणि निर्वाणी अशा सांप्रदायिक आखाड्यांचे कामच मंदिरावरील आक्रमणांविरुद्ध लढणे हे होते.

इ.स. १५२९ साली राणा रणविजय मीरच्या छावणीवर तुटून पडला आणि त्याने रामजन्मभूमी जिंकून घेतली; परंतु पंधराच दिवसांनी दिल्लीहून आलेल्या फौजेपुढे त्याचा टिकाव लागला नाही. असे राणा विजयला हौतात्म्य पत्करावे लागले तरी जयराज कुमारीने लढा चालू ठेवला. तिने दहा मोठ्या लढाया केल्या. मशिदीवर ताबा मिळविला, पण अखेर राणी रणांगणात मरण पावली आणि महेश्वरानंदही रणात कामी आले.

अकबर बादशहाच्या कारकिर्दीत वीस वेळा रामजन्मभूमिमुक्तीचे प्रयत्न झाले. धूर्त अकबराने मशिदीत एक चबुतरा बांधून, त्यावर मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यास परवानगी दिली आणि हिंदूंनी तेथे पूजापाठ करावा व कोणीही तेथे अडथळा आणू नये असा फतवाही काढला. ही तडजोड शहाजहानच्या कारकिर्दीपर्यंत चालू होती.

असा सगळा इतिहास डॉ. गिरीश आफळे यांच्या 'बखर अयोध्येची'मध्ये पाहावयास मिळतो.

## (५) संत समर्थ रामदास स्वामीशिष्य बाबा वैष्णवदास यांचे कार्य :–

श्री रामदास स्वामींचे शिष्यवर बाबा वैष्णवदास यांनी शरयूच्या अहिल्या घाटावर परशुराम मठ स्थापन केला होता. समर्थांचे मठाधीश महंत संत हे मारुतीची मंदिरे स्थापन करून राष्ट्रासाठी, धर्मासाठी आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी प्रसंगी बलिदानही करीत.

औरंगजेबाने हिंदूंची अस्मिता ठेचून टाकण्यासाठी, मोठी सेना रामजन्मभूमी काबीज करण्यासाठी पाठविली. बाबा वैष्णवदासांना हे कळताच, जवळपास निम्म्या सैन्याला शरयू ओलांडताना बाणांच्या जबरदस्त वर्षावाने जलसमाधी देवविली आणि औरंगजेबाचा हल्ला निष्फळ केला. अशाच प्रकारे बाबा वैष्णवदासांच्या चिमटाधारी साधूंनी तीन वेळा औरंगजेबाच्या सैन्याचे पारिपत्य केले. हे अलमगिरनाम्यात औरंगजेबाने लिहून ठेवले आहे.

इ.स. १६६४ साली औरंगजेब स्वतः चालून गेला. निकराचे युद्ध झाले. १०,००० हिंदू शहिदांना तुडवीत त्याने राममंदिर काबीज केले. राम चबुतरा खणून काढला. असे झाले तरी रामनवमीची यात्रा त्याला बंद करता आली नाही.

हिंदूंनी उद्ध्वस्त चबुतऱ्यावरच मंदिर बांधण्याचा नवा संकल्प केला; परंतु औरंगजेबाने पुढे इ,स. १६६९ मध्ये काशी विश्वेश्वराचे मंदिर तोडून, त्याच मंदिराच्या पायावर ग्यानवापी मशीद उभारली. तर १३ जानेवारी १६७० मध्ये मथुरेचे कृष्णमंदिर उद्ध्वस्त करून त्या जागी इदगाह बांधले.

मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकारणाचा एक अविभाज्य भाग म्हणजे अयोध्या, मथुरा, काशी ही तीर्थक्षेत्रे मुक्त करणे हाही होता. इ.स. १७६३ ते १८१४ या काळात हिंदूंनी मंदिरांवर ताबा मिळविण्यासाठी पाच आक्रमणे केली.

या आक्रमणांना कंटाळून नबाब सआदत अलीने हिंदूंना पूजेची आणि मुसलमानांना नमाज पडण्याची अनुमती दिली. मंदिरासाठी संघर्ष चालूच राहिला.

इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात हिंदू व मुसलमान एकत्रितपणे इंग्रजांशी लढले. एकत्रितपणे लढताना बादशहा जफरने रामजन्मभूमी हिंदूंना परत करण्याचा निर्णय घेतला. इंग्रजांना ही गोष्ट 'फोडा आणि झोडा' नीतीच्या दृष्टीने धोक्याची वाटली.

## (६) श्रीरामजन्मभूमिमंदिरासाठी ७९ लढाया :–

इ.स. १८५७ पर्यंत म्हणजे पहिल्या स्वातंत्र्ययुद्धापर्यंत ७९ लढाया झाल्या. बाबराच्या सेनापती मीर बाकीने २ लढाया करून, मंदिर अधेमुर्धे पाडून, जी काही अर्धवट मशीद बांधली; त्यानंतर खुद्द बाबराच्या काळातच ४ लढाया झाल्या. हुमायूनच्या काळात १०, अकबराच्या काळात २०, औरंगजेबाच्या काळात ३०, नबाब सआदत अलीच्या काळीत ५, नबाब नसिरुद्दीनच्या काळात ३, नबाब वाजिद अली शाहच्या काळात २, अशा एकूण ७६ लढाया झाल्या. बाबरपूर्वकालीन मसूद सालारच्या काळात २ लढाया व मिन्यांडरच्या काळातील १ लढाई हिशेबात धरली तर एकूण ७९ लढाया या श्रीरामजन्मभूमि मंदिरासाठी आत्तापर्यंत झाल्या आहेत.

## रामजन्मभूमीसाठी न्यायालयीन लढा :–

२५ मे १८८५ रोजी महंत रघुवरदास यांनी फैजाबादच्या जिल्हा न्यायालयात खटला दाखल करून रामजन्मभूमीवर मंदिर बांधण्याची परवानगी मागितली. तेव्हापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या कारकीर्दीतील ९ नोव्हेंबर २०१९ या

दिवशी रामजन्मभूमीविषयी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालापर्यंत ठोस पुराव्यांसह, न्यायालयीन लढाया सुरूच होत्या.

शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या पाच सदस्यीय पीठाने अयोध्या-बाबरी प्रकरणातील वादग्रस्त जागा रामलल्लाचीच असल्याचा निर्णय दिला. मुस्लीम पक्षकारांना पर्यायी जागा मिळणार असे सांगितले आणि न्यायालयीन लढायांना पूर्णविराम मिळाला.

वादग्रस्त जागी राममंदिर उभारण्याची योजना आखण्याचे आदेशही मिळाले. केंद्राने यात लक्ष घालून मंदिराची उभारणी करावी. येत्या तीन महिन्यांत मंदिराचे उभारणीचे काम सुरू करावे; असेही आदेश देण्यात आले आणि अयोध्यावादावर पडदा पडला. ट्रस्टची स्थापना करण्याच्या हालचाली केंद्राने सुरू केल्या.

**प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा श्रीरामजन्मभूमिमुक्ति-आंदोलनात सुरुवातीपासूनच हिरिरीने सहभाग :-**

पहिल्या एकात्मता रथयात्रेपासून मोठ्या प्रमाणावर सुरू झालेल्या जनआंदोलनांमध्ये पू. स्वामीजी संघटनात्मक पातळीवर आणि प्रचारात्मक पातळीवर सहभागी होते. देशभरात आणि विशेषतः महाराष्ट्रात भागवत-कथा, श्रीराम-कथा, महाभारत-कथा, देवीभागवत-कथा, कृष्णकथा, दासबोध, भगवद्‌गीता आणि योगवासिष्ठ यावरील भाष्ये या ज्ञानयज्ञाच्या निमित्ताने पू. स्वामी अयोध्या, काशी आणि मथुरा यांच्या मुक्तीसाठी जनजागृती करीत होते.

२६ मार्च १९८५ रोजी रामजन्मभूमि-मुक्तियज्ञ समितीची बैठक झाली. त्यात ८ मार्च १९८६ पर्यंत शासनाने कुलुपे तोडावीत अन्यथा हिंदू कुलुपे तोडून मंदिरात प्रवेश करतील असा इशारा देण्यात आला.

शहाबानो प्रकरणात, ताला खोलो आंदोलन आणि शिलान्यास हे एकापाठोपाठ घडलेले प्रसंग, महत्त्वाचे अध्याय ठरले आणि १ फेब्रुवारी १९८६ रोजी न्यायालयाचा निकाल हिंदूंच्या बाजूने आला. १ फेब्रुवारी १९८६ रोजी कुलूपे उघडली गेली. पण यानंतर मुस्लिमांनी देशभरात हिंदू मंदिरे तोडण्याची मोहीमच आखली. तथाकथित धर्मनिरपेक्षवाद्यांनी या गोष्टीला फारशी किंमत दिली नाही.

२८ फेब्रुवारी १९८७ ते ९ मार्च १९८७ या दरम्यान भारताच्या सर्व प्रांतांतून

साधुसंतांची हरिद्वार ते अमृतसर सद्भावना-यात्रा, विश्व हिंदू परिषदेने आयोजित केली. त्यात महाराष्ट्रातून वारकऱ्यांची एक 'नामदेव दिंडी'ही गेली होती. कुलुपे उघडल्यानंतर विश्व हिंदू परिषदेच्या वतीने, भारताच्या खेड्याखेड्यातून राम-जानकी रथयात्रा काढल्या गेल्या.

या रथयात्रांमध्ये श्रीराम-जानकी व हनुमान, त्याबरोबर भारतमाता यांच्या मूर्ती अथवा तसबिरी असत. देशभरात सुमारे २०० रथयात्रा निघाल्या. महाराष्ट्रातील रथयात्रांमध्ये १,५०,००० नागरिक सामील झाले होते. ह्या काळात मुस्लिमांच्याही प्रतिक्रियात्मक हालचाली सुरूच होत्या.

## श्री क्षेत्र आळंदी येथे वि.हिं.प.तर्फे धर्मसंमेलन :-

महाराष्ट्रातील संघटनकार्याच्या दृष्टीने आळंदी येथील धर्मसंमेलन अतिशय महत्त्वाचे ठरले. विश्व हिंदू परिषद आपला काटेरी मार्ग निर्धाराने आक्रमत होती. २५ डिसेंबर ते २७ डिसेंबर १९८७ दरम्यान, श्री क्षेत्र आळंदी येथे वि.हिं.प.तर्फे धर्मसंमेलन भरविण्यात आले. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. संमेलनात धुंडामहाराजांनी अतिशय समयोचित व स्फूर्तिप्रद भाषण केले. ''कंटकाचे निर्दालन हेच खरे संतकार्य आहे. कंटकांच्या निर्दालनालाही दयाच म्हणतात. *'दया तिचे नाव भूतांचे पालन । आणि निर्दालन कंटकांचे ।'* म्हणूनच तुकाराम महाराज, *'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी घालू काठी ।'*, अशी कठोर भाषा बोलतात. मग समर्थांसारखा धर्मरक्षक संत, *'खटासी खट आणि उद्धटासी उद्धट'* अशी भाषा वापरेल, त्यात नवल ते काय? ज्ञानेश्वरीतच श्री ज्ञानदेवांनी म्हटले आहे,

**'तरी स्वधर्मु एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे ।**
**मग तरिजेल काय पाहे । कृपाळूपणे ।**
**अर्जुना तुझे चित्त । जरी आले द्रवीभूत ।**
**तरी ते अनुचित । संग्रामसमयी ।'**

आम्ही केवळ दयाच शिकावी आणि धर्मरक्षण शिकू नये, असे कुणी म्हणत असेल, तर त्याच्या या म्हणण्यात काही तरी कावा असला पाहिजे. श्री तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या, *''वाघे उपदेशिला कोल्हा । सुखे खाऊ द्यावे मला ।''* या गोष्टीतल्यासारखा तो प्रकार होईल.''

या संमेलनात, सर्व आचार्यांनी, स्वामी विश्वेश तीर्थ यांनी सांगितलेल्या

समाजधर्माच्या चतुःसूत्रीचा प्रचार व आचार करावा, असे ठरले. ती चतुःसूत्री अशी– *हिंदवः सोदराः सर्वे । न हिंदुः पतितो भवेत् । मम दीक्षा हिंदुरक्षा । मम मंत्र समानता ।।*

१) सर्व हिंदू बंधू आहेत. २) कोणताही हिंदू हीन (पतित) असणार नाही. ३) हिंदूरक्षा हीच आपली दीक्षा. व ४) समानता हाच माझा मंत्र; अशी ही चतुःसूत्री होती. या संमेलनात, हिंदूंनी हिंदूधर्मराष्ट्र उभे करण्यासाठी ठामपणाने उभे राहिले पाहिजे, यावर एकमत झाले.

**रामायण संमेलनातील विश्व हिंदू परिषदेचा विश्वसंचार :–**

विश्व हिंदू परिषदेने अयोध्येत १९८४ साली पाहिले रामायण संमेलन घडविले. दुसरे संमेलन थायलंडची प्रसिद्ध राजधानी अजुध्या येथे झाले. तर तिसरे आंतरराष्ट्रीय रामायण संमेलन पश्चिम कॅनडाची राजधानी टोरँटो येथे झाले. चौथे आंतरराष्ट्रीय रामायण संमेलन २० ते २२ डिसेंबर १९८८ मध्ये दिल्लीतील विज्ञान भवनात झाले. यात रशिया, अमेरिका, कॅनडा, मेक्सिको, त्रिनिदाद, सुरिनाम, गियाना, ब्रिटन, हॉलंड, चीन, जर्मनी, बेल्जियम, झेकोस्लोव्हाकिया, नेपाळ, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, ब्रह्मदेश, हाँगकाँग, श्रीलंका, कंपुचिया, लाओस इ. देशांतले विद्वान व प्रसिद्ध रामभक्त उपस्थित होते. उद्घाटन समारंभात राष्ट्रपती व्यंकटरामन म्हणाले– ''श्रीराम भारताचेच नव्हे तर अखिल जगाचे दैवत आहे. रामकथा अनंतकाळ टिकणारी आहे. वाल्मिकींनी म्हटले आहे की, जोपर्यंत ही पृथ्वी, सूर्य, पर्वत, नद्या, चंद्र, तारे आदी अस्तित्त्वात असतील, तोपर्यंत श्रीराम विसरले जाणार नाहीत, हे पूर्ण सत्य आहे.''

**श्रीराम–शिलापूजनाचा कार्यक्रम – निर्णायक जनआंदोलन :–**

३०–३१ जानेवारी १९८९ रोजी प्रयागराज येथे तृतीय धर्मसंसदेचे आयोजन व त्यास जोडून १ फेब्रुवारी १९८९ रोजी संत महासंमेलन १,००,००० हून अधिक साधूसंत व भक्तांच्या उपस्थितीत झाले. त्या वेळी घोषणा करण्यात आली, शारदीय नवरात्राच्या पहिल्या दिवशी म्हणजे ३० सप्टेंबर १९८९ रोजी देशातील सर्व गावांमध्ये श्रीराम–शिलापूजनाचा कार्यक्रम होईल आणि ९ नोव्हेंबर १९८९ रोजी रामजन्मभूमीवर राममंदिराचा शिलान्यास केला जाईल. २७–२८ मे रोजी हरिद्वारला अकरा प्रांतांच्या संतांची बैठक झाली. त्यात या नियोजित कार्यक्रमाला पुष्टी देण्यात आली.

२६-२७ ऑगस्ट १९८९ रोजी लंडनजवळील मिल्टनबोल येथे दीडशेहून अधिक देशांतून ८०,००० हिंदूंच्या आंतरराष्ट्रीय संमेलनात श्रीराम-मंदिरासंबंधीचा प्रस्ताव पारित करण्यात आला. मिल्टनबोलचे महापौर शिलापूजनाच्या कार्यक्रमात सामील झाले.

१७ ते २२ सप्टेंबर १९८९ मध्ये १८५० साधूसंतांनी दिल्लीत इंद्रप्रस्थ धर्मयात्रा असा पंचवीस कि.मी. पायी फिरत कार्यक्रम केला. नंतर बोट क्लबवर अतिविशाल मेळाव्यात महामंत्री अशोकजी सिंघल, नृत्यगोपाल दास, उमाभारती, प्रभुदत्त ब्रह्मचारी आणि महंत अवैधनाथ ह्यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात, श्रीराम-मंदिर त्या जागी उभे राहणारच असा निर्धार झाला.

एकट्या महाराष्ट्रात ३० सप्टेंबर १९८९ ला २२,००० ठिकाणी शिलापूजनाचे कार्यक्रम झाले.

१९८९ नोव्हेंबर महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने श्रीराम-शिलापूजनाला परवानगी दिली. बूटासिंग आणि नारायण दत्त तिवारी यांनी धमक्या देण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे तर शिलापूजन आणि शिलान्यास याविषयी ठाम भूमिका घेतली गेली आणि १० नोव्हेंबर १९८९, कार्तिक शुद्ध द्वादशीच्या शुभ मुहूर्तावर महंत अवैधनाथजी यांच्या शुभहस्ते सर्व विधिपूर्वक शिलान्यासाचा कार्यक्रम झाला.

भद्रपीठावर अनुक्रमे पद्म, सिंहासन, तोरणछत्र, कूर्म व चतुर्भुज विष्णू अशा आकृत्या कोरलेल्या नंदा, भद्रा, जया, रिक्ता व पूर्णा अशा पंचशिला स्थापित करून, यथासांग शिलान्यास झाला आणि दुसऱ्याच दिवशी मंदिर निर्माण कारसेवेसाठी नऊ संतांच्या नेतृत्वाखाली मंदिर निर्माणासाठी कारसेवक जातील, असे पत्रही जिल्हाधिकाऱ्यांना दिले. परवानगी नाकारल्याने पुढील कार्यक्रम आखण्यासाठी २६-२७ जानेवारी १९९० रोजी संतसंमेलन घ्यायचे ठरविले. अर्थातच यावर देशात भरपूर भवती न् भवती झाली.

## राष्ट्रनेता अडवाणींची रथयात्रा :-

ऑगस्ट १९९० मध्ये देशभरातून अयोध्येमध्ये कारसेवक आणण्याची योजना राबविण्यासाठी समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यासाठी १ सप्टेंबर १९९० रोजी अरणी मंथनातून अग्नी निर्माण करून 'श्रीराम ज्योती' प्रज्वलित करण्यात आली. विश्व हिंदू परिषदेचा आणि मंदिर-समितीचा हा डाव हाणून पाडण्यासाठी,

व्ही. पी. सिंगांनी युक्त्या सुरू केल्या; परंतु १२ सप्टेंबर १९९० रोजी सोमनाथ ते अयोध्या अशी रथयात्रा २५ सप्टेंबर १९९० ला निघेल व ती अयोध्येमध्ये ३० ऑक्टोबर १९९० रोजी पोहोचून कारसेवेत भाग घेईल, असे सर्वांत मोठे जनआंदोलन होईल, अशी घोषणा राष्ट्रनेता लालकृष्ण अडवाणी यांनी केली.

गुजरात राज्यातील सोमनाथहून घोषणांच्या जल्लोषात रथयात्रा निघाली. महाराष्ट्रात अडीच लाखाची सभा सोलापूरला झाली. असा प्रचंड प्रतिसाद रथयात्रेला मिळत गेला.

श्री. अडवाणींच्या या रथयात्रेने देशात हिंदूंच्या भावना इतक्या चेतावल्या, की बिहारमध्ये धनबाद येथे मुख्यमंत्री लालुप्रसाद यादव यांनी अडवाणींना अटक करण्याचा हुकूम सोडल्यावर, तोंडी हुकूमानुसार अटक करण्यात येणार नाही, असे तत्कालीन अधिकाऱ्याने सांगितले. अखेर समस्तीपूर येथे सर्व तयारीनिशी सर्किट हाउसमध्ये अडवाणींना अटक झाल्याचे सांगण्यात आले.

त्यांच्याबरोबर रा. स्व. संघाचे प्रा. राजेन्द्र सिंह, अटलबिहारी वाजपेयी, विष्णू हरी दालमिया, गुमनलाल लोढा, महंत अवैधनाथ, स्वामी चिन्मयानंद यांनाही अटक करण्यात आली. या अटकेनिमित्त २४ ऑक्टोबर १९९० ला अभूतपूर्व असा 'भारत बंद'चा कार्यक्रम झाला. मा. अडवाणीजींनी व्ही. पी. सिंग सरकारचा, भाजपाचा पाठिंबा काढून घेतला.

**रामजन्मभूमीसाठी ज्ञानेश्वरी पारायण :–**

२५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट १९९२ दरम्यान अयोध्येत ज्ञानेश्वरी पारायण, हरिनाम पठण, कीर्तन सप्ताह साजरा झाला. त्यामध्ये महाराष्ट्रातील १०० वारकरी मंडळांचे अध्यक्ष, विविध फडांचे प्रमुख, याखेरीज २ हजार ३०० वारकरी हजर होते. ज्ञानेश्वरी पारायण व तुकाराम महाराजांच्या गाथेवरील प्रवचने करून, अयोध्येत चालू असलेल्या सर्वदेव अनुष्ठानात त्यांनी भाग घेतला. वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. निवृत्ती महाराज मनसुख, भास्करगिरी महाराज, रामदास महाराज कैकाडी, विठ्ठल महाराज चौधरी, रामेश्वर शास्त्री, प्रल्हाद महाराज साठे, विठ्ठलराव भोकसे आदी देहू, आळंदी, पंढरपूर, सासवड, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पैठण इत्यादींनी यात प्रामुख्याने भाग घेतला. महाराष्ट्र वि.हिं.प.चे उपाध्यक्ष ह.भ.प. भानुदासजी तुपे व रामभाऊ बगाडे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमाचा प्रारंभ महामंत्री अशोकजी सिंघल यांनी केला. शेवटी १२५

कीर्तनकारांची बैठक होऊन ठराव पारित झाला की, श्रीरामजन्मभूमी परिसरात कोठेही मशीद नाही, ते मंदिरच आहे.

**कारसेवा कार्यक्रमाला उधाण :–**

२७–२८ सप्टेंबर १९९२ रोजी नंदीग्राम येथे १२,००० श्रीराम पादुकांचे पूजन, एका समारंभात झाले. तर ६ ऑक्टोबर १९९२ ते दीपावलीपर्यंत या पादुका भारतातील हजारो गावांत पूजनासाठी फिरविण्यात आल्या. पुढची कारसेवा ठरविण्यासाठी ५००० संतमहंतांची पाचवी धर्मसंसद नवी दिल्ली येथे ३०–३१ ऑक्टोबर १९९२ रोजी करण्याचे ठरले. ३० ऑक्टोबर या दिवशी उत्तर प्रदेशच्या मुलायमसिंग सरकारने कारसेवकांवर गोळीबार करवून, अनेक कारसेवकांना ठार मारले होते.

याचे स्मरण म्हणून ३० ऑक्टोबर १९९२ वि.हिं.प.ने देशवासीयांना 'शहीद दिन' पाळण्याचे आवाहन केले. या पाचव्या धर्मसंसदेत, ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवा केली जाईल, असे घोषित करण्यात आले. या कार्यक्रमाला न्यायालयामार्फत अडथळे निर्माण करण्याचा भरपूर प्रयत्न करण्यात आला.

२८ नोव्हेंबर १९९२ रोजी उत्तर प्रदेशच्या कल्याणसिंग सरकारने, ६ डिसेंबरपासून सुरू होणारी कारसेवा प्रतिकात्मक राहील, असे हमीपत्र न्यायालयाला दिले; तर ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी १९९० मधील अपूर्ण राहिलेली रथयात्रा १ डिसेंबर १९९२ या दिवशी वाराणसीहून सुरू होईल आणि पुढे अयोध्येकडे कूच करेल असे सांगून या संघर्षाची परिणती कशात होईल हे सांगता येणार नाही. कल्याणसिंह सरकारच्या बरखास्तीसह सर्व प्रकारच्या आह्वानांना तोंड देण्यास आम्ही तयार आहोत, असे पत्रकार परिषदेत जाहीर केले.

**कारसेवकांची निर्णायक कारसेवा :–**

कारसेवकांच्या लोंढ्यांनी अयोध्यानगरी ओसंडून वाहू लागली.

**''दुनिया की कोई ताकद राममंदिर को रोक नहीं सकती ।''**
**''बंदुक से हम न डरेंगे, मौत हमारी हमजोली ।**
**जान हथेली पर ले आयी, रामभक्तों की यह टोली ।''**
**''रामका दरबार ही हमारा कोर्ट**
**और धर्मसंसद ही हमारी सरकार''**
**''खून देंगे प्राण देंगे ।**

**मंदिर का निर्माण करेंगे ।।**''

''**हिंदू हितकी बात करेगा, वही देशपर राज करेगा**''

''**टुटेगी झुकेगी, दिल्ली सरकार झुकेगी**''

''**पुंडलिक वरदा हरी विठ्ठल**'' भजन म्हणणारे महाराष्ट्रीयन वारकरी सर्वांचे चित्त वेधून घेत होते.

६ डिसेंबरला कारसेवा सुरू करण्याचा १२.१५वा.चा मुहूर्त भारतभरातील मंदिरांमध्ये घंटानाद आणि शंखनाद करून घोषित झाला. १२.२६ वा. अयोध्येतील सर्व मंदिरांमध्ये शंखध्वनी, आरत्या यांनी वातावरण दणाणून सोडले. कारसेवा सुरू झाली होती.

संपूर्ण २.७७ एकरावर कारसेवकांचा ताबा प्रस्थापित झाला होता. एका बाजूला व्यासपीठावरून ओजस्वी भाषणे होत होती आणि २.४५ वा. मोठा आवाज करीत, धुराळ्याचा प्रचंड लोट आकाशाला भिडला. ''जय श्रीराम'', ''हर हर महादेव'', ''जय बजरंग बली की जय'', ''एक धक्का और दो, बाबरी मस्जिद तोड दो'', या नाऱ्यांनी आसमंत दणाणून निघालं. ४.४५ वाजता तो शेवटचा धक्का बसला. धरणीकंपासारखा आवाज झाला. कित्येक गज उंच हवेत धुरळा उडाला. ''सीयावर रामचंद्र की जय'', ''जय श्रीराम'', ''रामलला हम आये है, मंदिर वहीं बनाएंगे''... घोषणांनी आसमंत दुमदुमलं.

पहिले दोन घुमट डोळ्यासमोरच पाडले गेले असल्यामुळे, धुरळा खाली बसण्यापूर्वीच नुसत्या आवाजावरूनच सर्वांनी ओळखलं की, मधला व मुख्य घुमटही जमीनदोस्त झाला आहे! मुद्दाम कारसेवेस आलेल्या शहीद कोठारी बंधूंच्या मातापित्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहत होता. कारसेवकांनी मोकळ्या मनाने कृतज्ञतेच्या घोषणा दिल्या. ''कल्याणसिंग ने कमाल किया ! बाबरी ढाचा ध्वस्त किया !'' त्याचबरोबर कल्याणसिंगांनी पोलिसांना गोळीबार न करण्याचे आदेश देऊन कारसेवकांना अभय दिलं व स्वतःचं सिंहासनही धोक्यात घातलं. खरोखरच संध्याकाळी ५.१५ वाजता कल्याणसिंगांनी राजीनामा दिला. आपल्या राज्यावर तीर्थ सोडलं.

## राष्ट्रनेता पंतप्रधान श्रीमान नरेंद्र मोदी सरकारला श्रीराम मंदिर उभारण्याचा आदेश :–

विवादित बाबरी ढाचा श्रीराम–कारसेवकांनी जमीनदोस्त केला. आता

'मंदिर वहीं बनाएंगे', याची खातरजमा झाली. मात्र जमीन अधिग्रहणाचे वाद न्यायालयात या ना त्या कारणाने प्रलंबित ठेवण्यात विरोधकांना यश आले. हिंदू-मुस्लीम परस्पर चर्चेने, सामंजस्याने मंदिर उभे राहावे असा धर्मसंसद, विश्व हिंदू परिषद आणि सरकार यांचा प्रयत्न सतत विफल होत राहिला. २०१४ मध्ये राष्ट्रनेता, कारसेवक श्री. नरेंद्र मोदी ह्यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण बहुमताचे केंद्र सरकार सिंहासनाधिष्ठित झाले. भारतमातेच्या आणि रामभक्तांच्या, राष्ट्रभक्तांच्या अपेक्षा उंचावल्या.

विश्वासाने, श्रद्धेने, सबुरीने तरी उत्कटतेने श्रीराम मंदिर उभारण्याची प्रतीक्षा देशवासी करीत होते. पाच वर्षे निघून गेली. श्री. मोदीजींचे शासन पूर्वीपेक्षाही अधिक बहुमताने २०१९ मध्ये सत्ताधीश झाले.

प्रभू रामचंद्रांनी आपल्या निस्सीम भक्तांची तपश्चर्या मान्य केली. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी भारताचे सरन्यायाधीश गोगोई यांनी भारत सरकारला, श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास संघटित करून अयोध्येतील राममंदिराचे बांधकाम करण्याची व्यवस्था करण्याचे आदेश दिले. या ट्रस्टला विवादित २.७७ एकर जमीन तर देण्यात आलीच; त्याचबरोबर १९९३ च्या अयोध्या कायद्यानुसार अधिग्रहित केलेली ६७,७०३ एकर जमीन देण्यात आली. न्यासाचे स्वरूप निश्चित करून देण्यात आले.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी ५ फेब्रुवारी २०२० रोजी लोकसभेत न्यासाच्या स्थापनेची घोषणा केली. १९ फेब्रुवारी २०२० रोजी न्यासाने महंत नृत्यगोपालदास यांची चेअरमनपदी नियुक्ती केली. या बैठकीनंतर पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांना न्यासाचे कोषाध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. धर्मसंसद आणि देशभरात आनंदाची लहर उमटली.

## राष्ट्रमंदिरासाठी निधिसंकलन :-

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि, श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष झाले. जबाबदारी मोठी. विश्वाचे लक्ष राममंदिराकडे लागलेले. तीर्थक्षेत्र विकासाचा आराखडा अपेक्षाप्रमाणेच सतत वर्धिष्णु! मंदिराचे निर्माणदेखील पुनर्रचित अतिभव्यतेचे. तीन महिन्यांत बांधकामाला सुरुवात होणे महत्त्वाचे होते. पू. स्वामी गोविंददेव गिरिजींना पत्रकारांनी घेराव घातला. कधी नव्हे तो पत्रकारांच्या चेहेऱ्यावरही उत्साह व आनंद ओसंडून वाहत होता. मंदिराचे अंदाजपत्रक काय?

निधिसंकलन अभियान कशासाठी? आजपर्यंत किती निधिसंकलन झाले? खर्चाचा अंदाज पाहता कोणीही एक धनाढ्य ते काम करू शकेल. त्यासाठी अभियानाची आवश्यकता कोणती? निधिसंकलनाची काही योजना तयार केली आहे का? असे एक ना अनेक प्रश्न पू. स्वामींना विचारले गेले.

स्वामीजी, अतिशय शांत, प्रसन्न मुद्रेने पत्रकारांकडे कौतुकाने पाहत उत्तरे देत होते. पू. स्वामी म्हणाले, ''अयोध्येतील रामलल्लांचे मंदिर हे सर्वसाधारणपणे गावागावात मंदिर असावे, तसे मंदिर नाही. हे मंदिर म्हणजे सनातन भारतीय संस्कृतीचे मंदिर आहे. सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे सतत जागरण करणारे प्रेरक राष्ट्रमंदिर आहे. यासाठी सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या सर्व लोकांचा सहभाग त्यात असला पाहिजे.'' पू. महाराज सांगत होते, ''मी कोषाध्यक्ष होताच मला देणगीचे असे काही प्रस्ताव आले, की त्या देणगीदाराने सांगितले, 'तुमचे प्लॅन इस्टिमेट सगळे माझ्याकडे द्या. मी हे मंदिर बांधून देऊन आपल्या ट्रस्टला समर्पित करतो.' असे प्रस्ताव एक नाही अनेक आले. तन-मन-धनाने ते राष्ट्रीय कार्य करण्यासाठी पुढे सरसावले होते.

त्यांचा मी सन्मान आणि अभिनंदन करतो. त्यांचे सेवाकार्य मी किंवा कोणी नाकारत नाही. जेथे हवे तेथे आम्ही ते घेणारच आहोत; परंतु प्रभू रामांचे चरणी सेवा, समर्पण आणि श्रद्धा यात प्रत्येक माणूस सारख्याच तोलामोलाचा आहे. संपूर्ण मंदिर बांधून देणाऱ्याचा सहभाग आणि मोलमजुरी करून प्रसंगी अर्धपोटी, उपाशी पोटी राहून राष्ट्रमंदिरासाठी दहा रुपये देणाऱ्याची सेवा, सहभाग आणि समर्पण तेवढ्याच मोलाचे आहे.

न्यासाने सर्वांच्या सहभागाची योजना केली आहे. रुपया, दहा रुपये देणाऱ्यालाही सनातन हिंदूधर्मराष्ट्र उभारणीतील सहभागाचा तेवढाच आनंद मिळेल जो अकराशे कोटी रुपये देणाऱ्याला मिळेल. भारतातल्या एवढेच नव्हे तर विश्वात जेथे-जेथे रामभक्त राहतो आहे तेथे-तेथे निधिसंकलन अभियान प्रत्यक्ष मानवी शक्तीच्या स्वरूपात किंवा संगणकीय शक्तीच्या स्वरूपात पोहोचेल. अगदी वाड्यावस्त्यांपर्यंत, रोजगार हमीच्या केंद्रांपर्यंत हे अभियान पोहोचेल.''

''निधिसंकलन अभियान हे केवळ मंदिर उभारणीसाठीच्या निधिसंकलनाचे अभियान नाही; तर धर्मराष्ट्ररक्षणासाठी संघर्षाच्या इतिहासाचे जागरण करण्याचे हे अभियान आहे. हजारो वर्षे आणि मुख्यतः गत पाचसातशे वर्षे, रामजन्मभूमी

उद्ध्वस्त करून; भारतीय राष्ट्रीय अस्मिता तुडविण्यासाठी झालेली, आक्रमणे परतविण्यासाठी, मातृभूमी आणि राष्ट्र यांच्या अभिमानाने प्राणपणाने लढलेल्या राष्ट्रसाधकांच्या संघर्षाच्या इतिहासाचे जागरण यानिमित्ताने होणार आहे. कारण प्रभू रामचंद्र हे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे मान स्वरूपातील राष्ट्रपुरुष होत. या राष्ट्रपुरुषाचे जागरण मनामनात करण्यासाठी प्रत्येक माणसाचा अर्थात आबालवृद्ध स्त्रीपुरुष ह्यांचा जात, पंथ, धर्म, देश या पलीकडे जाऊन, विश्वात्मक राष्ट्रउभारणीसाठी सहभाग नोंदवायचा आहे. प्रभू रामचंद्र ही केवळ भारतीयांची मिरासदारी नाही तर राम हा विश्वपुरुष आहे. त्याचे जागरण करावयाचे आहे.'' - पू. स्वामीजींच्या उत्तरांनी पत्रकार दीपून जात होते. रामराष्ट्राची वैश्विक भूमिका पू. महाराजांच्या मुखातून दिव्यत्वाने प्रसारित होत असते याचा अनुभव पत्रकारांनी घेतला.

**राष्ट्राच्या प्रथम नागरिकापासून निधिसंकलनाला सुरुवात :-**

छोट्या-मोठ्या सर्व प्रकारच्या देणग्या न्यास स्वीकारणार आहे, असे सांगणाऱ्या न्यासाच्या कोषाध्यक्षांनी अर्थात पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराजांनी, भारताचे विद्यमान महामहीम राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांचा धनादेश स्वीकारला. भारताच्या प्रथम नागरिकाचा सहभाग मिळविण्याचा हा ऐतिहासिक आणि रोमांचकारी प्रसंग सर्व भारतीयांनी, आंदोलकांनी, कारसेवकांनी डोळे भरून पाहिला आणि या दिव्य निधिसंकलन अभियानाला सुरुवात झाली.

**राष्ट्रयोगी पू. स्वामींचे घरातून निधिसंकलन :-**

१७ जानेवारी १९२० हा पुण्यमय दिवस नगर जिल्ह्याला म्हणजे पू. स्वामींच्या जन्मभूमीला, घराला सच्चिदानंद स्वरूपाचे दर्शन घडविणारा होता. या दिवशी जिल्ह्याचे ठिकाण नगर, पू. स्वामींचे जन्मगाव बेलापूर अर्थात श्रीरामपूर आणि पू. स्वामींचे कथाज्ञानयज्ञ आणि गीता परिवार फुलविणारे शहर संगमनेर येथे निधिसंकलनासाठीच्या बैठका झाल्या. खरे तर बैठकांची आवश्यकताही नव्हती. परंतु बैठकांच्या निमित्ताने या आपल्या घरातून विकसित झालेल्या, स्वरूपाने प्रकटलेल्या राष्ट्रयोग्याच्या वचनामृताचा लाभ घडणार होता. हा लाभ स्नेहाळ परिवार कसा सोडू शकेल? या निमित्ताने एकाच दिवसाच अनेकांच्या हातांनी कोट्यवधींचे निधीसंकलन झाले.

**रामजन्मभूमिपूजन :-**

पू. स्वामींनी सांगितले, ''न्यासाने भूमिपूजनासाठी दोन अतिलाभदायक

महत्त्वाचे मुहूर्त पाठविले होते. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यातील एक लाभदायक मुहूर्त, संरक्षण व्यवस्था भक्कम करण्यासाठी राफेलची सेवा घेण्यासाठी वापरला तर ५ ऑगस्ट २०२० हा मुहूर्त सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या मानचिह्न-उभारणीसाठी अर्थात अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिराचा भूमिपूजन समारंभ करण्यासाठी निवडला. राष्ट्रनेत्याच्या शुभहस्ते होणाऱ्या भूमिपूजन समारंभात पावित्र्य, मांगल्य, निःसंदिग्धता आणि समर्पितता साधण्यासाठी सेवाकार्य करण्याची जबाबदारी पू. स्वामींनी स्वतःवर घेतली आहे, हे सर्व भारतीय, सर्व जग टी.व्ही.च्या माध्यमातून पाहत होते. 'मंदिर वहीं बनाएंगे', या संकल्पाच्या संकल्पपूर्तीचा मुहूर्त शुभ कार्याने संपन्न होत होता. भूमिपूजन आणि पंचशिलान्यास या कार्यक्रम दर्शनाने राष्ट्रभक्तांचे ऊर भरून आले.

**राष्ट्राय स्वाहा! इदं न मम :-**

दिव्य ज्ञान प्राप्त, वेदान्तविद्याविभूषित, वाक्‌यज्ञ यशसाधक, मानद डी. लिट् विभूषित, श्री संत ज्ञानेश्वर पदाश्रित, प्रभू रामचंद्रचरणसमर्पित, ज्ञानयोगी, कर्मयोगी, राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज तथा किशोरजी व्यास, यांच्या 'राष्ट्रयोगी' विभूतिमत्त्वाचा आविष्कार, सतत, 'राष्ट्राय स्वः इदं न मम !' या मंत्रासह, कार्यगौरव करणाऱ्या अनेकानेक पुरस्कारांना गौरवित करीतमहामहीम भारतमातेला परमवैभवाप्रत नेऊन; विश्वगुरू म्हणून विश्वमान्य करण्यासाठीचा, ज्ञानवान कर्मयोग 'प्रतिपच्चंद्रलेखेव' प्रमाणे, आजन्म प्रगमनशीलतेने पुढे-पुढे-पुढे चालूच राहणार!

* *

## ।। तेरा ।।

# प्रकटे युगपरिर्वनाची ब्रह्मवाणी

पौष शुद्ध द्वादशीचे पुण्यपर्व! २२ जानेवारी २०२४ दिनी अवघे विश्व सनातन सांस्कृतिक रामराष्ट्राच्या पुनर्जागरणाचा अमृतानुभव अनुभवत होते. अयोध्या नगरीत, कारसेवकांच्या भावोर्मिंच्या शलाकांतून साकारलेल्या भव्य मंदिरात, रामलल्ला श्री बालकराम प्रतिष्ठित झाले होते. प्राणप्रतिष्ठाविधीचे मुख्य यजमान होते, सनातन सांस्कृतिक भारतीय राष्ट्राच्या पुनरुत्थानाचे, भारतीयांचे स्वप्न साकारण्यासाठी, अहोरात्र तपस्या करणारे, तपस्वी, योगी, राष्ट्रीय स्वयंसेवक, भारताचे प्रधानमंत्री श्रीमान नरेन्द्र मोदी!

प्रतिष्ठापनेनंतरची, सांगतामंत्राक्षद अभिनंदन सभा मंदिराच्या प्राङ्गणात सुरू झाली. भारतातील अवघे रामभक्त, अवघी गात्रे एकवटून, या संजीवन क्षणाचा स्वानुभव साक्षी होण्यासाठी समाधीमग्न झाले होते. विश्वातील रामभक्तांचे नेत्र या क्षणाचे साक्षी होत होते. अभिनंदन सभामंचावर यजमान श्री. प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी मुग्ध प्रसन्न, संकल्पसिद्ध मुद्रेने विराजमान होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मा. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत तृप्तमनस्क मुद्रेने सहभागी होते. राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री राष्ट्रयोगी योगी आदित्यनाथ आणि न्यासाचे विश्वस्त हा आनंदोत्सव संपन्न करीत होते.

न्यासाचे कोषाध्यक्ष, राष्ट्रयोगी प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज संबोधनासाठी उभे राहिले. भावविभोर मुद्रा! पाचशे वर्षांचा संघर्ष, कारसेवकांचे बलिदान आणि भारतीय अस्मितेच्या प्रतिष्ठापनेसाठीची भारतीयांची जिद्द, या विषयीच्या विलक्षण क्लेष आणि विलक्षण संतोष देणाऱ्या उर्मींनी अंतःकरणात दाटी केली होती. न्यासाच्या स्थापनेपासून अथक श्रमानंदात मग्न झालेले प.पू

स्वामी बोलत होते. ''यह केवल एक मंदिर मे एक मूर्ति की प्रतिष्ठा नही है। यह इस देशकी अस्मिता, इस देश का स्वाभिमान, इस देश का आत्मविश्वास, इसकी प्रतिष्ठा है।'' वाणी प्रकट होत होती. ''कारण तो अनेक होते है; लेकीन अनेक कारण मिलते मिलते आखिर वे एक विशिष्ट स्तर तक पहुंच जातें हैं। उस स्तर पर कोई महापुरुष हमे उपलब्ध होता है। उस विभूति कारण युग परिवर्तित हो जाता है। इस प्रकार का परिवर्तन लाने के लिये आपने जीवन को साधना पडता है। इस प्रकार जीवन साधने वाले हमारे इस देश की परंपरा के अनेक महान रत्नो में आज, हमे, लोगों को समय की आवश्यकता, युग की आवश्यकता, सनातन के अंतःकरण की आवश्यकता के रूप में हमारे सन्माननीय प्रधानमंत्रीजी प्राप्त हुए है। यह केवल इस देश का नही, संपूर्ण विश्व का सौभाग्य है की एक ऐसा राजर्षी हमें प्राप्त हुआ।''

प.पू. स्वामींच्या मुखातून अमृतवाणी प्रकट होत होती. ''अंतःकरण कृतज्ञतासे भरा हुआ है। अंतःकरण गदगद होने की अनुभूति होती है। मुझे आश्चर्य हुवा, मुझे वीस दिन पूर्व समाचार मिला, माननीय प्रधानमंत्रीजी को इस प्रतिष्ठा के लिये स्वयं अपने लिये क्या क्या अनुष्ठान करना चाहिये, वह नियमावली मिले। खुद को सिद्ध करने की भावना इस राजऋषी मे थी। वे कर्मणा, मनसा, वाचा व शुद्ध तथा सिद्ध होना चाहते थे। उसका मार्ग तपस्या है। हम लोगो ने महापुरुषोंसे परामर्श किया। मैने नियमावली भेजी थी। इस नियमावली से अधिक व्रतस्तता उन्होंने निभाई। तीन दिन के व्रतस्तता निभाने के बजाय ग्यारा दिनका अनशन किया। विदेश प्रवास टालने को कहा था। यह भी निभाया। ऐसा तपस्वी कोई राष्ट्रीय नेता प्राप्त होना, कोई सामान्य बात नही है। उन्होंने नासिकसे रामेश्वरम तक जा के दिव्य परमाणु प्राप्त करके, पूरी भारत माता के सभी स्थानो जाके दिव्य आत्माओंकी इस कार्यक्रम के लिये निमंत्रण देकर कहा, ''आईये, अयोध्या पधारे और राष्ट्र को महान बनाने का आशीर्वाद दे।''

प.पू. स्वामीजी प्रभू रामलल्ला की प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या यजमानांच्या भाववृत्तीचे वर्णन करीत होते. परमआदरणीय, पूजनीय प्रधानमंत्री मोदींना प्रभू रामलल्लांच्या प्रतिष्ठापनेसाठी सिद्ध व्हायचे होते. संवैधानिक भारतीय राज्याच्या शास्त्याला, विश्वशास्ता रामलल्लांची प्रतिष्ठापना करण्यासाठी यजमानपद सांभाळायचे होते. भारतीय सनातन परंपरेचा अनुसार करणाऱ्या या राजऋषींनी

प.पू. स्वामी गोविंददेवगिरिजी महाराजांकडून परामर्श घ्यावयाचे ठरविले.

राम मंदिर न्यासाची स्थापना करतानाच प.पू. गोविंददेवगिरिजी महाराजांच्या 'राष्ट्रयोगी' म्हणून सिद्ध प्रतिभेचा अधिकार लक्षात घेऊन; त्यांची अतिमहत्त्वाच्या अशा कोषाध्यक्षपदी नियुक्ती मा. प्रधानमंत्री मोदींनी केली होती. आरंभापासून 'रामलल्ला विराजमान' रामजन्मभूमी आंदोलनात हिरिरीने सहभागी होऊन; रामराष्ट्राच्या पुनरुत्थान कार्यात तपस्यारत झालेल्या, प.पू. स्वामींनी सनातन धर्माचे राष्ट्रमंदिर उभारण्यात स्वतःला वाहून घेतले होते. भारतभ्रमण करीत, या राष्ट्रमंदिरासाठी निधी संकलनाच्या निमित्ताने, सनातन भारतीय रामराष्ट्राचे जागरण प.पू. स्वामी करीत होते. सर्वार्थे सिद्ध अशा राष्ट्रयोगी प.पू. गोविंददेवगिरिजी महाराजांकडे, स्वाभाविकपणेच सांगतामंत्राक्षद अभिनंदन सभेमध्ये, अकरा दिवसांच्या उपवासासह कठोर व्रतस्थ राहून, स्वतःला यजमानपदी सिद्ध करण्याची तपश्चर्या करणाऱ्या प्रधानमंत्री नरेन्द्रजी मोदींच्या, व्रताची सांगता करविण्याचे दायित्व आले. श्रीमान नरेन्द्रजींच्या व्रताची सांगता करताना प.पू. गोविंददेवगिरिजींच्या अंतःकरणात, युगांच्या प्रतीक्षेचा गहिवर दाटला होता. छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे स्मरण करीत महाराजांच्या मुखातून शब्द प्रकटले, ''आज हम लोगों को उसी प्रकार के एक महापुरुष प्राप्त हुये है जिनको भगवती जगदम्बाने हिमालय से लौटाते हुए कहा, जावो, तुम्हे भारतमाता की सेवा करनी है।'' टाळ्यांच्या कडकडाटात जनसागरातून जय श्रीरामांचा जयघोष उमटला. प.पू. स्वामींच्या मुखातून, स्वामी समर्थांनी छत्रपतींच्या गौरवासाठी वापरलेले शब्द उमटले ''निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू, अखंड स्थितिचा निर्धारू श्रीमंत योगी! श्रीमंत योगी!'' महाराजांचा ऊर अभिमानाने भरून आला.

प.पू. स्वामींनी आपल्यावर सोपविलेल्या कामाचा उल्लेख करीत विचारले, ''आज मै यहाँ केवल इसलिये खडा हूँ इतने सारे तपस्या के पश्चात, इन सारे महात्माओं की अनुमती लेकर के और उनके आशीर्वाद लेकर के उनका ये तप पूर्ण करने के लिये, उसके सांगता करने के लिये, उनको चरणामृत दिया जा रहा है, आपकी सहमती हो तो आप सब ॐकार का घोष करके मुझे सहमती दे।'' लोकसागरातून ॐकार घोष निनादला. प.पू. स्वामींनी प.पू. प्रधानमंत्र्यांना चरणतीर्थ देण्यासाठी हात ओढवला. प्रधानमंत्री मोदींनी चरणतीर्थ त्यांच्या मुखी

प्रेषित करण्याची विनंती केली. प.पू. स्वामींना गलबलले. त्यांच्या ठायी अवघ्या अवकाशमायेचे मातृत्व संचारले. एखाद्या लहानग्या पक्षीपिलाने आपली चोच विकसित करीत माऊलीच्या चोचीतून दाणापाणी घेत, पंखात बळ देण्याचे वरदान मागावे, तसे श्रद्धेय नरेन्द्रजींनी मुख ओढवले. प.पू. स्वामी त्यांच्या मुखी माऊलीच्या अपार मायेने प्रभूरामचरणतीर्थ प्रेषित करीत होते.

अवघा आसमंत भारावला होता. युगायुगांच्या अरिष्टांचा प्रलय होत आहे असे वाटत होते. दुरितांचा तिमिर नाहीसा होत होता. महान तपस्वी राजऋषी नवयुग परिवर्तनासाठी जणू आपल्या बाहूत विश्वंभराचे बळ प्रकटविण्याची विनंती करीत होता. प्रभूरामचंद्रांच्या चरणतीर्थरूपी अमृताचे आश्वासन युगप्रवर्तक प्रधानमंत्री मोदींच्या ठायी प्रेषित होत होते. हे केवळ तीर्थ नव्हते. परवशतेचे कातळी मेघ भेदून उद्ध्वस्त करण्यासाठी दिव्य अस्त्रेच जणू, महर्षी अगस्तिमुनी प.पू. स्वामी गोविंददेवगिरिजी महाराजांच्या रूपाने, प्रभूरामलल्लांच्या साक्षीने आणि आशीर्वादाने युगप्रवर्तकाच्या ठायी प्रकटवित होते. गत हजारो वर्षांची निःसहाय्यता, हतबलता, दुर्बलता, परवशता, न्यूनता मनामनातून नाहिशी करण्याचे सामर्थ्य त्या व्रत सांगता विधीमध्ये, विधात्याने अवगुंठित केले होते. प्रधानमंत्री नरेन्द्रांचा जणू कायापालट होऊन नवयुगसूर्याचा दिव्य प्रकाश प्रसारित करणारा राजऋषी पुन्हा नव्याने प्रकट होत होता!

प.पू. गोविंददेवगिरिजी महाराजांचे प्राकट्य, खचितच याच नवयुग प्रवर्तनाची प्रेरणा देण्यासाठीच झाले असावे! अमृतवाहिनी प्रवरेच्या धारा अधिक तेजाने झळाळत उचंबळून प्रवाहित होत होत्या. महर्षी अगस्तिमुनी कौतुकाने हा सोहळा पाहात होते. बिल्वतीर्थातून साधूवाद निनादत होते. कारुण्यमूर्ती केशवगोविंदांच्या नयनांतून आनंदोन्मिलित अश्रूधारा वाहात होत्या. शिवविष्णूंच्या साक्षीने प.पू. किशोरजी अर्थात गोविंददेवगिरिजी महाराजांच्या मुखाने युगप्रवर्तनाची ब्रह्मवाणी प्रकटली होती!

लोकसागरातून अवघ्या आसमंतात शब्द घुमत होते, जय श्रीराम! जय जय श्रीराम! उल्हसित, समाधानी आणि कृतज्ञतापूर्णतेने राष्ट्रयोगी प.पू. गोविंददेवगिरिजी महाराज जनसागराच्या आश्वासक भावफुलांचा वर्षाव मंचावरील युगप्रवर्तकांवर होत असल्याचा अनुभव घेत होते!

* *

# उपसंहार

'राष्ट्रयोगी' या ग्रंथातील लेखन, विभूतिमत्त्व प्रदर्शित करणारे आहे. 'राष्ट्रयोगी' हा ग्रंथ चरित्रग्रंथ नाही. चरित्रात्मक कादंबरीही नाही. कादंबरी तर नाहीच नाही. प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे विभूतिमत्त्व सिद्ध, सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोगी स्वरूपात, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना प्रतीत होत आहे. विभूतिमत्त्व म्हणजे केवळ व्यक्तिमत्त्व किंवा चारित्र्य एवढाच अर्थ नव्हे. 'विभूतिमत्त्व' या शब्दाच्या अर्थाला पवित्र आणि व्यापक छटा आहे. इंग्रजीमध्ये सांगायचे तर Holy or Sacred Personality अशी अर्थछटा 'विभूतिमत्त्व' या शब्दाला आहे. प.पू. स्वामींच्या 'सिद्ध सनातन हिंदू धर्म राष्ट्रयोगी' या विभूतिमत्त्वाचा प्रत्यय, वर्तमानातील व भविष्यातील सर्व वाचकांना घडावा असा या लेखनाचा प्रयत्न आहे. म्हणजे विभूतिमत्त्व दर्शन असे ग्रंथलेखनाचे स्वरूप आहे.

'योग' हा शब्द भारतीय परंपरेतील सर्वांना, तसेच आता जगातही बहुतेकांना परिचित आहे. असे असले तरी 'राष्ट्रयोगी' हा शब्द अर्थात विशेषण पारंपरिक परिचित नाही. राष्ट्र निर्मितीसाठी, संरक्षणासाठी, वैभवसंपन्न करण्यासाठी आपल्या जीवन-कर्म-सारणीत संकल्पपूर्वक साधना करणारी, साधना सिद्ध झालेली व्यक्ती राष्ट्रयोगी होय.

सनातन हिंदूधर्मराष्ट्रयोग-विचार म्हणजे, वेदान्तानुसार, सर्वांभूती परमेश्वर या श्रद्धेने; मानवतेच्या स्वाभाविक, समावेशक, सहिष्णू प्रेममूलक कारुण्यभावाने; सर्वात्मक, समानमनस्क मानवी समूहाचा; अर्थात प्राप्तकाळी भारतीयांचा, स्थलकालपरिस्थितीनुसार, लौकिक तथा भौतिक आणि पारलौकिक तथा आध्यात्मिक, असा द्विविध, एकात्मक जीवनशैलीविचार होय. या स्थायी

भावाने, प्रथम हिंदूराष्ट्र तथा भारतराष्ट्र, हे, सर्व मतप्रवाह समावेशक, समन्वयक, स्वयंशासित, स्वयंसंरक्षित, परमवैभवसंपन्न असे स्थिर अजेय, अशा प्रकारचे राष्ट्र उभे करून; अखिल विश्वात्मक राष्ट्र, जीवनशैली अनुसरणात्मकतेने आविष्कृत करण्याचा; वैश्विक बंधुभावात्मक योग तथा वर्तनशैली तथा सारणी विचार अनुसरण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेतील, वर्तमानातील पहिला टप्पा म्हणजे हिंदूराष्ट्र तथा भारतराष्ट्र आदर्शवत आणि अजेय स्वरूपात उभे करणे होय.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज असे राष्ट्र उभे करण्यासाठी जीवनभर व्रतस्थतेने, तळमळीने, सिद्ध प्रज्ञेने कार्यरत आहेत. त्यांच्या समग्र आविष्कारातून, सर्वांना याची प्रतीति येत आहे.

हे विभूतिमत्त्व, द्वादश भागात, वैशिष्ट्यपूर्ण पैलूंवर प्रकाश टाकीत, प्रदर्शित करण्याचा नम्र प्रयत्न आहे.

सुरुवातीला पवित्र तीर्थस्थळी आणि भागवतकथा, भगवद्गीता, रामकथा, महाभारतकथा ज्ञानयज्ञ मांडण्याची परंपरा असलेल्या पवित्र कुळात पू. स्वामींचे तथा 'अवतरण किशोरांचे' कसे झाले याचे वर्णन केले आहे. त्याच कुळातील विद्याभ्यासाची, पौरोहित्याची, ज्योतिर्विज्ञानाची परंपराही निवेदित केली आहे. द्वितीय भागात, किशोरजी व्यासांच्या शैशवापासूनच्या लीलांमधून, त्यांच्या ठायी राष्ट्रप्रेम आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या साधनेचे स्फुल्लिंग कसे प्रकटले याचे प्रसंगांतून वर्णन येते.

'अभ्यासूनि प्रकटावे' या तिसऱ्या उल्लेखात किशोरजींची अभ्यासू वृत्ती, सनातन भारतीय ज्ञानपरंपरेची ओढ, तत्त्वज्ञान विद्यापीठातील आणि काशी क्षेत्रीच्या ज्ञानसाधनेची कथा वर्णन केली आहे. बालवयातच दिव्य प्रज्ञा प्रकटलेले किशोरजी आचार्य किशोरजी कसे झाले आणि त्यांची अखंड अध्ययन साधना सुरू असतानाच राष्ट्रयोगी म्हणून व्यक्तित्त्व कसे उदयाला येत होते याची हकिकत येते. त्यांच्यातील दिव्यत्वाची प्रचिती सर्वांना कशी येत होती; याचे निर्देशनही घडते.

चवथ्या उल्लेखात कथा ज्ञानयज्ञाच्या माध्यमातून लोकसंग्रह करीत, राष्ट्रीय जाणिवेने जागरण, प्रबोधन करण्याचा तसेच आध्यात्मिक आणि भौतिक उन्नती करू इच्छिणाऱ्या प्रेमी भक्तांना नेमके श्रद्धापूर्ण मार्गदर्शन करीत, अनुग्रहित करण्याची प्रक्रिया किशोरजींच्या विभूतिमत्त्वामधून कशी होत होती, यासंबंधातील

घटना, प्रसंग, कथा निवेदित झाल्या आहेत.

पू. किशोरजी व्यास यांना अध्यात्मिक क्षेत्रात आणि सनातन हिंदूराष्ट्र-पुनरुत्थान कार्यासाठी लाभलेल्या दिव्य, पवित्र गुरुपरंपरेचे वर्णन करून आध्यात्मिक तथा राष्ट्रीय संवेदना या दोन्ही क्षेत्रात पू. किशोरजी योगी म्हणून कसे सिद्ध होत होते याचे वर्णन आले आहे. त्याचबरोबर सहाव्या भागात, 'राष्ट्रयोग विचार' या वैचारिक व्यूहाचे संकल्पना स्पष्टीकरण करून; आचार्य किशोरजी व्यास तथा पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराजांचा 'सिद्ध राष्ट्रयोगी' असा आविष्कार जनमानसात कोणत्या प्रकारे घडतो याचे दिव्य दर्शन घडते.

संत, तत्त्वज्ञ, कवी अशा त्रिविध प्रकारे पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचे विभूतिमत्त्व, त्यांच्या कथाज्ञानयज्ञातून, प्रवचनांतून, व्याख्यानांमधून प्रासंगिक भावोत्कट मनोवृत्तीतून कसे प्रकटते; तसेच ते त्यांच्या समग्र वाङ्मयातून कसे अनुभूत होते याची साधार चर्चा सातव्या उल्लेखात येते. त्यांचे लक्षणीय बहुषाभाप्रभुत्व, श्रोत्यांना कसे अनुभूत होते याची चर्चाही या भागात होते.

पू. स्वामी गोविंददेव गिरि गेली पन्नास वर्षे कथाज्ञानयज्ञातून आविष्कृत होत आहेत. रंजकता, संगीतबद्धता, नाट्यमयता या मंचीय कलात्मकतेबरोबरच; प्रपंच आणि परमार्थ, मानवमात्र आणि सनातन हिंदूधर्मराष्ट्र-पुनरुत्थान या दृष्टीने उद्‌बोधक प्रबोधन करीत ते जनजागरण करीत असतात. सात्त्विकता, समन्वय आणि सामंजस्य याबरोबरच सामरस्य या मानवी एकात्मतेसाठी आवश्यक गुणांचाही ते प्रबोध करतात. श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान, धर्म, अर्जुन, ज्ञानेश्वर, संत स्वामी समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद या विभूतिमत्त्वासह व्यास, वाल्मिकींपासून समस्त ऋषिकुलांच्या कार्याची महानता आणि सांस्कृतिक महत्ता उद्‌घटित करतात.

श्रीमद् भागवत, देवीभागवत या महापुराणांसह श्रुति, स्मृति, पुराणे आणि संतवाङ्मय यांचा स्थलकालपरिस्थितीशी अनुबंध जोडून विवेक आणि पुरुषार्थ संपादण्यासाठीचा प्रबोध करतांना माउलीच्या ममतेने पू. स्वामी श्रोत्यांना जागवितात.

त्यांचा हा ज्ञानयज्ञ देशविदेशात सुरू आहे. इतिहासाच्या पायावर भविष्याची इमारत वर्तमानात कशी उभी करावी याविषयी द्रष्टेपणाने त्यांचे विवेचन आणि प्रबोधन सुरू असते. भौतिक अभ्युदयाबरोबर आध्यात्मिक शांती हवी यासाठी

संयम, विवेक आणि सामंजस्य यांविषयी उद्‌बोधन करीत ते भगवद्‌गीता, योगवासिष्ठ, ब्रह्मसूत्रे, दासबोध यांविषयीची प्रवचने प्रसृत करतात. सामान्य समाजातून राष्ट्रयोग साधक उभे राहावेत यासाठी त्यांची तळमळ असते.

ज्ञानयज्ञ स्वरूपातील वाक्‌यज्ञ आणि त्याआधारे सर्वांसाठी प्रेरक ठरणारे वाक्‌यज्ञाचे लिखित रूप असे समग्र वाङ्‌मय ही जशी पू. स्वामी गोविंददेव गिरि तथा पूर्वाश्रमीचे किशोरजी व्यास यांची वाङ्‌मयमूर्ती आहे, तशीच त्यांच्या ज्ञानवान कर्मयज्ञातून म्हणजे महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान, श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुलच्या माध्यमातून सुरू असलेली सेवा ही सनातन हिंदूधर्मराष्ट्र–पुनरुत्थानप्रक्रियेतील राष्ट्रयोगी पू. स्वामींची कार्यमूर्ती आहे.

'वेदश्री तपोवन' ही संकल्प कार्य योजना म्हणजे, सनातन भारतीय राष्ट्राच्या संवेदनांचे मूर्त रूप म्हणावे लागेल. सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्धपणाने कार्यरत असलेल्या राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि तथा आचार्य किशोरजी व्यास यांनी संघटित आणि संचालित केलेला गीता परिवार म्हणजे या राष्ट्रयोग्याची संस्कारसाधना–मूर्तीच होय.

सिद्धराष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी आपल्या तत्त्वज्ञान आणि संस्कार साधनेतील कार्यकर्ते तथा सेवासाधकांसाठी पंचसूत्र दिले आहे– भगवद्‌भक्ति, भगवद्‌गीता, भारतमाता, विज्ञानदृष्टी, स्वामी विवेकानंद – या पंचसूत्रीने संस्कार सिद्ध बालके हे उद्याचे राष्ट्रयोगी घडतील असा पू. स्वामींचा दृढ विश्वास आहे.

**राष्ट्र की अट्टालिका हो विश्व में सर्वोच्च अनुपम,**
**गोद में होते क्रियान्वित प्रगतिके सोपान उत्तम ।**
**किन्तु हर निर्माण के हित ईट पक्की ढालना है,**
**हर सुमन को साद जल से पूर्ण विकसित पालना है ।**
**लोकमन संस्कार करना यह परमगति साधना ।।**

पू. स्वामींच्या राष्ट्रयोगी विभूतिमत्त्वाचा आविष्कार श्रीराम, श्रीकृष्ण, माउली ज्ञानेश्वर महाराज, समर्थ स्वामी रामदास, स्वामी विवेकानंद आणि माँ भगवती यांच्या सदैव चैतन्यशाली दिव्य प्रेरणेने घडतो आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची दृष्टी आणि सृष्टी हे ध्येय उराशी ठेवून राष्ट्रयोगी पू. गोविंददेव गिरि महाराजांचा पवित्र संचार नित्य सुरू आहे.

प्रभू रामचंद्र हे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे राष्ट्रपुरुष होत हे रामतत्त्व मानवमात्रांत जागविण्यासाठी अयोध्येत श्रीरामलल्लांच्या जन्मभूमिमंदिर स्वरूपात राष्ट्रमंदिराची उभारणी झाली पाहिजे, असा गेली चाळीस वर्षे ध्यास घेऊन भारतमाता पुन्हा परमवैभवाप्रत नेऊन; विश्वगुरुत्वाने प्रकटली पाहिजे; यासाठी अथक प्रयत्न सुरूच आहेत.

आध्यात्मिक शांती, भौतिक अभ्युदय, समत्व आणि सामरस्यपूर्ण जागृत मन, विश्वबंधुत्वदृष्टीने कर्तव्यकर्मसारणी निर्माण करण्यासाठी; सिद्ध राष्ट्रयोगी पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज; श्री ज्ञानेश्वर-पदाश्रिततेने आणि श्रीरामचरणी समर्पिततेने अविरत राष्ट्रयोग समाधीमग्नतेने आविष्कृत होत आहेत.

**असू आम्ही सुखाने पर्थर पायातील**
**मंदिर उभविणे हेच आमुचे शील !**

अशी प्रेरणा देत हा नंदादीप सतत उजळत आहे! ''हा असाच तेवत जगी निजप्रकाश नित देणार!''

* *

# परिशिष्टे

## धर्मश्री प्रकाशन

## (मराठी)

| क्र. | विवरण | मूल्य |
|---|---|---|
| ०१) | श्रीराम कथामृत | २५० |
| ०२) | अभंग धर्म्मपद | १०० |
| ०३) | सार्थ संक्षिप्त दासबोध | १०० |
| ०४) | भगवान महावीर | ८० |
| ०५) | राजविद्या | ७० |
| ०६) | वेळेचं यशस्वी व्यवस्थापन | ६० |
| ०७) | वेदान्त आणि पुरुषार्थ | ५० |
| ०८) | गुलाब गीते | ५० |
| ०९) | संस्कार प्रेरणा | ५० |
| १०) | जीवन संग्रामातील विजय रथ | ६० |
| ११) | खेळांचा खजिना | ५० |
| १२) | संस्कार सुमन | ५० |
| १३) | संस्कार सुधा | ५० |
| १४) | व्यक्तिमत्त्व विकास | ५० |
| १५) | मेंदू बनवा सुपर फास्ट | ४० |
| १६) | प्रभावी भाषण कसे कराल? | ३० |
| १७) | रामकथा नवनीत | ३० |
| १८) | मी आणि माझा परिवार | २० |
| १९) | अपूर्व गुरु शिष्य दर्शन | २० |
| २०) | परमार्थ आणि मनःशांती | २० |
| २१) | पूर्णादर्श हनुमान | २० |
| २२) | भागवत विहंगम दर्शन | २० |
| २३) | शिवप्रेरणा | १५ |

| | | |
|---|---|---|
| २४) | विश्वबंधुत्व | १५ |
| २५) | चतुर्दशीचा चंद्र | १० |
| २६) | राष्ट्रगुरू | १५ |
| २७) | विद्यार्थी मित्रांनो | १० |
| २८) | यशस्वी अभ्यासाची दिशा | १० |
| २९) | योगवासिष्ठ कथा | ६५० |
| ३०) | सुगम कर्मयोग | ३० |
| ३१) | कर्तव्यबोध | २० |
| ३२) | गंमत-गणित | १०० |
| ३३) | जीवन कला | २० |
| ३४) | मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार | २० |
| ३५) | प्रबोधनकारांचा स्वधर्म | २० |
| ३६) | भारतीय प्रबंधन शास्त्र | २० |
| ३७) | शिव सृष्टी-शिव दृष्टी | २० |
| ३८) | युवकांसाठी संस्काराची नवी दि | १० |
| ३९) | आचारधर्म | १०० |
| ४०) | मी आणि माझा देश | १० |

---

# (हिन्दी)

| क्र. | विवरण | मूल्य |
|---|---|---|
| ०१) | भजन गंगा | १० |
| ०२) | राष्ट्रगुरू | १५ |
| ०३) | विश्वबंधुत्व | १५ |
| ०४) | मै और मेरा परिवार | २० |
| ०५) | वेदों का अपौरुषेत्व | २० |
| ०६) | मानस रत्नमाला | २० |
| ०७) | युव-उद्‌बोधन | २० |
| ०८) | विजय रथ | २० |
| ०९) | विद्यार्थी मित्रक्षों... | २० |
| १०) | शांत जीवन | २० |
| ११) | सफल जीवन | २० |
| १२) | शिवप्रेरणा | २० |
| १३) | संस्कार पाथेय | ५० |
| १४) | पूर्णयोग बोधिनी गीता | ५० |
| १५) | श्रीमद्‌ भागवत कथा सारामृत | ५० |
| १६) | कार्यकर्ता सह-चिंतन | ५० |
| १७) | स.म. गुलाबराव महाराज | ६० |
| १८) | यज्ञमय जीवन | ६० |
| १९) | साङ्‌गवेद परिचय | ८० |
| २०) | १३० ग्रंथों का सार | १०० |
| २१) | सार्थक जीवन | २० |
| २२) | मै और मेरा देश | २० |
| 01) | Universal Brotherhood | 40 |
| 02) | The Bhagavad Gita | 40 |
| 03) | Reflection of Jnaneshwari | 60 |
| 04) | A Path Towards Success | 20 |
| 05) | Success Strateies for students | 20 |

# धर्मश्री प्रकाशन

## (मराठी)

| क्र. | विवरण | भाषा | भाग | प्रकार | मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | भागवत कथा - रावेत | मराठी | 7 | DVD | 420 |
| ०२) | भागवत कथा - रावेत | मराठी | 1 | MP3 | 60 |
| ०३) | ज्योतिष्य शास्त्र | मराठी | 1 | MP3 | 60 |
| ०४) | श्रीरामकथा ज्ञानयज्ञ | मराठी | 5 | DVD | 300 |
| ०५) | श्री दत्त महात्म्य | मराठी | 3 | DVD | 180 |
| ०६) | स्वामी विवेकानंद कथा | मराठी | 1 | MP3 | 60 |
| ०७) | तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार | मराठी | 1 | MP3 | 60 |
| ०८) | दासबोध | मराठी | 1 | MP3 | 60 |
| ०९) | विजय रथ | मराठी | 1 | MP3 | 60 |

### (हिन्दी)

| क्र. | विवरण | भाषा | भाग | प्रकार | मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | भरत चरित्र | नागपूर | हिन्दी | 16gbP.D. | 1100 |
| ०२) | दासबोध कथा | नागपूर | हिन्दी | 16gbP.D. | 1100 |
| ०३) | श्री हनुमान कथा | मुंबई | हिन्दी | 16gbP.D. | 1100 |
| ०४) | अमृत वर्षा | अमरावती | हिन्दी | 16gbP.D. | 1100 |
| ०५) | शिवपुराण (मराठी) | काठमांडू | मराठी | 16gbP.D. | 1100 |
| ०६) | श्री देवी भागवत कथा | इगतपुरी | मराठी | 16gbP.D. | 1100 |
| ०७) | गीता कथा - २०१८-१ | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| ०८) | गीता कथा - २०१९-२ | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| ०९) | योगवासिष्ठ कथा भाग १ | मुंबई | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १०) | योगवासिष्ठ कथा भाग २ | मुंबई | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| ११) | महाभारत संदेश कथा | पोरबंदर | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२) | संत गुलाबराव महाराज चरित्र | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १३) | गीता साधना शिबीर-२०१९ | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १४) | गीता साधना शिबीर-२०१८ | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १५) | श्री गीता कथा OTG | स्वर्गाश्रम | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १६) | श्री संत कथा | | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १७) | भक्ती योग | | हिन्दी | 32gbP.D. | 1400 |
| १८) | पू. स्वामीजी - भजन | | हिन्दी | 8gbP.D. | 900 |
| १९) | नागपूर प्रवचन - २०१९ | | हिन्दी | 16gbP.D. | 1100 |
| २०) | श्रीमद् देवीभागवत कथा | | हिन्दी | 64gbP.D. | 1700 |

---

## गीता परिवारद्वारा प्रकाशित पुस्तके

(१) संस्काराचे मूलमंत्र (२) संस्कार प्रेरणा (३) मी आणि माझा परिवार (मराठी व हिन्दी) (४) मी आणि माझा देश (मराठी व हिन्दी) (५) तुम्हीच उद्याचे शिल्पकार (६) विद्यार्थी मित्रांनो (७) बाल संस्कार पाठमाला (८) शिवप्रताप (९) गीत विनायक (१०) संस्कार ज्योति (हिन्दी) (११) संस्कार सुधा (मराठी व हिन्दी) (१२) संस्कार सुमन (मराठी व हिन्दी) (१३) युवा स्फूर्ति (१४) संस्कार सुगंध (१५) संस्कार धन (१६) संस्कार महोत्सव (१७) दैनंदिन जीवनात गीता (१८) खेळांचा खजिना (१९) हसा नाचा खेळा (२०) मस्तिष्क संवर्धन एवं योगमय व्यवहार (२१) संस्कार पाथेय (२२) यशस्वी अभ्यासाची दिशा (२३) संस्कार साधना (मराठी व हिन्दी) (२४) जन्मदिन व नामांजली (२५) शिवप्रेरणा (मराठी व हिन्दी) (२६) विद्यार्थी मित्रहो (२७) संत संस्कार (२८) कसे जगावे जीवन? (२९) विजयरथ (३०) परमार्थ आणि मनःशांति (३१) युव उद्बोधन (३२) पूर्णादर्श - श्रीहनुमान् (३३) प्रभावी भाषण कसे करावे (३४) मेंदू बनवा सुपरफास्ट (३५) शिवदृष्टी व शिवसृष्टी (३६) जीवन संग्रामातील विजय (३७) वेळेचं यशस्वी व्यवस्थापन (Time Management) (३८) सुशिक्षितांचा कर्तव्यबोध (३९) गंमत गणित (४०) चला घडवुया व्यक्तिमत्त्व विकास (४१) भारतीय प्रबंधन शास्त्र (४२) सुखी जीवन (४३) सफल जीवन (४४) शांत जीवन (४५) सार्थक जीवन (४६) आनंदमय जीवन (४७) माझा अभिमन्यू (४८) युवाओं के लिए संस्कारों की नई दिशा (४९) Me & My Nation.

* *

# स्वामी गोविंददेव गिरि
# (श्री आचार्य किशोरजी व्यास)
# वंश वेल

श्री बालमुकुंदजी

- श्री त्र्यंबकराज
- श्रीधर
  - श्रीमदनगोपालजी (पत्नी सौ. गुलाबदेवी)
    - मथुरा
    - हरिप्रसाद
    - शांता
    - श्रीवल्लभ
    - **श्रीकिशोरजी**
    - रमाकांत

# राममंदिर विश्वस्त मंडळ

| | | |
|---|---|---|
| (१) | महंत नृत्यगोपाल दासजी महाराज | अध्यक्ष |
| (२) | स्वामी गोविंद देव गिरिजी महाराज | खजिनदार |
| (३) | श्री चम्पत राय | जनरल सेक्रेटरी |
| (४) | श्री नृपेंद्र मिश्रा | अध्यक्ष, बांधकाम समिती |
| (५) | श्री के पारासरन | सदस्य |
| (६) | स्वामी वासुदेवानंद सरस्वतीजी महाराज | सदस्य |
| (७) | स्वामी विश्व प्रशन्नतीर्थजी महाराज | सदस्य |
| (८) | युगपुरुष परमानंद गिरिजी महाराज | सदस्य |
| (९) | श्री विमलेंद्र मोहन प्रताप मिश्र | सदस्य |
| (१०) | डॉ. अनिल मिश्र | सदस्य |
| (११) | श्री. कामेश्वर चौपाल | सदस्य |
| (१२) | महंत दिनेन्द दासजी | सदस्य |
| (१३) | श्री ज्ञानेश कुमार | सदस्य |
| (१४) | श्री अवनीश अवस्थी | सदस्य |
| (१५) | श्री अनुज झा | सदस्य |